म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक एक पुणेकर

सन

…ालय क्रमांक

पुस्तकाचें नांव जुना वाडा - अंगरखा

प. आजारावप्रेशवे यां … कारकीर्दी

# …तिहासिक …दंबरी,

… IN INDIA

एका पुणेकरानें केलेली.

वचनः—

लीलालुण्ठितशारदापुरमहासम्पद्भराणां …
…द्यासद्मविनिर्गल… …दन्ताबिला… …
… च सुखेन मूर्द्धसुपदं धास्यन्ति शालाटकाः
जगन्नाथराय.

केली.

…R.

कादं…

मंत बाजीराव (थोरले) पेशवे

यांचे

कालीन अधिकाऱ्यांचे, मन्त्र्यांचे, व रण-
शूर सरदारांचे वंशजांस

ह्मणजे

आर्यभूमींतील साम्प्रतकालीन राजे रजवाडे,
व संस्थानिकांस

ही अल्पसेवा

परमादरानें

ग्रंथकर्त्यानें समर्पण केली आहे.

# उपोद्घात.

श्री हेज़् रॉयल हायनेम् प्रिन्स ऑफ वेल्स यांची स्वारी ...स सन् १८७५ सालीं आली होती. त्यावेळीं जो अ-
...न महोत्सव झाला तो पाहण्याकरितां मी मुद्दाम मुंबईस
...ं होतों. तेव्हां ( कैलासवासी ) विष्णु परशुराम शास्त्री
समर्त यांणीं, गणेश वासुदेव जोशी प्रभृति सार्वजनिक स-
...ा पुढाऱ्यांच्या मदतीनें, गिरगांवांत इंदुप्रकाश छापखा-
...चे इमारतींत, मुंबईस जमलेल्या राजेरजवाडे व संस्थानि-
...ा, लहानसा दरबार भरवून, पान सुपारी देण्याचा समा-
...केला होता. त्याचा मुख्य हेतु शास्त्रीबुवानीं असा व्यक्त
या...ग होता कीं " या हिंदुस्थान देशांतील राजे, रजवाडे,
...थानिक व इतर विद्वान आणि वजनदार लोक जर ए-
...ा जमून परस्परांच्या सुखदु:खाचा विचार करतील तर
...रोखर या हिंदुस्थानचें सर्व प्रकारें कल्याण होईल." त्या
...संगास, शास्त्रीबुवानीं जमलेल्या लोकांस जो सदुपदेश केला
...ा ऐकून माझे मनावर तरी एकप्रकारचा चांगला ठसा उ-
...टला आणि देशसेवेचें काम यथावकाश व यथाशक्ति क-
...ण्याचा मी निश्चय केला.

... त्यासमयास, ' इंदुप्रकाश ' पत्राचे एका अंकांत ' धाव-
...ीचे साधुपुरुष व श्रीमंत बाजीराव पेशवे ' यांच्या मुला-
...े संबंधाचा मजकूर प्रसिद्ध झाला. तो अंक व मजकूर

मी शास्त्रीबुवांस वाचून दाखवीत असतां त्याणीं मला सांगितलें कीं ' हा मजकूर जमेस धरून जर थोरले बाजीरावांचे कारकीर्दीबद्दल सर वॉल्टर स्कॉटच्या पद्धतीवर मराठींत कादंबरी लिहिलीस तर त्या भाषेंत नवीन पद्धतीचा ग्रंथ होऊन शाळेंतील मुलांचे मनावर त्या काळचें इतिहासाचें चित्र अनायासें चांगलें उमटेल. ' हें बोलणें होऊन मी कऱ्हाडास परत गेलों. तों याच संबंधाची ऐतिहासिक कादंबरी लिहिणारास, ग्रंथ पसंत पडल्यास, ४०० रुपये बक्षीस देण्यांत येईल ह्मणून पुण्यांतील दक्षिणाप्राइझ कमीटीची जाहिरात प्रसिद्ध झालेली पाहिली. असें जास्त उत्तेजन मिळाल्यावर फुरसदीप्रमाणें मीं हा ग्रंथ लिहिला आणि सदर्हू कमीटीकडे परीक्षणार्थ रवाना केला.

२ सदर्हूकामिटीकडे माझे ग्रंथाशिवाय आणखी तीन ग्रंथ आले होते. पैकीं ' क ' आणि ' ड ' संज्ञेचे ग्रंथ सर्व परीक्षकांचे मतानें टाकाऊ ठरले व बाकी राहिलेल्या ' अ ' आणि ' ब ' मधील गुणांची परीक्षा होऊन मला रुपये ४०० चें बक्षीस मिळालें.

३ पुढें साहा महिन्यांनीं सदर्हू कमीटीचे सेक्रेटरी याणीं मला असें कळविलें कीं तुमचे पुस्तकांतील धावडशीचे साधुपुरुषाचें वर्णनामुळें गैरसमज होऊन तुह्मास बक्षिस देण्यांत आलें होतें. त्यावरून मी ती बक्षिसाची रक्कम परत केली आणि तें बक्षिस मिस्तर नागेशराव विनायक बापट [illegible] नामक बाजीराव चरित्राचे कर्ते यांस देण्यांत आलें. [illegible] ' ब ' नांवाचा माझा ग्रंथ परत देण्यांत आला.

४ नतर कांहीं दिवसांनीं मिस्तर बापट यांचा ग्रंथ मुंबईचे रा. जावजी दादाजी निर्णयसागर छापखान्याचे मालक यांणीं प्रसिद्ध केला; आणि मी आपला ग्रंथ आजपर्यंत तसाच शेल्फमध्यें ठेऊन दिला होता. कारण मिळालेले पैसे परत दिल्यावर पुन: घरांतून पैसे मागून घेऊन तो छापून प्रसिद्ध करणें मला प्रशस्त वाटलें नाहीं.

५ आतां सदर्हू ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचीं कारणें मुख्यत्वें हीं झालीं:—

(अ) जगाचा क्षणभंगुरपणा मनावर अतिशय ठसला व आपली कृति जगापुढें ठेवावी, तिचा होणें असेल तो उपयोग होईल असें वाटलें;

(ब) हल्लीं दोन पैसे देवाच्या दयेनें मिळत असल्याकारणानें जरी कदाचित् हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्यांत तोटा झाला तरी तो सोसण्याची ताकद आहे;

(क) दक्षिणाप्राइझ कमीटीची परीक्षा चुकीची झाली असावी असें संभवतें. कारितां मिस्तर बापट यांणीं केलेलें चरित्र व मी रचलेली कादंबरी, यांपैकीं "ऐतिहासिक कादम्बरी" या नात्यानें कोणता ग्रंथ उत्तम आहे याची खरी परीक्षा विद्वज्जन करतील;

(इ) कैलासवाशी विष्णुशास्त्रीबुवानीं सन् १८७५ सालांत युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या आगमनाचे वेळीं जी इच्छा प्रदर्शित केली व छोटेखानी दरबार भरवून अंशत: अमलांत आणली, ती हल्लीं सन् १८८९ सालांत, त्याच भावीराजाचे पुत्रागमनाचे संवत्सरामध्यें, मुंबईस येत्या दिसेंबरांत भरणारे कांग्रेसच्या सभेमुळें

पुष्कळ अंशानें अमलांत येत आहे. त्या अर्थीं अशा सुसमयास पुस्तक प्रसिद्ध करून जो नफा होईल तो कांग्रेसच्या खर्चासाठीं द्यावा असें मनांत आलें.

अशा प्रकारचे विचार मनांत येऊन हा ग्रंथ मी छापून प्रसिद्ध केला आहे, व ज्या बाजीरावाचे पराक्रमानें पूर्वी मोठमोठ्या ऐतिहासिक गोष्टी घडून आल्या त्याच्या व त्याच्या सरदारांच्या वंशांपैकीं विद्यमान पुरुषांस मोठ्या नम्रपणें समर्पण केला आहे. आतां त्याचा बहुमानानें स्वीकार करणें त्यांच्या मर्जीवर अवलंबून आहे.

६ हें पुस्तक लिहिलें तेव्हां मी २० । २१ वर्षांचा असून अध्ययन करणाऱ्या वर्गांत मोडत असे. मिस्तर नागेशराव बापट, प्रतिस्पर्धी, हे तेव्हां कानडादेशांत डेपुटी एजुकेशनल इन्स्पेक्टर होते असें स्मरतें. मिस्तर बापट यांणीं बखरीच्या धर्तीवर चरित्र लिहिलें आहे. दक्षिणाप्राईझ कमीटीच्या जाहिरातीस अनुसरून मी ऐतिहासिक कादंबरी लिहिलेली आहे. सदर्हु कमिटीच्या परीक्षकांपैकीं ज्यांचे अभिप्राय मि० बापट यानां अनुकूल होते ते त्यानीं दिले आहेत व माझ्या तर्फेचीं मतें व जाहिरातीपैकीं उतारा मी हीं प्रसिद्ध केलीं आहेत. आतां वाचकांस विनंती एवढीच कीं ज्यानीं त्यानीं आपापला स्वतंत्र अभिप्राय होऊं द्यावा आणि तो तसाच प्रसिद्ध करावा. कविकुलगुरु कालिदासाचें 'मालविकाग्निमित्र' नाटक प्रथमच त्याणीं जगापुढें मांडलें तेव्हां, **पुराणमित्येव न साधु सर्वं । नचापि काव्यं नव मित्यवद्यं ॥ संतः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते । मूढःपरप्रत्य-**

नेयबुद्धिः ॥ असें मत प्रदर्शित केलें आहे, तें ध्यानांत धरून ग्रंथकर्त्याच्या गुणांची पारख झाली पाहिजे.

७ ग्रंथ लिहिला त्या वेळची भाषा जशीची तशीच मी कायम ठेविली आहे. साऱ्या पुस्तकाची छपाई फारच होऊंलागली व कांहीं मजकूर न छापला तरी ग्रंथ अपुरा दिसणार नाहीं असें वाटल्यावरून कांहीं भाग अजीबात गाळले आहेत. आणि ज्या धावडशीकर साधु पुरुषाचे मजकुरामुळें इतका ब्रह्मघोटाळा झाला तो भाग मिस्तर बापट यांच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाला आहेच. करितां माझ्या पुस्तकांत तो पुनः घेतला नाहीं.

८ हा ग्रंथ वाचून वाचणाराच्या मनांत देशाभिमान थोडा जरी उत्पन्न किंवा प्रदीप्त झाला तरी ग्रंथकर्त्याचें श्रमाचें चीज होईल.

९ मात्र जो खरा देशाभिमानी आहे त्यानें इतकें पूर्ण लक्ष्यांत वागविलें पाहिजे कीं देशाचा ऊर्जितकाळ होण्यास कालमानानुरूप ऊपाय योजिले पाहिजेत.

१० बाजीरावाचे मनुहून आतांचा मनु बदललेला आहे. आपला संबंध पाश्चिमात्य सुधारलेल्या राष्ट्राशीं आहे. हल्लींच्या सुधारणेच्या शतकांत ज्या योग्य त्याच तजविजी केल्या पाहिजेत. फक्त गोब्राह्मणांचा प्रतिपाल करण्यासाठीं जर बाहूबलाचे जोरावर पुनः पेशवाई स्थापन करूं ह्मणून कोणी हिंदु समजत असेल; किंवा पुनः दिन् दिन् करून हा सारा देश पादाक्रांत करण्याचें जर कोणी मुसलमान मनांत आणीत असेल; किंवा युरोपियनांचें रक्त आमचे अंगांत खेळत आहे त्यामुळें अखेर आह्मी सत्ताधीश होऊं ह्मणून जर कोणी युर-

शियनाचे मनांत विचार घोळत असेल; अथवा तरवारीचे जो-
रावर जिंकलेलें राज्य तरवारीच्या तीक्ष्णधारेच्या भीतीनें आह्मी
राखूं ह्मणून जर कोणी घमंडी मारीत असेल, तर त्या लोकांचा
हा समज निव्वळ चुकीचा होय. त्यानीं स्वप्नांतरीं तशारीतीनें
वरळूं नये व कृति करूं नये.

११ नामदार लॉर्ड रे मुंबई इलाख्याचे न्यायी गव्हर्न-
रसाहेब बहादूर यांची स्वारी कांहीं वर्षांपूर्वी सोलापूरास
आली होती तेव्हां त्याणीं स्पष्ट ह्मणून दाखविलें कीं इंग्र-
जसरकारचें राज्य जोंवर प्रजेच्या अंत:करणरूपी किल्ल्यावर
स्थापित राहील तोंवर तें बिनधोक चालेल. व सर्व राजका-
र्यधुरंधरांचा अभिप्राय अशा प्रकारचाच आहे.

१२ सामाजिक, व्यावहारिक अथवा दुसऱ्या इतर सु-
धारणा प्रजाजनांनीं सामर्थ्यानुरूप चालविल्या आहेतच. प-
रंतु राष्ट्रीय सुधारणा होण्यास सन् १८९८ सालांत आ-
पल्या परमदयाळू महाराणी व्हिक्टोरिया बाईसाहेबांनीं जो
जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे तो आपला ‘ म्याग्नाचार्टा ’
समजून तो पूर्णपणें अमलांत येई अशा कायदेशीर तजविजी
प्रत्येक राजनिष्ठ रयतेनें केल्या पाहिजेत. हल्लीं कांग्रेसच्या
सभा भरतात त्यांत हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या व वर्णांच्या
प्रजाजनांनीं आपापले प्रतिनिधी पाठविले पाहिजेत, इतकेंच
नव्हे, तर राजे रजवाड्यांनीं, संस्थानिकांनीं व सरदारांनीं सुद्धां
कोणाची भीड न धरतां, त्या सभेस प्रतिनिधी पाठविले पाहिजेत.
अशा रीतीनें एकत्र जमून सुखदु:खाचा विचार करण्याची संवय
आह्मां हिंदुस्थानवासी प्रजेस लागल्यावर सहजच या देशाची
“ पार्लमेंट सभा ” बनून येईल. ज्या दृढनिश्चयानें पूर्व-

कालीनलोकांनीं स्वराज्याचा पाया घातला, तशा निश्चयानें कांग्रेसचे कामीं प्रयत्न केल्यास परमेश्वर खचित् सिद्धी देईल. आणि कांहीं शतकेंपर्यंत दयाळु इंग्रजसरकारच्या आश्रयाखालीं सुधारणेचीं सर्व तत्वें शिकून तयार झाल्यास या हिंदुस्थान देशास अखेर खरें राष्ट्रत्व येईल. व हें आर्यावर्त सर्व प्रकारचें सुखाचें माहेरघर पूर्ववत् होईल. आणि असें झाल्यास, ज्या इंग्लंद देशाचें वर्चस्व सर्व शक्तिमान् प्रभूनें दूरवर नजर देऊन राखलें आहे, त्या इंग्लंद देशांतील लोकांनां देखील स्वतःच्या कृतीचें हें अमोल्य फल पाहून खरोखर धन्यता व कृतकृत्यता वाटेल यांत शंका नाहीं. कारण नामदार ब्याडला व केन. एम्. पीज्., व सर वुइलियम वेडरबर्न आणि मेसर्स यूल, ह्यूम व नार्टन, आणि दादाभाई नवरोजी व ब्यानर्जी प्रभृति विद्वान् व वजनदार मंडळी हल्लीं धूरीणत्व पत्करून खऱ्या कळकळीनें प्रयत्न करीत आहेत.

१३ पुण्यास श्रीमंत बाजीराव थोरले पेशव्यांचा वाडा आहे. तो वाडा **जुना वाडा** या नांवानें प्रसिद्ध आहे; व तेंच नांव चिरायू राखण्याचे हेतूनें या ग्रंथाचें नांव 'जुना वाडा' असें ठेविलें आहे. या वाड्याचे दिल्ली दरवाजाचा फोटोग्राफ काढवून या ग्रंथाचे पहिल्या पानावर वुडकट मध्यें त्याचें चित्र देण्याचा विचार होता, परंतु कांहीं अडचणीमुळें निरुपाय झाला याबद्दल दिलगिरी वाटते.

१४ शाळामास्तर, विद्यार्थी आदिकरून इतिहासप्रियलोकांनां सुलभ पडावें ह्मणून पुस्तकाची किंमत बरीच कमी केली आहे.

१५ हा ग्रंथ वाचून पाहून कांहीं सुधारणाकरण्याबद्दल ज्या मित्रमंडळीनीं सूचना केल्या त्यांचे, व हा ग्रंथ छापून शुद्धकरण्याची तसदी ज्यांनीं कृपाकरून घेतली त्यांचे ग्रंथकर्ता फार आभार मानीत आहे.

१६ या ग्रंथांत सर्व पात्रांची भाषा मराठी घातली आहे. मुसलमानी पात्रांस उर्दु किंवा हिंदी भाषेंत बोलूं दिल्यास पुस्तक वाचणाराचा रस भंग होतो. अशी कुरकुर, मी पूर्वी 'हंबीरराव आणि पुतळाबाई' नांवाचें अथवा 'सन् १८५७ सालच्या बंडाची धामधुम' चें पुस्तक एडिट् केलें तेव्हां ऐकली होती. तशा तक्रारीस जागा राहूंनये ह्मणून हल्लीं सरसकट एकाच भाषेचा उपयोग केला आहे.

१७ मी यथामती स्वभाषेची अल्प सेवा केली आहे. दोषाबद्दल क्षमा करून वाचक तिचा अंगिकार करतील अशी आशा ठेऊन ही प्रस्तावना पुरी करतों.

सोलापूर
ता. २४ माहे नवंबर
सन् १८८९.

**ग्रंथकर्ता.**

# OPINIONS.

The following are extracts from the opinions of Messrs. Ranade and Godbole, two of the then members of the Dakshina Prize Committee, in connection with the undersigned's competitive novel (marked B) as contrasted with that of Rao Saheb Nageshrao Bapat's marked A which is already before the public having been published, by Mr. Jawaji Dadaji of the Nirnaya-Sagar Press.

## RAO BAHADUR M. G. RANADE'S OPINION.

"I have read all the four manuscripts throughout with care. On the whole, I agree with the secretary's estimate of the worthlessness of the Biographies marked C and D and they must be put out of consideration. The contest really lies between the authors of A and B. The committee advertised for a novel illustrating Bajirao's times, not a biography of Bajirao. Viewed in the light of this requisition, I am inclined to place B on a higher level than the Secretary seems inclined to allow, and taken in connection with other merits, almost on an equality with A to which the Secretary adjudges the whole prize. As a matter of fact, the author of B alone understands the first necessities of a novel composition of the historical kind. The other attempts are all modelled after the fashion of Biographical memoirs or Bakhars. The author of B has avoided this error and confined himself for the

most part to a small portion of the hero's life and sought to suggest by its incidents, the leading characteristics of the men and the times he had to delineate. So far as the conception of the story is concerned, I think B ranks higher than A. The central incident of nearly the whole plot, the spiriting away of *Avadi* from the mogul Emperor's harem by Bajirao, though it has little signification in history, is still an allowable stretch of a novelist's licence and it derives a certain countenance from the fact that Bajirao did keep a Mahomedan concubine, and that he had children by her. In the hand of the author of B, this incident has been very skilfully contrived to serve several purposes. It brings the Nizam into disfavor with the Emperor and it enables Bajirao to see for himself the tottering condition of things in Delhi. The journey to and back from Delhi, full of perils and adventures, is itself very suggestive in its details. I do not agree with the Secretary's eulogies of the three days' speeches of Bajirao in A. I think they are failures. The old heroes of Marátha history never made long speeches lasting over days together. The speeches themselves are full of brag and bravado which had no counter part in actual history. The speeches in B, I think, are more true and lifelike than those in A. B's description of Delhi and its buildings possesses great merits."

## Mr. RAOJI SHASTRI GODBOLE'S OPINION.

"The author's descriptive powers seem to be con-

siderable. A few examples may be referred to, as follows :—

The description of the Darbar is very nice. The imbecility of a Maratha Prince is finely portrayed. Bajirao's speeches are very characteristic of his bold and frank disposition. The ignorance of political matters at the court of Delhi is graphically described. The demeanours of a mistress, and a wife on the occasion of the hero's being under constrained circumstances are beautifully contrasted. When Bajirao as a guest of Bapu Saheb in Delhi goes on an evening to see the various curiosities and wonders of the town, its lofty towers, magnificent palaces, splendid mosques, and many other gigantic public buildings exhibiting their artistic skill and strength of their materials, they are appropriately painted. By reading this description the reader is likely to be, reminded of the Palace of Vasantasená as described in *Mricchakatika* of Shudraka. Facility in novel writing is no doubt exhibited by the author."

# दक्षिणाप्राइज कमिटीच्या सभासदांचे अभिप्राय.

रा. रा. रावजी शास्त्री गोडबोले सेक्रेटरी यांचे अभिप्रायांतील अनुकूल उतारा:—( भाषांतर )

ग्रंथकर्त्याची वर्णन शक्ती बरीच दिसून येते. उदाहरणार्थ पहा:—

दरबारचें वर्णन सुरेख आहे. मराठी राजाचें मानसिक दौर्बल्य चांगलें साधलें आहे. बाजीरावाचीं संभाषणें त्याच्या धीट व निष्कपटी स्वभावास अनुसरून आहेत. दिल्लीच्या दरबारांतील राजकारणाबद्दलचें अज्ञान हुबेहुब वर्णिलेलें आहे. नायकाच्या संकटसमयीं प्रियपात्र व पत्नी यांच्या वर्तनांतील दिसणारें अंतर सुंदर रीतीनें दाखविलेलें आहे. दिल्लींत बापूसाहेबाचा पाहुणा असतानां, एके दिवशीं सायंकाळीं बाजीराव, शहरांतील नानाप्रकारच्या गमती व प्रेक्षणीय गोष्टी, व उंच मनोरे, मोठमोठ्या हवेल्या, व भव्य मशीदी, आणि कारागीरीचें कौशल्य व भक्कमपणा व्यक्त करणाऱ्या दुसऱ्या टोलेजंग सार्वजनिक इमारती, पाहण्यास जातो तेव्हांचें चित्र जसेंचे तसें रेखलेलें आहे. हें वर्णन वाचून, वाचकास शूद्रक कवीकृत मृच्छकटीक नाटकांतील वसन्तसेनेच्या महालाची आठवण बहुधा होईल.

कादम्बरी लिहिण्याची शैली, खरोखर, ग्रंथकर्त्यानें दाखविली आहे.

---

राव बहादुर महादेव गोविंद रानडे यांचा अभिप्रायः—
( भाषांतर )

बारहा लेख मी काळजी पूर्वक वाचून पाहिले. एकं-दरींत, ' क ' आणि ' ड ' नांवांच्या दोन्ही चारित्रांच्या अनुपयुक्ततेबद्दल जें सेक्रेटरीचें मत आहे तें मला मान्य आहे व ह्मणून त्या संबंधानें विचार करण्याची जरूर नाहीं. आतां, ' अ ' आणि ' ब ' नांवांच्या लेखांच्या कर्त्यांमध्यें वास्तवीक चढाओढ आहे. दक्षिणा प्राइझ कमीटी-च्या जाहिराती अन्वयें बाजीरावाचे वेळेची स्थिति दर्शवि-णारी कादम्बरी पाहिजे होती, बाजीरावाचें चरित्र नको होतें. या दृष्टीनें पाहिलें असतां ' ब ' च्या कर्त्याची योग्य-ता सेक्रेटरी मानतात त्याहून मी अधिक समजतों. आणि दुसऱ्या गुणांच्या संबंधानें विचार केला असतां, ज्या ' अ ' ला सेक्रेटरी सारें बक्षिस देऊं इच्छितात त्याची व ' ब ' ची बहुतेक बरोबरीच आहे. खरें ह्मटलें तर, ऐतिहासिक कादम्बरी रचण्यास अत्यावश्यक लागणाऱ्या गोष्टींचें खरें मर्म ' ब ' च्या कर्त्यालाच कळलें आहे. बाकीचे लेख च-रित्राच्या किंवा बखरीच्या धर्तीवर रचले गेले आहेत. ' ब ' च्या ग्रंथकर्त्यानें अशी चूक होऊं न देतां, बाजीरावाचे चरित्राचें बहुतेक ठिकाणीं, अवश्य तितकें थोडकेंच वर्णन करून बाजीरावाच्या वेळेचें व तत्कालीन मनुष्य स्वभावाचें मुख्य स्वरूपाचें दिग्दर्शन केलें आहे. संविधानकाच्या संबं-धानें विचार केला असतां मला वाटतें कीं ' अ ' च्या पेक्षां ' ब ' अधिक योग्यतेचें पुस्तक आहे. साऱ्या संवि-धानकांतील मुख्य गोष्ट— ह्मणजे बाजीरावानें मोंगल बा-

दशाहाच्या जनानखान्यांतून आवडीला पळवून नेलें—ही जरी इतिहासांत अप्रसिद्ध आहे तरी कादम्बरीकाराला जी वर्णन करण्याची मोकळीक असते त्याच्या वाहेर नाहीं आणि शिवाय, बाजीरावाचें एक यवनी प्रियपात्र होतें व त्याच्या पासून त्याला संतती झाली होती ही गोष्ट खरी आहे. 'व' च्या कर्त्यानें ही गोष्ट अशा कांहीं चातुर्यानें घडवून आणली आहे कीं त्यामुळें त्याला दुसऱ्या पुष्कळ गोष्टीं बद्दल उपयोग करून घेता आला. त्या गोष्टींमुळें निजाम व दिल्लीचा बादशाहा ह्यांच्यामध्यें वैमनस्य पडलें आणि ह्याच वरील गोष्टीमुळें बाजीरावास स्वत: दिल्लींतील विष्कालित झालेली राज्यव्यवस्था पाहतां आली. दिल्लीस जातानां व तेथून पुण्यास परत येतानां जीं संकटें बाजीरावास भोगावीं लागलीं व धाडसाचीं कृत्यें करावीं लागलीं त्यांचें समग्र वर्णन साधलेलें आहे.

'अ' मधील बाजीरावाच्या तीन दिवसांच्या भाषणाची सेक्रेटरीनें केलेली स्तुति मला मान्य नाहीं. मला वाटतें कीं त्या भाषणांत कांहींच अर्थ नाहीं. कारण मराठी इतिहासांतील प्राचीन सरदार फार दिवस चालणारीं अशीं लांबलचक भाषणें करीत नसत. तीं भाषणें मिथ्यावाद व अहंपणा ह्यांनीं भरलेलीं आहेत. व त्यांच्या खरेपणाबद्दल इतिहासांत यत्किंचितही आधार सांपडत नाहीं. माझी समजूत अशी आहे कीं 'व' मधील संभाषणें 'अ' च्या भाषणापेक्षां जास्त शोभणारीं व चटकदार आहेत.

'व' चें दिल्ली शहराचें व त्यांतील इमारतीचें वर्णनाची खुबी फार सुरेख आहे.

# जाहिरातींतील उतारा.

दक्षिणा प्रैज कमिटीचे सेक्रेटरी रा. रा. रावजी सदाशिव गोडबोले, यांच्या सहीच्या सन १८७५।७६ सालपैकीं नंबर २३ तारीख ९ आगष्ट सन १८७५ इसवीच्या जाहिरातीपैकीं उतारा.

२ "पहिला बाजीराव ह्याचें व त्याचे कारकीर्दीचें वर्णन" ह्या विषयावर सदरहू तारखेचे आंत (३० जून १८७६ चे आंत) इतिहासाचा आधार घेऊन जो गद्यरूपानें उत्तम प्रकारची गोष्ट लिहून पाठ-वील त्यास कमिटीकडून चारशें रुपये बक्षीस मिळतील."

४ "दुसरे कलमांतील ग्रंथाचीं पृष्ठें सामान्य आका-राचीं दोनशेंहून कमी असूं नयेत."

सं.का १८८

# जुना वाडा,

## अथवा

# पहिले बाजीराव.

---

## भाग पहिला.

संध्याकाळ झाली आहे; सूर्य अस्ताचलावर येऊन पोहोंचला आहे; त्या वेळच्या त्याच्या त्या मंदप्रभ शांत तेजानें मेघमंडळांत निरनिराळ्या रंगाची फार बहार उडवून दिली आहे. पशु, पक्षी आपआपल्या ठिकाणीं जाण्याच्या गडबडींत आहेत; अशा समयास एक सरदार, भरधांव घोडा टाकीत एका बाजरीचे शेतांत येऊन पोहोंचला. व हें निर्भयस्थान पाहून त्यानें तेथें जरासा विसावा घेतला आणि नंतर बाजरीचीं कणसें खाण्यास सुरुवात केली. उजवे हातानें कणीस तोडावें व डाव्या हातावर चुरगळून फुंकून खावें असा त्यानें क्रम चालविला. अशा रीतीनें क्षुधा शांत झाल्यावर त्यानें आपले घोड्यास एका झाडाचे बुंधाशीं त्यास सहज चरतां येईल असें बांधलें आणि तो गाशा टाकून जरासा लवंडला. इतक्यांत त्याला कांहीं माणसांची चाहूल ऐकूं आली. त्यामुळें तो दचकून उठून लगबगीनें उभा रहात आहे तों दोन असामी त्याजपाशीं आले आणि त्यास दरडावून ह्मणूं लागले. . .

**एकजण.**— ( स्वारास ) कोणरे तूं ?

**स्वार.**—मी वाटसरू ब्राह्मण आहें.

**एकजण.**—वामणा ! तुझं, इथं या इळेस र काय हाये?

**स्वार.**—पाटील बुवा ! रागाऊं नका. मी पांथस्थ-भिक्षुक आहे जरा वसा. ह्मणजे मी तुह्मांस माझे येण्याचें कारण सांगतों.

**एकजण.**—बोल बोल बिगी.

**दुसरा.**—( पुढें सरसावून ) मारत्या. येडाच हाय आर त्यो उपन्या वामण. त्याचं काय ऐकतोयास. ( डोळे वटारून, स्वारास ) ये वामणा, आमासनी कारण बिरन नग सांगाया. बोल बिगि आमच्या शेतांत कां आलास त्ये. हीं सारीं ताटं मोडूनश्यानी श्येताची नासाडी क्येलीस आणि माइंदळे खाल्लस. आमी कां आता दान्याचे नांवानं रडावं. कोनास इचारून ताटांसनी हात लावलास बोल पटकन् ? घोडा बिडा लई झोठा हाइ. तवा गबर दिसतोयास. तर टाक समद दकणेचे पैसे. तुमा बामनांचा धंदाच ह्यो दुस-ऱ्यासनी बुडवायाचा.

**स्वार.**—( मारुत्यास ) मारुतीराव ! पाटील बुवा ! तुह्मी भले दिसतां, तुह्माला मी सांगतों तें ऐका आणि मग काय तें बोला. तुह्मी उभयतां शेताचे मालक आहां व मी कणसें मोडून खाल्लीं हें खरें, पण माझें ह्मणणें ऐकून घेतल्यावर तुमचा राग शांत होईल असें मला वाटतें.

**मारत्या.**—हं बोल बिगी. ( सोबत्यास ) ग्यान्या ऐकर.

**ग्यान्या.**—लई साणाच दिसतोस. उगीच त्याला भोळे-पणा दाऊन ठकीवतोस झटदिशीं काम उरकून घ्यावं तें.

( स्वारास ) ए भट्टो ! मी काय इचारतोय ? सांग बिगिन, न्हाई तर पैसे दे आन् जा आपल्या वाटनं. ( इतक्यांत आणखी पांच सात असामी धांवून आले त्यां पैकीं एकास ) नाईकबा. ह्यो बगा भटुरगा आपले श्येतामंदी शिरून समदं पीक बकाणीत व्हता. ही ताट मोडून पडल्याती बगा. गंठोडयामंधीं ह्योप दरव्य बांधलया. त्यें आमासनी देऊन हो चालता ह्मंगुनश्यानी मगापून सांगतोया पर ऐकना. मारत्या लागलाया त्याच्या नादीं. वगा काय तो इचार.

**नाईकबा**:–उगीच कां शेतकऱ्याचं स्वांग घेऊन त्याच्या मागं लागलायास ? त्यो विचारा यकटा, भेदरून गेला असल तुमासनी पातांच, आन् तशातनं आमी बी आलों. त्यो वापडा काय करतोय ? आपलं करून घ्यावन् पार पडावं.

**ग्यान्या**.–जातोया कुठं आन् करतोया काय. कसं झालं तरी बामन भाय. ( स्वारास ) अन्योये भटो. अर भटुरग्या त्ये गंठड्याची गाठ सोडना. बोज्या कसला हाय वघून् तर द्ये आठप बिगिबिगि. न्हाईतर आन् मी बगतों सोडूनशान.

**स्वार**.– ( घाईनें उठून व गांठोडें घोड्यावर होतें त्याला हात घालून ) वा ! पाटील ! तें देवाचें गांठोडें, त्यांत माझें सोवळें भांडें बांधलेलें आहे. आमच्या जवळ पैसा काशाचा ? वाटेचे वाटसरू आह्मी. आपली भूक लागली ह्मणून चार कणसें खाल्लीं यांत कां मुद्दाम नुकसान करण्याचा माझा हेतू होता ? हे ग्यानबा, भलतंच सांगतात. आणि नाईक साहेब ऐकतात. ( मारत्यास ) मारुतीराव पाटील, हे नाईक साहेब "आपल काम साधावं" ह्मणून, कायहो आ-

तां बोलले. यावरून तुह्मी खरोखर शेताचे मालक नाहींत असें वाटतें. त्यांच्या बोलण्यांत कांहीं विपरित अर्थाचे शब्द आले. कृपाकरून तुह्मी सर्व कोण आहांत हें मला कळवा.

**मारत्या.**—खरं सांगण्यांत कांहीं अरथ नाहीं व ह्येवी मना न्हाई सांगू द्यायचं. तुझ्या बोचक्यांत कांई बाई असलं तर टाक ह्येंचे अंगावर फेकून. मंदी न्हाई ह्ये तुला सुखास लागू द्यायचे. माझ ऐक तर मी तुझा जीव तरी बच्यावीन, न्हाईतर वाट कठीण हाय.

**स्वार.**—तुह्मी सुद्धां उलटलांतना. अहो असेल तर द्यावें कां उगीच. माझे——

**ग्यान्या.**—लई बडबड लावलीया. मारत्या सदान कदा परताप दावतोया. ( स्वाराचें गाठोडें हिसकतो ) चल सोड उगीच कां पत्राज मिरवतोयास.

**स्वार.**—( हात हिसकून ) हो दूर. लांबून बोल. अंगाला किंवा मालाला हात लावलास कीं संभाळ.

**ग्यान्या.**—अर हो पोकळ धोतऱ्या. अशी बामणं कितीक बगीतलींत. चल हिरीवर दावतों तुझ्यावानी कितीजन मारून टाकल्यातीते——

**स्वार.**—विहीर तीही दिसतेच. तिथें जाऊन मी तर पाणी पिऊन आलों आहे. मला नाहीं कुठें मनुष्यें दिसलीं तीं.

**मारत्या.**—तीं नव्हं. त्येच्या पल्याड त्या वडाच्या झाडा खालतं लई मोठी खोल बावडी हाय. तथं बोलावतोया तुला तथं जाशील तर पराणच मुकशील. वर बोलानं हाथच्च असल तें देऊन त्येची मुठ भर. उगीच कां दिमाख लावलियास,

**स्वार.**— नाहीं, नाहीं, दाखवाच कशी विहीर आहेती घोडे घेऊं कां बरोबर ?

**ग्यान्या.**—नग. न्हाइनाका हिथेंच.

स्वारानें घोडे सोडूं का इतकें विचारतां क्षणींच घोडें सोडलें. व नको ह्मणतां पुन्हां बांधीत आहे असें दाखविलें. ह्मणून ते सर्वजण पुढें चालूं लागले. इतक्यांत स्वार उडून घोड्यावर बसला. गाशा मात्र तसाच तेथें पडला होता. वर बसतांच त्यानें घोड्यास टांच मारली. घोड्यानें इशारा ओळखून पळ काढला. धरा, धरा, ह्मणत ते चोर त्याचे पाठीशीं लागले. सुमार हाकभर ते मागोमाग होतेच. इतक्यांत एक अक्राळ विक्राळ स्वरूपी मनुष्य पुढें आल्यामुळें स्वारानें घोडा बाजूस वळविला. मागाहून धांवत आलेल्या असामींपैकीं एकानें दांडगाईनें घोड्याचा लगाम धरला हें पाहून स्वार त्यास ह्मणतो "दूर व्हा लगाम सोडा आणि घोडा आडवूं नका. नाहींतर याद राखा हात कलम करीन."

**ग्यान्या.**— ( पुढें सरसावून ) लंईसा गुरकावतोयास ? आमि तुला भिवूं होय. बामणा ! मस्ती आंगांत व्हती तर ठगवून पळालास कां ? न्हाइ घोडा पुढ जाउं देत जा. कर काय करतोसतें. आमी किती जण हावोत त्ये देखलसकां ?

**स्वार.**—( ग्यान्या पुढें आडवा झाला त्याच्या फाडदिशीं तोंडांत लगावून ) मुस्काड फोडीन पुन्हां बोललास तर. हलकट तो हलकट आणि पत्राज केवढी. ( तोबऱ्यांतून जंबीया काढून ) चल कोण येतो तो आंगावर, येऊं दे चाल करून.

**सर्व चोर.**—( दोन पावलें मागें हटून परस्परांत ) हें

त्यारच परकरन दिसतया. असं न्हाई वा आपून आजून पायल कंदी. ( मोठ्यानें ) हं चला समदे जन पकडूं त्या-सनी आन गरदन दाबूं.

**नाईक.**—भिताव कां असं ? यकटा चांग्या त्यास चित करील. समद कशाला हाव या ठेंकणास चिरडाया. (दरडा-वून ) चिमन्या उपस तरवार.

इतकें ह्मणत आहे तों घोड्यास बुजविणारा अकाळ पुरुष जवळच झाडापाशीं उभा राहून मजा पाहत होता त्यास त्वेष आला आणि त्यानें धनुकलीस तीर लावून त्या स्वारावर नेम धरला. छातीचा नेम चुकून तो तीर त्या स्वाराचे पागोट्यावर लागल्यामुळें तें खालीं पडलें. तेव्हां स्वारानें लागलींच टापशी आवळून बांधिली. पहिला तीर चुकला असें पाहून त्या अकाळ पुरुषानें दुसरा मारला तो तीर बोथून खालीं पडला. परंतु त्यामुळें त्या स्वाराचे आंगावरील चिलखत मात्र दिसूं लागलें.

**ग्यान्या** –( टापशी बांधतांना पाहून ) त्यो पा लोखंडाचा मुगुट डोईवर हाय. ( भितीनें वळून, अकाळ पुरुषास ह्मणतो. ) तिस्मारखान ! मी न्हाई वा त्याचे झोर जात. हिथूनच मजा पाहतोया.

**तिस्मारखान.**–उगीच तुझी नेहमीची बडबड पाहून घ्यावी. मी पहा कसे त्याच्यावर दोन तीर झाडले. आतां त्याची शर्थ झाली. अरे तो शूर दिसतो. तो बघ त्याचा आंगरखा फाटला माझ्या तिरानें, आणि पागोटें पडलें खालतीं. पण त्याच्या आंगावर चिलखत आहे आणि तूंच ह्मणतोस कीं डोक्यावर ही लोखंडाचा मुगुट आहे. त्याच्या

पुढें काय माझी दाद. मी आपला निमुटपणें मजा पाहत बसतों. ( असें ह्मणून तीर मारताना सरलेली पेंचदार पगडी पुन: एका कानावर ऐटींत बसवून व आस्तान्या सारून मिशावर पिळ देत तो स्वस्थ बसला. )

**चांग्या.**—जय मल्हारी ( चड्डी एका हातानें सावरून आणि उडी मारून दुसऱ्या हातानें तरवार फिरवून ) आव लड्नेकू तेरे * * *

**स्वार.**—( मान चुकवून घेऊन ) चल माकडा तुझा जीव घेतों. माझे घोड्याचे पायास जखम केलीस तर मी त्या मोबदला तुझ्या जीवास करणार ( असें ह्मणून त्यानें जंवियानें त्याचा शिरच्छेद केला. )

नंतर नाईक त्वेषानें स्वाराचे आंगावर चाल करून जाऊं लागला. तेव्हां सर्वांनीं विचार केला कीं चांग्या प्रमाणें नायकाची वाट लागल्यास पुढारी नाहींसा होईल. ह्मणून सर्व एकदम आंगावर जुटीनें आले. स्वारानें ही या विकट प्रसंगास तरवार बाहद्दरी खूप गाजविली. तो एकटा होता खरा परंतु त्याच्या शरिरावर अयोमय प्रावरण असल्यामुळें त्याचे आंगास कांहीं इजा न होतां मारणाराचें शस्त्र मात्र विनधार होत असे. आणि तो चलाखी करून जंवियानें आणि एका कळीचे तरवारीनें, भोंवतालचे चोरांवर जे आघात करी त्यामुळें ते जखमी होऊन हतवीर्य होत. त्या अमलांत स्वारानें उग्र दृष्टीनें पाहिलें ह्मणजे केलें या पेक्षां कोणतें घोर शासन करतो आहे कोण जाणे अशी त्या चोरट्यांस भीति पडे. परंतु पुन: धैर्य धरून ते निकरानें लढण्यास सुरवात करीत. स्वारही अधीक जोरानें घाव करी.

याप्रमाणें एक तास सवा तास पर्यंत युद्ध चाललें असतां घोड्यास दोन जखमा लागल्या. एक मागील पायास व दुसरी मानेचे वरील आंगास. स्वाराचें पागोटें पडलें, आंगावरील कपड्याच्या चिंध्या झाल्या आणि पोटीवर एक निसटता वार लागला, हाच कायतो त्याचा तोटा. इकडे, चोर तर, कांहीं पळाले, कांहीं जखमी होऊन धाय मोकलून धरणीवर पडले; आणि कांहींनीं तर आपण जसें कांहीं त्या गांवचेच नाहींत, असें दाखविलें आणि ग्याना तिस्मारखान यांनीं दुरून मजा पाहण्याचा क्रम चालविला. ही कठीण अवस्था व साथीदारांची वाताहात पाहून नाईक यास अत्यंत वाईट वाटलें आणि तो धीर आणण्यास यत्न करूं लागला. त्यास वाटलें कीं या प्रसंगास हट खाल्ली तर आपली स्थिति फारच वाईट होणार आहे. ह्मणून तो आपले साथीदारांस उत्तेजन देऊं लागला.

**नाईक**.—गाढविच्यो! तुमासनी काई लाज हये का न्हाई? ल्योकाच परान घेऊनशानी आपल पोट भराव हा आपला धंदा; आन् या वामना ह्मोर अस डर खाता? हत ल्योकाच्यो! थुः तुमच्या तोंडावर! त्या भटुरड्यान उगीच दोन हात कसवस फिरविलें! त्येला का कसब येंत! उगीचि आव दावतो हाय अन् काय. अस भितऱ्यावानि का पळता? घ्या दोन दणक आन घ्या उरकून. हाय काय न्हाई काय. भात खाऊ कोंकन्या दिसतोया. हुं घ्या देवाच नांव आन पाहा त्याच्या मानचा समाचार!

नाईकाचें हें बोलणें त्या चोरांना चुणचुणलें व त्यांच्या अंगांत त्वेष आला आणि ते पुनः चालकरून गेले. इतक्यांत नाइ-

ध्यानें आवेशानें घोडयावर वार केला. तो निसटतां कुशींत लागल्यामुळें घोडा मट्कन खालीं बसला. आणि ही गोष्ट स्वाराचे हिताचीच झाली ह्मटलें पाहिजे. कारण त्याच वेळेस उडी मारून वरचे हातानें तरवारीचा फटका मोठे कुशळतेनें राण्यानें मारला होता तो घोडा बसला ह्मणून नेमका लागला नाहीं. नाहीं तर स्वार ठार होत होता.

**स्वार.**—नाईक ! तुमची व तुमचे इतर मित्रांची अद्याप पर्यंत काडीभर मात्रा चालूं दिली नाहीं. तुह्मीं इतके जण होता तरी या लढाउ घोड्याचे जिवावर मी दोन हात करण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं. आतां तुमचे बहुतेक लोक हतवीर्य दिसतात. फक्त तुह्मीं आणि ते दोघे जण कायते अझूनही लढण्यास सिद्ध आहां. मी पडलों एकटा व तुह्मीं पडलां तिघे. तर या वेळेस तुह्मांस सुचवितों कीं तुह्मीं एक एकटे आंगावर या आणि मग जर हरलों तर तुह्मी खरे तरवार बहादर.

" इतक्यांचा पराभव केला तो कां आमचा तिघांचा पाडाव करणार नाहीं? सहज करील. पण जीवंत राहून हाल करून घेण्यापेक्षां समरीं मरणें बरें! " असें मनांत आणून आणि आपण विसावा ध्यावा या इराद्यानें नाईक राण्यास ह्मणतोः—

" राणबा ! कस? ह्यो काय ह्मंगतोया? "

आपलें हस्त कौशल्य स्वतंत्रपणें दाखविल्यास फार हुशारकी मिळवूं असा विचार करून राण्या नाईकबास मिशावर ताव देऊन ह्मणतो " बर, हाय. त्याच्या ह्मंगण्या प्रमान कां व्हईना. मी तर एका पायावर राजी. "

असा रुकार मिळाल्यावर त्या स्वाराचा आणि राण्याचा झगडा सुरू जाहला. सरासरी अर्ध घटिका निकराची झटापटी होऊन स्वाराचा जंबिया त्या चोराच्या मांडीवर जोरानें बसला, त्यामुळें तर राण्याचे हात पाय गळाले. नंतर 'उद्या' पुढें सरसावून हिकमतीनें डाव पेंच करूं लागला. परंतु त्याची कांहीं वेळानें तीच अवस्था झाली. कारण त्याचे वाऱ्हस्यावर दोन जखमा झाल्यामुळें त्यास शरण जावें लागलें. मग सर्वांचे नाईक पुढें सरसावले. हें द्वंद्व युद्ध मात्र इतकें तुंमळ झालें कीं "जयमल्हारी" ह्मणून बाजूचे लोक जयाचा घोष करतात तों पुन्हा नाईक हरतो असें दिसून येई. जयश्री कोणास प्राप्त होते यांचे कांहींच अनुमान करतां येईना. याप्रमाणें युद्ध होऊन सरते शेवटीं नाईकबा हरले.

**स्वार**.—( एक हात नाईकबाचे गळ्यावर देऊन व दुसऱ्या हातांत तरवार धरून ) मी कांहींजणांस मारलें ही चूक जाहली. माझी पक्की खात्री झाली आहे कीं सर्वांत तुह्मी तिघे वाकबगार व शूर आहांत; तर तुह्मीं कोण आहांत तें खरें सांगा, नाईक! शरणास मरण देणें आमचा धर्म नव्हे.

**नाईक**.—राव! तुमी भटापरमानं दिसत व्हतां ह्मनुन दरडावून धिंगा मस्ती करून सर्वे ऐवज वुचाडून घ्यावा या इचारान परथम आमी आलों. पन आता न्याराच परकार दिसतोया. आपला सरदारी बाना हाये आन् आपुनं करामत बी लई दावली. आमी तर चोरीचा धंदा करितो: त्या वडाचे झाडापं न्हाव, लोकासनी लुटाव आन् हथ

स.का. ८८

दडून न्हाव, ह्यो धंदा करतो. आपुन नांव सांगा आन कोन हा त्ये सांगा ( हात जोडून ) ह्यो दास बंदा हाय.

**स्वार.**—तुह्मीं या रानांत अशारीतीनें राहण्याचें अगोदर कारण सांगा ह्मणजे मग मी सर्व सांगतों.

**नाईक.**—वचन होव हा मजकूर कोनापाशीं बोलनार न्हाई म्हून आन् मंग हामी सांगु.

**स्वार.**—अभिवचन देतों. खचितअसेल तेंच सांगा.

**नाईक.**—आन मंग आपून सांगालना. आह्मी न्हाई कोनासबी कळवायाच. खंडोबा रायाचीच शपत. तिघासनीच हळु सांगा.

**स्वार.**— बरें आहे. तुह्मी तर सांगा.

**नाईक.**—लई नामी. आमी बगा मूळच मराठभाई. पन आमचं शाहु महाराज सातारच कनी, दिल्लीच बादशा सांगल तसं ऐकल्याती. आन तो करतोया जुलुम. आमी ह्ये भोगासनी तरासलों, आन ब्येत केला कीं समद्यासनी लुटायच. आन् हाथ येऊन न्हायलो. यवढच. या वाटन ज्ये येतात त्यासनी माराव, त्येच दरव्ये घ्यावं आणि हथ पोट भरून असाव. त्यी हीर मंगा ग्याना ह्मंगत व्हता दावतो म्हून तथं मारूनशानी ढकलून द्याव, ह्योच कायतो धंदा. माझं नांव मल्या, ह्योच राणबा, आन् त्येच उद्या. आमी कांहीं जातीचे रामोशी नव्हत.

इतकें बोलणें होत आहे, तों सर्व मंडळी त्या स्थळीं थबकत थबकत येऊं लागली सबब स्वारानें बोलणें थांबविण्याविषयीं डोळ्यानें खूण केली. परंतु “ कांहीं चिंता नाहीं, ते माझे बंदे नोकर आहेत ” असें ह्मणून नायकानें पुनः सांग-

ण्यास सुरवात केली " खरं पुसाल तर मी निरा नदीपाशीं होळगांवचा राहणारा पाटील आहें ह्मणून मला लोक "होळकर" या आडनांवानें हाक मारूं लागले आणि खरोखर मग मी विचार केला कीं मराठे लोकांचीं दुःखें जाळण्यास मुसलमानांचे राज्याची **होळी** केली पाहिजे. परंतु इतका महत्वाचा बेत सिद्धीस जातो कसा या घोटाळ्यांत पडलों; इतक्यांत साताऱ्यापाशीं कन्हेरखेड गांव आहे तेथील हे राणबा पाटील आह्मास येऊन मिळाले. त्यांचा सत्वस्थ, देशाभिमानी आणि शूर बाळाजीपंत पेशवा धनी होता तो मेल्यानंतर.

**स्वार.**—( हें ऐकतांच डोळे पुसतो ) काय तर तुह्मी पेशव्याचे नोकर ! ! !

**मल्हार.**—होय, परंतु आपल्या मनास इतकें कां लागलें तें सांगावें. आपण पेशव्याचे पदरचे सरदार आहां कां ?

**ग्यान्या.**—( आश्चर्यानें ) ह्ये काय इलखण आज चाललाया. लढाई काय झाली चांग्या न् ह्ये राज्यान्, पान्या, विन्या, काय ठार मारले गेले, आन् ह्यें काय बा, नाईकबा समद खर खर खडान खडा सांगत्याती.

**तिस्मारखान.**—( मिशी पिळून ) काय नाईक शरण जातात ? धिक् त्यांची. मी कसा समशेर बहादूर की दोन तीर मारून सर्वांस त्या स्वाराचें खरें स्वरूप दाखविलें ? ( आपल्याच हातानें पाठ थापटतो ) शाबास तिस्मारखान खरा मी पराक्रमी.

**ग्यान्या.**—यं, आन मी न्हाइकां त्यासन घोड्यासुद्धा अडिवला ?

मल्हार.—( दरडावून ) चुप बसारे ! काय गडबड
ः.

स्वार.—होळकर, हें नाम तुह्मास शोभतें. हे शूर मित्र
(न्याकडे व तिस्मारखानाकडे बोट दाखवून ) कोण
त तें तुमची गोष्ट संपल्यावर सांगा. हुं चालूंद्या तुमचें.

ग्यान्या.—कोन?

तिस्मारखान.—( मध्येंच ) आमी तिस्मारखान बडे हुद्देवाले क. ( सारे हंसूं लागतात. )

नाईक.डोळे वटारून ) गप्प, चकार शब्द हुकमावांचून करका. ही थट्टा करण्याची वेळ नव्हे.

स्वार.ान्या ! थांब लवकरच तुझ्याशीं व तिस्मारखानाशीं ंतों.

ग्या.—( नायकास ) "पन आज अशी कां कडी पातशालिया; रोजच्यावानी कां नाहीं बोलत ?"

नाईक.—आतां खरें खरें कळविण्याची ही वेळ आहे.
तां घटकाभर आपण मराठे लोकांप्रमाणें वर्तन केलें पाजे. समजलास कां ग्यान्या.

ग्यान्या.—व्हय समजलों. पर उमगलों न्हाई.

नाईक.—बस् बस् चुपराव ( स्वारास ) आपण कोण, सांगा. हें आमचे रोजचें आहे.

स्वार.—( गहिंवरून. ) हो तसेंच कांहीं आहे.

मल्हार.—अळमटळम कां ? खरं सांगा. आह्मी नाहीं कां गितलें.

स्वार.—( घसा दाटतो. ) सांगूंच —

मल्हार.—आह्मी सारे दास आहोंत. सांगाच.

**स्वार.**–( आंगावरचें चि गासारख्या मोंगलांचा काढून आणि गाठोड्यांतील उत्तम ...ांधवांस ते प्रीति थांवा तर, मी तुमच्यांतलाच आहें असें द... मोठेपणास

**राणवा.**–( स्वारानें नवा पोषाक केलेला पाहून हाराज ! पाया पडतो. अपराध माफ असावा. मी आप आतां खास ओळखलें. माझे छातीवर गुडघा टेकून पूर्वी " शरण " ह्मणायास लाविलें त्यावेळेस ... आला होता. आतां खचित् खात्री झाली. ...ले. करा. तरी ह्मटलें, आह्मांस चित् करणारा ... नमस्कार घालितो. )

**स्वार**–राणवा! उठा हा काय वेडेपणा ही पे- मला ओळखलें नाहींत. वर पहा.

**राणवा.**– ( वर पाहून पुन्हां खालीं ...गलें आणि पाया पडतो. ) कां उगीच आतां चोरतां. म... आहें. महाराज आपले वडिलांचे "– इतकें ह्मणताच चपापतात. आणि तिस्मारखान पळूं लागतो. त्यास ग्य पकडून आणि कानांत कुजबुजून उभा करतो.

**राणवा.**– ( गंहिवरून ) " आपले वडिलांचे ज वारागिरी करीत होतों. आज पर्यंत ज्यांचें अन्न खा त्यांचे चिरंजीवास मी ओळखणार नाहीं काय ?

**मल्हार.**–एकूण बाजीराव साहेबांची स्वारी तर ही आह्मीं खरोखर धनगरी लोक. ( पाया पडतो ) चूक म असावी. योग्यच आहे. सिंहाचा बच्चा त्याच्या सारख निपजतो; किंबहुना अधिक पराक्रमी. ( नाईक पाया डले हें पाहून सारेजण पाया पडतात. )

ला आहे. त्याचा आ खूळ. अहो तुह्मीं मला प
आहे वळ नाहीं. स्वार आहें.

ाजी.—( छा! महाराज आपण तर आमचे सरकार
( यांत.

आहे **बाजीराव.**— ( आतां खरें नांव प्रगट करण्यास हरकत
ानें पाहून ) शाबास तुह्मीं खरे मराठे बीजाचे आ-
**तिस्मा** यास्तव या वाईट कामास लागलां. असो, आतां
हुद्देवाले लो पूर्ण आश्वासन आहे. तुह्मां सर्वांस मी साता-
**नाईक.**—( ोकऱ्या देईन. भिऊं नका.
मावांचून काढू ानंदानें ) वाहवा काम झालें. आज आह्मांस
**स्वार.**— दर्शन दिलें ( पायां पडतात. )
खानाशीं बोल—राणवांनीं आपलें अन्न खालें. राणव आणि
**ग्यान**. दूध भात खाल्यास सर्व रामोशी त्या मनुष्यास
पातळ जतात. मग आह्मीं पूर्वी रामोशाचे नात्यानें शर-
गत आल्यानें आणि सरकारास ओळखल्यानें आतां
अ्वार आहों.

हि **राणवा.**—महाराज-( घोंगडें पसरतो ) बसावें. आमच्या
ाचे जवळ या वेळेस दुसरें कांहीं देण्यास नाहीं या
ें वाईट वाटतें.

ते **बाजीराव.**— ( बसण्याकरितां जमिनीवर जोडा काढून
ो. ) हा पहा मोठ्या आनंदानें बसतों. तुमची घोंगडी
ळेस मला मऊ लागते. फार काय, पुण्यांत गालि-
सांवर बसतों ते गालिचे आणि मृदु आसनें खरखरीत
ील असें वाटत आहे. देवास शक्त्यनुसार पत्र पुष्प
नैवेद्याला भुईमुगाचा दाणा दिला कीं भक्ताविपर्यी

प्रीति उत्पन्न होते. आणि तुमच्चें [illegible]सारख्या मोंग[illegible]नाश करण्यास प्रवृत्त झालेल्या मज्जातीय उत्तम [illegible]बांधवांस ते द-र्शवीत असतां मी मान न द्यावा हें माझ्या असे द[illegible] मो[illegible] उ-चित् होईल काय!

**सारे.**—सरकार आह्मीं कोण्या झाडाचा पाला.

“ मी उदाजी पाया पडतों. गुन्हा माफ असावा.” असें ह्मणून एकजण पुढें सरसावला आणि पायांवर डोकें ठेऊं लागला.

**बाजी.**—शाबास. तूं तर हातचलाखीची कमाल केलीस. मला वाटलें कीं आणखी एक घटकाभर जर तुझ्याशीं युद्ध केलें असतें तर माझी कठीण दशा झाली असती.

**उदाजी.**—छे, सरकार उगीच काय दासास चढवावें. आपल्या पायाची कृपा ह्मणून जीवंत राहिलों. नाहीं तर मी केव्हांच चिरडून जावयाचा.

**मल्हारी.**—महाराज! मी राणबा शिंदे आणि हे उदाजी पोंवार असे तिघे एक दिवशीं मथलों आणि या साथ्यांस साह्य घेऊन हें बंड सुरू केलें. ( हात जोडून, ) माफी मागतों.

**राणोजी.**— ( हातांत जोडा घेती ) महाराज आपल्या पादुका आह्मां दासांजवळ राहूं द्याव्या एवढी आमची विनंती आहे.

**ग्यान्या.**—गुलाम, सरकार हा आपला गुलाम आहे ( बाजीराव हंसतो. ) माझा मुजरा घ्यावा.

**बाजी.**—हा कोण हो मल्वा!

**मल्हारी.**—हा एक करमणुकी करितां बडबड्या सोबती

वाळगला आहे. त्याचा आव मात्र पहावा. आंगांत काडी-चेंही बळ नाहीं.

**बाजी.**—( स्मरण करून ) पहिल्यांदा मी ब्राह्मण आहें ह्मटलें, तेव्हां यानेंच बोलबोलून पुरे केलें नाहीं? आणि घोडा ही याच राजश्रीनें आडविला वाटतें ?

**ग्यान्या.**—होय, तो माझाच प्रताप. ल्हानकां झाला ! मी नसतों तर गोष्ट या थरास आली असती कां? बोल-ण्याची माफी असावी. मी ह्मटलें कोणी घोड्यावर बसून आरेराव जातानां थकून बसला आहे. त्यास बुचाडून पो-टाला मिळवावें. मला काय ठाव आपण होतां हें. ( दोन हाताची आणि पायाची आढी घालून व कैदी प्रमाणें हात जोडून ) चूक झाली.

**बाजी.**—बर, बैस. होळकर! हे तिरपगडीवाले कोण?

" मी तिस्मारखान ह्मणून मघाशीं कळविलें तोच मी " ह्मणून तिस्मारखान पुढें जाऊन पाया पडला.

**मल्हारी.**—हा मूळचा ब्राह्मण होता पण त्याला मुसल-मानांनीं जुलुमानें बाटविलेला आहे. दोन महिने झाले. हा आमचे आर्जव करूं लागला कीं मला तुमचे टोळींत घ्या. तेव्हां घेतला. त्याची ऐटच पाहून घ्यावी. तो दुसरा ग्यान्या. सहल करून आल्यावर मंडळी गप्पा मारीत बसली ह्मणजे या दोघांचें आतोनात तोंड सुटतें. करमणुकीकरितां यालाही जवळ ठेवला आहे.

**तिस्मारखान.**—नाईक ह्मणतात तेव्हां बोलतां येत नाहीं. बाकी माझा तीर पागोट्यास न लागतां, जर कां वर्मी लागता तर सरकार ! आपली अवस्था काय झाली असती ?

**ग्यान्या.**—आत्याबाईला मिशा असत्या तर काका ह्मटलें असतें.—

**बाजी.**—( हंसून आणि सर्व खों खों हंसले पाहून ) तिस्मारखान! काय ह्मणतो हा सोबती तुझा?

**तिस्मारखान.**—( ग्यान्यास ) क्यंबे लंडी? ( मिशावर ताव देतो ) हम्तो बडे बापके बेटा हूं.

**मल्हारी.**—महाराज! त्या मूर्खाशीं फार बोलून हंशील नाहीं. तो फाजीलपणा करील. ( तिस्मारखानास चापतो. तोही एकीकडे जातो आणि मोठी फुशारी मिळविली असें समजून पेंचदार पगडी एक कानावर ठेऊन तो आपले पोषागाकडे मोठ्या विस्मयानें पहात बसतो ). सरकार! आपलें येथें येण्याचें कारण काय हें सांगितल्यास दासावर कृपा होईल.

**बाजी०**—सर्व लोकांचीं मनें कोणत्या रीतीचीं आहेत हें ताडण्याचा मुख्य हेतु खरा. परंतु दुसरा फारच गुप्त आहे. तो सांगतां येत नाहीं.

**मल्हारी.**—आमचे हातून चाकरी होण्याजोगी असल्यास हुकूम फरमावावा. जीव गेला तरी बेहत्तर आहे. विश्वासानें नोकरी बजाऊं.

**बाजी०**—तुह्मास सांगण्याजोगें काम नाहीं. तें स्वतांच केलें पाहिजे. तुह्मीं सातार्‍यांत किंवा पुण्यांत गांठ घ्या ह्मणजे तुमची काय ती तजवीज करीन, आतां मला लवकर गेलें पाहिजे. पण हो तो मारत्या कां कोण तो कुठें आहे त्याला समोर आणा.

**ग्यान्या.**—तो पहा त्याचा मुडदा पडला आहे. त्यानें

नाईकवाचें ऐकून आपले आंगावर प्रहार करण्याचा यत्न केला ह्मणून त्यास देवानें योग्य शिक्षा दिली.

**बाजी.**—( उसासा टाकून ) अरेरे! तो गरीब आणि इमानी होता. असो. झाल्या गोष्टीस उपाय नाहीं. पुण्यास याल तेव्हां त्याच्या बायकोस इनाम देण्याची आठवण करा. बरं कां होळकर ? आतां जातों मी. आणा तो घोडा इकडे.

**सारेजण.**—घोडा व इतर सामान आणून देऊन पायां पडतात आणि बाजिरावाचें जाण्यापासून झालेलें दुःखानें विव्हळ होतात. व ग्यान्या व तिस्मारखान बक्षीस मिळेल ह्मणून मनांत आनंद पावतात.

**बाजी.**— ( घोड्यावर पूर्ववत् थाट करून व आरूढ होऊन ) राम, राम ! राम, राम! ( जातो. )

---

## भाग दुसरा.

"मी आपल्या गुणांनीं इतका सौम्य आहें तरी मला कोणीही मान देत नाहींत् व तो कडक वडील बंधू कीं ज्याच्या पासून सर्वांस ताप सदैव प्राप्त होतो तो आला ह्मणजे मात्र सर्व लोक मन लावून कामें करण्यांत दिवस खर्च करितात; आणि मी दृष्टीस पडलों ह्मणजे त्यांस खरोखर काम करण्यास स्फूर्ति यावी ती न येतां मजकडे अलक्ष करून स्वस्थ झोंप घेत पडतात; तस्मात् अशा अन्याय करणाऱ्या लोकांत राहून काय फळ?" इत्यादि विचारानींच जणु रात्रभर एकटा अधोमुख बसून पहाटेस चंद्र म्लानवदन होऊन चालता झाला. आणि आतां आपल्यास पूर्ण मोकळीक मिळाली असें पाहून

सूर्य हळुहळु जगावर अम्मल बसवूं लागला. अशा समयास कोणी बडा सरदार शौच विधी व मुखमार्जन करून दिवाण-खान्यांत चालता झाला. तेथें जाऊन पहातो तों कोणीखिस-मतगार नाहीं ह्मणून खिडकींत उभा राहून त्यानें नोकरास रागानें हाक मारिली.

कोण आहेरे देवडीवर? दफेदार ! ( दफेदार वर आला त्यास ) :—मानकरी सरदारास दरबारांत बोलाविलें आहे ह्मणून कळवा आणि जमल्याबद्दल एका घटकेचे आंत वर्दी द्या. त्या खासे महालचे दार उघडा, जा. ( दफेदारानें पुढें धांवत जाऊन दार उघडलें ). (त्या खुंटीवरची शाल द्या इकडे ). शाल घेऊन व गुरगुटून पांघरून ( जा आतां ). गेला पाहून स्वतांशींच हा कसला कागद पडला आहे? काल शिपायानें डांक आणिली ती त-शीच राहिली. काल एकच लखोटा आला वाटतें. ( वाचून ) काय ? “ बाजीरावास शाहूने खानदेशांत पाठविलें आहे.” वि-चार करण्यासारखी गोष्ट आहे. शाहूचें कांहीं या कृत्यांत अंग नसेल. असलें तर त्या बाज्याचें. कोण जाणें हें पोर कोणत्या प्रकारचें निघतें तें ! ! त्याचा बाप ह्मणजे कसली व्रात्य व्यक्ती होती. त्याची मला पक्की माहिती आहे. पुण्यास वसूल करा-याला नेमला काय आणि पेशवाईचा अधिकार मिळविला काय!! आमचे यजमान पडले कच्चे. नाहीं तर आतां प्रमाणें माझ्या हातांत सर्व कारभार असतां तर केव्हांच त्या भटुरग्याचें कांडात काढलें असतें. शाहू फार भोळा आणि बादशाहा तर परतंत्र आणि अपोक्त बुद्धीचा. बाळाजी पडला पक्का कोंकणस्थ. त्यानें आपल्या हुशारीनें आणि कावेबाज पणानें बराच अधि-

कार लाटला; आतां हें खरें कीं त्यानें मराठ्याची इतकी भर-भराटी केली. असो आतां पाठी मागील काय कामाचें? एवढें खरें कीं हा बाज्या त्याचाच मुलगा तो बापाच्या वळ-णावर जायचा. सारे सांगतात कीं त्यास पाहिल्या बरोबर मनाचा असा ग्रह होतो कीं "बापसे बेटा सवाई होएंगा." बरं त्याची माझी गांठ आहे. काय करील तें मी पाहीन. परंतु त्यास एकदां प्रत्यक्ष पाहिला पाहिजे. हें कार्य कसें सा-धतें? निदान त्याची तसबीर तरी पहावी. बामनजीला ए-वढी कामगिरीबजावा ह्मटलें होतें पण त्याचें काय झालें कोण जाणें? आतां दरबार भरल्यावर त्याला विचारूं, पण—— (इतक्यांत दफेदार येऊन सांगतो कीं दिवाणखान्यांत दरबार तमाम भरला आहे, आणि सारे लोक खासे स्वारीची वाट पाहत बसले आहेत.) मग तो सरदार पगडी घालून आणि आंगावर शालजोडी पांघरून, दरबार भरला होता त्या दि-वाण खान्याचे दारापाशीं मोठ्या ऐटीनें आला. हें पाहून सर्व जमलेल्या लोकांनीं त्यांस उठून खडी ताजीम दिली आणि मोठे आदबीनें सलाम केले व "नजर रखो! वजीर साबकी सवारी आया है" असें भालदारानें फुकारलें. नंतर वजीर साहेब आंत शिरले व हास्यमुखानें सर्वांस सलाम करून रुजाम्या-वरील गालिच्यावर लोडाशीं टेकून बसले. नंतर सर्व लोकही आपापले जाग्यावर खुरमांड्या घालून तत्परतेनें बसले आणि आज इतक्या पाहटेस बोलविण्याचें कारण काय व वजीर साहेबाचे मुखावाटे काय अमोलिक शब्द निघतात तें ऐक-ण्याचे उत्कंठेनें हातजोडून तटस्थ राहिले. इतक्यांत हवाल-दारानें हुक्का आणून दिला.

**वजीर.**—( हवालदारानें आणून दिलेल्या हुक्क्याचे झुरके मधुन मधुन घेत ) कां अली साहेब ? कसें काय वर्तमान ?

**अली.**—खुदावंत सर्व यथास्थित आहे. वरें पण आपली स्वारी काल पादशाहाचे भेटीस गेली होती तेव्हां काय खबर झाली ती कळवावी अशी सर्व दासांची इच्छा आहे.

**वजीर.**—खबर कसची. आपण करूं तें प्रमाण हें उघड आहेच. पण खरें ह्मणाल तर आह्मांस वाटतें कीं बादशाहाचा माझे मसलतीस मनापासून रुकार नेहमीं पडतो असें नाहीं. आतां आह्मी वजनदार पडलों तेव्हां जी जी सूचना करूं ती ती त्यास मान्य करावी लागते हें खरें. काल भेट झाली तेव्हां सर्व शुभवर्तमान जाऊन कळविलें. त्यानें आनंद प्रदर्शित केला. व त्याची मर्जी प्रसन्न करण्याकरितां उद्यां त्या "नूरजहानचें" गाणें करण्यास त्यानें सांगितलें आहे. लोकाचाराकरितां मी हो ह्मणून आलों. अफसोस ! अफसोस! या गोष्टीचा मला अतिशय संताप येतो. कसबिणी बाळगणें, पैसे उधळणें, चैन करणें, त्याचा मला अगदीं कंटाळा आहे. राज्यकारस्थान व स्वतःचें हित यांजकडे पूर्ण लक्ष्य दिलें ह्मणजे जिवास समाधान वाटतें. तुमचें काय मत आहे ?

**सर्वलोक.**—( एकामागूनएक ) सच्चहै सरकार ! ह्मणतां तसेंच.

**आवलिया.**—स्वाविंद! माफी असावी. मी आपला इमानीनोकर आहें. बोलण्याची जरूर नाहीं परंतु विचारलें त्या अर्थी खरें सांगतों. राग न यावा. सरकार त्या गाणारणीची

काय सिताफी सांगावी. या अल्ला ! आधीं स्वरूपानें परीस लाजविणारी. अठरा एकोणीस वर्षांचें वय! यौवनाचे ऐनभरांत! तशांतून उत्कृष्ट गाणार. एकेक तान जी घेते त्याचें काय वर्णन करावें? अहाहा ! ! ऐकणारा भुलून जातो व त्यास जन्मास आल्याची कृतकृत्यता वाटते.

**वजीर.**—असेल. आह्माला नाहीं त्याचा शोक. गप् बैस.

**अवलिया.**— ( यजमान नाखुष जाहले व सर्वांनींही गप् राहा अशी खूण केलीपाहून स्वस्थ बसला ) चूकहुइ खाविंद. माफ करनां ( मनांत ) या राजश्रीला कधीं नाकधीं मी आपल्या तावडींत धरीन. असो त्याबद्दल आतां काय? काय होतें तें तर ऐकावें.

**वजीर.**—खरें ह्मटलें असतां आह्मास असले वर वर मान आवडत नाहींत.

**अल्ली.**—होय साहब. या पासून फारतर एकरात्र मजा वाटणार आणि ती सुद्धां आपल्या सारख्या राजकारस्थानी पुरुषास काय? नादिष्ट आणि रिकामटेकड्या लोकांचीं कामें तीं. बादशहा अज्ञान असल्यामुळें त्यास त्या बयानें मोहिनी घातली. पण जे परस्त्रियांचे वेडास लागतात ते स्वतःचे हितास मुकतात ही जगजाहीर गोष्ट आहे. तरी लोकांत वाईट दिसेल याकरितां आपण गाण्यास गेलेंसें करून बादशहाचा मान राखावा असें आह्मांस वाटतें. या उप्पर आपली मर्जी.

**वजीर.**—बरं. पण हें १७२३ साल सुरू आहे नाहीं कां?

**अल्ली.**—होय सरकार.

**वजीर.**—आज बरोब्र वर्ष झालें आपण दिल्ली सोडुन

गेल्याला. हो त्यांतच नाहींका बादशहाचा रोख दिसूनआला ?

**अल्ली.**—जी साब ! काय ? पुन्हां सांगावें.

**वजीर.**—मी ह्मणतों कीं गुदस्ता हैदरावर स्वारी करण्यास जा ह्मणून बादशहानें मला सांगितलें यांत त्याचा आशय काय होता?

**अल्ली.**—आपण शूर, तेव्हां सहज त्याचा पराभव कराल हा हेतु. दुसऱ्यास पाठवून काम फत्ते होणार नाहीं हें त्यास पक्कें ठाऊक होतें.

**वजीर.**—छे अल्ली ! तुह्मांला त्यांतलें इंगित नाहीं ठाऊक. हें पहा. आपले विरुद्ध पक्षाचे लोकांनीं बादशहाची एकांतांत भेट घेऊन कान भरले कीं हैदर कुलीखान बराच माजला आहे त्याचा पाडाव करण्याकरितां निजामउल्मुलूख वजीर यास पाठवावा. ह्मणजे तो सहज वजीराची खोड मोडील. आणि त्यामुळें हल्लीं माजत असलेलें वजीराचें प्रस्थ अनायासें मोडेल. विपरीत झालें तरी ही बरेंच. मग बादशहाला ही मसलत बरी वाटली. कारण माझा कडक स्वभाव असल्यामुळें बहुधा त्याचें माझें पटत नाहीं. पण करितो काय? तो बोलून चालून नांवाचा अधिकारी.

**अल्ली.**— वा ! ! कोण त्या लोकांचा विघ्नसंतोषीपणा हा ! सरकार ! पुढें ?

**वजीर.**—ही बातमी मला चुलते अमेदखान याकडोन गुप्तरीतीनें कळली. मग मी विचार केला कीं आपला पराक्रम दाखविण्यास ही चांगली संधी आहे आणि बादशहानें " हैदरावर स्वारी करण्यास आपण जावें " अशी मजजवळ गोष्ट काढल्यावर मी मोठ्या उत्साहानें तें काम करण्याचें

पत्करिलें. हें पाहून बादशाहास व अर्थात् त्या दुष्ट लोकांस फारच आनंद झाला. मग काय झालें तें त्या शेरखानास विचारा.

**शेरखान.**—( पुढें सरसावून ) हो मी होतोंच. सरकार थोडेसे लोक बरोबर घेऊन जे निघाले ते थेट कुलिखानावर हल्ला करण्यास गेले. त्या बिचाऱ्याची काय दशा ? थोडावेळ लढला, आणि भिऊन गेला होताच, सरकारचा तशांतून तडाका, मग काय ? वेड्याचें सोंग घेऊन जो पळाला तो नाहींसाच झाला. नंतर गुजराथेस सरकारस्वारी राहून काम काज पाहूंलागली. सर्व मांडलिक सरदार येऊन त्यांस मिळाले. नंतर त्यांच्या प्रार्थनेवरून सरकारास दया येऊन सरकारनीं स्वतांकडे, ढोळका, भडोच, जंबूसर, मखुलाबाद आणि वळसाड एवढे प्रांत घेतले. सरकार फार दयाशील. दुसरे कोणी असते तर हातांत आलेला एवढा मोठा मुलूख वळकावल्या शिवाय राहता कां ? सरकारचा उदार पण स्तुत्य आहे ! ! !

**वजीर.**—त्यांत काय आह्मीं केलें? असो. नंतर आह्मीं अमदाबादेस आमेदखान यास स्वतंत्र कारभारी केलें. कारण त्यांनीं गुप्त गोष्ट कळविण्याचें कामांत फार इमान दाखविलें. अल्लीसाहेब ! काल तुमचे विचारानें बादशहास काम फत्ते केल्याची खबर दिली. पण आतां तुह्मीं सर्व ज्या अर्थी आमचे विश्वासू मसलतदार आहां त्या अर्थी तुह्मांपाशीं सांगण्यास काय नड आहे ? हें पहा. जर बादशहाचें व आमचें मन एक नाहीं तर वजीरी करण्यांत मला हंसल दिसत नाहीं. कामाचा राजीनामा द्यावा असें मला वाटतें. इतर लोकां-

प्रमाणें राहिल्यावर मग राज्याचें कांहीं कां होईना ? मला काय गरज आहे ? अल्लाचे मनास आल्यास तो नंतर ही सुखी राखील.

**अल्ली.**—( सर्वांचें मन खट्टू झालें पाहून ) छे सरकार ! हा भलताच विचार कोणीकडील आपले मनांत आला? छे ! आह्मीं नाहीं असली गोष्ट उगीच कबूल करणार. आपण गेल्यावर आमची सर्वांची काय दशा ? बरें तें एकीकडे राहूंद्या. तसें झाल्यावर मोंगलांचें राज्य या हिंदुस्थानांतून नाहींसें झालेंच समजा. तो बादशहा काय नांवाचा. आपण वजीर आहां ह्मणून चहूंकडे दरारा आहे. नाहींतर कोण पुसतो कोणाला ? आमची विनंती आहे. आपण असली गोष्ट पुन्हां मनीं देखील आणूं नये.

**सर्वजन.**—हो आमचे ही हेंच मागणें आहे.

**दफेदार.**—साहेब! वामनजी चितारी आले आहेत.

**वजीर.**—येउं द्या. ( अल्ली व बाकी लोकांस ) बरें तूर्त तो विचार तसाच ठेऊं. त्याबद्दल पुनः केव्हां ठरवितां येईल.

**वामनजी.**— ( मुजरा करतो ) सरकार.

**वजीर.**—( या बसा. ) जवळ जागा देतो.

**वामनजी.**—सरकार आपले कृपेनें काम फत्ते झालें.

**वजीर.**—शाबास. बरें कसें काय केलें?

**वामन.**—( तसबिरीचा कागद पुढें करून ) ही पहा तसबीर.

**वजीर.**—( रोंखून पाहतो ) बोला. तुमचें चालूं द्या.

**वामन.**— ( मनांत ) बाजीराव हा आर्य आहे. कसें झालें तरी त्याची आपली एक जात. आतां खरें सांगून उप-

योग नाहीं. दिल्ली जवळ बाजीराव आला आहे ह्मणून सांगितलें तर वजीर चौकशीकरून पकडील आणि त्यामुळें मराठ्यांचा तोटाच होईल. ही गोष्ट फार वाईट. तर आतां कांहींतरी जुळवलें पाहिजे. ( वजीरास ) आपण पूर्णपणें पहावें. मग सांगतों.

**वजीर.**—तुह्माला त्याची काय पंचाईत ? तुह्मी आपले बोलानांत.

**वामन.**—बरें आहे महाराज ! कधीं संधि सांपडेल ह्मणून एक सारखा विचारांत होतों तों खानदेशांत बाजिराव आले ह्मणून बातमी लागली मग तसा घाईघाईनें तेथें गेलों. कर्म धर्म संयोग. बाजीराव एक दिवस शिकारीस निघाल्याचें वृत्त समजलें. मग दऊत कलम आणि कागद हीं घेऊन त्याच्या मागोमाग गेलों आणि ( तसबिरींतलें झाड दाखवून ) ह्या झाडाचे समोर आंब्याचें झाड होतें तेथें बसलों व पाहतो तों बाजीराव थकले भागले असल्यामुळें ( बोटानें कागदावर दाखवून ) या झाडास घोडा बांधून गाशा पसरून पडले. व लागलीच उठून कणसें खाऊं लागले. मग त्याप्रमाणेंच ही तसबीर रेखली आहे.

**वजीर.**—बरोबर शिपाई प्यादे कोणीं नाहींत. हें कसें ?

**वामन.**—नाहीं. सरकार ! ते नेहमीं एकटेच स्वारीस जातात असें ऐकतों.

**वजीर.**—मग पोषाग सरदारी कां नाहीं करीत ?

**वामन.**—कोणास ठाऊक. परंतु कोणी ओळखील या करितां. हा भटीवेष घेतला असावा. असें अनुमान आहे.

**वजीर.**—तें असो. पण वामनजी, तुमची कराग्त अप्र-

तिम आहे आं? तें मोडकळींत पागोटें आणि ती दोन भो-वया मधील भरून आलेली खोंच, ते लढाऊ घोड्याचे फें-साचे जमिनीवर पडलेले ठिपके; हींतर सर्व हुबेहुब साधलीं आहेत!!! शाबास ! ! काम केलेत. ( अल्ली ) ही पहा तस-बीर हातानें काढली आँ ! ! आणि घाईघाईनें ! ! घ्या, दाखवा साऱ्या मानकऱ्यानां.

**सर्वजन.**—( तसबीर पाहून विस्मयानें ) शर्थ आहे ! वा ! काय कारागिरी ! !

**वजीर.**—अल्ली साहेब ! वामनजीस ९००० रुपये इनाम देववा.

**अल्ली.**—( हात जोडून ) हुकूम.

**वजीर.**—दरबार बरखास्त करा. ( उठतो व तसबीर हा-तांत घेतो. )

**सर्व.**—( लवून मुजरा करितात ) सलाम, सरकार.

**वामन.**—सलाम, रजा होईल आतां.

**वजीर.**—( हंसत ) हो सलाम.

## भाग तिसरा.

मागील भागांत सांगितल्याप्रमाणें बाजीराव निघाला व मार्ग क्रमूं लागला असतां त्याचे मनांत विचार घोळूं लागले:—

" खानदेशाचे वसुलाची हम्मी शाहुराजाचे हुकुमानें पत्करिली, आणि खानदेश सोडून त्या ' मस्तानी ' चे आशेनें येथवर तर लपून छपून आलों. आतां काय येथून दिल्ही अगदीं नजीक आहे ह्मणून त्या रामोशाचे बोलण्यावरून

समजलें आहे. पण वेळ पडली रात्रीची तेव्हां कोठें तरी लवकर मुक्काम केलाच पाहिजे. “ काय मनोहर चांदणें पडलें आहे ! ! किती शीतल मंद वायु वाहत आहे. सभोंवतालचे प्रदेशांत काय शोभा मनास अल्हाद देत आहे ! ! आहाहा ! पुण्यांतील वाड्याचे गच्चीवर असे प्रकारची सर्व रमणीयता अनुभवण्यासाठीं छपरी पलंगावर प्रियेसह कितीदां बसलों ! ! या अरण्यांत तें सुख नाहीं. हा चंद्र आपले किरणांनीं माझे मनास टोंचित आहे. हा वायू शीतल असतां ऊष्ण लागत आहे. तस्मात् विरहताप दुःसह आहे. हातचें सोडून पळत्याचे पाठीस कशास लागलों कोणास ठाऊक ? ह्या बादशाहीणीचे आशेनें आलों. ती मिळेल तेव्हां खरें. पण तूर्त तर वनवाश्याची गती प्राप्तजाहाली आहे. स्त्रीचें सुख मजेत भोगीत स्वस्थ बसतों तर नसतें कां झालें ? पण हा खटाटोप पत्करला आहे. त्याअर्थी हातर तडीस नेलाच पाहिजे. आतां डगमगतां कामा नये.” या प्रमाणें विचाराच्या अनेक लहरी त्याचे मनास उद्विग्न करीत आहेत व तो तोंड काढण्याचे नादीं लागला आहे, इतक्यांत त्यास डावे हाताकडे एका हाकेचे अंतरावर उजेड दिसला. तो चांदणीप्रमाणें जरा दिसे, पुन्हा अदृश्य होई, यावरून तो दिवा आहे कीं नाहीं याबद्दल पक्का निर्णय करितां येईना तरी ज्या अर्थी उजेड एकास्थलीं राहून राहून दिसतो त्या अर्थी तेथें मनुष्याची वस्ती असेल असें विचारानें एक पायवाट दिसत होती तिकडे त्यानें घोडा वळविला व मोठ्या हिकमतीनें त्या रुळलेल्या मार्गानें त्यास चालविलें. विकट वाट, रस्त्याची गैर माहिती, कामुक झाल्यामुळें मनास संताप देणारे पद. आणि तत्संबंधीं विचार व [illegible] सिध्यर्थ

युक्तींची योजना, या सर्व गोष्टींशीं त्याचे मनास झगडा करावा लागला. तशांतून घोडा दमून गेला होता व त्यास जखम झाली होती त्या मुळें तो जरा लंगडत होता. बाजीरावही श्रमला होता तेव्हां त्या रात्रीं फक्त तीन कोसांचीच मजल झाली. उजेड कोठून दिसत होता तें एकदाचें स्थळ दिसलें. दृष्टीआड वृक्ष आल्या कारणानें दिवा दिसावा, पुन्हां नाहिसा व्हावा, असा प्रकार झाला होता. आतां स्पष्ट ती झोपडी दिसली व पाहतोंतों जवळ दुसरें घर बीर कांहीं नाहीं. रामोशाचें घरांत शिरलों असें प्रथम त्यास वाटून तो मनांत चपापला. परंतु होईलतें होवो, प्रसंग काढला पाहिजे असा मनाचा निर्धार करून तो धैर्यानें तसाच त्या झोपडीच्या दाराशीं गेला आणि 'आंत कोण आहे' ह्मणून विचारूं लागला. कोणी ओ देईना तेव्हां आंत डोकाऊन पाहिलें तों एक ब्राह्मणाची बाई पोतेरें घालीत आहे असें दिसलें. तिला हा प्रवासी ह्मणतो "कोण आहे हो आंत?"

"कां तुह्मी कोण?" असा प्रश्न आंतील बाईनें तोंड फिरवून केला.

"आह्मी वाटेचे वाटसरू आहों. रात्र झाली, सोबत नाहीं ह्मणून पुढें जावयाचें टाकून तुमच्या गांवीं आलोंत. चार घटका रहायाला जागा द्याल कां?" असें प्रवाशानें उत्तर दिलें.

**बाई**—तुह्मी कितीजण आहां? एकटे असला तर पहातां येईल. पण पांच सात जण असला तर नाहीं आमच्या इथं जागा.

**प्रवासी**.—होय बया मी एकटाच आहे. आणखी कोणी नाहीं. जागा दिलीत तर मी मोठा उपकारी होईन.

मग बाहेरील सोप्यांत कां होईना? तुमच्या सोबतीला रातचेरात्र राहून सकाळीं उठून मी चालता होईन.

**बाई.**—(आनंदानें मनांत) पांच सात दिवस अगदीं सुने गेले. घरींही कोणी आमच्या तावडींत सांपडला नाहीं कीं मुलानेंहि कांहीं मिळवून आणलें नाहीं, बरी संधी सांपडली आहे तर उपयोग करून घ्यावा. (प्रवाशास) याहो आंत या बाहेर कां उभे? हें घर तुमचंच आहे. येतील जातील त्यांची सेवा चाकरी करूं नये तर आमचा इथं राहण्यांत काय अर्थ?

**प्रवासी.**—(मनांत) न जाणों काय या बाईचा हेतु असेल. ही आदरानें बोलावते यांत कांहींतरी काळेंबेरें असेल. चिंता नाहीं होईल तें होवो. आपण शूर असतां काय या बाईस भितों. (मोठयानें) हा पहा आलों. (गुप्ती हातांत सरसावून धरून) कुठें उतरायचें?

**बाई.**—(तपेल्यांत हात धुवून व आंतले दालनांत जाऊन हळुच) बाळ्या जेवीत काय बसलास? ऊठ लवकर बाहेर ये. एक शिकार साधली आज.

**बाळया**—(हळुच) तूं जा आपली. सगळ त्याला विचारून काढून घे. तों माझें जेवण आटपून मी बाहेर येतोच जा.

**बाई**—(खुंटीवरचें घोंगडें घेऊन पुन्हा ओसरीवर येते आणि जमिनीवर पसरते) बसा इथ बामनबुवा. तुमच गाठोड ठेवा आणि पडा जरासे.

**प्रवाशी.**—थांबा, आणतों बाहेर ठेवलय तें.

**बाई.**—बाहेरहो कां? तुह्मी सडेसोंट, बोजा खांद्यावर असायचा?

**प्रवाशी.**—बया माझें एक घोडें आहे त्यावर थोडेसें बोचकें आहे तें आणतों, पण घोडें कुठें बांधूं ?

**बाई.**—(बाहेर येऊन) बांधा त्या चाफ्यापाशीं आन् या आंत. (आंत जाते) बाळ्या आज कांहीं निराळाच रंग दिसतोय. अरे त्याचा केवढा घोडा? आपल्या छपरापेक्षां उंच आणि तो बाटसर तरी कसला धिप्पाड दिसतोय. ब्राह्मण नाहीं तो. तूं चल बाहेर.

**बाळ्या.**—अं! हं! मी नाहीं येत. मी आपला सपाटून जेवत बसून तुमचें बोलणें ऐकतो. कोणी कां असेना, आपल्या पुढें काय करील?

**बाई.**—(बाहेर येऊन) अझून नाहीं कां आटपलें? त्या चाफ्याला घोडं बांधायचं आणि आंत यायचं, त्याला मेला किती उशीर हा?

**प्रवाशी.**—बया घोडें जरा मस्तखोर आहे. त्याला मेखेला बांधलें पाहिजे. (मेख रोंवतो) हें पहा झालेंच. येवढा पायबंद बांधला कीं आलोंच.

**बाई.**—(मनांत) बरं काय चिंता आहे. कसें तरी कपट करून या बच्याजीला जेवतांना कांहीं तरी घालीन. तशांतूनही वांचलाच तर पाहूं काय त्याची मात्रा चालेल ती ! (मोठ्यानें) होऊंद्या तुमचं कांहीं घाई नाहीं. पण झटलं भूक लागली असेल तर भात टाकूं कां ?

**प्रवाशी.**—इतक्या खटपटींत कशाला हो पडता. मला भूक मुळींच नाहीं. वाटेनें फराळ केला, त्याला अझून फार वेळ नाहीं झाला, आतां आपले दोन पाण्याचे घोट घ्यायचे आणि लवंडायचें.

**बाई**.—( मनांत ) आपली युक्ती फसती वाटतें.( मोठ्यानें ) छ. तसं कुठं निजावं कां? फराळ केलात काल संध्याकाळीं. त्याच्यावर घोड्यावरून चालून आला. तें हिसक्यानें सगळं पार झालं असेल. संकोच कां कारितां? तुह्माला वाटेल तर पैसे द्या, नाहींतर नको.

**प्रवाशी**.—पैशाकरितां काय ? भूकच लागली नाहीं हो. थोडी घोड्यास वैरण द्या ह्मणजे झालें.

**बाई**.—( माळ्यावर हात घालते ) ह्या घ्या घोड्याला दोन पेंड्या. त्यांत काय? पण तुह्मी नाहीं ह्मणूं नका.

**प्रवाशी**—तुमचें मन मोडण्याचें वाईट वाटतें पण उपाय नाहीं. भूक असेल तर——

**बाई**.—तुमची मर्जी (आंत जाते ) बाळ्या तें माझ्या हातून साधण्याजोगें काम नाहीं, चल तूं बाहेर.

**बाळ्या**.—( हात धुतो ) चल मी येतों. ( धोतर पांघरून घेऊन त्यांत ल्हानशी तरवार लपवून घेतो ) चल कोण आहे पाहूं दे.

**बाळ्या**— ( पाहून, मनांत ) त्याचें बोलणें ऐकलें तेव्हांच मला संशय आला होता कीं हा कोणी परिचयांतला असावा, पण कोण आहे काय जणं.

**बाई**.—हे रे काय बाळ्या. बावळ्या सारखा कां त्या पाहुण्याकडे पहात उभा राहिलास. त्याचा समाचार घे. हो पुढें.

**बाळ्या**.—थांब ग इची उगीच कटकट. हा ब्राह्मण दिसतोयँ तर खरा, पण असला लढाउ घोडा याच्याजवळ कां याचा विचार करतोय. हें चमत्कारिक दिसतय. ( ब्राह्मणास ) कांहो कोठून आलां ?

**प्रवासी.**—त्याची कां पंचाईत ? एकदा त्या बाईला सांगितलें कीं वाटेचे वाटसरू ब्राह्मण आहोंत. रात्रीची येथें वस्ती करून सकाळींच रस्त्यास लागावयाचें आहे. त्यांनीं रहायाला जागा द्यायची कबूल केली ह्मणून घोड्यावरचें सामान उतरून ठेवण्याच्या बेतांत आहें. हा पहा घोड्याचा पायबंद बांधला. आंत चला भोजन करा ह्मणून बाई आग्रह करितात आणि तुह्मी आरेरावा प्रमाणें दरडावतां ! ! ! ही कां सभ्य पणाची रीत ?

**बाई.**—मला काय ठाउक तुह्मी असें आहांते. तो पहा बाळ्या काय सांगतो. पांथस्थ ब्राह्मण असालसें वाटलें ह्मणून जागा खालीं करून दिली आणि जेवा ह्मटलें. आधींच—

**बाळ्या.**—तूं गप्प बैस. (प्रवाश्यास) ती आपली बायको मनुष्य पाहिली आणि लागला दपटायाला. मऊं सांपडलें कीं कोपरानें खणायच वाटतें? तुह्मीं कोणी सरकारि अम्मलदार आहां असें मला वाटतें. तुह्मास जागा देतां येत नाहीं. तर वाट धरा कसे.

**प्रवाशीं.**—हें हो काय? तुह्मीं भलीं माणसें नाहीं दिसत. जागा दिलीत काय आणि कुंभांड घेऊन घालविण्याचा यत्न करतां काय ? आतां अपरात्रीं मी कुठं जाऊं ?

**बाळ्या.**—बास बास. आह्मीं नाहीं विचार करीत कुठें राहवतें. जा ह्मटलें जावें. जागा आमची आहे. मोंगली जुल्म कराल तर मारच खाल. झोंटिंग पादशाही ती इथ नाहीं चालायची. या रानांत फार गमज्या कराल तर खोडच मोडीन. समजलांका बच्चं प्यारे ! व्हा चालते निमुटपणीं.

**प्रवाशी.**—( मनांत ) दुसरें विघ्न येईल ह्मणून कल्पना

केली ती खरी जाहली. हे कोणी तरी तसेच रामोशी दिसतात. असो या प्रसंगास घाबरतां कामा नये. ( मोठ्यानें ) कोण चमत्कार हा ? अहो एकाएकीं असें वरदळीवर कां येतां ? अहो कांहीं माणसांसारखे वागा. तुमचे बोलण्यावरून कांहीं दुष्ट हेतु मनांत आहेत असें दिसतें. चिंता नाहीं. ( गुप्ती काठीच्या बाहेर काढतो. )

**बाळ्या.**—हं ! हाय आणखी बेत आहे कां ?

**प्रवाशी.**—यांत काय संशय ? जीवावर येऊन वेळ पोंहोंचल्यावर बचाव करणें हें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म होय.

**बाळ्या.**—( धोतर फेंकून देऊन त्या खालीं झांकलेली छोटी तरवार उजवे हातांत घेऊन. ) असें आहे कां ? या तर राजश्री. आतां तुमची रग जिरवतों. आमचा धंदाच तुमच्या सारख्याचा नाश करायचा. जिवाची आशा असली तर——

**बाई.**—तर बीर नको. हाण एक सपाटा कीं पाडजमिनी वर उलथाचे पालथा. मग मी लावीन सगळी व्यवस्था.

**बाळ्या.**—( त्वेषानें ) आतां कां भागुबाई सारखे उभे राहिलां? उगीच दिमाख़ ( आंगावर धावून जातो. )

**प्रवाशी.**—( गुप्ती पट्या प्रमाणें फिरवतो. ) ये पुढें असली पुण्याई तर. चल. ( बाळ्या मागें सरला पाहून ) आतां कोण भागू बाई ठरलें? तूं कां मी ?

**बाळ्या.**—आरे तुरे कां करितां ? मी तसेंच तुह्मास ह्मटलें तर शोभा राहील काय? ( पुन्हां आंगावर जातो ).

**प्रवाशी.**— (तोबऱ्यातून जंबिया घेऊन) हें बग मी शस्त्र सज्ज केलें आहे. कर वर हात कीं लगावतो बत्ती. ( हात उगारतो. )

**बाळ्या.**–( भिऊन खालीं वांकतो. ) नाहीं बुवा इथ कांहीं चालत.

प्रवाशी नंतर त्याची मानगुटी धरून त्यास गचांडी देतो. त्या सरसा बाळ्या जमीनीवर उताणा आपटतो. इतक्यांत आई पुढें सरसावते, आणि ह्मणते:– " हें हो काय ? माझ्या बाळ्याला भिंरीरी पाडलेंत. तो बाळ पडला ह्मणून वाटतें, आज ते असते तर सांगितलें असतें कसें कायतें ".

**प्रवाशी.**–हो दूर, थेरडी मोठी आली शास्त्रार्थ सांगायला! माया होती तर पहिल्यानदांच आपल्या पोराला दाबायचें होतें. ( डावाहात बाळ्याचे छातीवर देतो आणि उजव्या हातानें मारण्याकरितां जांबिया धरितो. )

**बाळ्या.**–( प्रवाशास ओळखून ) आई! तूं हो पलिकडे. माझा जीव बाजीरावांच्या हातून कधीं जायचा नाहीं. कल्याण करण्याचें ज्यांनीं एकदां वचन दिलें ते कां माझा जीव घेतील ?

**बाजीराव.**–( चपापतो ) तुलारे काय ठाऊक माझें नांव? जा तुला अभय वचन आहे. ( बोल. )

**बाळ्या.**–सरकार गुन्हा माफ असावा. माझें सर्वस्वी रक्षण आपण करतां त्याअर्थी आपलें उपकार फार आहेत. पण आपण मला अझून नाहीं कां ओंळखिलें ?

**बाजी.**–नाहीं खुणाखाणा सांग पाहूं. मग ध्यानांत आलें तर बघतों.

**बाळ्या.**–चमत्कार आहे!!! पण हो नाहीं, मोठे लोकांस सारे ओळखतात पण ते साऱ्यास नाहीं ओळखत, हेंच खरें. सरकार ! नुकतेंच तुह्मांला चोरांनीं गाठलें होतें तें तरी स्मरत आहे कां ?

**बाजी.**– ( हंसून ) हो, तूं तिथें होतास कां. काय नांव तुझें ?

**बाळया.**—माझं पाळण्यांतलं नांव " लंबोदर " , आई ह्मणती, बाळ्या, आणि मी नेहमी वाक्पांडित्य फार कारितो ह्मणून सगळे सोबती मला हांक मारितात, " ग्यान्या " ह्मणजे ज्ञान सांगाणारा.

**बाजी.**—तूं त्या तिस्मारखानाचा सोबती नाहीं कां ? आतां जुळलें " ग्यान्या ! ग्यान्या ! ". आतां खूण पटली. पण ग्यान्या ! सगळे तुझे साथीदार शरण आले आणि दास झाले, असें असतां तूं आज सर्पा प्रमाणें कृतघ्नतेची वर्तणूक कां केलीस ?

**बाई.**—हात जोडते, सरकार माझ्या लेंकरावर घुस्सा करूं नये. या वेळेस त्यास प्राण दान द्यावें. तो काय वेडा आहे. कमजास्ती बोलला तर मनावर घेऊं नये, कारण जरा बडबड्या आहे. आणि माझा एकुलता एक असल्यामुळें बराच लाडका आहे. हा मी पदर पसरतें. माफ करा.

**बाजीराव,**– छेछे. बाई.इतकी विनवणीं कां ? तुमचा मुलगा गमत्या आहे हें मला मवाशींच त्याच्या सोनत्यापासून कळलें. मी त्यास आतां पक्कें ओळखतों. त्याच नुसतें बोलणें आणि ऐट पाहून घ्यावींत. आंगांत हिम्मत तितकीच.

**बाळया.**—असें कां ? मी हरलों ह्मणून वाटतें ?

**बाई.**—( डोळे वटारून ) बाळ्या ऐकतोस कां नाहीं ?

**बाजीराव.**—बोलेनाकां ? ( बाळ्यास ) बाळ्या आतां बरीच रात्र झाली. बारावर एक वाजून गेला असेल. त्या

पहा कृतिका वर आल्यात. मला वाटेचे फार श्रम झाले आहेत तर आतां चल आंत.

**बाई.**—या महाराज !

( सर्व घरांत जातात. )

दुसरे दिवशीं सकाळीं बाजीराव व बाळ्या हत्यारांसह रानांत शिकारीकरितां गेले. उत्तरेच्या बाजूस गर्द व किर्र झाडी होती तिकडे निघाले. सुमार दोन हाक अंतरावर ते गेले न गेले तों 'मोत्या' नांवाचा बाळ्याचा कुत्रा धापा टाकित त्याच्या जवळ धांवत आला व त्याचे पायास चाटूं लागला. तेव्हां कोणी तरी त्याचे मागें मोठें श्वापद लागल्यामुळें तो भेदरून जाऊन जीव बचावण्याकरितां पळत पळत आला असावा असा बाळ्यानें तर्क बांधला. आणि खरेंच. तो कुत्रा पुन्हां आल्या वाटेस यजमानाचे पुढें कांहीं पावलें घुटमुळत चाले व इकडे चलावें असा मनांतील हेतु दाखवी. बाजीरावानें आपला जंबिया सरसावला व पुढें चालला. पाहतों तो एक बिब्या वाघ पिसाळल्यासारखा त्यास दिसला. वाघ दडून बसण्याचें बेतांत होता तों बाळ्यानें त्यास पाहतांच आई माई वरून मोठ्या रागानें शिवी दिली. त्यामुळें वाघ अधीकच चवताळला, आणि उलट खाऊन बाळ्याचे आंगावर धाऊन आला. बाळ्याचे हातीं तरवार होती तीतर त्या वेळेस गळून पडलीच. वाघ उडीमारून बाळ्याचे मानेचा घुटका घेण्याचा बेतांत आहे असें पाहून बाजीरावास फार त्वेष आला आणि त्यानें त्याचे छातींत जंबिया खुपसला. मग काय त्या वाघाची त्रेधा त्रेधा? मोत्यानें त्याचे चावून चावून लचके तोडले व त्याचे हाल

कुत्रा खाईना अशी खरोखर स्थिति झाली. मग बाळ्या उठला व बाजीरावास आपली शिताफी वर्णन करण्याचे हेतूनें ह्मणतो. ' कां महाराज ! कशी या वेळेस बहार उडविली. मी खालीं झालों नसतों तर वाघानें आपला समाचारच घेतला असता फार कशाला ? माझा मोत्या देखील कसा छान आहे , कशा वाघाच्या चिंधड्याकरून सोडल्या ! शाबास ! तरी ह्मटलं कुठ गेला होता ? मोत्या ! सरकारास तूं आपल्या यजमानाची हुषारी दाखविण्याकरितांच काल पासून या वाघाच्या भोंवतीं लागला होतास वाटतें ? तरी इमानी चाकर. नाहीं तर—'

**बाजी.**—पुरे रिकामी फुषारकी. मी यं केलें अन् त्यं केलें. वाघ पाहिल्या बरोबर गडबडा धरणीवर लोळण कां घेतलें ? आंगांत शौर्य होतें तर दाविलें कां नाहीं ? तो वाघ मारलेला इथेंच टाकायाचा कां ?

**बाळ्या.**—वा ! चला आपण फरफटीत ओढून नेऊं.

**बाळ्या.**—( घरीं गेल्यावर भोजनोत्तर ) मला जवळ ठेवतां कां ?

**बाजीराव.**—तूं राहतोस कां ? बरें तूं कबूल झालास तरि तुझी आई हो ह्मणते कां ? दिल्लीची तुला माहिती आहे कां ?

**बाळ्या.**—मी एका पायावर राजी. दिल्हीचीतर खडान् खडा माहिती आहे. आई बद्दल—

**आई.**—आपण माझ्या बाळाला आसरा दिलातर जन्माचे उपकार होतील. पण मी इथ काय कराव एकटीन ?

**बाजीराव.**—आह्मी कांहीं नेहमीं ठेवीत नाहीं. दिल्ली-

हुन जाऊन यायचें आहे, तर बरोबर सोबती असावा ह्मणून नेतों. पुन्हां तो परत येईल. फारतर महिना पंधरा दिवसांचें काम.

**बाळया.**—आणि मोतद्दाराला पगार काय ?

**आई.**—त्याची कां चौकशी ? सरकारचे पायाची चाकरी घडते. आणखी काय पाहिजे ? दोन दिवस सेवा होती ही पूर्व पुण्याई समज.

**बाजीराव.**—( बोटांतली आंगठी काढून) ही घे तुला—

**आई.**—( पाया पडते ) छेछे सरकार. देण्याची गरज नाहीं. आह्मी बंदे दास आहोंत.

**बाजीराव.**—ऊठ बया. तूर्त ही घे. मग पण आह्मी पुण्यास परत गेल्यावर तुह्मी मायलेक भेटा ह्मणजे तुह्मास आणखी देणें तें देईन.

**बाळया.**—( आंगठी घेऊन टिऱ्या पिटतो ) चला; मी सरकार येतो. मला नको रोजमुरा.

**आई.**—अस्सें आतां कस शाहण्या सारखें बोललास ?

**बाजीराव.**—झाली निघायची वेळ. बाळ्या ! कर तयारी.

**आई.**—बाळ्या कुरणांत घोडा चरतोय तो आण जा. तों मी दशम्या बांधून देतें तुला बरोबर न्यायला. ( बाळ्या पळत कुरणांत जातो. )

**बाजीराव.**—( मोठ्यानें ) येताना ओढ्यावरून पाणी पाजून आण आं ?

**बाळया.**—होय.

**बाजीराव.**— (पूर्ववत् पोषाख करतो. ) बाई !—

**बाई.**—महाराज! गरिबाचे झोपडीस पाय लागला यानें आह्मास आनंद वाटला. परंतु जेवला खाल्ला व मन मोकळें बोलला आणि बाळ्यास चाकरी ठेवलें यामुळें सरकारस्वारीचे जे आह्मावर उपकार झाले आहेत ते फेडण्यास जन्मोजन्म आंगावरील कातड्याचे जोडे करून आपले पायांत घातले तरी फिटणार नाहींत.

**बाळ्या.**—( घोड्यास आणून ) हा घोडा आणला. भला ताजा तवाणा झाला. पोट कसं तुडुंब भरलय. नगाऱ्याप्रमाणें.

**आई.**—त्याचे पायास लागलें होतें तें बरें झालें का?

**बाजी०.**—औषध कुणी लावलय बरें व्हायला?

**बाई.**—सरकार मला त्या कामांत जरा माहिती आहे. मी एक मलमाची पट्टी लावली होती त्यानें जखम भरली असावी.

**बाजी०.**—( जखम भरून आलेली पाहून ) खरेंच. आणखी दोन पट्ट्या असल्या तर आह्याला द्या पाहूं.

**बाई.**—ह्या घ्या महाराज. दोनसोडून च्यार.

**बाजी०.**—कधीं प्रसंग पडलातर असूंद्या. बाळ्या घाल सामान.

**बाळ्या.**—कसें घालायचें तें एकदा दाखवा, पुन्हा मग माझें मी घालीन.

( बाजीराव घोड्यावर बसून पुढें चालूं लागतो. )

**बाजीराव.**—( बाळ्या आला पाहून ) बाळ्या आलास आईला भेटून?

**बाळ्या.**—हो पण तिला सोडून दूर आल्यानें मनाला बरें नाहीं वाटत.

**बाजी०**—चल आपण जाऊं दिल्लीला. एक आठवड्याचें काम कीं येऊं पुन्हां घरीं.

**बाळ्या**.—बरें आहे. मी तुह्माला २ तासांत नेतो.ही पहा पायवाट. ती अगदीं माझ्या पायाखालची आहे. नाईकवा बरोबर तीनदां जाऊन कोणी खानाचे घरावर दरवडा घालून आणि त्याला लुटून रातोरात परत आलोय तें का उगीच. ज्या रस्त्यानें तुह्मी जात आहां तिकडून दुप्पट अधीक वांकडें पडतें. शुद्ध द्राविडी प्राणायाम आहे. मी ह्मणतों तिकडून दिल्ली सारी तीन का चार कोस. तर या माझे मागें.

**बाजीराव**.—बरें आहे.

नंतर बाळ्या आड मार्गानें पळत व उड्या मारीत चालला. बाजीरावही घोड्यावर दौडत दौडत आठ वाजायचे सुमारास शहराबाहेर जाऊन पोहोंचला. उंच मनोऱ्याचीं शिखरें, मशीदीचीं घुमटें, राजवाडा, हवेल्या, ह्या वृक्षांतून दृश्य होत, व मधून मधून दिवे चमकूंलागत. मनुष्याचा आवाज गोंगाटाप्रमाणें ऐकूं येई, त्यामुळें हेंच दिल्ली शहर असावें असें त्यास वाटलें. बाजीराव नंतर मनाशीं बोलूं लागला. "सखाराम देशपांडे या नांवाचा मनुष्य आपणच शाहू महाराजास शिफारस करून या शहरांत वकील पाठविला आहे. तेव्हां त्याचे येथें उतरावें व त्याचे मार्फत काम साधून घ्यावें अशा इराद्यानें येथवर तर आलों. त्याच्या बद्दल चौकशी वाटेनें करणें रास्त नव्हतें. खानदेशांत असतांना नोकर लोकांपासून जें ऐकिलें आहे, व लहानपणीं वडिलाबरोबर आलों तेव्हां पाहिलेलें जें साधारण आठवत आहे, तेव-

ह्यावरून असा अदमास वाटतोकीं राजवाड्यांत दुसरे मजल्यावर एका दिवाणखान्यांत तो राहत असेल; कारण त्याच्या अगोदर दामोदर पंत वकिला मार्फत तेथें राहत होता; आणि वकिलास एकदा राहण्यास दिलेली जागा बदलूंनये असा बादशहाशी करार आहेच. ”

**बाळ्या.**— ( उत्कंठतेनें ) कसला विचार चालला आहे सरकार !

**बाजी०**—सखाराम कुठें राहतो, साताऱ्च्या भोसल्यांचा वकील ?

**बाळ्या.**— ( भोंवया मुरडून, विचार केल्यासारखी मुद्रा करितो. ) तो नाहीं ठाऊक.

**बाजीराव.**—मग काय तुला डोंबल ठाऊक आहे ? मला वाटलेंच कीं सांगतोस ही कोरडी बात.

**बाळ्या.**— ( आठऊन ) बापुसाहेबकां ? ते साताऱचे कांहीं नाहींत, पण पुण्याचे आहेत.

**बाजीराव.**—ते कुठें राहतात व काय करतात ?

**बाळ्या.**—ते राजवाड्यांत असतात. हें पहा आह्मी सगळे नाईकबा बरोबर रात्रींचे जाऊन अबदुलखानास लुटलें होतें आणि पळून जाणार तों मीं एकटा सांपडलों जमादाराच्या हातीं. साऱ्यांनीं दिला बाल्या. मला कैदेंत टाकलें आणि राजवाड्यांतील एका बागेंत काम करण्यास लावलें. दुसरे दिवशीं मी बागेंत काम करीत असतांना हे बापुसाहेब आले आणि मला “ कोणरे तूं, कां तुला शिक्षा झाली ? ” ह्मणून विचारूं लागले, तेंव्हां “ बाहेरून जरी रामोशी दिसतो तरी मी खरोखर जातीचा ब्राह्मण आहे व अबदुलखानास

लुटलें त्या बद्दल हें बक्षीस भोगीत आहे" असें उत्तर देतांच त्याचें अंतःकरण कळवळून आलें व त्यांनीं मला एक चोरवाट दाखविली. त्या वाटेनें मी पळून गेलों व पुन्हां नाईकबास आनंदानें भेटलों. त्या गोष्टीस आज तीन महिने होत आले. त्यानीं मला सहज बोलतांनां सांगितलें होतें कीं पेशव्यानीं त्यांस पाठविलें आहे व ते पुण्याकडील राहणारे आहेत.

**बाजीराव.**— ( आनंदानें ) शाबास. तेंच मी ह्मणतों ते गृहस्थ. त्यास बापुसाहेब ह्मणतात काय ? आतां तुला त्या चोरवाटेनें त्याजपाशीं जातां येईल कां ?

**बाळ्या.**—हो हो. येईल ह्मणजे ! त्यांत काय आहे ? सहज. पण तुह्माला शहरांतून जायला काय भीति ? शेंकडों जाणार आणि शेंकडो येणार. कोण कुणाला पुसतय ? तुह्मी आपले चला. मी मात्र पोषाग बद्लतों. कारण, नजाणों कुणीं शिपुरड्यानें ओळखलें तर पंचाईत. आपण बराबर आहां तेव्हां भीति नाहीं हें खरें.

**बाजीराव.**—कर काय करायचें आहे तें. पालट पोषाग, पण आटप तोंड.

**बाळ्या.**— ( हातजोडून ) जीं महाराज ! नेहमीं माझा रामोशीबाणा, आतां मी बद्लून मराठी शिलेदाराचा पोषाग करितो. ( गाठोडें सोडतो ) हें बघा, धोतर उभें नेसतों आणि लंगोटी फेडतो. एका मराठे सरदारास मागें मारला त्यांत माझ्या वाटणीला ही ऐटीदार पगडी आली .ही चढवतों डोक्याला. हा पहा आंगरखा घालतो आणि बाह्या वर करतो. आतां काय राहिलें ? हो, जोडा नाहींका ? हा पहा पायांत घातला. ( चालून पाहतो ) कसा फट् फट् वा-

जतो ! हं ? ( धोतर कमरेस बांधतो ) यं आतां जमला कां नाहीं सारा थाट.

**बाजीराव.**– (बाळ्यास) अरे खरेंच! सजला! शाबास!!

**बाळ्या.**–तरी अझून कुठें काय केलय. ( मिशा बोटांनीं वर पिळतो. )

**बाजीराव.**–सारें झालें पण हातांत कांहीं पाहिजे कां नको ? ही घे कहाडणी.

**बाळ्या.**– ( घोंगडींत लंगोटी वगैरे बांधून ) हा पहा बोज्या डाव्या खांद्यावर अडकावतो. चला आतां. ( काहाडणी उजवे हातांत घेऊन चालूं लागतो. )

बाजीराव नंतर घोड्यावर स्वार जाहला आणि बाळ्या त्याच्या पुढें मोतद्दारा प्रमाणें चालूं लागला. इमारती, वाडे, हवेल्या, मनोरे वगैरे पाहत पाहत ते उभयतां शहरांत शिरले. आणि "चाल ए पैस" असें मोठ्यानें ओरडत ओरडत बाळ्या पुढें चालला. कोणी रस्त्यांत मनुष्य आडाण्यासारखा आडवा आला तर हुकुम अमान्यकेला ह्मणून त्यास तो ढकलून देई व वाट करवी. परंतु घोडाबिडा असला तर लाथ बसेल या भितीनें पलिकडून जाई. असें करतां करतां ते एका पुलाजवळ आले आणि नंतर बाळ्यानें दिल्ली दरवाजा वाटें न जातां मागें सांगितलेली चोर वाट काढली, आणि जातांजातां ते पुर्वी सांगीतलेले बागेत येऊन पोहोंचले.

**सखारामबापु** वर रंगमहालांत बसले होते ते घोड्याची चाहूल ऐकून खिडकींत आले आणि "कोण आहे" ह्मणून विचारूं लागले.

**बाळ्या.**–आपल्या कडे पाहुणे आले आहेत.

**सखाराम.**—( बायको जवळ होती तीस ) मी जाऊन येतों.

**सावित्री.**—( सखारामाची बायको धोतराचा पदर ओढते ) नको जायला, कोण आले कुणास ठाऊक ? असली गरज तर राहील रातचे रात खालचे पडवींत. मग सकाळीं करतां येईल शोध— ( तिरस्कारानें ) कुठला पाव्हणा आलाय कोण जाणे ! !

**सखाराम.**—हें काय ? सोड. ( पदराहिसकतो ) जाऊन येऊं दे. पाव्हण्याचा मान राखिला पाहिजे. " अतिथिः सर्वदा पूज्य " असें शास्त्रांत सांगितलें आहे, त्या प्रमाणें वागलें पाहिजे, ह्मणून कितीदां तरी तुला शिकवावें? तशांतून तो गुप्त वाटेनें आला आहे त्या अर्थी कोणीतरि माहितीचा असावा—

**सावित्री.**—( जिन्याचे दाराशीं हात देऊन आडवते ) पुरे झाला शास्त्रार्थ. सदान्‌कदा पोक्तपणा. मेलं सगळी वेळ सारखीच ( हास्य मुखानें ) आज ह्मटलं कसं चांदणें पडल्य. तर दोन तास विलास भोगूं. त्रों पाव्हणा येऊन उभा राहिला. मेला वाटेनच कां गतला नाहीं .कोण जाणे. मी नाहीं आतां जाऊन देत खालीं. चला पुन्हा. ( गळ्यांत मिठी घालते. )

**बाळ्या.**—( हळु ) आतां येईल मग येईल ह्मटलें, पण गेले तिकडे गेले. ( मोठ्यानें ) अहो बापूसाहेब ! " कोण आहे " विचारलेन् आंत कां गुप्त झालां ?

**सखाराम.**—( ऐकून ) पाव्हण्याला किती वेळ उगीच खोळंबवावें ग ? जाऊं दे. ( मिठी सोडवितो. )

**सावित्री.**—असूया हाक मारीत. ओरडेल ओरडेल आणि बसेल स्वस्थ.

सखारामानें आपल्या लाडक्या पत्नीची मिठी सोडून टाकली आणि तो मोठ्या लगबगीनें शेजारील दिवाण खान्यांतून पागोटें घालून व आंगावर रेशीमकांठी धोतर घेऊन खालीं पाव्हण्याजवळ आला आणि त्यांस घेऊन दिवाणखान्यांत गेला. नंतर सखाराम धांदलीनें शेजारल्या रंगमहालाशीं आला. पाहतो तों दार बंद. त्यानें बोटानें खडखड वाजवून खूण केली, परंतु सावित्रीनें ऐकलें न ऐकलेंसें केलें आणि 'हें काय'? असे पतीचे रागाचे शब्द बाहेरून ऐकलें तेव्हां तिनें उठून दार उघडलें.

**सखाराम**—पाव्हणे आलेत, मी त्यानां वर आणायाला गेलों, आणि तूं इकडे दार लावून घेतलेस कां. बरें घेतलेंस तर घेतलें. हाका मारल्यावर तर उघडावें! तेंही नाहीं. वेडी नाहीं तर! भलत्याच वेळेस हट्ट?

**सावित्री.**—इतके मोठे आहेत तरी कोण? नुकले पर्वां माझे वडील बंधु, गोविंरावदादा आले होते तेव्हां कुठें गेली होती ही गडबड? "तुझा भाऊ आला तर तूं जा" ह्मणून कां तेव्हां सांगितलें? मग आतां तरी दुसऱ्याला काय गरज आहे? आपले कोणी आले असले तर करावी आपण खटपट. माझं काय आडलय?

**सखाराम.**—तें राहूं दे या वेळेस. अधी दिवा लाव जा, खालीं स्वयंपाक घरांत जाऊन. तिथेंच फळीवर सन्काड्याचा जुडा ठेवला आहे.

**सावित्री.**—आतां कसं राहू दे. आपल्याला राग येतो

तसा तेव्हां मला नसेल कां आला ? माझ्याच्यानें नाहीं एकटं खालीं जाववत.

**सखाराम.**—( त्रासून ) चल मी सोबत येतो.

**सावित्री.**—पाय आपटीतच जिना वाजवीत खालीं जाते. " महाराज जरा बसावें आलोंच " ह्मणून पाहुण्यास विचारून सखाराम खालीं जातो. परंतु मागून नवरा बरोबर आला नाहीं यामुळें सावित्रीस राग येतो आणि वर चढ-ण्यास परतते.

**सखाराम.**—पुन्हां कुठं चाललीस.

**सावित्री.**—अग बया ! भ्यालेनं मी. मला एकटीला पुढं धाडून दिलं. काय फसवणं पहा !

**सखाराम.**—वर चल. उघड कडी स्वयंपाकघरचे दाराची.

**सावित्री.**—माझा नाहीं हात पुरत.

**सखाराम.**—( पुढें होऊन स्वतां उघडतो ) घ्या ह्या काड्या. ( फळीवरून काढतो ) नाहीं तर तिथं तुझा हात पुरायचा नाहीं.—

**सावित्री.**—आणा इकड. मी चुलींत पाहते विस्तु आहे कां नाहीं तो ( राख दूर करून त्रासानें ) इथं काय आहे? कोळसे नुसते.

**सखाराम.**—( काड्या जवळ देतो ) असल ग किती त्रास देतेस. हो दूर, मी पहातो ( चुलीत हातानें पाहतो ) हा विस्तु नाहीं तर काय झालं ? तक्रारी सांगायला पाहि-जेत शंभर गाडे.

**सावित्री.**—( हिरमुसून ) मी नाहीं पाहिला आवेला-कडे. ह्या घ्या काड्या.

**सखाराम.**—समई आण. ( सावित्री समई आणते. ) काय ही समय. गच्चं गच्च तेलानें भरलीय. आणि वाती तरी चार चार. कोंण जाड्या ह्या; ( सावित्री ह्मणते आ-जीबाईनीं तेल घातलें ) पण तुझं काम पहायचं आणि रागें भरायचं होतं कां नाहीं. हाच कां यजमानीनपणा. (दिवा लावतो.)

**सावित्री.**—पुरें आतां लावला दिवा.

**सखाराम.**—चल तर समई घेऊन.

( सावित्री समई दिवाणखान्यांत नेऊन गालिच्यावर ठेवतें तों तेल सांडतें. ती जाऊन पुन्हां रंग महालांत निजते. सखाराम फडक्यानें तेल पुसतो. )

**सखाराम**—( पाहुण्यास ) आपलं नांव काय ?

**पाहुणा.**—बापू ! तुह्मी आझून ओळखलें नाहीं कां ?

**सखाराम.**—( ओळखून ) माफी असावी. ( पाया पडतो. ) आपण अन्नदाते. आपली ओळख विसरून काय करावें ? परंतु सरकारचे या पामराचे घरीं येण्याचा प्रसंग कसा आला तें समजण्याची इच्छा आहे.

**पाहुणा.**—( सखारामाच्या तरण्या बायकोचा शिरजोर-पणा ओळखून ) आतां पुष्कळ रात्र झाली. निजा जा. सकाळीं बोलूं.

**सावित्री.**—( ऐकून, मनांत हंसून ) आतां बरी खोड मोडली. माझ्या मना जोगें झालें.

**सखाराम.**—( रंगमहालांत जाऊन ) अग तुला स-मजलं कां कोण पाहुणे आलेत ते ?

**सावित्री.**—मला काय त्याची उठाठेव पडली ? कोणी कां असेनांत.

**सखाराम**.—असें काय ! खुळी खरी. बाजीराव साहेब पेशवे पुण्यांतले ते हेच. याणींच कृपा करून आपली येथें सोय केली. ते आपले यजमान—

**सावित्री**.—तुमचे असतील. माझे यजमान तुह्मी.

**सखाराम**.—(त्रासून) खरेंच. तुझ्याशीं वाद घालून उपयोगी नाहीं. तूं कधीं धड बोलत असतेस. तुं नीज आतां मी दिवाणखान्यांत जातो, पाहुण्याच्या तैनातीस.

---

## भाग चवथा.

दुसरे दिवशीं प्रातःकाळीं बाजीराव व सखाराम कांहीं गुप्त गोष्टी बोलत बसले असतां बाळ्या जवळ येऊं लागला तेव्हां त्याचा सखारामानें निषेध केला. त्यावरून बाळ्या रागावलासें पाहून बाजीराव त्यास मोठ्या उत्कंठेनें ह्मणाला. बाळ्या ! आलिकडे ये. तुला कांहीं गुप्त विचारायचें आहे. मनांत ठेवशीलनां ’ ?

**बाळ्या**.—माझें साह्य नसतें तर ०आपण येथें अशा गुप्त रीतीनें आला असतां कां ? इतका मी मनापासून आपले कारितां झटत असून विश्वास ठेवीत नसंलां तर—

**बाजीराव**.—तसें नव्हेरे ! काम फार गुप्त आहे. तूं जरा तोंडाचा फटकळ पडलास ह्मणून विचारलें. रागाऊं नको. माझी खात्री आहे, गुप् चुप् करशील नां ?

**बाळ्या**.—आपल्या पायाशपथ, माझ्या गळ्याशपथ, माझ्या आई शपथ इमानानें वागेन. आतांतर झालं. पण काय तें ऱ्गाहेर तर पडूं द्या.

**बाजीराव.**—( गंभीर मुद्रेनें ) बादशाहानें नवीन एक फक्कड गाणारीण ठेवली आहे—

**सखाराम.**—होय. ती ब्राह्मणाची मुलगी असोन बालविधवा झाल्या कारणानें या शहरांतील प्रचारा प्रमाणें कलावंतीन झाली आहे, अद्यापि दूषित नाहीं. तिचे सौंदर्याबद्दल व कसबाबद्दल सर्व जग वाखाणणी करतें, तर ती आपले जवळ असावी हें योग्य खरें. शिवाय यवनांचें हातून एका ब्राह्मणाचें बायकोस वाचविल्याचें श्रय येईल. नाहींतर ते बाटवितील.

**बाजीराव.**—बाळ्या ! या कामीं तुला काय युक्ती सुचते.

**बाळ्या.**—वाहवा ! ती आवडी कां ? ( सखारामानें हो ह्मटल्यावर ) ती तर मला ठाऊक आहे. लहानपणीं ती आणि आह्मी एके बिऱ्हाडांतच राहत होतों. येथून १८ कोसावर नेरलें ह्मणून गांव आहे तेथें गोवींदराव बुंदेले या नांवाचे गृहस्थ राहत होते. त्यास ती दिली होती. पण नवज्वरानें ते मेल्यावर हिला एका मुसलमान सरदारानें जुल्मानें काढून आणली. तीच स्थिती माझी बहिण गंगा होती तिजवर कदाचित् येईल अशा भीतीनें आह्मी पळून चाललों तों वाटेंतच गंगा वारली. मग आह्मी त्रासलों आणि वाटेंत तिस्मारखानादि सोबती भेटल्यावर त्यांच्या आग्रहास्तव आह्मी राणबा जवळ राहिलों.

**सखाराम.**—विचारलें तें सांग ? तुझी कर्मकथा कुणी पुसली होती ?

**बाळ्या.**—ऐकून घ्यावो बुवा. उगीच मधीं तोंड घालूं नका.

असाच संवाद ठेवलातर बाळ्या तामशीपणानें व्यर्थ

कटकट करील आणि आपलें कार्य सिद्धीस न जातां सखाराम फुकट खट्टु होईल असें समजून बाजीरावानें सखारामास सांगितलें कीं " चालुद्या त्याचें. कामा पुरतें असेल तें घ्यावें; त्याच्याशीं बोलून फळ नाहीं ! "

**बाळशा.**—हं ऐकातर. तेव्हां ही सायंत हकीकत मी कांहीं दिवसांनीं माझ्या सोबत्यानां कळविली. व आह्मी सर्वानीं बेतकरून एके रात्रीं तिला त्या उपट्या मुसलमानाचे घरांतून पळविली. तों आमचे मागें स्वाराची टोळी लागल्यामुळें तिला तसेंच रस्त्यांत टाकून आह्मी पळ काढला; परंतु पुन्हां साधेल तर यत्न करावा असें आमच्या मनांत घोळतच आहे. तर आतांही बरी संधी आली आहे. कांहो ! बापुसाहेब ! तिला कोठें ठेवली आहे, तुह्मी सांगाल ?

**बापुसाहेब.**—राजवाड्याचे पश्चिमेचें आंगास " बेगम महाल " नांवाचा बंगला आहे त्यांत बंदोबस्तांत ठेवली आहे.

**बाळया.**—दरवाज्याशीं दगडी दोन कोरीव सिंह मांडले आसून सभोंवती बाग आहे, तोच नाहीं कां बेगम महाल ?

**बापु.**—हो तोच.

**बाजीराव.**—कां आहे कां नाहीं, बापू, आमच्या बाळ्याला ठाऊक ?

**बाळया.**—( हांसून ) त्यांत काय आहे ? तिथ दोस्तखान कांहीं वर्षा पूर्वी राहत होते. तेव्हां राणबा बरोबर रात्रीचे जाऊन मोहोरांच्या २ थैल्या चोरून आणल्या होत्या.

**बाजीराव.**—धन्य केलीस आतां.

**बाळया.**—शाबासकी पुरे. सगळें काम झाल्यावर कायतें द्या. आतां नको. तेथें जाऊन तिला युक्ती प्रयुक्तीनें मी ए-

कटा पळवितों. पहा तर मजा. तुह्मी आपले स्वस्थ असा. आतां तें काम लागलें माझ्या कडं.

**बाजी.**—कां बापुसाहेब ! अर्धें काम उरकलें कां नाहीं? नाहींतर तुह्मी आह्मी घुटमळत पडलों होतों. चला आतां शहर पाहायला जाऊं.

**सखाराम.**—हो, हो, तें ही काम करावयाचें आहेच आपल्यांला.

बाळ्या तसाच उठला व रात्री प्रमाणें कुणबी शिपायाचा वेष घेऊन दिल्ली दरवाज्यानें बाहेर पडला. वाटेनें गम्मत पाहत पाहत बेगम महालाचे बागेजवळ जाऊन पोहोंचला; व आंत जाणार तों तेथील मुसलमान पाहेरकऱ्यानें त्यास दरडाविलें.— " मज्जावबे हिंदु."

बाळ्या स्वतां चोर असल्यामुळें त्याला ही शिवी फारच लागली व तो रागानें क्रोधजनक उत्तरही देणार होता परंतु कोणच्या कामाकरितां आलों हें मनांत आणून तो त्या वेळीं फक्त " आपल्या गरजे गाढव राजे " असें कुजबुजला परंतु त्या मुसलमान भाईस त्या मुळें राग येऊन तो " इदरसे मज् जाव बे लंडी " असें पुन्हां दरडावून ओरडला. बाळ्यानें निमुट पणीं राग गिळिला आणि तो नंतर सामोपचारानें बोलूं लागला. व त्यानें खिशांतून एक मोहोर काढून त्या शिपायाची हळूच मूठ दाबली. मग काय? बाळ्यास तेव्हांच आंत रिघाव मिळाला. तो प्रथम डावे आंगचे छपरांत स्वयंपाकणीचे बिऱ्हाडीं गेला.

इकडे बाजीराव आणि सखाराम हे शहर पाहणेंकरितां निघाले. कोणी ओळखील ह्मणून बाजीरावानें सरदारी पो-

याग केला व दोघे जण दोन उत्तम घोड्यांवर बसून शहरांत चालले. राजमार्ग ज्यास " चंदनी चौक " ह्मणतात. तो युरोपांतील अत्युत्तम रस्त्यांसहि मागें सारील. तो रस्ता पाऊण मैल लांब आणि शंभर फूट रुंद असे. त्याच्या दोनी बाजूस मोऱ्या बांधून काढल्या असून त्यांत कित्येक ठिकाणीं आळु, कित्येक ठिकाणीं बारीक केळींचीं झाडें, आणि कित्येक ठिकाणीं गांवांतील कल्मष पाणी सोडून त्यांत पानवेली सोडून दिल्या होत्या, त्या मुळें चित्र विचित्र शोभा बनून आली होती. त्यारस्याचे दोन्ही आंगचे कमानदार व घुमटाकृति दुकानांतून विकण्या करितां माल मांडून व्यापारी लोक बसले होते. कोठें कोठें गारोडी तमाशा मांडून लगे ढोल, लगे ढोल, खानसाबके नांवाचा डंका, बाबु साबाचे नांवाचा डंका असा गोंगाट करीत होते. कोणी तमासगीर मुखा वाटे धूर आणि अग्निज्वाळा काढीत; कोणी हळद कुंकु वगैरे तीन चार रंगाच्या भुकण्या एकत्र मिसळून पाण्यांत घालून प्राशन करीत व पुनरपि पूर्ववत् कोरडे व निरनिराळे रंग काढीत. कोणी प्रथम अधोमुख होऊन नंतर ऊर्ध्व दृष्टि होतांच सुवर्णाप्रमाणें पिवळी नेत्र पटलें दाखवीत व पुनः पूर्ववत् करीत; कोणी दांत सोन्याप्रमाणें रंगवीत; कोणी मुखावाटे लांब लांब धागे ओढीत; कोणी शंख व गारगोट्या वगैरे सामुद्रिक पदार्थ कुंथत कुंथत काढून दाखवीत; कोणी वृश्चिक व सर्प इत्यादिकांस हस्तांवर खेळवीत; कोणी मुंगसाची व सापांची लढाई लावीत; कोणी एडक्याची टक्कर करवीत; कोणी गौडबंगाली तमाशे करीत या प्रमाणें अनेक प्रकारच्या कर्मणुकीच्या गोष्टी उदर निर्वाहार्थ

गारोडी लोक करून दाखवीत असत; व तें अवलोकन करण्याकरितां राजमार्गांत लोकांच्या झुंडीच्या झुंडी उभ्या राहात व हिंडत असत. मध्यम प्रतीचे लोक बुरख्याच्या गाडींतून जात येत त्या मुळें सजविलेल्या बैलाच्या घाटींचा व गाड्यांचे चाकांचा आवाज मिश्र होई. कोणी उमद्या आरबी घोड्यावर स्वार होऊन चमकत व दवडत जातयेत. कित्येक मोंगलांचे पदरचे सरदार, खान व राजे हत्तीवर अंबारींत व हौद्यांत बसून डाम डौलानें ललकारत व मजा पाहत इकडून तिकडे व तिकडून इकडे जात असत. शिपाई प्यादे स्वारी पुढें जमलेल्या समुहास पैस् पैस् करीत नागव्या तरवारी हातांत घेऊन कष्टानें धांवत जात. अशी ज्या राजमार्गानें एकच गर्दी उसळली तेथें सखाराम व बाजीराव यांची स्वारी येऊन धडकली व अशा गर्दींत त्याना ओळख न पटूं देतां फिरण्याची संधी सांपडली.

**बाजीराव.**—कांहो बापू! या राजमार्गांत बाजारच्या लोकांची व सरदारस्वाऱ्यांची गर्दी जाहल्या मुळें जिकडे पहावें तिकडे मुंग्यां प्रमाणें दाट माणसें दिसतात तशीं दुसऱ्याही रस्त्यांत आहेतकां?

**बापू.**—होय सरकार काय विचारावें? शहरची वस्ती वीस लक्ष सुमार आहे. हें पहा उजवे व डावे आंगास थेट रस्ते फुटले आहेत. त्यांत कारागिरांचीं दुकानें वगैरे वसलीं आहेत. इकडे कां थोडी दाटी दिसते पहा आपण. त्याच्याच पलीकडे सरदार लोक राहतात. मोठाले उच उंच गच्चींचे वाडे दिसतात ते—

**बाजी.**—( पाहून ) अहो खरेंच! पण त्यांत कोणी वीर—

**बापू.**—( कानाशीं ) महाराज, ती शंका नको. यांत खरे वीर फार विरळा. बहुतकरून भोजन भाऊ, पगारखाऊ, व आळशी, आणि मिज्याशी अशां प्रकारचेलोक या शहरांत सुखवस्तु जाहले आहेत.

**बाजीराव.**—हें तर सगळ्या अंदाधुंदीवरून दिसतच आहे. पण गुलाम चैन मारतात खरी. शिपायी व सरदार यांचा कसा काय मासला ?

**बापू.**—एकाच माळेंतील मणी. बारवर्षी सोळवर्षी पोरें सैन्यांत ठेवलीं आहेत. जे कांहीं मोठें सरदार आहेत ते राजविलासी चैन भोगतात. पण कवाईत मात्र वरचेवर होत असते. सर्व लटपुटी कारभार. यांतला प्रसंगास किती उपयोगी पडेल, देवास ठाऊक.

**बाजी.**—( बापूस हलकेंच ) विषय राजकीय पडला. सर्व लोक बेफिकीर आहेत हें खरें तरी रस्त्यानें त्या बद्दल वाटाघाट करणें चांगलें नव्हें. घरीं गेल्यावर बोलूं.

**बापू.**—हो. तरी बरेंच. आपण भव्य इमारती पाहायला जाऊं ह्मणजे झालें.

**बाजी.**—चला. कापड बाजारांतून जाऊं.

**बापू.**—कांहीं घ्यायचें वाटतें ?

**बाजी.**—हो. एक शालजोडी घ्यायची आहे.

**बापू.**—फार उत्तम. तो मार्ग आपल्या वाटेवरच आहे.

**बाजी** व सखाराम "घेलाशेट" मारवाड्याचे दुकानीं गेले.

**मारवाडी.**—रावशाब ! ही काश्मीरची शालजोडी अपी शोध केला तर कोठें शापडायची नाहीं.

**बाजी.**—अरे पण, किमतीचें नीट बोलत नाहींस मग

पाहून काय अर्थ ? चला बापू. दुसरीकडे तपास करूं.

**शेट.**—ये रावशाब ! अर घेऊन टो जा. शवाचार हजार रीप्याला.

**बाजीराव.**—चार हजार घ्यायचेत ?

**शेट.**—बरं. रावशाबाचें मन कां मोडा. याट मुद्लाला फार टोटा झाला पण भोवनीची वेळ जा घेऊन.

बाजीरावानें ती शालजोडी ठरलेल्या रकमेस विकत घेतली. सखारामानें रोख रुपये लागलींच देवविले.

**बाजी.**—बरी शालजोडी पडली नाहीं कां ? बरें पण पाहण्याजोग्या इमारती कोणत्या तें सांगा ह्मणजे तिकडे—

**बापू.**—हो चला. डाव्या आंगाला समोर दिसते ती पाहूं.

**बाजी.**—( जवळ जाऊन ) कोणाची मशीद ही ?

**बापू.**—रोशन अद्दोलाची.

**बाजी.**—केवढाली हीं घुमटें आणि शिखरें ? वरून सगळाच सोन्याचा मुलामा ?

**बापू.**—हो. आंत जाऊन पाहण्या जोगें कांहीं विशेष नाहीं. चला दुसरी पाहूं.

**बाजी.**—( जवळ जाऊन ) ओ हो ! काय जबरदस्त आणि सुरेख काम हें ?

**बापू.**—जुम्मा मशीद ह्मणतात ती ही. चला आंत जाऊन पाहूं.

( दोघेजण गड्यापाशीं घोडे देऊन उतरून जातात. )

**बाजी.**—खालचा चहुत्रा सगळा बांधीव आहे ! शिकस्त आहे पैसा खर्चण्याची ! ! बरें वर चला. ( दोघे वर जातात. ) बरोबर चाळीस पायऱ्या आहेत. पुष्कळ उंच

आलों आपण. ही सभोंवारचीं घरें पहा झोंपड्या सारखीं दिसतात. हे तिन्ही घुमट सबंध संगमरवरी दगडाचे आणि बापू ! काय जाळीदार व नक्षीदार काम केलें आहे हो हें ? ( पाय निसरतो ) वा ! येथेंही इतके गुळगुळीत रंगीत दगड बसविण्यांत सिताफी आहे खरी ! !

**बापू**.—सरकार ! पुढील कसब पाहिलेंत कोठें ? चला दुसरी मजा पाहूं ( असें ह्मणोन दोघेही पायीं चालतात. )

**बापू**.—ही पहा वेधशाला. कौशल्य पाहून घ्या. अकबर बादशाहचे वेळेस देवसिंगनामें अति विख्यात ज्योतिषी होऊन गेला त्यानें ही बांधली. ( वर जातात. )

**बाजी**.—हें हो काय गच्चीवर दगडाचीं यन्त्रेंच यन्त्रें ? हीं केवढालीं पाषाणीं वर्तुलाकृतीं मेजें, अर्ध चंद्राकृतीं ताटें, व चंद्रकोरी प्रमाणें तबकड्या. लेखण्या आणि कागद. विद्वान् लोक गणित करण्यांत गुंतले आहेत. चला दुसरीकडे जाऊं.

खालीं येऊन शेजारल्या वाड्यांत जातात.

**बाजी**.—हें हो काय बापू ! ऋषीच्या आश्रमा सारखे जिकडे पाहावें तिकडे खोल्या आणि दिवाणखाने केवढाले हे ? काय रुंद व भव्य गच्या ?

**बापू**.—शालागृह ह्मणतात याला. या खोल्यांत मुलें अभ्यास करतात. दिवाणखान्यांत गुरुजी शिक्षण देतात. व सज्जे मजे करितां—

( पुन्हां बाहेर येतात व रस्त्यानें चालूं लागतात )

**बापू**.—( बोटानें दाखऊन ) हें संगमरवरी दगडाचें घुमट औरंगजेबानें त्याचा वजीर ग्यासल दिनचांद याचें स्मरणार्थ बांधलें हें साधारणच आहे.

**वाजी.**—ऊन आतां रखरखीत पडलें. ( आकाशाकडे पाहून ) सूर्य पुष्काळ वर आला आहे. अकरा वाजायला आले असावेत. चला घरीं बापु ! दुपारून पुन्हां येऊं.

( दोघेही घरीं जातात. )

घरीं परत आल्यावर, बाळ्या आला कीं नाहीं या बद्दल बाजीरावानें अगोदर शोध केला, पण " आला नाहीं " असें कळलें; तेव्हां गोष्ट सिद्धीस नेण्या विषयीं जी बाळ्यानें प्रतिज्ञा केली ती कितपत खरी होती किंवा त्याचे अल्लड वर्तणुकीमुळें कांहीं विघ्न उद्भवतें या विचारानें बाजीरावाचें मन जास्त उद्विग्न झालें. अशी बाजीराव काळजी करीत आहे, तों बाळ्या तेथें आला. त्यास पाहून बाजीराव पुसतो. " कांरे ! काय झालें गेला होतास कां तिकडे " ?

" वाहवा महाराज " बाळ्या ह्मणाला " आपला तळीराम गार झाला वाटतें ? तरीच या गोष्टी. माझी कांहीं आठवण झाली कां ? बेगारीला तेवढा मी ? "

**बाजीराव.**—( ढेकर देतो ) ( हंसून ) तुझी पुष्काळ वाट पाहिली. मग बसलों जेवायला.बरें, हो सोंवळा लवकर. घरांतील मंडळी तुझी वाट पहात बसलेली आहे.

बाळ्या पाय धुतो. त्यास मुकटा नेसावयास सावित्री स्वयपाक घरांतून बाहेर फेकते.

**बाजी**०— ( विनोदानें ) अहो बापू ! त्याला पितांबर द्या तो नेसायला....

बाळ्या कधीं न नेसलेला अमोलिक जरिकाठी पितांबर मोठ्या हौसेनें नेसला, व वाढलेल्या पानावर डौलानें बसून त्यानें मिष्टान्न सेवन केलें. पहिला भात खाऱ्या नंतर

बाजीरावानें हांसत व उत्सुकतेनें त्यास विचारिलें “ बाळ्या गेला होतासकां तिकडे ” ? “ हो हो !” बाळ्या उत्तर देतो. “ दुसरा काय उद्योग ” ? तडक तिकडेच गेलों. प्रथम दरोजावर बाहां * * त्या नोड्यानें आडविलें. इच्या * * * त्यानें मला शिव्या दिल्या पण कामाकरितां चकारशब्द न बोलतां त्याचे हातावर खिशांतल्या मोहरा ठेवल्या. मग आंत जा ह्मणाला व डावे आंगास स्वयंपाकीण राहते तिला भेटा ह्मणून सांगीतलें. व स्वयंपाक घराचे दारापाशीं एक मोलक-रीण होती तिला एक मोहोर देऊन तिचे मार्फत “ काशी-बाई ” नांवाची ब्राह्मणीण बाई स्वयंपाक करीत होती तिची भेट घेतली. ( हुस् हुस् करून ) तिखट झालीहो, चौधारी घेवड्याची भाजी ( ठस्का लागतो )

**बाजी०**—वर पहा. पाणी पी लवकर.

**बाळ्या.**— ( वर पाहून ) ती पहा माझी खट्याळ सासू टांगली आहे. तिथें कोण मसनी आहे कोण जाणे ? अजून लग्नाला ठिकाण नाहीं तोंच सासून् बिसू. ( सर्व हंसतात )

**बाजी०**—बरें मग पुढें काय झालें ?

**बाळ्या.**—थांबाहो. त्या मस्न्या सासुला पाणी पाजुद्या. ( पाणी पितो ) ( सर्व हंसतात )

**बापू.**—बाळोबा, चालूंद्या, सरकारस्वारीचें व आमचें मन तिकडे लागलें आहे.

**बाळ्या.**— माझ्या पराक्रमाकडे होय ? ऐका तर इ-कडच्या तिकडच्या गप्पा छप्पा झाल्यानंतर हळूच गोष्ट काढली पण बयानें काय तिट्टकारा दाखविला ! ! नाक काय मुरडलें ! ! हिडिस् फिडिस् काय केलें ! ! तिचें तिला

साजे. अहो ! रांडेनें मला शिपायास सांगून अडकाऊन ठेवण्याची देखील भीती घातली. मग मी ह्मटलें, आतां असें नाहीं उपयोगीं. खानाच्या येथें आवडीला पळवायला गेलों ह्मणून सकाळीं सांगितलें तें, तेव्हां मी तिच्या गळ्यांतला चंद्रहार उपटला होता बरेंका, त्यांतले एक दोन पदर, खिशांत तुटून पडले होतेच ते सर्व आकाबाईच्या पुढें ओतले. मग झाली देवी प्रसन्न आणि आंत एकांताची खोली होती तेथें तिणें मला नेलें. तिथें मात्र ती मनापासून बोलूं लागली. तेव्हां मग तिला मी आपला हेतु स्पष्ट कळविला. तेव्हां कोणाकारितां मी इतकी खटपट करित आहें तें तिनें पुसलें. हंबीरराव ऊर्फ बापूसाहेब पागे ह्मणून जयपुरा कडील मोठे श्रीमंत व नामांकीत सरदार, येथें तेवढ्याच कामाकारितां आले असून त्यांच्या वतीनें मी हें काम करीत आहे व त्यास तुमची मदत मिळाल्यास फत्ते होईल, असें तिला उत्तर मजकडोन मिळालें तेव्हां तिचे मनांत लालुच जास्त उत्पन्न होऊन तिनें माझे ह्मणण्यास रुकार दिला. ती आतां दुपारीं जेऊन आवडीकडे जाईल आणि आपले बद्दल ( बाजीरावास उद्देशून बापूसाहेब झाला बरेंका आपण. अरे हो ) ( सखारामाकडे पाहून ) येथें दोन बापूसाहेब झाले. 'तिचें मन भरून ठेवणार आहें. सकाळ प्रमाणें आज संध्याकाळीं आपण सरदारी पेहराव करून हवा खाण्यास तिकडे यावें ह्मणजे मी तेथें जातोंच. तेच हे ह्मणून दाखवीन. ( सखारामास ) बागेच्या समोरील हवदापाशीं उभे रहा ह्मणजे खिडकींतून छान दिसेल ह्मणून त्या काशीबाईनें सांगितलें आहे. तेव्हां वकील बापुसाहेब सरकारला त्या ठिकाणीं घेऊन या बरेंकां ?

**बाजी.**–( हर्ष पावून ) शाबास, वाहवारे बाळ्या, शाबास. ( गळ्यांतून हजार बाराशें रुपयाचे किमतीचा धाकटा गोफ होता तो काढून बाळ्या पुढें टाकला ) हा घे खाऊं. ( सखारामास ) कां बापू !–

पुढें बोलणार इतक्यांत सखारामबापू ह्मणाला कीं " महाराज योग्य आहे. " बाळ्यानें तोफ गोफ घेऊन चोरखिशांत गांठ मारून ठेवला. भोजनोत्तर पानसुपारी खाल्यावर बाजीराव व सखाराम शहरांत मजा पाहण्यास गेले आणि बाळ्याही शिपाईगिरी पेहरावानें सांकेतिक स्थलीं गेला व काशीबाईचे मध्यस्तीनें आवडीस भेटला. तिला लहानपणची ओळख पटविली व बापूसाहेब पाग्यापाशीं तेव्हांपासून चाकरी आहे असें खोटें सांगून इष्ट कार्याविषयीं तिचेजवळ मसलत करीत बसला. तिनेंही तेव्हां संभावितपणाचा बराच आंव आणला आणि कांहीं वेळ नाकबुली दाखविली. परंतु तिचें अंतरंग बदललें. दोन चार, वर्षें राहून जसा चित्ताल्हाद होईल तसा मुसलमान लोकांचे दुष्ट पादशाहापाशीं अनीतीनें वास करून व्हावयाचा नाहीं अशी तिचे मनाची पुष्कळ दिवस खात्री जाहली होती परंतु प्रतिबंधांत असल्यामुळें इच्छेनुरूप वागण्यास तिला आजपर्यंत सांपडलें नव्हतें. ती सवड बाळ्या होऊनं दाखवित आहे त्याचा फायदा करून घ्यावा अशा इराद्यानें तिनें मनांतील हेतु अन्योक्तीनें प्रदर्शित केला. हें बाळ्यानें व काशीबाईनें जाणलें आणि अधिक स्फुरण पावून ते दोघेही बापूसाहेब पाग्याविषयीं उघडपणें अतिशयोक्ती करून स्तुती करूं लागले तेव्हां तो गृहस्थ तिचे मनांत फारच भरला

आणि त्यास एकदा समक्ष पाहण्याची उत्कंठा आहे-असें तिनें बोलून दाखविलें. बाळयाचे मनोदयानुरूप गोष्टी घडत चालल्या, हें पाहून त्यानें दुपारीं ठरविल्या बेताप्रमाणें घडून येण्याची मसलत केली व संध्याकाळीं साहा वाजतां ते द्वारावरून जातील असें सांगितलें. मग तर ती फार अधीर जाहली आणि त्यांचें दर्शन केव्हां होईल हें तिला वेड लागलें. साहा वाजण्यास तासाचा अवधि उरला होता परंतु ती बाळया काशी यांचें स्तुतीपर वर्णन ऐकून जाहली होती. त्यामुळें वेळ जाता जाईना ह्मणून खिडकींत बसून रस्त्याकडे सारखी टक लावूं लागली. आणि घोड्यावर बसून कोणी मराठा सरदार गेला कीं तिनें बाळयास "हेच कां ते." असें मदांध होऊन पुन्हां रस्त्यांत बघत रहावें. असा तिला नाद लागला.

बाजीराव व सखाराम शहरांतील प्रसिद्ध स्थळें पाहण्यास निघाले, ते अर्धी पुराण किल्ला नांवाचा जुना किल्ला बाबर बादशाहानें बांधलेला होता तो पाहण्यास गेले. त्याची मजबुती आणि कामाची व नक्षीची सुरेख मजा वगैरे वर्णनीय काम पाहून बाजीरावास आश्चर्य वाटलें. ही भक्कम इमारत आंत जाऊन पाहून जिज्ञासा तृप्त करून घ्यावी असें त्यास वाटून "चला आंत जाऊं" असें तो आपले वकिलास बोलला.

**सखाराम.**—महाराज माफी असावी. येथें बंदोबस्त फार कडक आहे. दोन बाजूंस दोन घुमट आहेत व वर्तुळाकृती भाग .र पाया नसतां वर मशीद बांधून त्यांत पीर ठेवला अ.ह तें, या अष्ट पैलु वाड्याच्या मधील चौकांत. ( बोटानें

दाखवून ) तें पहा. त्यांत खालीं मोठालीं तीन भुयारें आहेत तीं बांधून काढून लहान तोंडें ठेवलीं आहेत. हो बरी आठवण झाली. आपल्या सातारच्या किल्ल्यांत राजदिंडी वाटे चढून आंत गेल्यावर उजवे हातास रांजण पुरले आहेत कीं नाहीं, तसाच प्रकार. त्यामध्येंच दारू गोळा भरून ठेवण्याची आज कित्येक वर्षांपासून वहिवाट चालत आली आहे.

**बाजीराव**.—आतांहि तेथेंच ठेवला आहे असें वाटतें.

**सखाराम**.— छे पूर्वीप्रमाणें तयारी नाहीं. डामडौल मात्र राहिला आहे.

**बाजी**.—किती रुपयाची दारू असेल बरें ?

**सखाराम**.—फार झालें तर तीन हजारांची. या वर्षाचे लष्करी जमाखर्चाचे कागदपत्र अद्याप बादशाहाकडोन सह्या होऊन आले नाहींत. परंतु गुदस्ताचे पाहिले त्यांत पांच हजारांची रक्कम होती.

**बाजी**.—बरेंच कळलें. हें पाहिजे होतेंच. पण तोफा वगैरे किती आहेत ?

**सखाराम**.—चलावें सरकार. जवळ मैदान आहे तें दाखवितों ह्मणजे सहज दिसेल.

**बाजी**.—( जाऊन ) ह्याच कां ? तोफा तर बहुतकरून रचून ठेवलेल्या दिसतात. आणि त्या तरी किती दोन तीनशावर नाहींत कांहीं. एवढीच कां पुंजी ?

**सखाराम**.—महाराज ! आणखीं कायतर ? अहो सर्व मदोद्धत कारभार!! वरचेवर आपल्या सारखे रणधुरंधर थपडा देत आहेत तरी मराठे व तत्पक्षांतील लोक निष्पराक्रमी समजून हे पादशाहीपणांत गर्क होऊन गेले आहेत.

फार झालें तर प्रसंगीं उपयोगीं पडण्याजोग्या ५० एक तोफा असतील. बाकीच्या एकमेकींच्या उरावर पडल्या आहेत.

**बाजी**०—आणि कसरत होते कांपण ? आणि ती कोठें ?

**सखाराम**.—याच मैदानांत. ( बोटानें दाखऊन ) त्या तोफाच्या ढिगाच्या बाजूस बंगला बांधला आहे तो, त्याच्यांत खुद्द बादशाहा व त्याचे मानकरी बसतात आणि सणासुदीचे दिवशीं दोन तीन टोळ्या येथें येऊन लुटपुटीची लढाई करतात.

**बाजी**.—पण तोफा उडविते वेळीं गोळ्याचा उपयोग क्वचित् घडत असेल.

**सखाराम**.—हो, फक्त दारु ठासून बार काढतात. तसेंच दबा धरून बसतात त्यावेळस वायफळ बार काढतात. कांहीं वेळानें शत्रुकडील पळून चाललेलें सैन्य निराश होऊन शरण येतें, कारण पाठी मागून हल्ला झालेला असतोच व पुढें होण्याचीही धास्ती.

**बाजी**०—एकुण उत्तम बंदोबस्त व कवाईत. उगीच १०० मराठे लोक हजारों यवनांची दाणादाण उडवून देतात ती. असो. पण (बोटानें दाखवून ) मधोमध मैदानांत छत्राकृती काय उभारलें आहे तें ?

**सखाराम**.—तें जयचिन्ह होय. या इमारतीवर निशाण लावितात व विजयी सैन्यापैकीं मुख्य सरदाराचे पराक्रमाचें वर्णनार्थ त्यास्थळीं तासे वाजवितात आणि नंतर तेथें बादशाहा हत्तीचे अंबारीत बसून जयघोष ऐकतात.

**बाजी**०—जय अमुकाचा व्हावयाचा व अमुकानें पळून जावें असें पूर्वी ठरविलें असतें वाटतें ?

**सखाराम.**—हो; तें तर आदले दिवशीं ठरलें असतें व त्या प्रमाणेंच रणांत एकंदर प्रकार घडून येतात.

**बाजी.**—( हंसतो ) पण खऱ्या शत्रुशीं लढतानां अशी कशी व्यवस्था राहील ?

**सखाराम.**—( हात जोडून ) तें सरकारस्वारीस मज पेक्षां जास्त माहीत. चलावें सरकार पुढें जाऊं.

( सुमार पावकोस उभयतां अश्वावर पुढें जातात. )

**सखाराम.**—ही डावे बाजूस निजामुल्दिन् ह्मणून यवन संत होऊन गेले त्यांची कबर. सर्व काम संगमरवरी पाषाणाचें आहे. मध्यें ज्या जागीं साधूस पुरलें त्यावर दोन बाजूस दोन दगडाच्या जाळीदार भिंती बांधल्या आहेत. यांत जें हस्त कौशल्य आणि चतुराई व नक्षी दृष्टीस पडतात तसे प्रकारची कारागिरी प्रत्यक्ष ताजमालांत ही नाहीं.

**बाजी.**—चला पाहूं. ( दोघे, उतरून, पाहण्यास जातात. )

" अहो ! खरेंच " बाजीराव ह्मणतो " आह्मी वडिलांबरोबर लहान असतां येऊन ताजमहाल पाहिला होता, त्यांतील नामांकित भिंतीचे पडद्या पेक्षां हें काम खचित् सुरेख व सफईदार आहे. बापू ! तुह्मी कांहीं ह्मणा परंतु मला असें कळलें आहे कीं " संतराम् ह्मणून प्रसिद्ध कारागीर होऊन गेला त्याचे करामतीचीं हीं फळें. हे यवन कबूल ना करोत, पण आर्य लोकांशिवाय अशा सुबक आकृती व चित्रें निघणें अशक्य दिसतें.

**सखाराम.**—हें तर खरेंच पण ते मुसलमान लोक स्वतां विषयीं लेख लिहून ठेवितात त्यामुळें लोकांस खरें कळत नाहीं. आपल्या सारखे धूर्त, शोधक, राजपुरु-

पांची गोष्ट वेगळी; बाकी ( दगडावर वाचतो " ही कबर शेखअल्लीनें पुज्यमहंत निजामुल्दिन याचे स्मरणार्थ बांधली सन्.... " ) या लेखावरून कां, लोक फसणार नाहींत?

**बाजी.**—हं. अशा थोड्या कां लबाड्या आहेत. पण बोलून काय फळ ?

(सखाराम पुढील इमारत दाखवितो व दोघे जातात. )

**सखाराम.**—ही मशीद हूमायून बादशाहानें बांधण्यास सुरवात केली पण त्याचे हातून समाप्त न जाहल्यामुळें त्याचा मुलगा अकबर यानें पुरी केली. यांत आंत जाऊन पाहण्या सारखें फारसें नाहीं. शेजारीं पाण्याचा नळ आहे तो पाहूं ह्मणजे तेथून दुसरी मजा दिसेल.

( सखाराम व बाजीराव त्या नळापाशीं चालून जातात. )

**सखाराम.**—चलावें बर. ( दोघे पायऱ्या चढून जातात. )

**बाजीराव.**—( आंत जाण्यास रुंद बांधीव जिना होता तो पाहून ) किती हो हा रुंद आहे दगडी जिना ?

**सखाराम.**— " ४० हात रुंद " २९ हात खोल. यांत पैसा टाकतांच कोळी लोक काढून आणतात.

त्याप्रमाणें बाजीरावानें फेंकतांच थोडक्या वेळांत तेथील पोहणारे कोळ्यांनीं बुडीमारून पैसा वर आणला. हें पाहून बाजीरावानें संतोष दर्शविला व १ मोहोर त्या पाणबुड्यास दिली. ही गम्मत पाहून ते उभयता उखासावरील गच्चीवर गेले व तेथून कांहीं इमारती बोटानें दाखवून सखाराम यजमानास कळवितो. " सरकार मुसलमान शिपायास राहण्या करितां नऊलाख रुपये खर्चून ह्या सात इमारती बांधल्या आणि फार झालें तर हजार लोक तेथें राहत असतील.

तसेंच त्यांची खाण्या पिण्याची मिजास काय ठेवली आहे ? मौज मारताहेत गुलाम ! !

**बाजी.**—आणि कांहीं मराठी शिपायी लष्करांत ठेवलेत त्यांची काय सोय केली ?

**सखाराम.**—काय सांगावें महाराज ? त्यांचे हाल पहावत नाहींत. त्यांनीं स्वतां हातानें घरें बांधून राहवें ह्मणून ठरविलें आहे व त्याप्रमाणें (बोटानें डावे आंगास दाखऊन) तीं दाहावीस घरें दिसतात तीं, तेथें थंडी वाऱ्यांत उपास मारा काढीत त्यास जुलमानें राखलें आहे.

**बाजी०**— ( हंसत ) हें हिताचेंच आहे—

**सखाराम.**—हो. चातक पक्षाप्रमाणें ते आपलेसारखे वीरांची वाट पाहतच बसले आहेत.

कांहीं वर्षांपूर्वी बाळासाहेब पेशव्याकडील बाबासाहेब वाटगे सरदार लढाईस उठून या दुष्टांची कत्तल उडविली, तेव्हां हे सर्व त्यास सामील होते. वरिष्ट मुसलमान लष्करी अम्मलदारानीं लढण्यास सांगितलें कीं उलटून पडून ते त्यांसच ठार करीत. पण थोडक्यांत फसलें, त्या वेळेस बाबासाहेब अदृश्य झाले त्या मुळें यांचा दम खचला नाहीं तर—

**बाजी०**—असो. ध्यानांत ठेवलें पाहिजे. त्या बद्दल येथें उघड बोलूंनये.

**सखाराम.**—छे सरकार ! राजनिष्ठा कागद पत्रांतून आणि बादशाहा व त्यांचे चाकर यांचे समक्ष मात्र. बाकी जुलमाविषयीं खाजगी रीतीनें बोलण्यास कोणीहि येथें भीत नाहींत. सर्वांचीं मनें—

**बाजी०**— ( कानांत ) आपल्या सारख्यांनीं इतरांप्रमाणें

बोलण्यापेक्षां करून दाखवावें हें उचित्. आतां काय पाहण्या सारखें आहे ?

**सखाराम**.—ह्मणण्यासारखें उरलें नाहीं. वजीर सोफदार धांगचे कबरस्थान कांहीं पहाण्यासारखें आहे; पण येथून कोसभर लांब—

**बाजीराव**.—संध्याकाळ होत आला. उशीर होतो आणखी आपल्याला ( हंसतो ) बेगम महालाकडे जायचें आहे.

**सखाराम**.—होय महाराज. चलावें तिकडे अधीं जाणें झालें पाहिजेच. ( हंसून खूण पटवितो. )

दोघेही पुन्हां मजा पाहत व गप्पा मारीत पाऊण तासांत नेमल्या जागीं जाऊन पोहचले आणि सखारामानें ' हाच खुणेचा हौद ' असें यजमानास सुचाविलें. इकडे ह्या स्वाऱ्या आलेल्या पहातांच आवडीस जो मोह उत्पन्न झाला तो वर्णितां येत नाहीं. स्वतां स्वरूपानें इतकी उत्कृष्ट होती तरि नजरानजर होतांच तिचे डोळे द्रिपले व त्या विनयवतीनें बाळ्यास तिकडे पाहण्याविषयीं खूण केली. बाळ्यानें बाजीरावास पाहिलें होतें तरी आवडीचें मन कसें काय स्वभावतः फिरतें तें जाणण्याकरितां प्रथम त्यानें तिकडे पाहिलें न पाहिलेंसें केलें व " तेचहे " ह्मणून सांगतांच तिचें मन खास त्याजवर बसलेलें ओळखून तिला थट्टेनें ह्मणतो, " आऊसाहेब लाजतां कां ? बापूसाहेबानीं तर तुमच्याकडे सारखी टक लावली आणि तुह्मी लाजून मागें पाहतां हें काय ? "

**आवडी**.—छे ! रे ब्ळवंतराव ! पाहवेना मेलें तिकडे.

असें नखरेबाज व लाडिकपणाचें उत्तर दिलें खरें, प-

रंतु मनापासून पुन्हां केव्हां पाहीन असें झालें होतें ह्मणून पुन्हां पदर डोकीवरून सांवरून घेऊन ती पाहूं लागली. तें रम्यरूप मनांत भरलेलें पुन्हां पाहवें, पुन्हां लाजून खिडकीचें दारा आड स्वतःचें मुख लपवावें, असा प्रकार त्या लज्जावतीनें सुरू केला. याप्रमाणें कांहींवेळ झाल्यानंतर पुन्हां पाहतांच ती मूर्ती नेत्रासमोर घोड्यावर दिसली नाहीं ह्मणून वाळ्यास म्लान मुद्रेनें प्रश्न करिते: “ बळवंतराव ! हें रे काय, जाणें झालें वाटतें ? हतभाग्य मी ! ! ”

**वाळया.**— छे हो आऊ साहेब ! घोड्यावरून खालीं उतरली आहे स्वारी.

**आवडी.**— ( लाजून आंतले खोलीचे दाराकडे लवकर जाते ) अग बाई ! वर येणें होतय वाटतें ? ( आनंदानें ) हें काय बाई ! अग काशी तयारी तरीकर. बळवंतराव ! जा आण जा नीट वाटेनें.

**वाळया.**—वर कसे येतील. पाहारा नाहींकां ?

**आऊ॰**—जळलातो! आग लागो त्या पादशाहाच्या हुकुमाला ! ! जाग काशी ! खालीं जाऊन त्या शिपुड्याला माझा निरोप सांग कीं ( लाजते ) वर येण्यास मनाई करूंनको ह्मणून मी ताकीद केली आहे.

**वाळया.**—तुमचे ऐकतील कां ?

**काशी.**—छे त्याचें काय ऐकतां बळवंतराव ! तो मेला दांडगा नोडगा बाहशाहाचे हुकुमाखेरीज कोणाचें ऐकत नाहीं.

**आऊ.**— ( खरी स्थिती ऐकून ) खरेंच मेलं, माझं तरी कोण जुमानतोय ? मैनेला पिंजऱ्यांत ठेवतात त्यांतली मी.

पण वळवंतराव ! तुह्मी कसे वर आला तसें * घेऊन यानांत ?

**वाळया.**—माझी गोष्ट निराळी, तसें त्यानां करता येत नाहीं ( खिडकींतून डोकावून ) आऊसाहेब ! उगीचकां पं- चाईत इकडे या, स्वारी इकडे नाहीं येत.

**आऊ.**— नाहीं तर— ( हिरमुसते )

**वाळया.**— अहो त्या नारळी खालचे हौदाकडे स्वा- री वळली.

**आऊ.**—पाहूं ( खिडकी जवळ येऊन )आणि ते दुसरे गृहस्थ कोण बरोबर ?

**वाळया.**—त्यांचे वकील ते. त्यांच्या येथेंच आह्मी सारे उतरलोंत.

इतकें संभाषण होत आहे तों बाजीराव व सखाराम हौदावर गेले व हौद वहात होता तेथें गुळणें करण्याचें मि- षानें कांहीं वेळ फरशीवर बसले. हें पाहून आवडीहि म- नांत समजली कीं उभयतांचे मनाप्रमाणें हेतु शेवटास जात आहेत. सूर्य अस्तास जाण्याचे सुमारास असल्यामुळें तो आपले ऊर्ध्व किरणांनीं त्या स्थलास विशेष शोभा आणता झाला. आकाशांत चित्रविचित्र वर्णाचे ढग दिसूं लागले. झाडाचीं पानें खुलूं लागलीं; त्यावरहि आरक्तता चढली. सूर्य किरण बाजीरावाचे मुखावर पडल्यामुळें कानांतील लोलक चमकूं लागला व त्यांतून नानाप्रकारचे रंग प्रसृत झाले. या सर्व कारणांनीं बाजीरावाचे चेहऱ्यावर आवडीची विशेष नजर बसली. त्या बाजीरावास पाहून आवडीस जो आनंद झाला तो विलक्षणच. ती हास्यमुख होऊन व मु-

रकत पाहून काशीबाईस ह्मणते " काय ग ! देखणा पुरुष असावा तर असाच; नाहींतर रोज छपन्न हजार आडु माडू राजे रजवाडे आणि खानबहादूर पुकारत जात येत असतात. फार कशाला ? ज्या मेल्या पादशहानें मला येथें जुलमानें ठेवलं आहे व माझें मन त्यावर बसावें एवढ्यासाठीं दागिनें, जवाहीर, व पोषाग घालून तो रात्रंदिवस नटत असतो व त्याचे पदरचे लोक त्याबद्दल वाखाणणी नेहमीं करतात तो तरी काय * पुढें दिसेल ? ओंवाळून टाकावें अशा राजबिंड्या पुरुषावरून लाखोंजण. बळवंतराव खरंच कां माझ्यावर प्रीति आहे ? कां तुह्मी मधचे मधीं कांहीं तरी सांगतां ? "

बाळ्या—मग उगीच कां जयपुराहून हजारों रुपये खर्च करून या शहरांत आले आहेत ?

आऊ.—हो. कांहीं तरी सांगून आपली माझी समजूत घालतां झालें. माझ्या सारख्या दासी घरीं शेंकडों पडल्या असतील.

बाळ्या.—आऊताई ! नाहीं तर हौदापाशीं मुद्दाम येऊन घोड्यावरून उतरून पाणी पिण्याचे निमित्तानें कां आपल्याकडे पाहत बसले आहेत ?

बाळ्याच्या सांगण्यावरून व बाजीरावाचे कृतीवरून तो आपल्यावर भुलला आहे हें आवडीस पक्कें समजलें होतें. ती त्याच मनोवेगानें बाळ्यास ह्मणतेः—" स्वारी जात असतां तोंडांस कोरड पडली ह्मणून खालीं उतरून जाणें झालंय हौदावर आन् काय ? बळवंतरावजी तुह्मी मात्र माझी उगीच चेष्टा करतां. "

**बाळ्या.**—ताईसाहेब ! तुमच्या गळ्या शपथ तुमच्या करतांच स्वारी आली !

आवडी बाजीरावाकडे वक्र दृष्टीनें व लीलेनें पाहत असे व त्यानेंहि प्रीतिफुल्ल नयनानें तिकडे पाहिलें ह्मणजे ती डोळा घालून स्मितहास्य करित असे. कांहीं वेळानें सखाराम व बाजीराव पूर्ववत् घोड्यांवर चढले. पादशहाप्रमाणें गड्यांनीं हात देऊन व गड्यांच्या मांडीवर पाय देऊन न चढतां बाजीराव पटादिशीं शूर वीराप्रमाणें उडीमारून चलाखीनें बसला हें पाहून तर आवडीस जास्त आनंद वाटला. परंतु मनाला आल्हाद देणारी मदनमूर्ति नेत्राआड चालली या गोष्टीमुळें तिला वाईट वाटलें. तेंव्हां बाळ्या ह्मणालाः—" आऊ साहेब ! घडला भेटीचा योग, आतां कसें काय ?

**आऊ.**—थांब रे बळवंतराव, मला पोटभर पाहून तरी घेऊं दे. नाहीं तर जाईनास खालीं आणि उभे रहाण्यास सांग.

**बाळ्या.**—आतां बापुसाहेबास तेथें उभे रहाणें रास्त नाहीं. गेलें पाहिजेच.

**आऊ.**—दासीचा अर्ज आहे ह्मणावें ' माडीवर येऊन चरणानें जागा पवित्र करावी. '

**काशी.**—ताईसाहेब ! मघाशीं नाहीं कां—

**आऊ.**—कहरच आहे. जळला तो शिपुर्डा. येऊं देईना वर संमद आहे जीवंत !( विचार केल्यासारखें करून) इतकें हावें कशाला, मीच जाते तिकडे.

**काशी.**—आपल्या कारितां तर सगळा खटाटोप शिपाई न् पाहरा. जाल कसें ?

**आऊ.**—जायला लागले तर आंगाला हात लावील कां माझ्या ? त्याला नाहींका ठाऊक बादशाहाची कशीमी जीवका प्यार आहे ती? मी ह्मणेन काम आहे. मग पाहूं काय आ-डविण्याची त्याची बिषाद?

**काशी.**—नाहीं ह्मणाला तर काय कराल? तो तिरसट भाई, हुकुमाचा बंदा. बादशहानें ताकीद केली तसें वागलें पाहिजे. नाहीं तर येणार त्याच्या अन्नावर पाणी.

**आऊ.**—आतां काय करावें. लांब जाणें होतें. जाऊं दे मला तुझीच सगळी पिरपिर. काशी मी बादशाला सांगन आं ?

**काशी.**—काय ह्मणून? दुसऱ्या पुरुषाकडे जात असतां मी आडविलें ह्मणून ?

(आवडी उदासीन झाली हें पाहून) कोणतेंही काम घाईनें होत नसतें. बापुसाहेबापाशीं तुह्मांस नेण्याचें मजकडे लागलें पण तुह्मीं खचित् पुढें फिरणार नाहीं नां ?

**आऊ.**—वेड तर नाहीं लागलें. अग मी एका पायावर राजी. पण युक्ति काढ कांहीं ?

**काशी.**—बळवंतरावजी ! वाड्या बाहेर पोंचवायाचें माझें काम. पुढें काय तजवीज करणार? रस्त्यानें कसें न्याल?

**बाळया.**—आज मध्यान्हरात्र उलटून गेल्यावर एक वाजण्याचे सुमारास मी घोडा घेऊन तयार राहतो. आऊसाहेब! मी दोन घटकांनीं एक मर्दानी पोषाग काशीबाई बरोबर पाठवून देईन तो घालून तुह्मी मजबरोबर चला ह्मणजे झालें.घोड्यावर बसा कीं सूं बाल्या.

**काशी.**—फार उत्तम. आतां ती झिम्मी माझ्याकडे.

**आऊ.**—शावास. तुमचे दोघांचे मजवर फार उपकार होतील. ( आठवण करून )पण रात्रीं गाणें करण्याकरितां बादशहा येईल ह्मणून वर्दी आली आहे. तेव्हां कसें ?

**काशी.**—हो. खरेंच. पण गाणें लवकरच आटपावें ह्मणजे झालें-

**बाळया.**—नाहीं तर काशीबाई. निरोप धाडानां हो कीं आज आऊ साहेब बेमार आहेत ह्मणून.

इतकें संभाषण चाललें आहे तों एक मुसलमान शिपायी खिडकी खालीं येऊन उभा राहून काशीस हाक मारितो. लगबगीनें आवडी व बाळ्या आंतले दिवाण खान्याचे दाराशीं उभे राहतात. काशीबाई खिडकींत येते. व कोण आहे ह्मणून विचारिते. शिपायानें जबाब दिला कीं “ बादशहाचे हुकुमावरून वजीर साहेबानीं तुह्मांस कळविण्यास सांगितलें आहे, सरकार स्वारीची तबियत आज नादुरुस्त आहे तर काल कळविल्या प्रमाणें गाण्याचा बेत करूं नये. रहित केला आहे ह्मणून बाई साहेबांस कळवावें. ”

**आऊ.**—( हळु )कां बळवंतराव! ( हंसते ) झालें काम. देवाचे मनांतच आहे.

**काशी.**—खावंदास कळवा कीं हुकुमाप्रमाणें ताईसाहेबांस कळवून तजवीज ठेवते. त्यांचीही प्रकृती साफ नसल्यामुळें आज मनाजोगा थाट उडाला नसता.

**शिपायी.**—जातो तर. हुकूम.

**काशी.**—नांव काय तुमचं ?

**शिपायी.**—मला दाऊदखान हवलदार ह्मणतात. देवडीवर असतो—

**बाळ्या**( हवलदार गेल्यानंतर कांहीं वेळ आनंदांत गप्पा मारून ) चला जातो मी आतां. मलाही सर्व हकीकत कळवून पुन्हा रात्रीं येऊन बसलें पाहिजे.

**आऊ.**—जा. पण सर्व मजकुर गुप्त ठेवा.

**बाळ्या.**—छे, छे, त्याची काळजीच सोडा. फक्त बापूसाहेबास——

**काशी.**—बरें. चला तुह्माला पोचिवते ह्मणजे शिपाई अडवायचा नाहीं.

नंतर आवडी आंतील दिवाणखान्यांत जाऊन दोन कागदावर कांहीं मजकूर लिहिते. आणि बाळ्या व काशी बोलत बोलत खालीं येतात. आणि कांहीं वेळानें गोष्टी संपल्यावर बाळ्या बाहेर पडतो व जातानां गोफाचा पदर तोडून मुसलमान पाहरेकऱ्याचे हातीं देतो आणि आनंदानें धांवत धांवत सखारामाचे घरीं येतो.

---

## भाग पांचवा.

सूर्याच्या प्रखर किरणांनीं संतप्त होऊन जणूं सर्व पृथ्वीवरील लोक गोंगाट करूं लागले व तो गलबला ऐकून त्या लोकांचें दुःख निवारण करण्याकरितां सायंकाळचे समयास चंद्र उयगिरीवर आला आणि अभितप्तजनांस सुखविण्याकरितां आपल्या थंड किरणांनीं अमृतस्राव करूं लागला. व अशाप्रकारें शांत झालेले लोक चंद्रप्रकाशांत जिकडे तिकडे आनंदानें विहार करूं लागले. पाहवें तिकडे रस्त्यांत लोकांचें मेळे. बहुतेक लोक पायीं चालूं लागले.

ज्या रस्त्याचे दोहों बाजूस उत्तम वृक्ष वाढले होते त्याच्या फांद्याच्या फटींतून जें चांदणें सडकेवर उमटून शोभा दिसत होती ती त्या वेळीं चित्तास फारच आनंद देत असे. तिचे पुढें साच्याच्या अगर कोरीव जाळीदार कागदाच्या हि सुबक रांगोळ्या देखील रद्द. या प्रमाणें सर्व जग सतेज दिसूं लागलें ह्मटलें खरें, परंतु बाजीरावापाशीं प्रीतीची वस्तु नसले कारणानें त्यास हें सर्व विपम वाटूं लागलें आणि ' पुढें न जातां आल्या मार्गानें परत जाऊन आवडीची हास्य मुद्रा पुन्हां पाहूं ' असें तो सखारामास ह्मणाला; परंतु आपल्या सारख्या थोर मनुष्यास एकाच नादीं लागलों आहों असें प्रसिद्धपणें दाखविणें उचित् नव्हे व पुन्हां जाऊन महालाचे समोर रस्त्यावर उभें राहणें संशयास कारण होईल असें सखारामानें नम्रपणें उत्तर दिलें.

त्यावरून बाजीराव व सखाराम दौडत दौडत कुतुब मनोऱ्याजवळ आले.

**बाजी.**—( मनोरा पाहून )काय अचाट काम हें!

**सखा.**—मजले पाहिले कां किती ?

**बाजी.**—( वर पाहतो )एक, दोन, तीन ( पागोटें हातानें सांवरतो )चार,.. पांच, अबब! वर पाहवेना बापू! किती तरी उंच मनोरा! धन्य आहे बांधणाराची. अहो पण हा पायाच केवढा आहे?

**सखा०.**—९४ हात रुंद असून २९ कां २७ हात उंच आहे. घ्यापेक्षां वरचें काम आश्चर्य वाटण्याजोगें आहे. चला पाहूं.

**बाजी०.**—बाहेरून एकदा पाहून घेऊं द्या. ( पाहतो )

संगमरवरी पाषाणाची बांधीव आणि त्यांत चित्र विचित्र रंगाचे स्फटिक शिला बसविल्या आहेत. तांबडे निळे पट्टे-सफईनें ओढले आहेत. एकूण शाबास! पण बापू! ही इमारत बांधली कधीं व कोणीं?

**सखा.**—सरकार नाहीं तरि आज ५०० वर्षें होत आली बांधल्याला. १३ शतकांत ह्मणतात. काम सतत १८ वर्षे सुरू होतें तेव्हां एकदाचा हा मनोरा संपला. कुतुबुद्दिननें लाखो रुपये पाण्यासारखे खर्चण्यास त्यावेळेस मागें पुढें पाहिलें नाहीं.

**वाजी.**—इतका कां जुना आहे? तरिच वरचा भाग कललां आहे.

**सखा०**—होय सरकार! तो पुष्कळ दिवस तसाच आहे. पण तो कोठें भंगला नाहीं. असे चार मनोरे बांधून त्यावर तो दिवाणखाना करणार होता तों त्या कुतुबुद्दिनास मृत्युनें गाठलें. चला वर गेलों ह्मणजे सगळें समजेल. ( वर चढून जातात )

**वाजी०**—हा पहिला मजला नाहीं कां? वा, हवेकरितां काय छान खिडकी राखिली आहे.

**सखा.**—होय महाराज! अशाच वर चारही मजल्यांवर आहेत.

( पुढें मनोऱ्याची थोरवी वर्णीत तीन मजले जातात )

**वाजी०**—बापू! किती हो उंच आलों. गम्मतच आहे. जिन्याची बांधणी भोंवऱ्यासारखी आहे पण बुवा आतां नाहीं खालीं पाहवत. डोळे फिरतात.

**सखा०**—आझून पांचव्या मजल्याच्या गच्चीवर कुठें

गेलोंत. सरकार ! भोंड येईल आपण जरा येथें दम खावा. कुणी पाहणारा असला तरी अह्मी नेहमीं तीन मजले येतों; आज आपण बरोबर होता ह्मणून इतका वरती जेम तेम चढतो आहें, आतां विसावा घेतल्याशिवाय आपल्याच्यानें नाहीं वर जावायाचें. ( बसतो हुश् )पागोटें काढतो ( कांहीं वेळानें पुन्हा वरल्या मजल्यावर जातात. )

**बाजी**०—झालें कां एकदाचें चढायाचें?

**सखा**०—हो आपण वर जाऊन पाहून या. माझ्याच्यानें नाहीं येववत. चक्कर येऊन पडेन बिडेन खालीं.

**बाजी**.—चला हो वर आलोंत तें कां हें पाहिल्यावांचून जायचें. ( गच्चीवर चढतो. ) हें हो काय गुळगुळित दगड? तोंड दिसतें आंत.

**सखा**.—( वर जातो व पाय निसरून आपटतो ) अरे रे ! मरतों आतां !

**बाजी**.—( त्याला हात देऊन उठवितो ) हें काय बापू ! जपून पाय ठेवावा कां नाहीं? पडतां कशानें गच्चीला वरवंडी आहे.

**सखा**.—आपण होतां ह्मणून वाचलों. ( पागोटें पुन्हा उचलून डोकीस घालतो ) महाराज चंद्रमणीशिला ह्मणतात ती ही. आज पक्की लक्ष्यांत राहिली.

**बाजी**.—असें कां? मी सुद्धां कालिदासाच्या ग्रंथांत " शशिमणिशिला सेयं यस्यां विपांडुर माननं " वगैरे वाचलें होतें. वडील ( बाळासाहेब ) ह्मणत होते कीं ते या शहरांत आले तेव्हां एक चंद्रकांताचा त्यांनीं खडा पाहिला होता बरें चला, आज आपण त्याची फरशीच पाहिली.

पाहिलेंत कां ? चंद्र जों जों पूर्ण कळेला चढतोय तों तों हें पाषाण द्रवतात !

**सखा.**– होय खरेंच. त्या कठड्याला टेंकून बसून शहर पाहवें.

**बाजी.**—कांहो बापू. येवढा राजवाडा पण घरासारखा दिसतोय. बाकी तर झोंपड्या. मनुष्यें मुंग्यासारखीं बारीक दिसतात. एकूण बहार खरी ! !

**सखा.**—सरकार, थंडी वाजते. चला उतरूं आतां.

**बाजी.**—दाहा बारा कोशावरचा टप्पा दिसतो येथून. जरा थांबा हो. केवढाले रस्ते हे रुंद. पांच सहा कोस तर पश्चिमेचे अंगास हें शहर पसरलेलें दिसतें आहे. सगळी झाडीच. तरीच इतकी वस्ती. कां हो बापू, भंगलेला नाहीं ह्मणालात तें खोटें नाहीं.

**सखा.**—( बाजीरावापाशीं बाळ्याची गोष्ट काढली ह्मणजे खालीं उतरतील या हेतुनें ) सरकार ! पण घरीं बाळ्या वाट पाहत असेल.

**बाजी.**—( हंसून ) मग चला लौकर.

अशी सांकेतिक गोष्टीची बाजीरावास आठवण केली तेव्हां सखारामाचे विनंतीप्रमाणें तो अल्प काळांत खालीं उतरला आणि उभयतां पुन्हां घोड्यावर बसून दौड करीत राजवाड्यांतील बिन्हाडीं आले. त्याच्या पूर्वी बाळ्या येऊन घरीं वाट पाहात बसला होता. बाजीरावास घरीं येताच बाळ्यानें विनोदानें सांगितलें कीं “ ती आकाबाई पुन्हां उलटली, आतां वश होतां दिसत नाहीं. मीच कसा तरी इकडे पळून सुटका करून आलों. ” ज्या कामाकरितां

आलों तें काम साधत नाहीं हें ऐकून बाजीरावास अतिशय वाईट वाटलें. व त्याचे मनाची स्थिति विलक्षण झाली. स्वतां भेट झाली तेव्हां प्रसन्नता दिसली असोन पाठीमागून हा प्रकार घडून आला यामुळें त्यास पुष्कळ विस्मय वाटला व पुन्हा पुन्हा तो बाळ्यास खोद खोदून विचारूं लागला. कांहीं वेळ असें झाल्यानंतर फार थट्टा करणें बरें नाहीं असें समजून बाळ्यानें विनोद केल्याबद्दल माफी मागितली व इत्थंभूत हकीकत खरी खरी सांगितली. ती ऐकून बाजीरावाचा आनंद पोटांत माईना. नंतर ते आनंदाच्या गोष्टी एकमेकांशीं बोलत बसले. भोजनोत्तर बाळ्या पागेंत गेला व बाजीरावाचा खासगी एक व सखारामाचा दुसरा असे दोन घोडे घेऊन आवडीचे बिन्हाडाकडे पोषाखासुद्धां जाण्याची त्याणें तयारी केली. बाळ्या स्वतां सखारामाचे घोड्यावर बसला आणि त्याचा विश्वासु नोकर गोंद्या नांवाचा होता त्याच्या स्वाधीन बाजीरावाचा घोडा दिला आणि ते दोघे बागेकडे गेले. तेथें गेल्यावर संध्याकाळ प्रमाणें गोफाचा एक पदर द्वारपाळास देऊन बाळ्या आंत गेला. तेथून पूर्ववत् काशीचे स्वयंपाक घरांत जाऊन तिला भेटला. तिनेंहि मोकळे मनानें त्यास ठरलेला बेत सांगितला. बाळ्या नंतर घोड्यांसह त्या बेगम महालाचे पाठीमागचे आंगास तळें होतें तेथें जाऊन झाडीचें आड दडून आवडीची वाट पाहत बसला.

**काशी**:—( नंतर आवडीस भेटून ) ताई साहेब ! बळवंतराव घोडा घेऊन आले आहेत.

हें ऐकतांच आनंदानें पटादिशीं उठून बसून आवडीनें विचा-

रिलें:— ‘खरंच कां. शाबास. बळवंतराव, शाबास. काशी खरोखर धन्य मी. पण बाहेर कसें ग जायचें ? ’ तेव्हां पुन्हां काशी ह्मणते. ‘ हें पहा दुल्हेखानाला तुह्मी रजा दिली नाहीं कां? ’

**आऊ.**—अग हो ! त्याची बायको फार आजारी होती ह्मणून दिली. आज पांच दिवस झाले.

**काशी.**—पण तुह्मी मधचे मधीं कशी दिली. आणि रोज दुपारीं जमादारसाहेब पाहऱ्याचे हजीरीला येतात तेव्हां कसें होतें ?

**आऊ.**—काय वेड्यासारखी विचारतेस कोण जाणें ! बादशाही अंदा धुंदी. हजीरीच्या वेळेला एक तास दुल्हेखान येतो आणि पुन्हा जातो. बोभाट करायचें आपलें हातांत कां कोणाच्या ? तो कशाला पुकार करील ? मला जमादारानें विचारलें ह्मणजे मी ह्मणते कीं शिपायाचा पहारा सक्त आहे व ते मेले मला बागेंत देखील हिंडूं देत नाहींत. ह्मणून नेहमी त्यांच्या मी कागाळ्या नेते.

**काशी.**—आईसाहेब, हें सर्व मी जाणून आहे. पण ह्म-टलें खुलासा काढावा. बरें तळ्यांतून आतां पोहून चलाल कां नाहीं ?

**आऊ.**—शाबास ! छान युक्ती काढलीस. तें काम माझें. मी पोहण्याचें कामीं पटाईत आहे. काशी ! दे मला पड-दणी नेसायला ह्मणजें झालें.

**आऊ.**—नाहींतर असें करीनास. रात्रीचा वेळ; न जाणो, भोपळे पाठीस बांधून मागें शिकवीत होतींस पोहा-यला तें—

**काशी.**—त्यांतला एक फुटला. चिंता नाहीं, एकावर काम

भागेल. तो पाठीवर बांधावा ह्मणता कनी, आन् पुढें ?

**आऊ.**—तो भोपळा बांध माझे पाठीवर म्हणजे पली-कडे खुशाल जाते.

**आवडी.**—काशी हे घे कागद एका मेणकापडांत नीट बांधून दे ह्मणजे भिजणार नाहींत.

**काशी.**—कसलें तें पाहूं कां. ( रुकार मिळतांच ) ( हंसते ) आतां पराकाष्ठा झाली. सर्व कडेकोट बंदोबस्त, ताई साहेब ! फार दूरवर विचार आहे तुमचा.

काशीनें जुनें लुगडें आणून दिलें तें नेसून व पेटींतील दागिनें आंगावर घालून आवडी पळून जाण्यास सिद्ध झाली व काशीबरोबर पाठिमागील दरोज्यानें थेट तळ्यावर गेली. तेथून ती तेव्हांच पोहून पार गेली. तेथें गेल्यावर वाळ्यानें दिलेला मर्दानी पोषाख आवडी नेसली. व पोहतांना बुचेडा सोडून अंबाडा बांधला होता तो सोडून शेंडीचे गांठीप्रमाणें केंस बांधले व त्यावर पगडी चढविली. खऱ्या पेक्षां खोट्यास ह्मणजे खऱ्याच्या नकली वस्तूंत जास्त खुमारी दिसते. त्या न्यायानें आधीं स्वरुपानें लावण्यवती, तशांतून मर्दानी पेहराव केला मग काय ? कोणी उत्तम कुळांतील राजपुत्राप्रमाणें ती दिसूं लागली. काशीसतर भूल पडली. स्त्री किंवा पुरुष हें भान राहिलें नाहीं. व त्या कृत्रीम पुरुषाचे गळ्यांत तिनें, मोहपाशानें मिठी घातली. तेव्हां आवडीनें तिला बोध करून ताळ्यावर आणली. नंतर काशीस आवडी ह्मणते—'मी एकटीच या पुरुषांबरोबरजाऊं आणि तूं घरांत राहतेस? आजपर्यंत माझ्या जिवाला कायतो फक्त विसावा तूं. कांहीं कमजास्त झालें ह्मणजे तुला सांगत होतें—'

**काशी.**—छे हो ताईसाहेब असें समजूं नका. बळवंतराव फारावश्वासू. ते तुमच्याशीं भावाप्रमाणें वागतील. अशीत्यांच्या बोलण्या चालण्या वरून व सहवासावरून माझी पक्कीखात्री झाली आहे. नाहीं तर मी तुह्माला कधींच एकटीला असें पाठविलें नसतें—

**आवडी.**—काय होईल तें खरें. आतां ईश्वरावर हवाला. पण काशी कसेंहि करून तू बरोबर चल, निदान भेट होई पर्यंत तरी.

**काशी.**—सगळें खरें. पण बोभाट होईल तो नको कां निवारायला ? तुह्मी जा. मी आहेन् मग बादशाहा आहे. करूंद्या शिक्षा. सगळे दागिने काढलेत व कानांतल्या बुगड्या व काप वगैरे नाहीं काढलेत ते ?

**आवडी.**— (काढून)तें सर्व घे तुला. माझी आठवण असूंदे एवढी.

**काशी.**—( घेऊन )जन्माची मी आपलीदासी. रोज आठवण होईलच. दागिन्याची कांहीं गरज नव्हती पण न घेतल्यास आपलें मन खट्टूहोईल ह्मणून घेतें.

**बाळ्या.**—आटपा. बसा लवकर घोड्यावर. बोलणें कोणी ऐकेल. उशीर झालाय.

**काशी.**—खरेंच. ( गोंद्यानें घोडा बाजीरावाचा पुढें आणला. त्याजवळ जाऊन ) बसा वर.

**आऊ.**—मीग कशी बसूं ? काशी ! केवढा उंच व दांडगा तरि हा घोडा. मला पाडील बिडील बाई वाटेनें.

**बाळ्या.**—मी अल्लद उचलून ठेवतो या.

**काशी.**—छे ताईसाहेब. ( मांडी घोड्याचे पोटाशीं नेते ) द्या यावर पाय. हाताला धरा माझ्या. मी उचलून

देतें आणि चढावर. येवढी तरी सरते शेवटीं चाकरी घडूं द्या यजमाननीची.

**आऊ.**—( घोड्यावर बसून ) येते आं काशी ? पण माझ्या करितां तुला हे दुष्ट हाल हाल करून ठार करतील ग ! तूं चलच बरोबर. मागें कांहीं कां होईना.

**काशी.**—माझी नको काळजी करायला. तुह्मी हिकमत तर पहा. निदान दोन चार दिवसतरी दाद नाहीं लागूं देत.

**आऊ.**—मला एकटीला लावून देतेस ? मर्जी तुझी. पण काशी ? मी गेल्यावर तूं कोठें राहशील सांग बर ?

**काशी.**—मग अगदीं करमायच नाहीं. अशीच कोठेंतरि भटकत हिंडेन.

**आऊ.**—काय करती कोण जाणें ? हें काय गडे ! मी बोलावणें पाठवीन.

**काशी.**— *यजमानाला सांगून होय ?

**आऊ**( हंसून ) आपलं कसंतरि, पण तूं येशीलनां ?

**बाळ्या.**—पुरें झालें आतां. चला लवकर.

**आऊ.**—बरंतर काशी येतें ग ? ( स्फुंदत, नेत्र पुसते )

**काशी.**—( हात जोडून ) चाकराची ओळख ठेवा. कधीं कमी जास्ती बोलले असेन त्याची माफी—

**आऊ.**—हें ग काय काशी ! आतां मी तुला मैत्रीण समजतें. या प्रसंगीं तुझे मजवर उपकार आहेत आणि मी कशी विसरेन ?

**काशी.**—देवाच्या मनांतून सुख द्यायचें होतें. मी त्यांत काय केलें ?

**आऊ.**—येते. ( घोडा हळु हळु चालविते ) ( काशी तिच्या पायां पडते )

**काशी.**—( पदरानें डोळे पुसून ) बळवंतराव ! ताई-साहेबाला जपून न्या हो. कालरात्रीं सांगितलय तसं करा. संभाळा, टाकून बोलूं नका.

**बाळया.**—जा आतां तुह्मी. महालांतली व्यवस्था लावा जा. मी ताईसाहेबाला फार जपून नेतों. ( गोंद्यास ) गोंद्या चल पुढें.

ते गेल्यावर काशी निराशेनें परत आली, तरी यजमानीन मुसलमानाच्या तडाक्यांतून सुटून मराठ्याकडे गेली या पासून तिला आनंद वाटला. मग महालांत परत आल्यावर उघडलेलीं सर्व दारें पूर्ववत लावून व बंदोबस्त करून ती आपले खोलींत हळुच आली.

बाळ्या सखारामाचे घोड्यावर बसला. व यजमानाचे घोड्यावर आवडी बसली. आणि ते गोंद्यासह रस्त्यास लागले. वर्षोन्वर्ष सापळ्यांत धरलेल्या श्वापदास अगर पिंजऱ्यांत कोंडलेले पक्ष्यास किंवा कैदेंत हाल भोगीत असलेल्या मनुष्यास जर दैवयोगानें सुटका मिळाली तर अपमान जाहला त्याचें भान न राहतां तो प्राणी जसा स्वर्गसुखच मिळालें असें मानतो, तद्वत् या समयास आवडीची स्थिति झाली. आज पांच सात वर्षे सक्त पहाऱ्यांत राहिल्यानें, शिपायाच्या मनाईनें, माडी खालीं पाऊल न ठेवल्यानें, काशी किंवा तैनातीतील माणसें या शिवाय दुसरे कोणाशीं मन मोकळें करून बोलण्याची परवानगी नसल्यानें, व बादशाहा वर्षांनीं खास बाटविणार या धास्तीनें, सारांश सर्व प्रकारचे जाचानें आवडी अगदीं त्रासून गेली होती व तिला जीव नकोसा झाला होता. ती कसा तरी गाणें शिकण्यांत व चो-

रून लिहिण्या वाचण्यांत ( कारण माहेरीं असतां बापानें शिकविलें होतें ) वेळ घालवीत असे. परंतु बापूसाहेब पाग्या सारख्या मनांत भरलेल्या पुरुषाकडे गेल्यावर या शिकण्याचे चीज होईल व अनेकविध विलास भोगण्यास सांपडतील, या विचारांनीं तिचें मन या प्रसंगीं इतकें रंगलें कीं तिचें बाळ्याकडे लक्ष्यही गेलें नाहीं. त्या नादांत नाहीं ह्मणायला त्याच्या बरोबर नेईल तिकडे घोड्यावर बसून ती चालली होती. बाळ्याहि आपण जें कृत्य करूं ह्मटलें तें असाध्य असतांहि आपल्या हातून घडलें यांत समाधान व फुशारकी मानून व बाजीरावासारख्या राज पुरुषाकडून खचित् जन्माचें कल्याण होईल या आशेनें आनंदीत होऊन मनोराज्य करूं लागला. ते चौकीपाशीं गेले तेव्हां त्यांस कोण आहे ह्मणून विचारिलें असतां ओ न दिल्या कारणानें त्यानां शिपायांनीं अडविलें. त्यामुळें बाळ्याचे मनोराज्यांत व्यत्यय येऊन तो शिपायास रागावून ह्मणाला " चलबे ! छोड. " परंतु शिपाई कांहीं केल्यानें ऐकेना. तेव्हां बाळ्यानें आपलें तोंड सोडलें. उभयतांची बरीच बाचाबाची झाली व पुढें मारामारीहि कदाचित् झाली असती परंतु त्या गलबल्यानें आवडीचें लक्ष्य प्रस्तुत गोष्टीकडे वळलें. बादशाहाची खदस्तुरची मोर्तब तिजपाशीं होती तिचा उपयोग करून " यास जाऊं द्यावें– ( शिका बादशाहाचा ) " असें कागदावर लिहून तिनें कागदबरोबर घेतले होते. ते शिपायाचे अंगावर फेकून दिले. ते पाहून त्यानें त्यास पुढें जाऊं दिलें तेव्हां बाळ्यानें शिपायास सलाम केला.

**शिपाई.**—महाराज आपण सरकार पडलां. आमची

काय मग्दुर आहे आपल्याशीं भांडण्याची. पण काम दिलें तें केलें पाहिजे ह्मणून दरडावून बोललों त्याची माफी असावी.

शिपायानें मान दिला हें भावी महत्वाचें सूचक आहे असें समजून गौरवानें बाळ्यानें शिपायास माफी केली आणि जातां जातां पुसलें कीं " पुनः कोणी अडवील कां ? "

**शिपाई.**—सरकार आपल्याला कोणीकडे जायाचें तें समजलें ह्मणजे सांगतों.

**बाळ्या.**—राजवाड्यांत जायचें. कांहीं निकडीचें काम आहे.

**शिपाई.** होय खावंद, जातांनां व येतांनां दोन्ही वेळ हटकतील—–

बरें ह्मणून पुन्हा सलाम करून बाळ्या व आवडी पुढें निघाले. तेव्हां मनोराज्य करीत बसले असतां पुन्हा अडथळा येईल ह्मणून व आवडीशीं कांहीं तरी बोलावें या हेतूनें बाळ्या प्रश्न करितो ' कां हो ताईसाहेब ! आहेत कां आणखी कागद ? '

**आवडी.**—नाहीं हो बळवंतराव ! मला हें ठाऊक नव्हतें. नाहीं तर आणखी दोन घेतले असते.

**बाळ्या.**—ह्मणजे बादशहाचा शिक्का कसा मिळविला ?

**आऊ.**—इथें काय कमी ? माझा विश्वास त्यावर बसावा ह्मणून त्या बादशाहानें मजपाशीं शिक्का ठेवला आहे. आयता त्याचा उपयोग करून त्याचे दांत त्याच्या घशांत पाडले.

**बाळ्या.**—पण फक्त शिक्का काय कामाचा ? आतां येथें शाई कुठें ?

**आऊ.**—मग हो बळवंतराव ! ( खिन्न मुद्रेनें ) आ-तां कसें हो.

**बाळया.**—डगमगतां कां ? मी आहे तो कां कमी पडूं-देतों ? आपल्या यजमानास येथें आणलें. तेव्हां राजवाड्यांत त्यानां प्रसिद्धपणें जाण्याची फार पंचाईत होती तेव्हां जी युक्ति केली तीच आतां लढवितों. मधाशीं मी जरा नादांत होतों ह्मणून वाट चुकली आणि शिपायानें आडविलें. आतां बेधडक मी नेतों तिकडून चला.

**आऊ.**—( आश्चर्यानें ) तें कसें ?

**बाळया.**—अहो एक चोरवाटेनें.

**आऊ.**—शाबास ! सगळ्याला तुह्मी वाट दाखवून पार पडतां बुवा. पण त्या वाटेनें कुणी नाहीं आडवायचें ?

**बाळया.**—छे हो. भुयारासारखी बांधीव वाट आहे.

**आऊ.**—मग तेथें उजेड कशाचा ? अंधारांतून कसें दिसेल ?

**बाळया.**—गम्मत तर हीच. रस्त्यांतून गटारांचे आंतून खिडक्या बांधून काढून, गटारांत जाळ्या सारख्या तिहिरी बसविल्यात. त्यांतून आंत चांदण्याचा फक्कड उजेड येतो. शिवाय रस्त्यावरील कंदिलाचा व शेजारील दुकानांतील व घरांतील——

**आऊ.**—अगो बाई ! चमत्कारच आहे. पण या रस्त्यानें कोणी दुसरे जाता येतातकां ?

**बाळ्या.**—छे ताईसाहेब ! बापूसाहेबाचे घरांतून चोर वाट आहे, तिकडे बंदी आहे. व आतां जेथून आपण शिरूं तेथें पुलासारखें बांधून काढलें आहे. व ही वाट. शहर

सरताना एका बाजूस लागते. लोक तो नाल्याचा पूल समजतात.

**आऊ.**– ( हंसत ) चला कोणीकडोनं कार्यभाग उरकून मनाप्रमाणें होतय.

असें बोलत बोलत बाळ्या व आवडी थाटानें घोड्यावर बसून त्या पुलापाशीं आले व तेथून आंत शिरून बाळ्यानें वाट दाखविली तिकडून चालले. तों थोडक्या वेळांत बापूच्या परड्यांत आले.

इकडे बाळ्या गेल्यानंतर बाजीरावास सखारामानें राजवाडा पाहण्यास नेले व सर्व दिवाणखाने व कचेऱ्याच्या जागा वगैरे एकंदर दाखविलें. जनानखाना, जामदारखाना हीं फक्त पाहण्याचीं राहिलीं. तसेंच भटारखाना ( तेथें मासाची घाण येते सबब ) बाजीरावच पहावयास गेला नाहीं. खाशेस्वारी बादशहाची रंगमहालांत निजावयास गेली होती त्यामुळें त्याचा उठण्या बसण्याचा दिवाणखाना दिसण्यास कठीण पडलें नाहीं. सखारामाचे ओळखीवर ज्या मराठे व मुसलमान पाहरेकऱ्यांनीं बिन तक्रार बाजीरावास पाहूं दिलें, त्या प्रत्येकास त्याणें पांच पांच मोहोरा दिल्या. हें पाहून बाकीचे जे मग्रुर व उद्धट होते त्यांनींहि द्रव्याच्या लालचीनें त्यांचे पाहऱ्यांतील ठिकाणें पाहण्यास बाजीरावास नेलें, व त्यानेंहि त्यांस बक्षिसें दिलीं. अशा रीतीनें बहुतेक राजवाड्यांतील स्थळें पाहून बाजीराव व सखाराम बारावाजतां परत आले आणि दिवाणखान्यांत जाऊन बेत ठरविलाकीं बाळ्या आवडीस घेऊन येतांच शहरांतून बाहेर खानदेशास जाण्याकरितां जावयाचें. असा संकेत ठरून ते उभयतां नि-

जावयास गेले. परंतु बाजीरावाचें सर्व लक्ष्य बाळ्याचें आणि आवडीचें येण्याकडे लागलें असल्यामुळें तो बिछान्यावर उगीच पडून राहिला. त्याला कांहीं केल्यानें झोंप येईना. अनेक तरंग मनांत घोळूं लागले. आवडीसारखी रंभा उपभोगण्यास मिळणार या आनंदांत तो गर्क होऊन गेला. तों चाहूल ऐकूं आली. ह्मणून लागलींच उठून खिडकींत जाऊन कान देऊन तो ऐकूं लागला. तों जवळ जवळ कोणी येत आहे असें त्यास वाटलें. ज्या चोर वाटेनें आपण येथें आलों त्याच वाटेनें बाळ्या प्रियेस आणित असेल असें वाटून तर तो फार अधीर झाला आणि बागेचे दरवाजाची किल्ली खुंटीस अडकाविलेली होती ती घेऊन खालीं दार उघडून बागेंत गेला. चोरदरवाज्याजवळ जाऊन पाहण्याकरितां जिना उतरूं लागणार इतक्यांत बाळ्या आवडीसह बागेंत आला. "बापूसाहेब" ह्मणून हांक मारूं लागला. आधीं बाळ्याचा गळा घोगरा व कर्कश, तशांतून मोठ्यानें आरोळी मारली. मग काय पुसावें ? यजमानाचे सेवेंत तत्पर राहण्याकरितां सखाराम सावध निजला होता तो घाबऱ्या बाबऱ्या उठून येऊं लागला. परंतु वेळ अवेळ न जाणतां त्याचे खाष्ट बायकोनें त्यास अडविलें. नंतर तो कसा तरि रागें भरत जिन्यापर्यंत गेला व यजमानास जागें करण्याचे हेतूनें दिवाणखान्यांत गेला. पाहतों तों ते तेथें नाहींत व किल्लीहि नाहीं; मग आधींच खालीं गेले असतील असें समजून तो घाईनें खालीं जाऊं लागला, तेव्हांही सावित्रीनें तिच्या हेकड स्वभावाप्रमाणें त्यास न जाण्याचा आग्रह केला त्यामुळें सखाराम फार संतापला आणि तिला

फरफटीत ओढून निजण्याचे माडींत घातलें व बाहेरून कडी लावून घेतली. आंतून कडी लावून तीही रुसून बसली. जेम तेम करून सखाराम खालीं गेला आणि बाजीरावास पाहून मनांत ओशाळला. बाजीरावानें आवडीस हातांत धरून दिवाणखान्यांत नेलें. तेथें आवडी अदबीनें अंतरावर बसली. मराठे सरदाराचे ऐवजीं ब्राह्मणाकडे बाळ्यानें कसें आणलें असा तिला प्रथम संशय आला, तथापि चेहरा पाहतांच खिडकींतून पाहिलेली मदनमूर्ति तीच आहे असें तिला खास वाटलें. ही तिचे मनाची स्थिती ओळखून बाजीरावानें बाळ्यास वर बोलविलें व बापूसाहेब पागे नांवचे हेच ते गृहस्थ ह्मणून बाळ्यानें खात्री केल्यावर आवडीनें पुनः पूर्ववत् स्त्रीचा पोषाख केला. पुढें आठचार दिवसांनीं आवडीस खरी हकीगत समजल्यावर बाजीरावासारख्या थोर व पराक्रमी पुरुषाची गांठ पडल्याबद्दल तिला धन्यता वाटली. बरोबर आणलेला मोर्तब आवडीनें बाजीरावाचें स्वाधीन केला. नंतर ज्या कार्यासाठीं इतके दूर दिल्लीस आलों तीं सारीं कामें झालीं ह्मणून कृतकृत्यता मानून तो बाजीराव ईश्वराचे आभार मानूं लागला.

---

## भाग सहावा.

एके दिवशीं सकाळचे दहा वाजतां सरदार, मानकरी, मुत्सदी वगैरे मंडळीचे पंक्तीस दीडशेंखणींत खाना खाऊन बादशाहा घटका दोन घटका निजला आणि दोन काश्मी-

रच्या स्त्रिया ठेविलेल्या होत्या त्यांजपाशीं विलासाच्या गोष्टी सांगत वसला, इतक्यांत शिपायानें वर्दी दिली कीं "उभयतां सय्यद साहेबांच्या स्रांच्या जलदीनें सरकार स्वारीस भेटण्या कारितां आल्या आहेत तर हुकूम व्हावा." हें ऐकून पादशाहानें त्या स्त्रियांस आंतील दारानें जनानखान्यांत जाण्यास सांगीतलें. हुकुमाप्रमाणें सय्यद वर आल्यावर त्यानीं प्रथम इकडच्या तिकडच्या गोष्टीनीं बादशहाचें मन रिझविलें व मर्जी प्रसन्न झाली असें पाहिल्यानंतर हळूच गोष्ट काढली.

**वडील सय्यद**.—खाविंद! (हात जोडून नम्रपणें) सरकार करायला गेले एक आणि झालें एक. आह्मांस खचित् वाटलें होतें कीं हैदर कुलिखान याचा समाचार घेईल पण उलट झालें. त्याला काय तोड काढावी ?

**धाकटा सय्यद**.—मियासाब ! तसें झालें ह्मणून फिकीर नाहीं. हैदराचा पाडाव झाला हें आपलें पथ्यावरच आहे. याला काय, पुन्हां घोटाळ्यांत घालूं. आपल्या सारखे युक्तिवान् गृहस्थ सरकारांनीं नाहींतर कशास वाळगले आहेत ?

**बादशहा**.—हुसेन भाई ! तुह्मी ह्मणतां तें खरें; पण मिया काळजी करतात तीहि रास्तच आहे.

**मिया**.—सरकार ! नूरजहान ( मस्तानी ) साहेबांचें गाणें होणार होतें तो बेत——

**बादशहा**.—आमचे मनांतून करायचें नव्हतें. हें तुह्मी जाणत आहांच.

**मिया**.—होय सरकार.

**हुसेन**.— ( मान डोलवून ) हं.

**बादशहा**.—पण लोक रीतीप्रमाणें कबूल केलें होतें,

तरि तबियत नादुरुस्त आहे असें मिष करून तो बेत रहित केला. त्यावर अझून वजीराची गाठ नाहीं.

**हुसेन.**—नाहीं तरी निजामाला काय आवड आहे त्याची?

**मिया.**—नाहीं खरेंच. पण त्याला कर्मणुक तरी कसली?

**बादशहा.**— * * वाला गुळाची चव काय? उलाढाली करण्यांत त्याचा पहिला पाय. कधीं येईल, कां बसेल, दोन घटका बोलेल, कां चैन करील तर शपथ. आलान् आला कीं त्या जमीनदार सातारकराच्या गोष्टी. दुसरें कांहीं नाहीं.

**हुसेन.**—होय सरकार! रात्रंदिवस तोच त्याला निजध्यास लागला आहे.

**मिया**—खावंद! तोंडापुरतें बोलणें मला आवडत नाहीं. ( सात्विक पणाचा भाव आणून ) आपल्या चरणापाशीं सर्व खरें सांगणें आमचें दासाचें कर्तव्यकर्म आहे. राग येणार नाहीं तर बोलतों.

**बादशहा.**—कशाबद्दल तें तर समजूंद्या.

**मिया.**— मी जर खोटें सांगत असेन तर अल्ला माझा सत्यानास करो! सरकार सांगायाला वाईट वाटतें. पण उपाय नाहीं. कळवितोंच.

**हुसेन.**—मिया साहेब! बोला लवकर. सरकार उत्सुक दिसतात.

**बादशहा.**—मियासाब! बोलो हं नहि घुस्सा करेंगे. वाततों सुन्ना देव.

**मिया.**—आपल्याला वाटतें मात्र. पण निजाम पक्का हरामखोर आहे. वरवर भोळसरपणा दाखवितो पण तो अ-

सला मादर * * आहे की बोलण्याची सोय नाहीं. तें कशाला आपली आणि नूरजहान साहेबाची भेट झाली त्याला किती दिवस झाले ?

**बादशहा.**—आज पंधरा दिवस होतील. त्याचं काय ?

**मिया.**—पण चार दिवसां, पांच दिवसां, भेट व्हायची त्याला पंधरा दिवस कशाला लागले ?

**बादशहा.**—तबीयत ना दुरस्त आहे असा निरोप येत असतो सबब.

**मिया.**—त्याचेंच नांव तें. आजारी व्हायला काय धाड आली ? या निजामड्याचें सारें कृत्रीम.

**बादशहा.**—( रागानें ) मिया, काय बोलतां व कोणाजवळ याचा नीट विचार करा. आह्मी नूरजहानला कडेकोट बंदोबस्तांत ठेविलें आहे. शिवाय तीहि आमचेवर खुष् आहे असें असून तुह्मी सांगतां असें कसें घडेल ?

**मिया.**—पूर्ण चौकशी केल्याशिवाय बोलत नाहीं. नूरजहानसाहेब ह्या स्वतां जरि आपल्यावर फिदा आहेत तरि जुलमा पुढें काय करणार ? पाहरा निजाम मार्फत आहे कां नाहीं ?

**बादशहा.**—( रागानें ) इतका मूर्ख व बेइमानी वजीर आहे काय ? उगीच ढोंगी आहेतर बाहां * *, पण मिया संभाळा. मी आतां बेगममहालांत जाऊन पाहून येतो; जर ती असेलतर तुमची कठिण अवस्था—

**मिया.**—चिंता नाहीं. खरें खोटें जाणण्याचा हा प्रसंग आहे. पण खरें झालें तर काय बक्षीस ?

**बादशहा.**—दरबार भरवा. मी तेथें येतो. त्या गा*वाची

पक्षी उडवितो भरदरबारांत. मग पाहतो कशी काय गमजा करतोय.

**मिया.**—हुकुम, सरकार.

**बादशहा.**—पट्टेवाला ! या सय्यदानां दरबार भरवून तेथें बसवा जा.

**शिपायी.**—( हात जोडतो ) सरकार, हुकुम.

**बादशहा.**—पागेंत वर्दी दे कीं आतांचे आतां हत्ती सोन्याचे अंबारीसह तयार पाहिजे. स्वारीचे थाटानें निघायचें नाहीं. फार झालें तर बरोबर पंचवीस घोडेस्वार असूं दे. जा लवकर घेऊन ये.

शिपाई कांहीं वेळानें परत येऊन मुजरा करून कळवितो कीं हुकुमाप्रमाणें हत्ती सजवून तयार ठेवला आहे. नंतर सय्यदास पाहेरेकऱ्याचे नजरेंत देऊन पादशाहा पोषाक करून हत्तीवर बसून नूरजहानविषयीं खरी हकीकत कळण्याकरितां बेगममहालाकडे जातो.

आवडीची सुटकाकरून दिल्यानंतर काशीबाई परत बंगल्यांत आली आणि दुसरे दिवशीं हवालदार वर्दीस आला तेव्हां तिनें त्यास सांगितलें कीं आज जरा यजमाननीचें कपाळ दुखत आहे, ह्मणून अद्याप उठल्या नाहींत. उत्तरोत्तर प्रकृति बिघडत चालल्याचा मजकुर तिनें आठ दहा दिवसपर्यंत त्या हवालदारास वर्दीस आला ह्मणजे कळवावा; व हवालदारानें नित्य तो निरोप वजीरसाहेबास कळवावा. आवडी अजारी पडल्याची बातमी वजीरानें मधचें मधेंच दाबली कारण ती ऐकून त्यास आनंद वाटे व मनाजोगें घडून येईल अशी उमेद येई. काशीबाईनें रात्रीं तळ्याच्या

वाटेनें बाहेर पडून एका झाडाखालीं खळगा केला व त्यांत सारे दागिनें पुरून ठेवले. आणि आपणहि आजाऱ्याचें सोंग घेऊन चाकरी सोडून गेली. ही खबर वजीरास लागली तरी त्याणें नवीन स्वयंपाकीणीची नेमणुक केली नाहीं. कारण आवडीचें मरण त्यास इष्ट होतें. पांच शिपायी नेमणुकीस होते, पैकीं तळ्याचे आंगचा तर फक्त हजीरी देऊन चालता होई, व बाकी चार मनांत कुरकुर करित कीं " यजमानीन आजारी असतांहि वजिरसाहेब हेकडपणानें कांहीं बंदोबस्त ठेवित नाहींत. परंतु मोंगलाई राज्य. ही गोष्ट बादशहाचे कानावर घालतो कोण, व खोल दरबारीं त्यांची भेट होते कशी ? महालीं समाचारास स्वारी यावयाची तीही आज पंधरा दिवसांत चांदबिबीचे नादानें आली नाहीं; यजमानीण तर अंथरूणावर पडून आहे; काशीबाई आजारी होऊन चाकरी सोडून गेली." अशा सर्व गोष्टींनीं त्यांचें मन उद्विग्न होऊन ते सदय अंतःकरणानें व बादशहास समजलें तर नुकसान होईल या भीतीनें, फार फिकीरींत होते, इतक्यांत बादशाहाची स्वारी येत आहे ह्मणून जासुदानें पुढें येऊन कळविलें. तेव्हां सोत्सुक व साशंक होऊन ते पाहारेकरी एकमेकांत कुजबुजूं लागले कीं आतां कसें करावें. याप्रमाणें त्यांची मसलत चालली आहे तों स्वारी पुढले दरवाजापाशीं येऊन थडकली. हत्तीवरून खालीं उतरून बादशाहा दरवाजापाशीं येतांच शिपायानें लवून मुजरा केला. नेहमीं प्रमाणें एकदम आंत न जातां दाराजवळ उभे राहून उग्रमुद्रेनें व क्रुद्धस्वरानें बादशाहानें त्यांस विचारिलें — " कुच कमजास्त खबर है ? "

**शिपाई.**—नहीं सरकार ! ( परंतु खोटें बोलल्यास यजमान शिक्षा करील या भितीनें, हात जोडून ) माफी करा सरकार ! बाई साहेबांची तबियत नादुरुस्त आहे. आज पंधरा दिवस झाले तरि....

**बादशाहा.**— ( स्वारी बरोबरील एका स्वारास ) जमादार ! पांच दारांवर पांच घोडेस्वार ठेऊन तेथील पाहारेकऱ्यांस बंगल्यांत पाठवा. शिपाई ! तूंचल आमचे बरोबर.—

**शिपाई.**—हुकुम—

**पादशहा.**—हो पुढें. ( धांवत पुढें चालतो त्यास ) जा आंत; आह्मी आल्याचें कळीव.

“ होय ” ह्मणून शिपाई दिवाणखान्यांत गेला आणि पाहतो तों तेथें आवडी नाहीं. मग तर तो फारच घाबरला. इतक्यांत बादशहा जिना चढून वर आला आणि “ शिपाय ” ह्मणून त्यानें दरडावून हाक मारली; परंतु शिपाई भितीनें बाहेर आला नाहीं. “ नूरजहान ” खरोखर आंत असून तिजपाशीं बोलत बसला आहे किंवा ती नसल्या कारणानें भेदरून लपून राहिला आहे याबद्दल बादशहास संशय आला व तो ताबडतोब संतापानें आंत पाय आपटीत गेला. आणि पाहतो तों दिवाणखान्यांत अगर रंगमहालांत कोणीच नाहीं. नंतर त्यानें पलीकडील बदामी महालांत जाऊन पाहिलें. तेथें तो शिपाई कोपऱ्यांत दडून उभा राहिलेला दिसला. तेव्हां “ नूरजहान ” पळविली गेली असें खात्रीनें वाटून बादशहास अधिक त्वेश आला. त्यानें शिपायास लाथ मारली, त्यामुळें तो धाडदिशीं जमिनीवर पडला. नंतर त्याचे कान पिरगळून व त्याला उभा करून आंतील रंगमहालांत

घेऊन गेला. आणि कोचावर बसून बादशहा शिपायास विचारतो "क्यं बे लंडी किदर है तेरे जजमानीन ?"

**शिपाई.**—( बादशाहाची उग्रमुद्रा पाहून थर्थर् कांपत व तोत्र्त नम्रतेनें ) ख् ख् खाविंद ! क् क् कहता हूं ! ल् ल् ल् लाचार हूं.

**पादशहा.**—मादर चोद ! तेरा जान लेऊंगा. बोल.

**शिपाई.**—बाईसाहेब आजारी आहेत इतके दररोज हवालदार येतात तेव्हां स स समजत असे त्यावरून मी व बोललों.

**बादशाहा.**—मग कोठें आहे ती आतां ?

**शिपाई.**—क काय जणे ? सर्व बंगल्यांत शोधून पाहिलें तरी कोठें दिसत नाहींत त त तर श शोध क करतो.

**बादशाहा.**—अरे गुलामा ! पक्का कपटी आहेस. थांब तुला सांगतों कसेंकाय आहेतें ( खिडकींत येऊन ) नाईक!

नाईक बाकीचे तीन पाहारेकऱ्यांस घेऊन येत होता त्याणें हाक ऐकून तत्परतेनें "ओ" दिली आणि तो जलदीनें त्या पाहरेकऱ्यांसुद्धां वर आला.

**बादशाहा.**—( पुन्हां कोचावर बसून ) आणले कां सारे ? ( पाहून ) अरे हे तर तिघेजण दिसतात. ( पूर्वीच्या शिपायाकडे पाहून ) हा एक चवथा आणि पांचवा कोठें आहे ?

**पहिला शिपाई.**—सरकार तो आजारी आहे.

**बादशाहा.**—( संतापून ) मग तिकडे पाहरा कोण करतो ? बेवकूब लोक ! तुह्मांला फांशी दिलें पाहिजेत. नाईक ! यांनां सर्वांनां कैद करून चला राजवाड्यांत.

इतकें ह्मणून बादशाहा त्रासानें व क्रोधानें पाय आपटीत आपटीत जिना उतरून खालीं गेला आणि हत्तीवर बसून राजवाड्यांत परत आला.

इकडे दरबार तमाम भरून लोक बसले आहेत, त्यानां तुडवून मोठ मोठे सरदार व मानकरी आपले जाग्यावर जात आहेत; व ते अधिकारी वरिष्ठ असल्यामुळें इतर लोक निराशेनें अपमान सहन करित आहेत, जे बोलत किंवा पुढें रिघाव करण्यास यत्न करीत त्यांस बंदोबस्ताकडील जवान कोतवालाचे सदर परवानगीनें व मनाची पूर्ण हौस पुरविण्याचे हेतूनें, तोव्यानें व सोडग्यानें बडवीत आहेत; आणि शांतता व्हावयाची ती एकीकडे राहून जिकडे तिकडे उलट गोंधळ होत आहे; हा प्रकार बंदकरण्याचे मिषानें कांहीं बडे खान शेखी सोडून अर्जवानें भांडणें तोडून गलबला मिटवीत आहेत, इतक्यांत दुसरा कोणी बडे मिय्या येऊन पुढील जाग्यावर वसण्याकरितां त्या लोकांचे आंगावर पाय देऊन जाई व त्याचे डौलावर त्याचे भालदार चोपदारहि तशा प्रकारचीच उद्दामपणें वर्तणूक करीत, त्यामुळें पुनः गडबड होत आहे, व पुनः स्वस्थ बसण्याविषयीं कोणी तरी सभ्य गृहस्थ पुढें सरसावून अर्जव करीत आहे; खेरीज अर्जदार व तमासगीर लोक हजारों जमत आहेत, व दरबारांत काय मासला उडतो तो अवलोकन करण्याकरितां उत्सुक असून एकमेकाशीं गप्पा मारीत बसले आहेत; श्रीमंत लोक मिजासीनें तक्याशीं टेकून पडले आहेत; व त्यांचें वैभव पाहून लोक विस्मित होत आहेत; अशी चोंहीकडे गर्दी उडाली, असतां बादशाहाची स्वारी आली तेव्हां अर्थात् जि-

कडे तिकडे एकदम शांतता झाली आणि दिवाणखान्यांत बादशाहास शिरतानां पाहतांच एकंदर लोकांनीं खडीताजीम दिली व लवून सलाम व मुजरे केले, व ते घेत घेत बादशाहा सिंहासनावर जाऊन बसला.

**बादशाहा.**—"कांहो मानकरी! वजीर कोठें आहेत."

**एक मानकरी.**—(हात जोडून) खावंद! येत आहेत.

**बादशाहा.**—कशावर उंटावर कां हत्तीवर! (इतर लोक मनांत चपापतात. )

**शिपाई.**— सरकार! आपला हुकूम त्यांना कळविलेला आहे, परंतु ते अद्याप कां आले नाहींत कोण जाणें.

**सय्यद**(हुसेन).—(पुढें सरसावून) खाविंद! मिय्या साहेबांनीं सांगितलेलें कारण तर नसेलनां ?

**मिय्या.**—(हात जोडून) सरकार मी ह्मटलें त्याचा आपल्यास अनुभव आला असेलच. काय झालें तें मेहरबानी करून सेवकास सांगावें.

**बादशाहा.**— शिपाय! जा अधीं आणि वजिरास ह्मणावें कीं ताबडतोब चल्रा.

**शिपाई.**— अछा साब! हुकूम.

**एक मानकरी.**—(दुसऱ्यास हळुच) कांहो सरकार स्वारीची आज्ञा अमान्य केल्यास मोठें शासन मिळतें; तसें या वेळीं न होतां आज पुनः बोलावणें कसें घडलें ?

**बादशाहा.**— (धोरणानें समजून) थांबा! तुमच्या सर्वांच्या देखत त्याला खाऊ देतो. फार गमज्या चालविल्यांत तो आह्मांला काय समजतोय ?

( इतक्यांत वजीर आले त्यांना पाहून )

**बादशाहा.**—कां हो वजीर आज उशीर कां केलांत?

**वजीर.**— खावंद ! सरकारी काम करीत असतां हुकूम कळला तेव्हां जलदीनें काम आटपून येत होतों तों आपली स्वारी आली—मी—

**बादशाहा.**— पुरे पुरे! तुमची नेहमी कांहीं ना कांहीं तरि तक्रार आहेच. तें सरकारी काम आणि हें दरबारांतील ह्मणजे खासगी असेल ?

**वजीर.**— असें कसें होईल. तेंहि आपलें. हेंही आपलेंच. दिल्ली दरवज्यापाशींच काय तों शिपाई भेटला.

**बादशाहा.**— (क्रोधानें) दरवाज्यापाशीं नाहीं, इथें पायरी जवळ; पण बोलावणें तर घेतलेतनां ? तुह्मी कोण ? आमचे व्याही कां जांवई ?

असा प्रकार पूर्वी भरदरबारांत कधींच झाला नव्हता असें असतां आज होण्याचें कारण काय, व आतां उत्तर काय द्यावें या विचारांत वजीर आहे तों त्याची दृष्टी सय्यदांकडे गेली व अपमानाचें कारण समजून तो ह्मणाला:— "सरकार! तमाम कचेरी भरली असतां, अशी मानहानि करून घेण्याजोगा माझे हातून अपराध तरी कोणता घडला आहे? उगीच कां घुस्सा मजवर? "

बादशाहाजवळ वजीराचें फार वजन असे. कारण बादशाहाचा काळ नेहमी ख्याल खुशाली वगैरे मजामारण्यांत जात असे व सारा राजकारभार वजीराचे हातून होत असल्याकारणानें बादशाहास नित्य वजीरावरच अवलंबून राहणें भाग पडे. शिवाय, बादशाहानें पूर्वी एक दोन सय्यदांच्या चाहड्या ऐकून वजीरास धमकी दिली होती त्यावेळीं मुद्दे-

सूद गोष्टींचें प्रमाण दाखवून बादशाहाची खात्री केली होती. त्याप्रमाणेंच हल्लींचे प्रसंगीं घडून येईल असें वाटून वजीरानें वरील उत्तर दिलें होतें परंतु या खेपेस सय्यदांची बातमी खरी आहे अशी बादशाहाचे मनाची प्रत्यक्ष पाहिल्यावरून खात्री झाल्यामुळें, पडावें तितकें त्या उत्तराचें वजन पडलें नाहीं आणि तशांतून दोघेही सय्यद समक्ष हजर असून बादशाहास चिडवीत असत, मग काय? अग्नींत तेल पडल्याप्रमाणें झालें. अखेर बादशाहा वजीरास ह्मणतो. "तुह्मी परम अपराधी आहां."

**वजीर.**—सरकार ! —

**सय्यद.**—वजीर साहेब ! चूक कबूल करून माफी कां मागानांत ?

**वजीर.**— ( त्वेषानें ) बसा गप्प, तुह्मांला नाहीं कोणी विचारलें.

**सय्यद.**—वजीर साहेब ! आह्मां गरिबांवर कां राग ? आह्मीं आपले—

**वजीर.**— ( संतापें सहन न होऊन ) चुप बैठो. बोलेंगे तो ए देखो ( म्यानांतून पटादिशीं तरवार उपसतो आणि सय्यदावर रोंखतो )

**सय्यद.**—सरकार ! वजीरसाहेब आमच्यावर घुस्सा करतात. ते थोर आहेत. त्यांच्या चुकीबद्दल मी क्षमा मागतो. कारण कसें झालें तरी ते व आह्मी सारे मानकरीच. एकाच्या हातून चुकलें तर दुसऱ्यानें संभाळलें पाहिजे.

**वजीर.**—अहारे ! साळसूद ! ! कपटी ! कसाब ! लो-

कांची मान कांपायला पाहिजे ? जास्त बोललास तर वार करीन. ( डोळे वटारतो आणि वीरासन घालतो. )

**बादशाहा.**—निजाम ! तुह्मी, लहान कां होईना पण अपराध केलातनां ?

**वजीर.**—होय खावंद ! झाला खरा.

**बादशाहा.**—इतकें बस्स आहे.माफ केलातरअदबीनें वागा.

**वजीर.**—आपण मालक आहां. पण हे सय्यद कां मधें तोंड घालतात ?

**बादशाहा.**—त्याचें काय आतां? कचेरीचें काम चालूं द्या.

**वजीर.**— ( पूर्ववत् बसून ) शिपाय ! अर्ज्या पुकारो.

**शिपाई.**—हुकुम. कोई अर्जदार है ? कोई अर्जदार है ?

**दुसरा शिपाई.**— ( दालनामध्यें उभा होता तो ) कोई अर्जदार है ?

**तिसरा शिपाई.**—( पायरी जवळील) कोई अर्जदार है?

हें ऐकून कांहीं आरब व मुसल्मान आणि हिंदुलोक पुढें सरसावले. त्यांनीं लेखी अर्ज सादर केले. जात्याभिमान व जयाभिमान यामुळें ज्या लोकांस राज्यकर्ते वरिष्ट समजत त्यांस बादशाहाच्या पुढें अगोदर जाण्यास शिपायानें नेहमी प्रमाणें परवानगी दिली. ते सिंहासनासमोर गेले आणि खालील गादीवर बसले. नंतर गुडघे टेकून व ईश्वर प्रार्थनेस बसत त्याप्रमाणें ते बादशाहाच्या पुढें हात जोडून बसले. तेव्हां त्या तिघांतील एक दाढीवाले अमिरास बादशाहा पुसतो. " क्यं भाई तुमारा क्या अर्ज है ? "

**अमीर.**—खावंद ! आपका खुदा भला करेंगा ! आपले सारखे शूर, पराक्रमी, व न्यायी राजे राज्य करीत असतां

आह्मां सर्व प्रजेस सुख होत आहे. चोंहींकडे आबादी आहे राज्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा आहे. असें असतां कांहीं विपरीत गोष्टी घडून येतात तेव्हां काय करावें तें समजत नाहीं. खाविंद ! सरकारचे पायां शिवाय आतां आमची दाद कोठची ?

**बादशाहा.**—बरें तुमची फिर्याद काय आहे ती तर कळुंद्या.

**अमीर.**—खावंद ! मोठ्याशीं झगडा केल्यास आमची प्राणहानी होणार.

**दुसरे दोन अमीर.**—हांजी सरकार ! ही तर सची बात आहे. जीवावर उदार होऊन तर आह्मी आज येथें हजर झालों.

**बादशाहा.**—पण काय तें बोला तर खरं ?

**अमीर.**—सरकार अभय वचन दिल्यास सांगतों. जर आमचेकडे चौकशी अंतीं अपराध ठरेल तर मग तोफेचे तोंडीं बेलाशक आह्म, तिघांसहि द्यावें. नाहीं तर—

**बादशहा.**—बरें.तुह्मांस अभयवचन आहे. बोला लवकर.

**अमीर.**—( थर थर कांपत ) खावंद ! मूळ, आह्मी काजीसाहेबाकडे अर्ज केला तेव्हां निकाल आमचे तर्फे झाला. पण त्या हिंदूनीं तोच खटला ( मानेनें दाखवून ) या निष्पक्षपाती ह्मणवून घेणाऱ्या वजीर साहेबाकडे चालविला, त्यांनीं सारखी दोन आठवडे चौकशी सुरु ठेवली आणि पंच नेमले. इतका अट्टाहास करून व आह्मास व्यर्थ अतोनात खर्चांत घालून सरते शेवटीं निकाल आमचे विरुद्ध केला. तो असा कीं आह्मी तिघां अमिरांनीं मिळून आठ

दिवसाचे आंत आमचे वादीना ह्मणजे मराठे सरदारांनां रोख रुपये ९०००० द्यावे. त्या मुदतींत न दिल्यास आमची जिनगी जप्त करून सरकार मार्फत विकली जाईल आणि विक्रीचे पैशांतून मराठ्यांच्या सर्व कर्जाची फेड केली जाईल. असा हुकुम देऊन त्यांनीं काजीसाहेबाचा हुकुम रद्द केला. आतां राज्यकारस्थानाशिवाय इतरप्रकारच्या फिर्यादी, सरकार ! लोकांनीं आजपर्यंत आपले चरणापाशीं आणल्या नाहींत हें खरें; तथापि अशा अन्यायाबद्दल वजीरसाहेबांस एकदां शासन व्हावें यासाठीं ही हकीगत आज खावंदाचे कानावर घातली. ( हात जोडतो ) त्या बद्दल कृपाकरून माफी असावी.

**बादशाहा.**–( अमिरास ) कुच फिकीर नाहीं, तुम् मत् डरो. अबी सब खुलासा लेएंगे हं ( वजीरास ) काय हो याबद्दल तुमचें काय ह्मणणें ?

**वजीर.**–( रागानें ) खावंद ! अशा क्षुल्लक गोष्टीचा जर या दरबारांत आपण व आह्मी विचार करीत बसलों तर मोठमोठ्या राजकारणांचा उलगडा कसा होईल ?

**बादशाहा.**–अहो तुह्मी ह्मणतां तें खरें. पण आलीकडे तुमच्या बद्दल शहरांत बोभाटा फारच झाला आहे, तुमचे दुर्वर्तनाकडे आह्मी लक्ष्य पोंहचवूं नये तर लोक आह्मांस काय ह्मणतील ?

**वजीर.**–सरकार ! दुर्वर्तन तरि काय घडलें त्याचा खुलासा व्हावा.

**बादशाहा.**–( तिरस्कारानें ) आह्मी प्रत्येक गोष्ट टिपून ठेवीत नाहीं बसलों. पण हें तर उघड आहे कां नाहीं

कीं या श्रेष्ठ जातीचे अमीराकडे योग्य नजर न पुरवितां तुह्मी त्या नीच मराठ्यांच्या तर्फे निकाल केला ?

**वजीर.**—खावंद ! न्याय्य दिसलें तें केलें.

**बादशाहा.**—बस्स बस्सः यावरून जात्याभिमान तुह्मांला मुळींच नाहीं.

**वजीर.**— ( रागानें ) आतां मात्र पुन्हा संतापास कारण होत आहे. आपण राज्यारूढ होतांच जाहीरनाम्यानीं सर्व प्रजेस नाहीं कां कळविलें कीं जातिभेद व धर्मभेद न मानतां सर्वांवर समदृष्टी ठेवून व न्यायानें आचरण करून सर्व लोकांस सुखी ठेवण्याचें आह्मी आज अभिवचन देतों. त्या बाहेर कां मी वागलों ?

**बादशाहा.**—काय हो वजीर ? तुह्मी उत्तम राजकारस्थानी पुरुष ह्मणवितां आणि इतकेंही तुह्मास कळत नाहीं काय कीं आह्मी राज पदवीवर [illegible] होण्यापूर्वी जो दंगा माजला होता तो निर्मूल होण्याकरतां व लोकांचा आमचेवर विश्वास बसवून घेण्याकरितां तेव्हां तसा जाहीरनामा लावला ? आतां त्याचें काय ? जिकडे तिकडे शांतता झाली व जिल्हे तालुके परगणे वगैरे ठिकाणीं नेमलेले जे आपले स्वामिभक्त मुसलमान कामगार आहेत त्यांच्या लिहिण्यावरून सारी प्रजा आमचे हुकुमाचे पक्के दास बनून राहिली आहे असें समजतें. शिवाय प्रजाजन विद्वत्तेनें व बुद्धिमत्तेनें, नीतिमत्तेनें व इतर गुणांनीं आपल्या बरोबरीचा नाहीं. आपले पूर्वज्यांनीं ज्या प्रकारें राज्यरीति चालविली त्याप्रमाणें आपण चालविली पाहिजे. ही गोष्ट ह्मटलें असतां अगोदर तुमचे लक्षांत आली पाहिजे.

**वजीर.**– ( त्रासून ) फार उत्तम आहे. हेंच जर आह्मां नोकर लोकांस व इतर प्रजेस पूर्वी कळतें तर बरें झालें असतें. आतां सांगतों इतकी याद राखा कीं आपण ह्मणतां यारीतीनें वागल्यास आपले राज्याचें वाटोळें लवकरच होईल. कारण यामुळें सरकारचे शब्दावर प्रजेचा भरंवसा राहणार नाहीं.

हे बेअब्रदीचे शब्द ऐकून बादशाहा अतिशय संतापला. तें पाहून कचेरींतील लोक " खुदा माफ करो, अल्ला माफ करो " असें ह्मणूं लागले.

**बादशाहा.**–( क्रोधानें ) अरे कृतघ्ना ! हे राजद्रोहाचे उद्गार तोंडून निघतात काय ? असें मला पूर्वी कळतें तर तुझें इतकें कधींच कल्याण केलें नसतें.

**मिय्या,** ( सय्यद )– खावंद ! भर दरबारांत असा आपला अपमान करणें ह्मणजे मोठाच अपराध होय. या साठीं वजीरास हद्दपार करण्याचा हुकूम व्हावा.

**बादशाहा.**– ( घुटमळतो ) यांत काय संशय ? होय. तीच मी शिक्षा देईन.

**वजीर.**– ( तरवार उपसतो ) जीव गेला तर पत्करला पण— ( सय्यदाचे अंगावर धांवत जाऊन ) दुष्टा ! ( सय्यदाचा शिरच्छेद करितो ) झालास कां या जगांतून पार ? (तरवारीनें त्याचे तुकडे करून) ऊठ ऊठ, कर मला हद्दपार.

वजीरास खून चढलेला पाहून बादशाहा व दरबारचे सारे लोक थरथर कांपूं लागले. आणि वजीराचे अंगावर जाऊन त्याला दबविण्याची त्या पैंकीं एकाची ही पुण्याई

होईना तेव्हां बादशाहानें विचार केला कीं आतां नम्रता धारण करून यास शांत केलें पाहिजे.

**बादशाहा.**—वजीर साहेब ! शांत व्हा. त्यानें मधें तोंड घातलें त्याचें त्यास बक्षीस मिळालें. पण आतां राग सोडा आणि आपले आसनावर बसा. आह्मी तुह्मास बोललों तें त्या सय्यदाचेच सांगण्यावरून. तुमच्या खरेपणाबद्दल आह्मास आतां बिलकूल शंका उरली नाहीं. ( उठून त्यास हातानें धरून ) चला तुह्मी जाग्यावर बसा. दरबारचे लोक काय ह्मणतील ?

**वजीर.**—आतां चिंता नाहीं. ( शांत होऊन व आपल्या गादीवर बसून) हा पहा मी बसलों. आपण सिंव्हासनारूढ व्हावें.

बादशाहा बसतो व कांहीं सांत्वनाच्या गोष्टी वजीरास सांगून नंतर कचेरी बरखास्त होते.

---

## भाग सातवा.

मागील भागांत वर्णिलेले मोंगलाईची खबर संध्याकाळीं साऱ्या शहरभर पसरली. लोक अनेक तऱ्हेचे तर्क करूं लागले. बादशहाचे मर्जी विरुद्ध जरा कोणी वागल्यास त्या अपराध्याला लागलींच देहांत शिक्षेचा हुकुम व्हावयाचा. असें असून उन्मत्तपणानें वजीरानें सय्यदास बादशहाचें समक्ष ठार मारलें असतांही शिक्षा करण्याची गोष्ट एका बाजूस राहून बादशहा त्या वजीराचे अर्जव करीत आहे हें ऐकून लोक जिकडे तिकडे आश्चर्य करूं लागले. शहरांत जिकडे पाहावें तिकडे लोक एकमेकांत कुजबुज करितांनां

दृष्टीस पडत. उघडपणें मन मोकळें करून, कोणी कोणांशीं त्या संबंधानें बोलण्यास धजेना.

या प्रसंगास कांहीं प्रमुख मराठे लोक श्रीजगदंबेचे देवळांत एकांतांत रात्रीं जमले व त्याणीं असें ठरविलें कीं कोल्हापूरचे महाराजाकडील वकील सयाजीराव घाटगे याणीं वजीराची गुप्तपणें गांठ घ्यावी व त्याला मराठ्यांचें पूर्ण पाठवळ अमल्याचें कळवावें. ही गोष्ट सातारकरांचे वकील सखारामबापू यांजला मात्र बिलकूल आवडली नाहीं. त्याणीं लागलीच बाजीरावाकडे मुद्दाम स्वार रवाना करून घडलेली हकीगत इत्थंभूत पत्रद्वारें कळावली. इकडे संकेतानुरूप सयाजीराव घाटगे दुसरे दिवशीं वजीराकडे गेले.

वजीराचा सयाजीवर पूर्ण विश्वास असे. बाजीरावाविरुद्ध ज्या सल्लामसलती नेहमीं होत असत त्या वजीर सयाजीच्या सांगण्याप्रमाणें करीत असे. हल्लींच्या संकटाच्या प्रसंगीं घडलेला सर्व वृत्तांत सयाजीस कळवावा व तो काय ह्मणतो तें पाहावें असे विचारांत वजीर आपल्या सात आठ मुत्सद्यांशीं एकांत करीत बसला असतां सयाजीराव आल्याची वर्दी शिपायानें वजीरास दिली. त्या बरोबर आनंदानें त्याला आंत येऊं देण्याविषयीं हुकुम झाला. त्यानंतरचा संवाद जसाचे तसा वाचकांस सादर केला आहे.

**सयाजी.**—( मुजराकरून ) खाविंद ! आह्मां सर्वांचे बादशाहा आपणच आहां.

**वजीर.**—छे ! छे ! असें कसें—

**सयाजी.**—सरकार ! माफी असावी. तो बादशाहा काय

नांवाला गादीचा मालक. खरी सत्ता आपल्या हातीं आहे. आपण कराल तें प्रमाण—

**वजीर.**—( आढ्यतेनें ) सयाजीराव ! तुह्मी ह्मणतां हें खरें असतें तर कालच्या दरबारांत कां आह्माला ताटाखालच्या मांजराप्रमाणें वागावें लागलें ?

**सयाजी.**—वाहवा खावंद ! असें उलटें बोलण्यांत काय अर्थ आहे ? तो बादशाहा काय गोगल गाय आहे !

**अली.**—हेंच खरें.

**वजीर.**—तुमच्या सर्वांच्या आग्रहास्तव मी कबूल करतो कीं—

**सयाजी.**—आग्रहास्तव ह्मणजे—

**वजीर.**—बरें, माझीच तशी समजूत आहे असें कां होईना, पण भर दरबारांत माझा अपमान नाहीं कां झाला ? मला वाटतें कीं आतां (कागदावर कांहीं मजकूर लिहितो )

**सयाजी व इतर.**—( हात जोडून ) काय सरकार ?

**वजीर.**—अहो हें पहा अमेदखानानें निदान् २०००० फौज आणावी ह्मणून लिहित आहें—

**सयाजी.**—भलतेंच !

**वजीर.**—थांबाहो. दाऊद खानानें १००००, शेख अबदुलनें ५०००, ( मुखानें ) वीस आणि दाहा तीस आणि साडेतीन मिळून ३५००० फौज झाली कां नाहीं, आणि शिवाय आपली ? इतकें कशाला ? मी जेथें पाय ठेवीन तेथें हवें तितकें सैन्य जमा करीन.

**सयाजी.**—हो, हो, सरकार ! आपले तोंडून हुकुम

सुटण्याची अवधी. लोक इतके अनुकूल आहेत कीं जिवास जीव देतील प्रसंग पडला तर.

**अली.**–( उसासा टाकून ) काय दैवाचे खेळ आहेत कोणास कळे ?

**वजीर.**–कां अली ! वाईट कां वाटतें ? कडेकोट बंदोबस्त असतां कोठें व्यंग सांपडेलसें तुह्माला वाटतें कां ? किंवा जर तुह्मास अशावेळीं मला सोडून अलग रहावेंसें वाटत असेल तर मी सांगतों कीं खचित् तसें करा. मला संपत्तीच्यावेळचे फक्त मित्र असतात ते नकोत. जे विपत्तींत सुद्धां उपकार स्मरून व सेवेंत तत्पर राहून आमचे कार्यास यश आणणारे असतील ते पाहिजेत. मर्जी असेल तर बेलाशक शत्रूस जाऊन मिळा. माझे कडून मनाई नाहीं.

**अली.**–सरकार ! हें काय ? अहो अल्लासमक्ष सांगतों कीं हा अली वेळ पडेल तर खावंदाचे प्रीत्यर्थ या प्राणाची आहुती देईल. मात्र अविचारानें काम करूं नये एवढें या दासाचें हात जोडून मागणें आहे.

**वजीर.**–या वेळेस स्वस्थ बसलें तर आह्मास कोणीतरी मान देईल कां ?

**अली.**–खावंद ! सहसा कोणतेंही काम करूं नये कारण–

**वजीर.**–तें राहूं द्या अली ! तुह्मी स्वतः जाऊन उद्यां सकाळीं सर्व पठाण, अमीर, मोंगल आणि मुसलमान जे आपले सैन्याचे मुख्य मुख्य सरदार असतील त्यास हुकुम द्या कीं तावडतोब त्याणीं जाऊन राजवाड्यास घेरा घालावा आणि बादशाहास कैदकरून आह्मा पुढें हजर करावें. आपले जे कोणी मित्र व अनुयायी वगैरे वडे लोक असतील

त्यांस कळवाकीं सकाळीं आठ वाजतां आपले शिपाई प्याद्यासह आमचे वाड्यापाशीं तयार असावें आणि आमचे खासगींतील नोकर लोकांस आतांच वर्दी द्याकीं त्यांनीं हत्यार बंद व्हावें. मराठे व रजपूत जे सैन्यांत आहेत ते अर्थात् त्यांचे वरिष्ट सरदार आज्ञा करतील तसें वागतीलच. खेरीज ( सयाजीकडे मानकरून ) हे रात्र मराठे आहेत तेव्हां ते तिकडील बंदोवस्त राखतील.

**सयाजी.**–( हात जोडून ) हो. हो. आज्ञा सरकारची झाल्यास मग काय उशीर ?

**वजीर.**–बरें, हे लाखोटे ( लिहिलेलीं पत्रें बंद कारितो) आतां सांडणी स्वाराजवळ द्या. ह्मणजे हां हां ह्मणतां कुमक येईल. ( गर्वानें ) मनावर घेतल्या नंतर बंदोवस्तास काय कमी ?

**अल्ली.**–हो. हो. आपल्यावर अल्लाची पूर्ण कृपा आहे. त्या अर्थी कोणती उणीव पडणार आहे ? ( हात जोडून ) खाविंद ! पण आपण मनांत आणलें आहे तसें एकदम करणें उचित नाहीं. येवढें माझें ह्मणणें आहे. आपण न्यायमूर्ति आहां व दूरवर विचार केल्याशिवाय आपले हातून कोणती गोष्ट घडत नसते ह्मणून सांगत आहे. माफी असावी.

**वजीर.**– ( त्रासून ) मग तुमचें ह्मणणें तरी काय. नीट सांगा पाहूं.

**अल्ली.**–खावंद ! घुस्सा करूंनये. माफी असल्यास बोलतों.

**वजीर.**–बरें. केली माफी. बोला.

अल्ली हा वजीराचा इमानी नोकर असे व जेणेंकरून स्वतांचें व वजीराचें कल्याण होईल असाच तो त्यास नेहमीं

उपदेश करीत असे. त्या मुळें वजीराचा त्यावर फार भरंवसा असे. कोणती ही गोष्ट करणें झाली तरि तो अल्लीचे सल्या खेरीज बहुधा करीत नसे. असा प्रकार असल्यानें अल्लीसहि वाटत असे कीं आपले संमती खेरीज वजीर कांहीं करणार नाहीं. परंतु या खेपेस वजीराचें मन पूर्वीच शेरखानानें दूषित केलें होतें. तेव्हां वजीर कांहीं केल्यानें मत घेईना असें पाहून अल्लीस वाईट वाटलें. तथापि कसेंहि करून बेत फिरविलाच पाहिजे, नाहींतर अकल्याण होण्याचा संभव आहे असें समजून अल्लीनें इतका वेळ मर्जी गेली तरि बोलणें चालविलें होतें; आणि त्या आग्रहास वजीराचे रुकारानें सफळता आली असें पाहून अल्ली सोत्सुक मुद्रेनें ह्मणतोः—

"सरकार! आपण अक्कल, विद्या, व शील यांहीं युक्त आहां. बलाढ्यहि नाहीं असें माझें ह्मणणें नाहीं. परंतु प्रत्यक्ष बादशाहावर उलटून पडणें ह्मणजे आपले पित्यावर पडल्या प्रमाणें होय. आपण स्वतः सर्व प्रजेचे हल्लीं मायबाप आहां खरें, तरि आपल्यास बादशाहा शिरसामान्य असले पाहिजेत. आतां ते राजकर्मी दक्ष नाहींत हा त्यांचा अपराध नाहीं. ज्या दुष्ट सय्यदांचा तसा अपराध होता त्या पैकीं एकास तर आपले हातून आज योग्य बक्षीस मिळालें आहे. माफी असावी सरकार! कसें जाहलें तरी, महंमद हा बादशाही कुलांत उत्पन्न जाहलेला आहे. शिवाय त्यांचें नांव आपण अति पूज्य मानतो. तर त्याला कैद केल्यास लोक काय ह्मणतील? न्यायाचरण होईल काय? माझे मतें आपले नांवास बट्टा लागणार आहे. कारण आपण न्यायी आहां असा डंका वाजत आहे व या न्यायाकरितांच आपण सर्व अप-

मान सोसून सहनशीलता स्वीकारिली. तर उतावळेपणाचा त्याग करून शांततेनें कृत्य करावें-- ”

हे शब्द वजीराचे मनास फार लागले आणि त्याचे विचार तत्काल फिरूं लागले. रणप्रसंग आणावा किंवा काय करावें हें त्यास कांहीं सुचेना. तो निमुटपणें बसला हें पाहून सयाजी व शेरखान यांस वाईट वाटलें कारण त्यांनीं योजलेला उपाय निष्फल होण्याचा समय दिसूं लागला. तेव्हां सयाजी ह्मणतो:—खावंद ! हा उपदेश अगदीं गैरशिस्त आहे. बाप झाला ह्मणून घरांत कर्त्या पुत्रास मुला बाळांच्या व बायकांच्या समक्ष त्याची फजीती उडवील कीं काय ? तद्वत् सर्व प्रजेच्या देखत कां ह्मणांनां, कारण दरबारांतील बातमी आबाल वृद्धांत प्रसिद्ध झालीच आहे, आपली बादशाहानें मानखंडणा केली नाहीं कां व त्याचा सूड उगविण्याकारितांच लढाईचा बेत आपण चालविला होता नां ?

असें सयाजीचें बोलणें ऐकून वजीराचें मन पुनः फिरलें. याचें ऐकूं कां त्याचें ऐकूं असें त्यास झालें आणि तो लोडास टेकून स्वस्थ बसला. परंतु शेरखान अल्लीचे ह्मणण्यावर काय उत्तर देतो तें ऐकण्याचें हेतुनें वजीर त्यास ह्मणतो. ‘कां मंत्रि ! तुह्मी कां मौन धरलें ? अल्लीचे बोलण्यावर तोड काय’ ? सयाजीराव ह्मणाले तें खरें, इतकें ह्मणून शेरखान पुढें बोलणार तों पाहेरकऱ्यानें येऊन वजीरास कळविलें कीं अवलियासाहेब कांहीं जरुरीचे कामासाठीं आले आहेत. वजीरानें वर येऊं द्या ह्मटलें. आणि लागलींच ते वर आले आणि सलाम करून बसले. त्यांचे मुखावर उद्विग्नता दिसूं लागली. त्याचे नेत्र पाण्यानें भरून आले आणि

त्यास गहिंवर आल्या कारणानें बोलवेना. नंतर कांहीं वेळानें तो वजीरास स्फुंदत स्फुंदत ह्मणाला. 'खावंद ! गावांत दाट बातमी पसरली आहे.' पुढें त्याच्यानें स्पष्ट बोलवेना.

**वजीर.**—( अधीरतेनें ) अवलिया ! सांग कायतो. तुझें मन इतकें दु:खीत झालें यावरून आह्मांवर कांहीं तरी मोठें संकट आलेलें असावें, पण कळूं दे तर खरें काय आहे तें.

**अवलिया.**—नुकता बादशाहानें गुप्त बेत केला कीं खावंदास ( स्फुंदतो )

**वजीर.**—काय ठार मारणार !

**अवलिया.**—या अल्ला ! त्यांची काय बिशाद तसें करण्याची ? पण खावंद ! आपल्यास वजीरीवरून दूर करणार.

**अली.**—( उसासा टाकून ) बुडालें हो बुडालें, बादशाही राज्य बुडालें ! ! आमचें अन्न बुडालें ! !

**वजीर.**—अवलिया ! आणखी काय बातमी ?

**अवलिया.**—इतकीच.

हें ऐकून वजीर अलीस रागानें ह्मणतो:— कां हो ! झाली खात्री आतां. दाहा पंधरा दिवसां पूर्वीं एकदा तुह्माला विचारल्याचें आठवतें आहे कां ? बादशाहाचें आमचें पटत नाहीं तर वजीरीचा राजीनामा द्यावा आणि घरीं स्वस्थ अल्लाचें नांव घेत बसावें, ह्मणून आमचें भाकीत खरें झालें कां नाहीं ?

**अली.**—होय सरकार ! आपण ह्मणालां तसें झालें खरें.

**वजीर.**—( रागानें ) तेव्हां आतां तुमच्या सल्याप्रमाणें वागावें कां ?

**अली.**—सरकार ! शांत व्हा. माझें ह्मणणें बादशाहा

व्रतः दुष्ट अंतःकरणाचा नाहीं; ज्या निर्दय मनुष्यानें आ-
ल्यास त्रास देवविला त्यास आपण आज नरकवास भोगा-
वास लाविलें आहेच. आतां त्याचा भाऊ हुसेन उरला.
गाचा एकदा समाचार घेतला ह्मणजे आपोआप सारें सुर-
ीत चालेल. मज गरिबावर कां उगीच राग? आपण
ामावरून दूर झालांत तर सर्व मोंगलाई बुडणार—

**अवलिया.**—( हात जोडून ) सरकार! आणखी एक
न गोष्ट कानावर घालावयाची आहे.

**वजीर.**—( उत्सुकतेनें ) बोला.

**अवलिया.**—दुपारीं खासे स्वारी बेगम महालांत गेली
होती तेव्हां तेथें त्यांची रखेल नूरजहान ( मस्तानी ) नाहींशी
झाल्याचें समजून बादशाहाचा संताप जाहला आणि—

**वजीर.**—मेली वाटतें रांड? आजारी होतीच ती?

**अवलिया.**—खरें कां? आई! आई! जगांतलें रत्न ग-
मालें. माझा हेतु अपुरा राहिला. असो. पण सरकार, गा-
वांत भलतीच कंडी उठली आहे.

**वजीर.**—ती काय बुवा?

**अवलिया.**—कीं आपण तिला पळविलें आहे.

**वजीर.**—काय? तूं बोलतोस काय? शुद्धीवर आहेस कां!

**अवलिया.**—सरकार! आपण पळविली असें माझें
स्वतःचें मत नाहीं. बादशाहा ह्मणतात त्या संबंधानें जो
गावत बोभाट झाला आहे तो कानांवर घातला आहे.

**वजीर.**—बरें, पुढें काय झालें तें सांगा?

**अवलिया.**—मग तेथील पाहरेकरी शिपायांस कैद करून
नेलें आणि घटका झाली असेल किंवा नसेल, कारणी कां

कोण मसणी स्वयंपाकीण होती तिला हि पकडून नेऊन चौ
कशी चालविली आहे. पुढें निकाल काय झाला तो पक्क
समजला नाहीं. पण गुण्गुग् अशी आहे कीं आपण ति
पळविली अशी बादशाहाची खात्री झाली आहे.

**वजीर.**– ( निराशेनें ) माझ्यावर आळ आला आं ?

**अली.**–मला नाहीं वाटत कीं बादशाहास आपला स
शय येईल. त्याची पक्की खात्री आहे कीं आपल्याला रि
यांच्या बिलकुल नाद नाहीं.

**अवलिया.**–मागें मी एकदा तिचे विषयीं बोल
तर पूजा करून घेतली. सरकार ! आपल्यास चैनबाजी
नाद नाहीं हें मी शपथेवर सांगेन. बाकी मला वाटत ः
कीं सरकारजवळ तसें पांखरूं पाहिजे.

**वजीर.**–आह्माला विचारलें तर आह्मी साफ नाक
करूं. अली ! तुह्मी ह्मणतां तें खरें. काय त्याची प्र
आहे मला बोलण्याची ?

**सयाजी.**–खावंद ! माझी एक प्रार्थना आहे. बा
तर तसें करावें.

**वजीर.**–बोला पाहूं. ( मनांत ) मसलती ऐकल्या पाहि

**सयाजी.**–सरकार ! बादशाहा येऊन जाऊन व
वरून दूर करील इतकेंचना ? केलें तर केलें. त्यांतच अ
नफा आहे.

**वजीर.**– ( आश्चर्यानें ) तो हो बुवा कसा ?

**सयाजी.**–आपण दक्षिण हिंदुस्थानांत चलावें
तेथें पूर्वी प्रमाणें अम्मल बसवावा. आमचे महाराज
अंकीत होतील अशी मी तजवीज ठेवतों. कोल्हापूर

आणि आपली जूट झाल्यावर आपण चाहील तें करूं शकाल. उत्तरेचा बादशाहा महंमद, व दक्षिणेचा आपण. मवाशीं वय गेतलेले लोक, शिवाय, आपल्यास अनुकूल आहेतच. हा विचार कसा आपले मनास येतो ?

**वजीर.**—शाबास ! फक्कड युक्ती आहे. पण एक अडचण दिसते.

**सयाजी.**—कायती समजली तर मला थोडीशी अक्कल आहे तिच्या योगानें निवारण करीन.

**वजीर.**—अहो अडचण ह्मणजे काय ? मागें आह्मी तिकडे होतों तेव्हां त्या सातारकराच्या बाळाजीनें पुरेंपुरें केलें होतें. आतां त्याचा पोरगा बाज्या आहेनां ? लोक ह्मणतात झाला बापाहून सवाई आहे. तो त्रास देईल, दुसरें कांहीं नाहीं (अह्लीस) ती तसबीर घ्या इकडे. (अह्लीनें दिलेली तसबीर सयाजीस दाखवून) हा कोण पाहिलांत कां ?

**सयाजी.**— (पाहतांच) ओळखला ह्मणजे ? आमचा गांवचाच हा. ज्या ब्राह्मणा विषयीं आपल्यास भय वाटतें तोच बाजीराव पेशवा प्रधान. त्याचाही मोड होईल अशी युक्ती सांगतों.

**वजीर.**—ती कशी काय ?

**सयाजी.**— (मिशावर ताव देऊन) अहो मी पंतप्रतिनिधीपाशीं बरेच दिवस संधान लावून ठेवलें आहे.

**वजीर.**—प्रतिनिधी तो कोण ? कोणी बाज्याचा शत्रू आहे ?

**सयाजी.**—खावंद ! प्रतिनिधी ह्मणजे शाहूमहाराजांचा प्रधान. आपण जसें या दरबारचे अधिकारी आहां तसा तो तिकडील आहे. शाहूकडून तो चाहील तें करवितो.

इतकें जबरदस्त त्याचें वजन आहे. पण काय झालें आहे पहा, बाळाजी पडला शाहूचे उपयोगीं. त्यानेंच खटपट करून या शहरांतून बादशाहाचे परवानगीनें त्याला सोडवून पुन्हां साताऱ्यास नेऊन राज्यपदावर बसविलें. तेव्हां त्याला त्याचे मुलाचें ह्मणजे त्या कावेबाज ( तसबिरीकडे बोट करतो ) बाज्याचें ऐकावें लागतें.

**वजीर.**—हें त्या प्रतिनिधीला आवडत नसेल तर ?

**सयाजी.**—अर्थात्. ह्मणून तर आपलें कार्य साधेल ह्मटलें. आमचे कोल्हापूरचे महाराजाकडून लालूच मी लावली आहे. आणखी तशांतून आपण दक्षिणेंत जाऊन त्यास मदत केली तर काम अनायासें फत्ते होईल.

**वजीर.**—शाबास ! बहार केलीत सयाजीराव ( अल्लीस व शेरखानास ) कां दोस्त, तुमचा काय सल्ला ?

**अल्ली.**—( मनांत ) दुराग्रह उपयोगी नाहीं. मला वाटलें होतें कीं वजीरी सोडून हा घरीं बसणार. मग आली होती उपाशी मरायची पाळी. सयाजीची युक्ती चांगली दिसते. वजीर दक्षिणेंत स्वतंत्र झाला कीं आपलाही लाट साधेल. ( मोठ्यानें ) आतां चिंता नाहीं. ही युक्ती फक्कड निघाली. माझी या गोष्टीस पूर्ण संमति आहे.

**वजीर.**—( अल्लीचें मन आपल्याकडेस वळलें पाहून ) कां खान ? एकतर झाले कबूल. तुह्मी काय ह्मणतां ?

**शेरखान.**—आपल्या बाहेर नाहीं मी. पण ह्थलेंयेथें- झालें असतें तर अधीक—

**वजीर.**—छे तसें करतां येत नाहीं. सयाजीरावाचेंच ह्म. णणें खरें दिसतें. त्या बाज्याचाही बंदोबस्त झालेला आहे.

ठीक झालें. चला आतां. ( वजीर उठून वाड्यांत जातो. ) (अल्ली शेरखान व सयाजीराव आणि अवालिया हे त्यास सलाम करून वाड्याबाहेर आले आणि गप्पा मारीत आपापले घरीं आनंदानें गेले.)

दुसरे दिवशीं बादशाहानें सकाळींच दरबार भरविला. आणि वजीरास बोलावणें पाठविलें. वजीर आपले दिवाणखान्यांत बसला होता त्यास बादशाहाकडील शिपाई बोलविण्यास आला तेव्हां वजीरास अधीकच आनंद झाला कीं योजलेलें कार्य लवकर सिद्धीस जाईल. या हर्षाचे भरांत त्यानें पेहराव चढविला आणि मुत्सद्यांची वाट न पाहतां तो तावडतोब बादशाहाचे भेटीस गेला. मुलाकतीनंतर पांच एक मिनिटें झाल्यावर बादशाहा ह्मणतो—

“ कां असोफ ! काल उपमर्द केलांत त्या बद्दल माफी मागतानां ? ”

**सय्यद हुसेन.**—( क्रुद्ध होऊन ) गैरसावधपणानें अब्दुल मियावर वार केला यांत पराक्रम तो कसचा ? तेव्हांच या राजश्रीला ह्रात दाखविला असता. पण आपण समजूत काढूं लागला—

**वजीर.**— ( डोळे वटारून ) तूं त्याचाच भाऊ नाहींकां ? थांब.

**बादशाहा.**—हं वजीर, कालच्या प्रमाणें केलें तर याद राख़ा. जर—

**वजीर.**— ( उठून ) असें आहे कां ? ( तरवार उपसतो ) हुसेना ! मग्रुरी जिरवतों, दमखा.

( हुसेन व वजीर यांची चकमक उडून अखेर हुसेन

खालीं पडतो.) अरे चांडाळा! (प्रेत खाली पडतें तें पाहून) झालों मी आतां कृत कृत्य. तुह्मां दोघानां तर माझे हातून मृत्यु आला!

**बादशाहा.**—तुह्मीं आपले आसनावर अर्धी चलतां कां नाहीं?

**वजीर.**—हा पहा. (जाऊन बसतो) काय हुकूम आहे?

**बादशाहा.**—(काजीस) पडद्या पलीकडील हत्यार बंद स्वारास हाक मारा. (स्वार येतात त्यांस) पकडा या वजीरास.

**वजीर.**—(चवताळून बादशाहाचे आंगावर जातो) शेवटीं असें बोलतोस? (त्याचे भोंवती स्वार गराडा घालतात) व्हा दूर. नाहींतर पहा.——

**बादशाहा.**—(स्वारास) या वजीराला जाग्यावरून हालूं देऊं नका. कैद करा त्याला. त्याला चांगली शिक्षा द्यावयाची आहे.

**स्वार.**—वजीर साहेब! तुह्मी दांडगाई करून आमचे पैकीं दोघां तिघांचा जीव घेतलांत आणि हवालदाराचा पंजा उडविला, तरि आह्मी गय खाणारे गडी नाहींत; जीव गेला तरी तरवार घेऊन आपल्यास कैद केलें पाहिजे. (तरवार हिसकून घेतात) खावंदाचा हुकूम ऐकला पाहिजे. (वजीरास कैद करतात.)

**वजीर.**—(क्रुद्ध होऊन) पण माझें ऐकतां कां नाहीं? लांब व्हा कसें.

**स्वार.**—छे सरकार! ती गोष्ट होणें नाहीं.

**बादशाहा.**—(स्वारास) तुह्माला त्याच्याशीं बोलण्याची जरूरी नाहीं. बडबडूंद्या त्याला. तुह्मी आपलें काम बजावा. त्याला हालूं देऊं नका.

**स्वार.**—हुकूम सरकार !

**बादशाहा.**—कां वजीर ! जिरली कां आतां मस्ती तुमच्या घोर अपराधास खरोखर देहांत शिक्षा दिली पाहिजे. समजलांत.

**वज़ीर.**—आणि आपण दरबारांस येण्याचें आमन्त्रण पाठवून एकाएकीं या हल्कट शिपायाकडून मजला कैद करविलें यांत पुरुषार्थ तो कोणता ? शिवाय त्या सभ्यदानीं दुष्टरीतिनें मजविषयीं आपलें मन भरवून दिलें आणि भर कचेरींत अपशब्द बोलून माझा अपमान केला तें आपल्यास बरें वाटलें कां ?

**बादशाहा.**—तें कांहीं असो. तुह्मी फार शेफारलां आहां, हें खचित्. तें राहूंद्या एकीकडे. पण ते कैद करून आणलेले शिपायी काय सांगतात तें ऐका.

**वज़ीर.**—( मनांत ) बहुत करून त्या रांडे बद्दल असेल ( मोठ्यानें ) हं काय ह्मणतात ?

**कैदी.**—( बादशाहास मुजुरे करून ) सरकार !

**बादशाहा.**—अजून तरि कबूल करतां कां नाहीं ?

अबदुल कादर याच्याकडे शहरचा फौजदारी अधिकार असे, त्याच्या ताब्यांत हे कैदी बादशाहानें दिले होते; त्याचें व वजीराचें कांहीं सरकारी कामावरून वांकडें आलें होतें तेव्हां त्या बद्दल सूड उगविण्याची त्यास ही उत्तम संधी सांपडून त्यानें होईल तितका वजीराविरुद्ध पुरावा करविण्याचा प्रयत्न चालविला होता. त्याचे हाताखालीं गजानन ह्मणून एक कोतवाल असे. त्यास आर्य लोकांस पुष्कळदां शिक्षा देवविल्या बद्दल अबदुल्लानें इतके उंच प्रतीस चढविलें

होतें त्यामुळें त्याला जास्त हुशारी वाटून तो अधिकाधिक आर्य लोकांस छळी. परंतु खुद्द वजीर तडाक्यांत सांपडले आहेत तर अशा प्रसंगास बहाद्दरी दाखविल्यास बाहशाहा प्रसन्न होऊन जाहागीर देईल असे भरंशानें तो झटून काम करूं लागला. एक रात्रीची मुदत सांपडली तेवढ्यांत त्या उभयतांनीं फार मेहनत घेतली. पूर्वी त्या कैदींस पुष्कळ समजवून सांगितलें कीं तुह्मी बनावट पुरावा द्याल तर बरें परंतु ते पापभीरू असल्यामुळें त्यांची एकाएकीं तितकी हिम्मत होईना. मग गजाननानें सांगितलें कीं " अबदुल्ल साहेब ! यांस चवदावें रत्न दाखविल्याशिवाय हे वठणीस यायचे नाहींत." हें अबदुल्लास खरें वाटून ती सूचना केल्या-बद्दल त्यानें गजाननास शाबासकी दिली आणि शिपाया कडोन त्या कैद्यांचे अंडास चाप लाविले, त्यांनां फटके मारले आणि त्यांचे इतर प्रकारेंहि फार हाल केले त्यामुळें ते कैदी आपला जीव जाईल या भीतीनें ह्मणाले कीं " सरकार ! सांगालतसें खावंदासमक्ष सांगूं. परंतु आतां या पीडेपासून मुक्त करा, पायां पडतों आह्मी. " तेव्हां अबदुल्ल व गजा-नन यांनीं त्यांस मना प्रमाणें शिकविलें होतें परंतु बादशाहा कडूनहि त्यास कांहीं आश्वासन दिल्यास ते बदलणार नाहींत अशा इराद्यानें प्रथम अबदुल्ला बादशाहा समोर जाऊन हात जोडून उभा राहिला आणि मुजरा करून ह्मणतो:—

" खावंद ! एक अर्ज आहे. हुकूम होईल तर— "

**बादशाहा.**—कोण खान ! मग उभे कां ? बसा हाजी काजी साहेबा जवळ.

**अबदुल्ला.**— ( काजीजवळ बसून ) सरकार या कै-

दीनीं कच्ची हकीकत त्या गजाननरावापाशीं कबूल केली आहे पण अभयवचन मिळेल तर ते सांगण्यास तयार आहेत.

**बादशाहा.**—( कैद्यास ) तुह्मास गुन्हा माफ केला आहे. बोला लवकर—

**अबदुल्ला.**—सरकार ! मेहेरबानी झाली ( कैद्यांस ) शिपाय ! हं ! सांगा हकीगत. ह्मणजे शिक्षा तुह्माला मिळायची नाहीं.

**कैदी.**—सरकार ! वजीर साहेबांनीं फार अनास्था केली; आमच्या यजमानीन साहेब आजारी आहेत अशी त्यानां वर्दी कळली असतां त्यांनीं कांहींच तजवीज केली नाहीं.

**वजीर.**—काय ?

**शिपाई कैदी.**—आतां आपण रागाऊं नये. आह्मी खरें खरें सांगतों.

**अबदुल्ला.**—( डोळ्यानीं दाबतो ) हं सांगा ! रात्रीं काय रावसाहेबाजवळ कबूल केलें—

**कैदी.**—होय खावंद ! वजीर साहेबानीं त्यानां पळवून नेलें; बोदनदुब्बे आगाचे घरापाशीं राहतात त्यांच्या मेण्यांत बळजबरीनें बसवून नेलें. आह्मी कां ह्मणोन विचारतां, बोलले कीं याबद्दल चकारशब्द कोणाजवळ बोललां तर ठार करूं.

**बादशाहा.**—कां वजीर ! काय उत्तर याच्यावर ?

**वजीर.**—( रागानें ) उत्तर काय. कुभांड आहे हें.

**कैदी.**—छे सरकार ! वजीर खरें सांगत नाहींत.

**बादशाहा.**—चला आतां पक्की खात्री जाहली. तुह्मास वजीरीवरून दूर करून मुतलखीचे जाग्यावर नेमलें आहे. इतकी शिक्षा तूर्त बस्स आहे. उठा आणि निमुटपणें व्हा चालते.

( अब्दुल्लास ) खान ! या शिपायानां नोंकरींतून वडतर्फ करा. असले निमकहराम पदरीं ठेवणें बरें नाहीं.

वजीरास जेव्हां कैद केलें तेव्हां अल्ली संतापून कचेरीं-तून उठून बाहेर पडला आणि त्यानें वजीराचे शिपाई प्या-द्यास ही गोष्ट कळविली. ते हत्यारबंदलोक तावडतोब दर-बारांत आले आणि पाहतात तों वजीर खालीं मान घालून परत येत आहे. वजीरानें आपल्या लोकांस पाहतांच पुन्हां त्यास क्रोध येऊन तो धीरानें आपले लोकांस ह्मणतो.' अल्ली! अहो शेरखान ! पाहतां काय ? प्रत्यक्ष मला ज्या स्वारांनीं आतां कैद केलें होतें त्यांच्या मुसक्या बांधून माझे समोर हजर करा. त्यानां धरून वाड्यांत घेऊन या.' असा हुकूम होतांच वजीराचे लोक बादशाहाचे तैनातीस असलेल्या स्वारांचे आंगावर तुटून पडले व त्यांची चकमक सुरू झाली. यांनीं त्याच्यापैकीं दोघांस जमिनीवर पाडावें, त्यांनीं यानां मारावें, यांचे दोन हात, त्यांचे दोन हात, असें होतां होतां वजीराचे अनुयायाहीं बादशाहाचे १५।२० स्वारांचा पाडाव केला आणि त्यांस पकडून वजीराचे वाड्यांत नेलें.

इकडे वजीरानें आपल्या वाड्यांत येऊन अल्ली, शेरखान व सयाजीराव यांचे योग्य मदतीबद्दल आभार मानले. नंतर सर्वांचा विचार ठरला कीं झाली ती गोष्ट यथायोग्यच झाली. आतां बादशाहा कदाचित् लोकांच्या शिकवणीवरून रागानें वजीराविरुद्ध सैन्य पाठवील तर इतक्या पल्ल्यास गोष्ट नेण्यापेक्षां माफीपत्र पाठवावें.

वजीर उठून गेल्या नंतर बादशाहानें खरोखर तसा ठ-राव केला होता. तों वजीराकडून माफीपत्र आलें. तें पा-

हून बादशाहा शांत झाला. नंतर कचेरी बरखास्त झाली. या वेळेपासून बादशाहा व वजीर वरपांगीं स्नेहभावानें वागूं लागले.

## भाग आठवा.

बाजीराव गुप्तरीतीनें दिल्हीहून निघून गेल्यावर मुक्काम करीत करीत खानदेशास गेला आणि तेथील मोकासेपणा मिळवून सर्व व्यवस्था बाळ्या व गोंद्या यांच्या स्वाधीन केली. बाळ्या हा स्वभावानें पहिल्यापासून भित्रा होता खरा तरी आपले हवालीं केल्या वस्तूचें जतन कोणते प्रकारें करावें हें तो उत्तम जाणत असे. तसेंच गोंद्या हा स्वभावानें शांत, तत्पर, विश्वासु, सत्यशील, आणि शूर असा होता. परंतु हे दोघेजण दरिद्रावस्थेंत निपजले असल्यामुळें त्यांचे गुणांचें आजवर चीज झालें नवतें. त्याणीं जी थोडीशी बाजीरावाची कामगिरी मनापासून बजावली त्या बद्दल त्याणें प्रसन्न होऊन त्यांस मोकासेपणाची व्यवस्था करण्याचे कामीं नेमणूक केली. हें बक्षीस आहे असें समजून ते धन्य झाले. आणि त्या उभयतांनीं एक विचारानें वागून बिन बोभाट काम केलें.

नंतर बाजीराव तेथून निघून आपले बरोबर आणलेल्या सैन्यासह व इतमामानीशीं पुण्यास व सासवडास गेला आणि तेथें कांहीं दिवस राहून नंतर साताऱ्यास शाहूमहाराजांचे पादवन्दनार्थ गेला. पादवन्दन करून बाजीरावाची स्वारी तेथें कांहीं दिवस विश्रान्ती करितां राहिली. जगांतील पुष्कळ

वस्तूंचा प्रखर प्रतापानें नाश करणारा जो सूर्य तो आपला स्वतःचा अस्त होण्याचा समय आला पाहून रागानेंच जणू लाल लाल भडक अग्नीचे गोळ्याप्रमाणें संतप्त झाला आहे; अशा संध्याकाळचे समयास बाजीराव आपले मातेस भेटण्याकरितां गेला. तेव्हां ती वाड्यांत देवघरांत भक्तीनें रामनामाचें स्मरण करून हातीं माळ घेऊन जप करीत बसली होती, तीस स्वारी आल्याची खबर सुनेनें जाऊन सांगितली. मग ती उठून देवगृहाचे द्वारापाशीं उभी राहून पुत्रागमनाची वाट पाहूंलागली, तों बाजीराव मोठ्या मातृवत्सलतेनें सत्वर आंत आला. आणि आईचे चरणीं मस्तक ठेऊन उभा राहिला. लोकांनीं मान द्यावा, सामोरें यावें, हांजी हांजी करावें, असें सर्वांस वाटत असण्याचा संभव आहे. परंतु शिरसामान्यजी माता तिचे पुढें एकूणएक नम्र असतात, व असे जे असतात तेच खरोखर धन्य समजले पाहिजेत. या प्रसंगीं बाजीरावाची धन्यता काय पुसावी ! मातेनें सप्रेम पुत्राचा हात धरला आणि सुनेकडून पाट मांडवून त्यावर त्याला बसवून आपण पूर्ववत् पाटावर बसली. बाजीरावाचे मुखावरून प्रेमानें हात फिरवून त्यास आई ह्मणते " अण्णा ! पुष्कळ दिवस भेटला नाहींस, त्यामुळें काळजी लागतेरे ! प्रकृती बरी आहे ना ? "

**बाजीराव.**—बरी आहे ग ! सरकारी कामा काजामुळें यायला झालें नाहीं.

दिल्लीहून आणलेल्या स्त्रीचे नादीं लागल्यामुळें बाजीराव इकडे आला नाहीं, हें आईस माहीत होतें. परंतु त्याच्या या वाईट कृत्याबद्दल कोणीच त्यास दूषण लावीत नाहीं,

सर्व होस हो, ह्मणून मर्जी संपादणारे नोकर, तेव्हां ह्या कामांत त्यास खरा उपदेश द्यावा, मग मानणें न मानणें, त्याची मर्जी, असें समजुतीनें ती बाजीरावास ह्मणते. "खुशाल आहेस ऐकून बरें वाटलें. न कां भेटानां पण लौकीकानें वागून वडिलांचें नांव राखा ह्मणजे झालें." बाजीरावानें आईचे रागाचें कारण ओळखलें परंतु छपवणी करून तिची समजूत घालण्याचें हेतूनें तो ह्मणतो. "आई रागावूं नको, काम काज असतें त्यामुळें येण्यास आवकाश लागला, त्या बद्दल माफी मागतो. ( पाया पडतो ) पण आई ! लौकिकानें राहून नांव राखा, असें कधीं न ह्मणतां आजच्च बोललीस याचा अर्थ काय ? मी लांच खात असेन अगर माझे हाता खालील कोणत्याहि प्रकारचे लोकांस जर व्यर्थ नाडीत असेन तर तुझ्या पायांचो शपथ वाहतों हवीतर.

**आई.**—तसें नव्हे, बाळा ! तूं आला नाहींस तरि कोणाकडूनहि मला तूं खुशाल असल्याचें समजतें. पण तूं आज बरेच दिवस आला नाहींस ह्मणून ह्मटलें. प्रजेस जाच करतोस असें मी कधींही ह्मणणार नाहीं. तुझी तर कीर्ति सारे लोक गातात हें ऐकून माझे पोटांत आनंद मात नाहीं. ते गेले तरी, मुलानें प्रतापाचे कामीं त्यांचें नांव जाऊं दिलें नाहीं हें ऐकून तर माझ्यासारखी धन्य कोणी नाहीं, असें मीं समजत आहें. पण आतां रागावणार नाहींस तर सांगतें.

**बाजीराव.**—( आईचे पाय रगडूं लागतो ) राग आईवर मी करीन कां ? ( मनांत ) छिद्र बाहेर पडतें त्यास आतां काय करावें ? मौन धरून रागें भरून घेण्या परीस

दुसरा उपाय नाहीं. असो. ( उघडपणें ) आई सांग कीं ग !

**आई.**—खानदेशास गेलास तेथून एकदोन पत्रें पाठविलीस. पुढें महिनाभर तुझ्या हातचें पत्र नाहीं. कोणी भलत्यानेंच लिहून पाठविलें कीं तूं आजारी आहेस, तेव्हां जीव घोरांत पडला. ( सुनेकडे बोटकरून ) मुलीला चैन नाहीं, कधीं खुशालीचें पत्र येईल ह्मणून आह्मी वाट पहात बसलों.

दुसरा कोणी पृच्छक असतां तर आजारी पणाची सबब लढविण्यास बाजीनें कमी केलें नसतें, परंतु खरी गोष्ट कळल्यानें जिला राग आला आहे त्या प्रत्यक्ष माते जवळ लपंडाव करून वेळ मारून नेणें पुत्रधर्मास योग्य होणार नाहीं असें समजून बाजीराव हिरमुसल्याप्रमाणें खालीं मान घालून, कांहींएक उत्तर न देतां पुन्हां आईचे पाय रगडूं लागला. तेव्हां ती ह्मणाली— " दिल्ली कोणीकडे लांब, पण तिथें सुद्धां जायला चुकला नाहींस ? "

**बाजीराव.**—तेथील राज्यव्यवस्था पाहण्याकरितां जाणें भाग पडलें ग—

**आई.**—तें समजतं मला. किती बतावणी करतोस बरं अण्णा ! बरोबर कोण आणलीस ? ( बाजीराव उत्तर देण्यास लाजला पाहून ) आतां कसें तोंड मिटलें ? कुठली मुसलमानीन घेऊन आलास काय जण ? जा गडे, तुझें करणें तुला बरें वाटतें. अशानें कुळाला बट्टा लागतो हें तुला कळत नाहीं असें नाहीं. बरें, आणलीस तर आणलीस. तिचा कैवार घेऊन आणि तिच्या वरकरणी मायेस भुलून या पोरीला ( सुनेकडे बोट दाखवून ) हाका मारीत बसविलेंस.

**बाजीराव.**—आई ! या गोष्टींत कांहीं मला तुझ्यापाशीं

बोलतां येत नाहीं. तुं * पक्ष घेतलास तर घे. पण चौकशी केलीस तर अपराध कोणाचा आहे हें सहज दिसेल. तिला हिनें कां टाकून बोलावें ? तूंच सांग.

**बाजीची बायको.**—( मर्यादेनें ) सास्वी ! आतां बोललें तर राग मात्र येईल—

**आई.**—थांब मुली ! तूं नको बोलूंस. अण्णा ! पण कशी झाली तरी ही लग्नाची बायको. ती मेली रांड, हडळ, बाटलेली, तिचें तोंड सुद्धां जळलं मेलं तें पाहूं नये.

आईनें सुनेचा कैवार घेतलेला पाहून बाजीराव आईस ह्मणतो. " आई तुझे शिकवणीचा मला राग नाहीं. मी त्या गोष्टीचा विचार करतो आणि पुन्हां भेटेन तेव्हां काय तें कळवितों. "

**आई.**—कांहीं काम नसलें तर इथेंच कां आज राहिनास ?

**बाजीराव.**—काम ह्मणण्या सारखें नाहीं पण गेलों ह्मणजे बरें—

**आई.**—रागावून चाललास कां मजवर ?

**बाजीराव.**—छेग ! कांहीं तरी काढती—

**आई.**—नाहीं तर येथेंच आज संध्याकर ह्मणजे झालें—

**बाजीराव.**—बरें आहे.

**आई.**-मुली ! जा ग संध्येचें मांड आपल्या पतिराजाचें. सून तांब्या, पंचपात्री, पळी, ताह्मन, व भस्म, आणण्याकारितां माजघरांत गेली असें पाहून आई बाजीरावास ह्मणते कीं " ती फार सद्गुणी, कामकाजाची " हुपार, नीतिमान, चालरीतीची, कुलीन, व सदाचारी अशी आहे. तिच्यावर प्रीति करीत जा; लग्नांत तिला दिलेलें वचन पाळ; तिचे आई बा-

पांनीं आह्मापेक्षां तुजकडे सर्वस्वी बघून तिला आपले घराण्यांत लोटून दिलेंलें आहे. हल्लीं ज्या पापिणीवर भुललास ती केव्हां तरि तुला फसवील, तिची प्रीति खोटी आहे, तिनें नित्य इच्याशीं भांडावें, धुसूपुसावें, तुझ्याजवळ इच्या चाहाड्या खोट्या नाट्या सांगाव्या, आणि तूं नंतर तिचें खरें मानावें, हें बरोबर नाहीं " या प्रकारचा बाजीरावास त्याचे आईनें अंतःकरण पूर्वक उपदेश केला परंतु तो आवडीमुळें वेडा झाला असल्या कारणानें त्याचे मनास त्या पासून फारसा विकार झाला नाहीं; तथापि हें रागें भरणें आईचें असल्यामुळें त्यानें त्या वेळेस मौन धरिलें. आणि बायकोनें आणलेल्या ऊन पाण्यानें पाय धुऊन व नंतर संध्या करून बाजीराव रामरक्षा ह्मणत बसला. इतक्यांत रस्त्यावर घोडेस्वार पायदळ इत्यादिकांचा अवाज त्यास ऐकूंआला, ह्मणून तो बाहेर जाऊं लागला. तेव्हां त्याची आई पुसते " अण्णा ! कोण आलेंरे ? तुला महाराजा कडील बोलावणें आलें कीं काय ?

**बाजी.**—अग ! आज अप्पा येण्याचीं वाट होती. सकाळीं जासूद आला होता त्याच्या कडोन—

**आई**—आणि मला कळविलें देखील नाहींसतें ?

**बाजी**—गोष्ट काढायला झालें केव्हां ! आज आल्यापासून एकसारखें रागें भरणें चाललें आहे. बरें तें असुंदे. मी बाहेर जाऊन पाहतों कोण—

असें ह्मणून बाजीराव बाहेर जाणार तों स्वतःचे शिपाई प्याद्यास घरीं जाण्यास परवानगी देऊन व भालदार चोपदार यास देवडीवर बसण्यास हुकूम देऊन अप्पा अत्युत्सुकतेनें आंत आला आणि देवाचे, आईचे, वडील बंधूचे व वयनीचे

पायां पडला. आणि त्यांचे आशिर्वाद घेऊन वयनीनें मांडलेले पाटावर बसला. पुढें कुशलतेचे प्रश्न झाल्यावर त्यानें संध्या केली आणि त्यानंतर ते रामलक्ष्मणसदृश उभयतां बंधू मातेचे आज्ञेवरून भोजन करूं लागले. तेव्हां पुन्हा भाषणास सुरवात झाली.

**बाजी.**—अप्पा ! शाबास, माझें एक काम उरकलेंस. जय मिळविलास हें फक्कड झालें.

**आप्पा.**—वडिलांच्या पुण्याईनें——

**बाजी.**—पण कसें काय झालें तें सविस्तर सांगतर खरें?

**आप्पा.**—अण्णा ! काय पुसतां? पहिल्यांदा केवढें अवडुंबर मांडलें? पण जेव्हां कां मी आणि राणोजी शिंद्यानीं—

**बाजी.**—तो कोठें तुह्मास भेटला ?

**आप्पा.**—अहो ती एक मजाच आहे. सांगतों ऐका. काय झालें. आह्मी नागपुराच्या अलिकडे २० एक कोस गेलों आणि तेथें एका वाघामागें मी एकटाच शिकारीस जात असतां त्यांची टोळी एकाएकीं आंगावर तुटून पडली. त्यांचे आमचे दोन हात झाल्यावर ते शरण आले आणि त्या राणोजीनीं मला ओळखून जीवदान मागितलें तेव्हां मी त्या राणोजीचा पराक्रम पाहून खुष झालों. तेव्हां त्याणीं आपल्या बद्दल दिल्लीजवळ घडलेली सारी हकीगत कळविली. मग मी त्यास बरोबर नेलें. तेव्हां ते शिंदे माझे फार उपयोगीं पडले. सादत खानावर जेव्हां कां आह्मी सर्वांनीं तोफांची झली तेव्हां कसचें काय? त्रेधा त्रेधा उडून तो जेरीस आला मग आह्मी त्यास हद्दीपार केला. आणि मी राणोजीबहाद्दराकडे संतोषानें तेथील व्यवस्थेचें काम देण्यास

राजी झालों. परंतु ते कांहीं केल्यानें ऐकेनात. त्याणीं उदाजीं पोंवाराकडे सर्व बंदोबस्त सोंपविला. मग तेथें आठ दाहा दिवस राहिलों आणि त्या उदाजीचें काम यथायोग्य चाललें आहे व लोक त्याचे शासनास राजी आहेत, असें पाहिल्यावर आह्मी इकडेस आलों. राणोजीस खोदखोदून विचारलें. "परंतु तुमची भेट घेतल्यावर सर्व पत्करीन" एवढेंच सांगत; जास्त खुलासा होऊं देईनात. या करितां त्यांस बरोबर आणले आहेत. प्रातःकालीं आपले चरणाचें दर्शन घेण्यास ते येणार आहेत; आतांच येणार होते पण मी नको ह्मटलें.

**बाजीराव**— ( हंसत ) तो तसाच आहे, बापाचा बच्या. वीर पण वीर आहे. अप्पा ! आतां कोठें आहे तो ?

**आप्पा.**—सरजेराव, माची खालचे ते, त्यांच्या येथें ते नातेवाईक असल्यावरून पाहूणचारार्थ गेले आहेत—

बाजीरावानें त्या राणोजीची खूप शिफारस केली. तो खरा देशाभिमानी व शूर पुरुष असून निराश्रित असल्यामुळें बंडावा करून पोट भरीत होता, परंतु आतां आपल्यासारख्यांनीं त्याला हातीं धरल्यावर त्याचा उत्तम उपयोग होईल ह्मणून अप्पास कळविलें. नंतर चिमणाजीनें बाजीरावास दिल्लीकडील सर्व वर्तमान विचारिलें. बाजीरावानें राजकीय प्रकरणीं सर्व प्रकार त्यास विदीत केला.

भोजनोत्तर त्या बंधूंचा पुनः संवाद सुरू झाला:—

**आप्पा.**—अण्णा ! आणखी कांहीं "दिल्लीचें" वर्तमान ?

**बाजीराव.**—कां बरें, पुन्हांसें विचारलें ?

**आप्पा.**—आपली उडत उडत गद्यारयन्त्रांतली बातमी ऐकिली ह्मणून विचारतों—

**बाजीराव.**—ऐकतर तुझ्या मना जोगें सांगतों. हें घे वाचून पहा.

**अप्पा.**—( मनांत वाचतो ) छान झालें ( हंसतो. )

**आई.**—मोठ्यानें वाचरे अप्पा! अण्णानें सांगितलें सुद्धां नाहीं. तूं तरी वाच.

**बाजीराव.**—वाच अप्पा तिला गोडी वाटणार नाहीं, ह्मणून मी बोललों नवतों.

**अप्पा.**—( वाचतो. )

॥ श्री ॥

मुक्काम हस्तिनापूर ( दिल्ली. )

श्रीमंत सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्म्यालंकृत
राजमान्य राजश्री बाजीराव अण्णासाहेब पेशवे पंत
प्रधान निसबत् सातारचे छत्रपती स्वामीचे शेवेशीं—

पोष्य सखारामबापू वकील यानें चरणावर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागाईत कार्तिक वद्य ४ बुधवार पावेतों मुक्काम मजकुरीं आपले कृपेकरून सुखरूप असो विशेष. सरकारस्वारी येथून गेल्यानंतर तावडतोब कळविण्याजोगा एक वृत्तांत येथें फारच चमत्कारीक घडून आला तो सादर करितों. सरकार बादशाहा यांचे सभ्य-दांनीं मन भरविलें आहे कीं त्यांची नूरजहान ( आपल्या आऊसाहेब ) वजीर निजामउल्मुलूख यांणीं पळविली आहे, त्यावरून त्यांणीं स्वतः जाऊन बेगम महालांत चौकशी केली. पहारेकरी शिपायांस कैद केले आहेत आणि त्यांचे कडोन साक्षी पुरावा होण्यावर प्रकरण राहिलें आहे. परंतु

आज दरबारीं वजीर व बादशाहा यांची पुष्कळ बोलाचाली होऊन वजीरानें थोरले सय्यदास ठार मारलें. ‘ आर्य लोकांचा कां पक्ष घेतला ’ वगैरे बादशाहा वजीरास बोलले व त्यावरूनहि बराच तंटा झाला. अखेर बादशाहानें वजीराचा राग आजचे दरबारांत शांत केला; पुढें त्याणीं खासगी दरबार भरविला होता तेथून मी आतांच आलों. तेथें असें ठरलें आहे कीं वजीरास कामावरून दूर करावें. उदईक पुन्हां कसा काय प्रकार घडतो तो लागलींच जासुदा बरोबर लिहून पाठवीन. वाचून पाहून पत्र विसर्जन व्हावें. गांवांत बंडाई सुरू होण्याचा संभव आहे. वजीर तर लढाईस देखील उठेल असा अदमास आहे. त्याचा दांत विशेषत: आपलेवर आहे. ईश्वर कृपेनें आपल्या मनाप्रमाणें गोष्टी होत आहेतच. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

**बाजीराव.**—हें दुसरें घ्या मागाहून आलेलें.

**चिमणाजी आप्पा:**—

॥ श्री ॥

मुक्काम हस्तिनापूर. ( दिल्ली. )

( श्रीमंत वगैरे माना वाचल्यानंतर )

तागाईत कार्तिक वद्य ९ गुरुवार पावेतों सुखरूप असो विशेष. मागें कालचें मित्तीचें पत्र पावून हकीगत कळली असेलच. वजिरास बोलावून आणून आज भरदरबारांत त्याचा अपमान केला. त्याणीं धाकटे सय्यदाचा सुद्धां प्राण हरण केला. व साक्षी पुरावा होऊन वजीर नूरजहानास पळविण्याचे कामीं दोषी ठरले. ह्मणून त्या वजीरास मुत-

स्वीचे कामावर घालून कैद केलें. इतक्यांत् वजीराकडील लोक धांवून आले आणि दोन्ही पक्षांची चकमक झडून बादशहा राजवाड्यांत पळून गेला. लोकवार्ता अशी आहे कीं वजीर माफी पत्र पाठविणार आहे. काय होईल तें खरें. येणें प्रमाणें मजकूर श्रुत केला आहे. अधिकोत्तर नाहीं. कळावें हे विज्ञापना.

ताजाकलम. बंद करीत असतां आतांच असें खास समजलें आहे कीं वजीरानें माफी पत्र पाठविलें आहे; व बादशहानीं तें कबूल केलें आहे. कळावें.

आपले चरणीं नम्र सेवक,

सखाराम बापू वकील.

**आप्पा.**—खूप् बहार उडाली अण्णा ! आपण गेल्याचा हा प्रताप, त्या बिचाऱ्यास भोंवतों आहे.

**बाजीराव.**—( आप्पास एकाबाजूस हलकेंच ) आप्पा! खरें पुसशील तर दोघांत वाकडें आणण्या करितांच मी तिला पळवून आणलें.

**आई.**—मला सगळें समजतें. आतां कां छपवाछपवी करतोस?

बाजीरावानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. नंतर ते कित्येक दिवस विसावा घेत तेथें राहिले. दरम्यान एकदा बाजीरावास साताऱ्याहून जाऊन यावें लागलें. एके दिवशीं बाजीराव व चिमणाजी गप्पा मारीत बसले असतां स्वारानें एक पत्र आणून दिलें.

**बाजीराव.**—( अप्पास ) पहा बरें, कायतें, वाच.

**आप्पा.**—( कुजबुजतो ) (मायना वगैरे वाचून मोठ्यानें) “ श्रीमंतास कळविण्याजोगा विशेष मजकूर नाहीं खरा,

तरी दिल्लीचे दरबारीं कोणत्या प्रकारें कारभार चालू आहे हें कळविणें या दासाचें कर्तव्य कर्म आहे, असें मी समजतों. बादशहा आणि निजाम या दोघांचे बाह्यांतरीं नीट चाललें आहे, तरि अंतरंगीं कडूपणा आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. सयाजीराव घाडगे वकील निसबत् कोल्हापुरचे राजाराम महाराज, याणीं फितुर होऊन निजामास असें कळविलें आहे कीं शाहू महाराजाचे दरबारीं बहुतेक मुत्सद्दी मंडळी आपल्या विरुद्ध आहेत तर त्यांनां आंतून अनुकूल करून घेतलें ह्मणजे दक्षिणेंत राज्य काबीज करण्यास कांहीं नड पडणार नाहीं. या संबंधानें आंतून सयाजीरावाच्या खटपटी चालू आहेत तर श्रीमंतानीं जपून असावें. एवढें सांगणें आहे. कळावें हे विज्ञापना."

**आप्पा.**—अण्णा ! देवकृपेनें इच्छेप्रमाणें घडत आहे यावरून पुढें सुद्धां आपण बेत केला आहे त्याप्रमाणें घडत जाईल असें वाटतें. परंतु महाराजास बातमी कळली आहे कां?

**अण्णा.**—कळविली ह्मणजे ? अजून राहिली कां ? १५ दिवस सुमार होत आले. महाराजांस सखारामबापूकडोन सरकारी नात्यानें एक लांबलचक मजकुराचें पत्र आलें होतें त्यावरून त्याणीं दरबार भरवून मुत्सद्यास हकीगत जाहीर केली. त्या वेळेस प्रतिनिधीनीं फार वाईट गोष्ट झाली, असें ह्मणून दाखविलें आणि पुन्हां निजामास वजिरीचें पद द्यावें असें महाराष्ट्रवाशी जमीनदाराचे प्रजेचें मागणें आहे अशा मजकुराचा दिल्लीस अर्ज करण्याची त्यानीं मसलत दिली आणि चमत्कार हा कीं बहुतेक लोकांनीं त्यांचे ह्मणण्यास रुकार दिला.

**आप्पा.**—वाहवारे सदिच्छा ! अशामुळें आर्यांचें त्वरि-रच कल्याण होईल !

**अण्णा.**—मग मी त्यास उलटपक्ष सिद्ध करून दाखविला. निजामाचें आणि बादशहाचें भांडण झालें आणि त्या सबबीवरून बादशहानें त्यास वजीरीवरून काढून टाकलें ही उत्तम गोष्ट घडली आणि आर्य ह्मणून जितके आहोंत तितक्यांनीं या मुळें आनंदच मानला पाहिजे. महाराजांचे जर तो रात्रंदिवस वाईट चिंतीत आहे तर त्याचें जितकें वाईट होईल तितकें आपल्यास इष्टच आहे, अशाप्रकारें सर्वां समक्ष मी निस्पृहपणानें प्रतिपादन केलें. तें त्यांचे मनावर छान ठसलें आणि त्यांनीं मला एकांतांत बोलावून नेऊन प्रतिनिधीस सयाजीराव घाडग्याकडोन आलेलें पत्र दाखविलें.

**आप्पा.**—त्यांत फितुरीचा बहुधा मजकूर असेल ?

**अण्णा.**—होय. अप्पा ! काय त्या गुलामाची लबाडी ! आणि तशांतून आपले प्रतिपक्षी प्रतिनिधीची तर कांहीं शिकस्त आहे ! त्यानें प्रतिनिधीस लिहिलें कीं ( ही पहा त्यापत्राची नक्कल ) " तुह्मी आह्मास पूर्वी भरंसा दिला त्या आशेवर आम्ही खटपट करून नबाब साहेबांचें मन वळविलें आहे आणि आपण आंतून सामील आहां अशाबद्दल त्यांची पक्की खात्री केली आहे. थोडे दिवसांत, माझे आंगांत वाकबगारी आहे तिचे योगानें, आपले मनाप्रमाणें तिकडे पूर्ववत् नबाव साहेबास आणण्याचें करितों. पुष्कळदां गोष्ट काढून पाहिली, परंतु तुमचे प्रतिस्पर्धी बाजीरावाचा त्यास अतिशय धाक वाटतो. कसेंहि करून शाहुमहाराजांचें मन

असे तऱ्हेनें वळवा कीं बाजीरावास त्यांचे राज्यांत कोठेंहि मान मिळूं नये. कोल्हापूरकर छत्रपती अनुकूल आहेत. आपण संकेताप्रमाणें कार्य सिद्धी केल्यास इकडून अमोल्य अधिकार आपल्यास मिळतील असें करतों. हल्लीं नबाबा-पाशीं माझें फार वजन आहे. ”

**आप्पा.**—यत्राचा रोंख तर पूर्णपणें तुमच्यावर आहे ?

**अण्णा.**—काय चिंता आहे ? आपल्या पुढें काय तीं माकडें कारितात ? दिल्लीस चोरून जाऊन दिल्लीची व तिकडील प्रांताची राज्यव्यवस्था पाहून आल्याची गुप्त बातमी शाहूस सांगितली आणि परिस्फुटता कदापि होणार नाहीं अशा विषयीं त्या पासून जगदंबेची शपथ वाहून घेतली आहे. माझें म्हणण्याप्रमाणें वागण्याचें त्यानें वचन दिलें आहे. आप्पा ! नागपुराकडे तूं जाऊन जय मिळवून येशीलच. मी स्वतां खानदेश काबीजकरून आलों आहेच, मोकासेपणाचा हक्क मिळविला आहेच. आतां बऱ्हाणपूर, माळवा, गुजराथ, इकडे स्वाऱ्याकरून देश ताब्यांत घेतला ह्मणजे तूर्त वस्स आहे, असें मी महाराजास कळविल्यावरून त्यांणीं मला बऱ्हाणपुराकडे जाण्यास परवानगी दिली आहे. तूं येण्याची वाट पहात बसलों होतों. बरेंच झालें. आपण लवकरच महाराजास उभाउभी भेटून येऊं आणि नंतर भावडशीस जाऊन महापुरुष स्वामीमहाराजांचे दर्शन घेऊन बऱ्हाणपुराकडे मार्गस्थ होऊं. तुझा काय बेत ?”

**आई.**—तुमच्या बोलण्यावरून मला इतकें समजलें अण्णा ! कीं तुमच्या जिवावर सर्व उदार होऊन नुकसान करण्यास अगदीं टपून बसले आहेत. माझ्या मतें तुह्मीं दो-

घानींहि येथेंच राहून काम करावें. दूर गेल्यानें व्यर्थ आ- ह्मास काळजी लागते. आप्पा तुझें कसें काय मत ?

**आप्पा.**—आई ! मुलानीं दूर गेल्यापासून आयांस का- ळजी लागते खरी, परंतु देशांकरितां आपले स्वहिताचा त्याग करून प्राण खर्च पडतील तरी करणें हा वीरांचा धर्म आहे. जर बाळासाहेबानीं पुण्यांतच वसाति केली असती तर आज पेशवेपण आपल्यास प्राप्त झालें असतें कां ? आई ! तूंच सांग बरें.

**अण्णा.**—आप्पाचें ह्मणणें सर्वथैव खरें आहे. आई ! बायकांचें मन असतें फार नाजूक. त्यांनां उन्हांत अगर वाऱ्यांत हिंडण्याचा कधींही प्रसंग नसतो. साधारण बराच पैसा मिळाला ह्मणजे मुलानें संसारांत कृतकृत्यता केली अशी त्यांची कोती समजूत असते. आई ! तुला मी नांवें ठेवतों असें नाहीं. एकंदरींत हल्लींच्या बायकांचीच गोष्ट अशी.

**आप्पा.**—तरि आई ! आह्मा बरोबर फौजफाटा पुष्कळ असतो त्यामुळें विशेष भीति नसते. वडिलांच्या पुण्याईनें आणि देवाच्या दयेनें चोहींकडे आह्मांस यशच मिळत आहे व मिळेल, आई ! तूं काळजी करूं नकोस. या खेपेस आह्मी दोघेजण बरोबर जात अहोंत तेव्हां शत्रूस कैद क- रून आणूं यांत शंकाच नाहीं.

**आई.**—तसें झालें तर मी पुळ्याच्या गणपतीला पेढे वाटीन. बरें पण परत केव्हां येणार. ( चिमणाजी दमून आल्यापुळें त्याचे डोळ्यांवर झोंप आली पाहून ) रात्र बरीच झाली निजा जा आतां.

( सारे जातात. )

# भाग नववा.

सन १७२७ सालीं निजाम उलमुल्ख हैदराबादेस येऊन त्यानें गोवळकोंडा वगैरे किल्ले खवाजा आहद्नामें सरदारापासून ( तो त्याचा दोस्त असल्यामुळें त्याशीं सलोखा बांधून ) हिकमतीनें आपले ताब्यांत घेतले आणि दुसरे कोणतेहि स्थळीं त्यांचें पूर्ववत् वजन पडेना. तेव्हां, करावें तरि काय अशा विचारांत गुंग होऊन तो एके दिवशीं तिसरा प्रहरीं आपले वाड्यांतील दरबारांत लोडास टेंकून बसला होता. इतक्यांत आपल्या यजमानाचें हित साधून स्वतःचें हित साधणारा असा त्याचा जुना व विश्वासु नोकर—अल्ली—त्यास भेटण्यास आला. तेव्हां त्या अल्लीस निजाम ह्मणाला:—" अल्ली ! खरोखर त्या सयाजीरावाचें ह्मणण्यास रुकार देऊन त्याप्रमाणें वागलों ही आह्मी मोठीच चूक केली असें आह्मांस आतां वाटावयास लागलें आहे; त्यांच्या थापांस भुलून फसलों असें आतां कळून आलें. खरोखर दुरून डोंगर साजरे दिसतात. आमच्या पाठीशीं आकाबाई लागली आहे. दिल्लीहून निघून इकडे येण्याची कां बुद्धी झाली कोणास कळे !

**अल्ली.**—इतकें वाईट वाटण्याजोगें झालें तरि काय ?

**निजाम.**—अहो तुह्मीच पहा. शिकारीचें निमित्य करून दिल्लीहून आपण सारें पळून आलों तेव्हांपासून एक तरि आपल्यास सुख आहे कां ? आपण थेट माळव्यांत गेलों आणि तेथें वजन बसतें न बसतें तों त्या बाज्याचा भाऊ चिमणाजी अप्पा कां कोण.—

**अल्ली.**—हो चिमणाजीच तो. अप्पासाहेब ह्मणतात त्याला.

**निजाम.**—त्यानें, आणखी त्या उद्या पोवारानें, अगदीं भंडावून सोडलें. ह्मणून गुजराथेस आमेदखानाकडे आपण चाललों तों बऱ्हाणपुराची लढाई चालली असतां तशांतून सवड काढून तो बाज्या आडवा आला.

**अल्ली.**—त्या वेळेस आपले कडोन चूक झाली. सयाजीरावाची मसलत ती. तरि मी सांगत नव्हतों सरकार ! कीं आंतून जरि मोंगल सरदारास कुमक देतां आहां तरि परिणाम वाईट होईल ?

**निजाम.**—मग ह्मणतों काय तर ? आमचा भोळसरपणा आह्मांस भोंवला. सयाजीरावाला साफ त्या वेळेस नाहीं ह्मटलें असतें ह्मणजे होत होतें, पण नाहीं. वेळेचा गुण! तशी बुद्धी व्हायला आणि त्या सुभेदाराबरोबर आपला पराजय व्हायला——

**अल्ली.**—अहो बोलून चालून सतत दोन वर्षें बाजीरावाचा या प्रांतांत मुक्काम आणि तशांत आंतून सर्व लोक अनुकूल——

**निजाम.**—बरें. तें असो. नागपुरापाशीं काय झालें ?

**अल्ली.**—तिथें तो राण्या शिंदे ठेवला होताच त्या बाज्यानें कडेकोट बंदोबस्त करून. आपण गेलों तें एकदम जाळें पसरलेलें—

**निजाम.**—खरेंच; त्यावेळेस अल्ली तुह्मी तेव्हां जवळ नसतां तर आज हे दिवस दिसले नसते.

**अल्ली.**—छे सरकार ! आपले पायाचे कृपेनें सर्व झालें. आह्मी काय हुकुमाचे बंदे नोकर.

**निजाम.**—तुह्मी होतां म्हणून त्याचे तडाक्यांतून सुटून

आलों. काय केलें म्हणायचें तें गोवळकोंडा आणखी दोन चार किल्ले मिळविले. त्यांत म्हणजे तरवार गाजविली हें फारच थोडें ?

अल्लीनें मनांत जाणलें कीं या वेळेस यजमान पश्चात्ताप पावून हकीकत सांगत आहे. परंतु अशा वेळेस " होस हो " ह्मणत गेले तर त्याचे मनाचा सर्व उत्साह नाहींसा होऊन तो फार विरक्त होईल, हें चांगलें नव्हे. तर, अशा प्रसंगास त्याचाच पक्ष स्वीकारून कांहीं उत्तर दिलें पाहिजे. अशा समजुतीनें करद्वय जोडून अल्ली ह्मणतो— " सरकार ! इतकेवेळ आपले विचार ऐकून घेतले. विश्वासु नोकराजवळ अंतरंगांतील विचार सांगितलेत, त्या अर्थी माझे दोन शब्द ऐकून घ्यावे. गुजराथ व माळवा येथें आपण फार दिवस कां राहिलों नाहीं, याचें खरें कारण ह्मटलें तर सरकार ! बादशहाचा हुकुम आला होता. नाहीं तर आपले मनांतच असतें तर त्या चिमणाजीला दादतरी दिली असती कां ? "

मीच काय तो कर्ता, करविता, अशी जी आजपर्यंत निजामाचे मनांत घमेंडी होती ती त्याचे विरुद्ध जे प्रकार घडत आले त्यामुळें जिरली होती. विरक्ततेनें त्याचे मनावर आपला पूर्ण अम्मल बसविला होता. त्याची खरी योग्यता त्यास पश्चात्तापामुळें समजली होती. गर्वाचे वाऱ्यामुळें अंगीं उद्धटपणा आला होता तो आतां अदृश्य झाला, त्या मुळें अल्लीचे हांजी हांजीचें संभाषण त्यास रुचलें नाहीं आणि तो अल्लीस ह्मणाला:— " सत्य स्मरून सांगतो अल्ली ! व्यर्थ थोरवी मिळविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपण लबाडीनें दिल्लीहून हुकुमाशिवाय आलों या मुळें इतकें संकटांत

पडावें लागलें. आणि मुतलखीचें देखील काम काढून घेऊन बादशाहानें आमच्या ताब्यांतून माळवा घेण्याकारितां राजा गिरिधर यास पाठविलें. आणि गुजराथ घेण्याकारितां सर बुलंद खानास ! ! तेव्हां घरचे शत्रु, बाहेरचे शत्रु, अशी अवस्था होऊन फजीति करून घेऊन नाहींकां इकडेस आलों ? आणि तुह्मी काय सांगतां ? तोंड पुंजकेपणा करण्याकारितां अल्ली ! आपली जीभ कां विटाळतां ? संकटीं उपाय सांगाल तर इतके दिवस मजपाशीं विश्वासानें वागल्याचें व मी तुह्मास भावाप्रमाणें वागऊन घेतल्याचें चीज, नाहीं तर—"

अल्लीनें जाणलें कीं या वेळेस यजमान रागावला आहे, तेव्हां अशा प्रसंगीं मन वळविण्याची शैली सयाजीखेरीज दुसरी कोणास साधणार नाहीं. असें वाटून तो लघवी करण्याचे मिषानें निजामाचे परवानगी वरून खालील मजल्यांत गेला व आतांचे आतां सयाजीरावास बोलावून आण, ह्मणून शिपायास हुकूम केला आणि पुन्हां वर आला.

**निजाम**—अल्ली ! सांगा आतां करावें काय ? मला वाटतें कीं तो सयाजीराव त्या सातारकर जमीनदारामार्फत आला नसेल कशावरून ? त्या कपटी मराठे लोकांचें आंतलें काळें बेरें काय आहे, कोणास ठाऊक ?

**अल्ली**.—छे छे सरकार ! तसा हेतु दिसत नाहीं. ते आपल्याशीं कपटानें वागल्याचें कधीं दिसून आलें आहे काय ? जेव्हां पाहवें तेव्हां ते नमून असतात व खरीखरी सल्ला देतात. शिवाय दिल्लीपासून आपण त्या सयाजीची वर्तणूक पाहत नाहीं काय ? प्रतिनिधीकडील एकून एक

पत्रें त्यानें, आपल्यास तर काय, पण मी नोकर असून मला सुद्धां, दाखविलीं आहेत.

**निजाम.**—अहो तें सारें ढोंग आहे. एकानें गोडी गुलाबी लावून पेचांत पाडावें व दुसऱ्यानें दुष्टाईनें आपला मोड करीत जावा ही त्या गुल्यमांनीं हिकमत चालविली आहे. ते मादरचोद हिंदु, आंतून सारे एकच आहेत. बाहेरून मात्र एकोपा न दाखवितां शत्रुत्व दाखवितात.

**अल्ली.**—छे हो.—

**निजाम.**—तुम्ही किती बतावणी कराल. माझी तर मनदेवता तशी लवत नाहीं.

**अल्ली.**—माझें काय अडलय बता—

**निजाम.**—उगीच नका माथें चढवूं. तुम्हाला कांहीं देऊं केलें असेल ?

**अल्ली.**—( अल्लाची शपथ वाहतो. ) आपल्या पायावर हात ठेवून सांगतों कीं मी खुदास स्मरून आपली नोकरी बजावीत आहें. व आज पर्यंत मी जें पहात आलों, त्यावरून सयाजीचें कपट कोठेंच दिसून आलें नाहीं.

इकडे सयाजीस त्या दिवशीं पत्र आलें होतें, व तें पत्र घेऊन तो निजामाकडे येण्यास निघाला आणि निजामाचे राजवाड्यापर्यंत आला तों त्यास शिपायानें बोलाविल्याची वर्दी दिली. मग जास्त आनंद वाटून तो लगबगीनें दरबारचे ठिकाणीं गेला आणि मुजरा करून खुरमांड्या घालून अदबीनें आसनावर बसला. तेव्हां त्यास पाहून अल्ली ह्मणतो. "शिपाय कोण आहे रे खालीं देवडीवर ?"

**शिपाई.**—( धांवत येऊन सलाम करून ) फत्तेखान आहे, खाविंद !

**अली.**—तूं काय ह्मणून. आम्हीं एकान्तांत असतां या रावास येथें येऊं दिलेस ? ( उत्तर देऊं नको अशी निजामास न कळत खूण करून ) बोल.

**निजाम.**—अली ! राहूं द्या ( शिपायास ) जा तूं खालीं तुझा अपराध नाहीं. ( शिपाई गेला पाहून ) नेहमीचे वहिवाटीप्रमाणें त्यानें येऊं दिलें यांत त्याचा काय गुन्हा ?

**सयाजीराव.**—( संशय येऊन ) सरकार ! मी जातों घरीं. आपल्यास खोटी नको.

**निजाम.**—खोटी कशाची ?

**सयाजी.**—आमच्यावर अलीचा व आपला फार कटाक्ष दिसतो. आजपर्यंत कोणती क्षुल्लक गोष्ट करणें झाली असतां सयाजीची मसलत घेतली नाहीं असें कधींच घडलें नाहीं आणि आज असा भेद दिसूं लागला ह्मणून भय वाटतें.

**अली.**—( खोटा आवेश आणून ) तुमचेपासून आमचा फार तोटा होतो समजलां ?

**निजाम.**—सयाजीराव !

**अली.**—तुह्मी दिल्लीहून सरकारास इकडे आणून फसविलेंत आणि—

**निजाम.**—छे ! अली गप्प बसतां कां नाहीं ?

**अली.**—सयाजीराव ! तुमचेमुळें आम्हास फार त्रास झाला. सुख ह्मणून नाहीं.

**निजाम.**—राव तुम्ही—

**सयाजी.**—( क्रोध आलासें करून ) अल्ली भलभलतें बोलतात. सरकार ! आपण त्यांस कांहीं सांगा.

**अल्ली.**—सरबुलंद खानांनीं अमेदखानास पिटाळून दो-हद्दास लाविलें.

**सयाजी.**—मग त्यांत काय वाईट झालें ? मी कांताजी कदम बांडे नांवाचे शाहूकडील सरदारास कुमक करण्याकरितां प्रतिनिधीकडून अमेदखान सरदारास पाठविलें नव्हतें कां ?

**अल्ली.**—मग काय पराक्रम केला त्यांनीं ?

**सयाजी.**—हें घ्या ( पत्र निजामापुढें टाकून ) वाचावें सरकार.

**अल्ली.**—काय पाहूं ?

**सयाजी.**—अहो अल्लीसाहेब ! सरबुलंद तर दिल्लीस पळाला. सजायतखान डौलानें स्वारी करून आला होता तो त्याला छानदार बक्षीस मिळालें.

**निजाम.**—( हर्षानें ) शाबास सयाजी. सजायताला ठार केले नां ?

**सयाजी.**—सरकार ! ती बहार पुसूं नका. त्याचा प्रांत लुटून फस्त केला. अल्लीसाहेब ! दुसरी एक मजा अशी जाहली कीं पिलाजी गायकवाड म्हणजे बाजीरावाचा निस्सीम भक्त. त्याचें पेशव्यानें सर्वस्वी कल्याण केलें होतें पण—

**अल्ली.**—त्याला फितविलें वाटतें ?

**सयाजी.**—यांत काय संशय ? ( निजामाचे पायाकडे दृष्टि देऊन ) या पायाच्या कृपेनें सर्व घडतें. त्याला प्रतिनिधीकडून फितविला आणि प्रसंग पडेल तर त्यालाही आणखी कुमक करण्याला पाठविला आहे. तो तेथें जातो तों

जिकडे तिकडे शांतता झाली. मग त्यानें आणि कांताजीनें गुजराथेंत चौथाई वसूल केली. तेव्हां काय झालं पाहां* * तों ते आपसा आपसांत भांडूं लागले.

**अल्ली.**—लुच्चे लोक, तें मराठे म्हणजे कां सामान्य आहेत!!

**सयाजी.**—छे हो! अल्ली! अमेदखान साहेबांनीं त्या वेळेस उत्तम बंदोबस्त ठेवला. कसें झालें तरी सरकारचें गोत. त्याच्यामध्यें खंबायतेस लढाई सुरू जाहली असतां खानसाहेब तेथें गेले आणि त्यांनीं मध्यस्ती करून कज्जाचा निकाल लाविला. पिलाजीस सुरत प्रांत दिला आणि कांताजीस खानदेशानजीकची जहागीर.—

**निजाम.**—पण पुन्हां बादशहानीं सरबुलंदास सैन्यासह पाठविलें ह्मणून तुह्मी ह्मणालां होता नाहीं कां?

**सयाजी.**—होय सरकारस्वारीपाशीं मी गोष्ट सहज काढली होती त्याचा परिणाम ठीक झाला;

**निजाम.**—तो कसा काय?

**सयाजी.**—मी प्रतिनिधीस पत्र लिहिलें कीं बाजीरावानीं पुन्हां फितूरी करून कपटानें पिलाजीस मथविला आहे आणि अमेदास व कांताजीस जेर कर असें शिकवून तसें करण्याविषयीं उत्तेजन येण्याकरितां त्यास समशेर बहादूर किताब दिला आहे तर त्या बद्दल लवकर योग्य तजवीज व्हावी. त्यावरून प्रतिनिधींनीं शाहूस सांगून पिलाजीस आज्ञापत्र पाठविलें. मग तो मऊ आला. इतक्यांत मला सरबुलंद आल्याची वर्दी लागल्याबरोबर मी त्या विरुद्धजावें म्हणून पिलाजीस प्रतिनिधीकडून हुकूम पाठविला.

ईश्वर कृपेनें आतां असें कळतें कीं सरबुलंदाचा पराजय झाला आणि तो जीव घेऊन पळाला.

**अल्ली.**—शाबास ! सयाजी ! पण खानसाहेब पुन्हां तक्तावर—

**सयाजी.**—( नाक मोडून ) तेवढेंच काय तें वाईट झालें.

**अल्ली.**—तर काय मृत्यूनें गाठलें ? सयाजी ! ( त्वेष आलासें करून ) तुम्ही कधीं चांगलें वर्तमान कळवीत असतां?

**सयाजी.**—( खेदानें ) कोणी म्हणतात कीं त्यास वैताग येऊन ते रानोमाळ भडकत आहेत.

**निजाम.**—छे मला काल कोण सांगत होता कीं फकीर बनले आहेत.

**अल्ली.**—या अल्ला !

**निजाम.**—बरें केलें. माझ्याहि मनांत तसेंच येतें. खुदाचें नांव घेत—

**सयाजी.**सरकार ! ( हात जोडून ) असें भलतें मनांत आणूं नयें.

**अल्ली.**—खरेंच. सरकारस्वारींनीं असें केल्यावर मग काय राहून फळ, आम्ही तसेच होऊं.

**सयाजी.**—अल्ली ! हो काय म्हणतां. हां हां म्हणतां सगळे—

**निजाम.**—काय बोलतां राव ! एवढा राजा गिरिधर पण त्या बाज्यानें आणि त्याच्या चिमणाजीनें त्याला भंडावून सोडलें.

**अल्ली.**—खचीत परिणाम भयंकर दिसतो. कांहीं वर्षांनीं तो या हैदराबादेंतही येईल.

**सयाजी.**—भितां कां असें सरकार ? अल्ली तुम्हीहि असें धीर सोडून सरकार स्वारीचे बोलास रुकार देतां ? अहो ! त्या बाजीरावांच्या गमजा किती चालतील ? मी मूळाशीं संधान राखिलें आहे तें माहीत नाहीं कां ?

**अल्ली.**—पण त्याचा अशा बिकट वेळेस कुठें उपयोग—

**सयाजी.**—हें हो काय बोलणें ? सरकारला विचारा. प्रतिनिधीला गुप्तपणें वऱ्हाड प्रांत बक्षीस देऊं केला—

**अल्ली.**—तें मलाही माहीत आहे. पण मग काय झालें तें सांगा.

**सयाजी.**—शाहूमहाराजाकडून पंतप्रतिनिधीनें असें कबूल करविलें आहे कीं, एक लाख रुपये आणि इंदापूर परगणा असें सरकारांनीं त्यास द्यावें आणि हैदराबाद प्रांतांतील चौथाई आणि सरदेशमुखी आली ह्मणोन लिहून द्यावें.

**निजाम.**—कशावरून ?

**सयाजी.**—( आनंदानें ) हें पहा पत्र वाचून. तें दाखविण्याकरितां तर आतां आलों पण अल्लींच्या गैरमर्जीमुळें खाविंदापुढें हजर करण्यांस वेळ लागला. माफी असावी.

**निजाम.**—( वाचून ) अछा, अल्ली ! हें पहा. सयाजीराव तुमची करावी तितकी तारीफ थोडीच.

**अल्ली.**—वाहवा, राव, आतां काय करतो तो बाज्या पेशवा!

**सयाजी.**—अझूनहि जास्त महत्वाचें कळवायचें आहे. सरकार !

**अल्ली.**—बोला लवकर.

**निजाम.**—( उत्कंठेनें ) काय काय? सयाजीराव काय? कोल्हापूरचे प्रकरणासंबंधी आहे कां ?

**सयाजी.**—होय सरकार ! कळ लाविली तसे परिणाम होत आहेत.

**अल्ली.**—संभाजीचे बाबतींत ? चंद्रसेन ?

**सयाजी.**—होय. त्या निंबाळकरास व जाधवरावास आणि पिलाजीराव गायकवाडास दोन कोटीचा मुलूख देऊं केला होता, त्यांणीं आपलेकडून काम योग्य रीतीनें बजाविलें आहे.

**निजाम.**—कां, तो हातांतला कागद त्या विषयींचाच वाटतें ?

**सयाजी.**—होय सरकार, त्यानीं जाऊन प्रताप केला. आतां संभाजी महाराजाचे व शाहूचे पराकाष्टेचे तंटे सुरू झाले आहेत. कोल्हापूरकराकडून ( आमचे धन्याकडून ) मला हुकूम आला आहे ( कागद पुढें टाकतो. )

**अल्ली.**—काय ?

**सयाजी.**—कीं सरकार स्वारी सांगेल त्याप्रमाणें आह्मी वागूं.

**निजाम.**—( हर्षानें ) राव या इकडे. ( सयाजीची पाठ थोपटून ) तुमचें काम फत्तें झालें आं ? शाबास शाबास !

**सयाजी.**—( मुजरा करून ) या पायाची कृपा.

**निजाम.**—पण सातारकराचें काय वर्तमान ?

इतक्यांत शिपाई येऊन सांगतो— " सरकार ! सयाजीरावाकडे खालीं कोणी स्वार आला आहे. "

**सयाजी.**—बोलाव वर त्यास.

**शिपाई.**—माफी करावी. मी त्यास बोलाविलें पण त्याचें ह्मणणें कीं आपणच खालीं यावें. कांहीं गुप्त बोलायचें आहे.

**सयाजी.**—जा पुन्हा जाऊन सांग कीं मी बोलावतोय ह्मणून. ( शिपाई जातो. )

**शिपाई.**—( पुन्हा येऊन ) सरकार तो ऐकेना. खालीं या ह्मणतो.

**सयाजी.**—( उठून बाहेर जाऊन व स्वाराजवळील पत्र घेऊन येऊन ) सरकार ! हें पहा ( पत्र पुढें टाकतो. )

**अल्ली.**—कसें काय ?

**सयाजी.**—साताऱ्याहून पंताचें पत्र आलें आहे.

**अल्ली.**—काय वर्तमान ?

**सयाजी.**—आमचे महाराजाप्रमाणेंच सरकाराकडे सर्व निकाल करण्याची मुखत्यारी शाहूनें दिली आहे.

**निजाम.**—शाबास ! सयाजीराव तुमचे सारखा कर्मकुशल साथी आजपर्यंत मला मिळाला नवता. अल्ली ! कशी काय तजवीज आतां करावयाची ?

**अल्ली.**—तें सयाजीरावास पुसावें, खावंद मला वाटतें, दोघापासून लाखोंरुपये उपटून दोघांसही फसवावें.

**सयाजी.**—छे. माझे मतास निराळेंच येतें.

**निजाम.**—काय ? संभाजीचा पक्ष घ्यावा ! आणि शाहूस त्याचे ताब्यांतला राजा करावा ह्मणतां ?

**सयाजी.**—तसें केल्यापासून फायदा नाहीं असें नाहीं पण बाजीची खोड कशी मोडेल ?

**निजाम.**—शाहूचा मान कमी झाला ह्मणजे अर्थात् बाज्याचा——

**सयाजी.**—सरकार ! माफी असावी. आपले व संभाजीरावाचे मसलतीप्रमाणें केल्यावरून आपला नफा होईल ख-

रा पण मला वाटतें कीं, " तुमची विनंति कबूल केली. सवडीप्रमाणें कायतो हुकूम देऊं. परंतु तेथपर्यंत तुमचे कडील सर्व कामगार लोकांस हैदराबाद प्रांतांत वसूल करण्यास मनाई केली आहे " असें शाहूस लिहावें आणि आमचे महाराजास मी आंतून कळवितों कीं आपल्या मार्फत लवकर निकाल होईल. हा बेत कसाकाय सरकारस्वारीचे मनास येतो?

**निजाम.**—फार उत्तम आहे. तसेंच करावें. अल्ली उद्यां दरबार भरवून लिहा सयाजीराव सांगतात त्यावरहुकूम.

**अल्ली.**—हुकूम सरकार.

**निजाम.**—सयाजीराव तुह्मी जा आतां! स्वार वाट पहात असेल. तुह्मीही प्रतिनिधीस कळवा. अल्ली! पंतांच्या ताब्यांत वऱ्हाड द्या आणि सयाजीराव सांगतील तसें निंबाळकर व गायकवाड यांस बक्षीस द्या. संध्याकाळ होत आली. आह्मी आतां निमाज पढण्यास जातों.

**अल्ली.**—फार उत्तम आहे ह्मणतो आणि निजाम वाड्यांत गेल्यावर, सयाजीरावासह काम फत्तेझालें ह्मणून आनंदानें बोलत बोलत त्याचे घरीं जातो.

---

## भाग दहावा.

बाजीराव बऱ्हाणपुरास गेला व तेथील सुभेदार व माळव्यांतील सरदार त्यांचा प्रथम त्यानें पराभव केला. या प्रसंगीं राणोजी व मल्हारराव होळकर उपयोगीं पडल्यामुळें पहिल्यास त्यानें नागपुरास उदाजी पोंवारापासून सर्व व्यवस्था घेण्याकारतां पाठविलें आणि दुसऱ्यास चिमणाजी आप्पा बरोबर माळवा

लुटण्याकरितां रवाना केलें. यावेळेस उदाजीस वैमनस्य वाटलें. परंतु त्यानें बाहेरून सख्य दाखवून बाजीरावाचे परवानगीनें धारेस ल्हानसें राज्य स्थापिलें. निजामास दक्षिणेंत पिटवून लावल्यावर बाजीराव माळव्यांत शिरला आणि त्यानें तेथें गिरिधरास फार त्रास दिला. इतक्यांत नबाब व प्रतिनिधी यांचें मसलतीनें घडलेली गोष्ट बाजीरावाचें कानावर आली. ह्मणून तो तसाच साताऱ्यास परत आला. व त्यानें प्रथम शाहूची एकान्तीं भेट घेतली. शाहूचा स्वभाव अस्थीर असे. प्रतिनिधी सांगे तेव्हां त्याचें ह्मणणें खरें वाटे; इकडे बाजीराव मसलत देई तेव्हां ती खरी वाटे; सारांश अमुक तऱ्हेनें चालावें असा दृढ निश्चय त्याला स्वतां करितां येत नसे. कोणासही गोड शब्दानें आपलेंसें करून घेणें हा बाजीरावांत स्वभावसिद्ध गुण होता. व त्या गुणानें शाहूची त्यावर अत्यंत मर्जी असे. बाजीरावानें बऱ्हाणपुराकडे जय मिळाल्याचें आणि निजामास त्रास दिल्याचें वर्तमान शाहूस इत्थंभूत सांगितलें. तें ऐकून शाहू महाराजास धन्यता वाटली. नंतर शाहूनें प्रतिनिधी मार्फत नबाबाशीं केलेला सर्व व्यवहार जसा जसा घडून आला तसा तसा एकूण एक बाजीरावास कळविला. त्यावरून बाजीरावानें त्यास सुचविलें कीं, उदईक दरबार भरवा ह्मणजे तेथें माझे प्रतिपक्षांचा मी समाचार घेतों. नंतर बाजीराव आपले वाड्यांत परत आला. ही बातमी प्रतिनिधीस कळली ह्मणून त्यानें खासगी रीतीनें निंबाळकर, दाभाडे, जाधवराव वगैरे मित्र मंडळीस बोलावून आणलें, आणि त्या सर्वांनीं मिळून, बाजीरावाचें उद्याचे दरबारीं कांहीं चालूं

द्यावयाचें नाहीं, असा संकेत ठरविला. दुसरे दिवशीं किल्यावर राजवाड्यांत दरबार भरला. शाहू महाराज सिंहासनारूढ झाले. त्यांचे उजवे आंगास बाजीराव पेशवे आपले आसनावर बसले. वाम भागास श्रीपतराव पंतप्रतिनिधी बसले. तसेंच आपआपले जाग्यावर निंबाळकर, दाभाडे, जाधव प्रभृति सरदार मंडळी बसली. व बाकीचे हजारों लोक लांब रुजाम्यावर बसले. या प्रमाणें कचेरी भरली असतां शाहूमहाराज ह्मणाले—

" तमाम लोकांस कळविण्यास आह्मास आनंद वाटतो कीं आमचे विश्वासु पेशवे पंतप्रधान बाळाजीपंताचे चिरंजीव बाजीराव अण्णा साहेब यांणीं दोन वर्षांपूर्वी प्रतिज्ञा करून गेल्याप्रमाणें बऱ्हाणपुर प्रांतीं जय मिळविला आहे. "

**बाजीराव.**–( उठून उभा राहून मुजरा करून ) महाराजचे चरण कृपेनें मी पत्करिलेलें काम बजावून आलों आहे. (आबा पुरंधरे मुतालिक दूर बसला होता त्यास) आबा कैद करून आणलेले मोंगल सुभेदारानां पुढें आणा. ( पुढें आणून उभे केलेले सरदारास ) सुभेदार ! व म्लेंच्छ सरदारों ! तुह्मी उद्दामपणें वागून प्रजेस फार पिडलेंत. आणि महाराजाकडोन उपद्रव न करण्याविषयीं हुकूम मिळाला असतांही तो अमान्य करून लोकांस अतिशय त्रास दिला. त्याबद्दल मी तुह्मास कैद करून आज येथें आणलें आहेतर महाराजांपुढें साष्टांग नमस्कार घालून केलेल्या अपराधांची माफी मागा. ( त्यांनीं आज्ञाप्रमाणें केल्यावर ) आबा ! ठेवा यानां जन्मभर कारागृहांत.

**महाराज.**–दुष्ट यवनानों ! आमचे आण्णा फार मायाळु

ह्मणून त्यांनीं तुह्मास जन्मभर कारागृहांत ठेवण्याची परवानगी दिली. ते बोलून चुकले नाहीं तर खचित् मी तुह्माला देहांत शिक्षाच दिली असती. बरें जा आतां, पुन्हां तोंड दाखवूं नका. अबा ! न्या त्यानां.

**बाजीराव.**—राजाधिराज ! आपले जोरावर मी काबीज केलेला प्रांत तूर्त माझ्या अप्पाचे स्वाधीन केला आहे.

**महाराज.**—फार उत्तम आहे.

**श्रीपतराव.**—नागपूर अप्पांचे हवाली केलें होतें ना ?

**बाजी.**—होय, परंतु ( महाराजास ) सरकार ! तेथें गेल्यावर व्यवस्था फिरवावी लागली. आप्पा मजबरोबर बऱ्हाणपूर माळवा वगैरे प्रांतांत आला ह्मणोन राणोजीस नागपुरास पाठविलें.

**महाराज.**—राणोजी शिंदे कां ?

**बाजी.**—होय महाराज.

**श्रीपत.**—सरकार तो तर आण्णासाहेबांचा हुजऱ्या. आह्मास असें समजलें आहे कीं त्या जोडे उचल्याचें नांव मात्र. सगळें प्रमुखत्व आण्णासाहेबाकडे.

**आण्णा.**—रावसाहेब ! बोलणें तें फार जपून बोलावें. राणोजीसारखा रणांत शूर क्वचित् सांपडेल समजलांत.

**शाहू.**—रावसाहेब ! राणोजीची आह्माला माहिती आहे. त्याचे वडिलांनीं तर नांव गाजविलें होतें. राणोजीनें आण्णासाहेबांच्या पायाची चाकरी केली हें तर त्याचें भूषण आहे. तो मोठा पराक्रमी आहे. ( बाजीरावास ) आण्णासाहेब ! त्यास नागपुरास नेमलें. ठीक केलेंत.

**बाजी.**—( संतोषानें ) सरकार ! आतां बोलणें उरलें नाहीं

द्यावयाचें ाहू.—असो. पुन्हां सर्वांस सांगण्यास आह्मास संतोष वर राजवा कीं बाजीरावांनीं माळवा प्रांतांत दोन स्वाऱ्याकरून रूढ झालेल्या द्रव्यानें खजिनें गच्च भरून टाकले आहेत. उ- आसनावस्त धारेस नेमून तिकडील पुष्कळ प्रांत मिळविले आ- बसले. ततसेंच त्यांचें बंधु आप्पा हे शौर्यानें तिकडील सर्व जाधव ाज केलेल्या मुलखाची व्यवस्था राखीत आहेत, येणें लोक न या गादीचें महत्व वाढून मराठ्यांचा चोहोंकडे दरारा असतां । आहे. बाळाजीपंतानीं आह्मास गादीवर बसविलें आणि

" । पुत्र बाजीराव हल्लीं हत्यार गाजवून आमचे राज्यास कीं आकटी आणीत आहेत व त्यांचे बंधु चिमणाजी आप्पा जीव क्यां सहाय्य करीत आहेत. याहून दुसरी आनंदाची वा- करूनी ती कोणची ? ( सर्व लोक टाळ्या पिटतात आणि

बारानें आपल्यांसही आनंद झाला आहे असें सुचवितात ) हाराज बहादरीबद्दल आम्ही सर्व पुणें प्रांत बाजीरावास बक्षीस आहेला आहे. ( बाजीस ) अण्णासाहेब ! आजपासून त्याचा कैद भोग तुह्मी घ्यावा.

आणू **बाजी.**—( हात जोडून ) आह्म महाराज ! मेहेरबानी दाराली.

आगि **श्रीपतराव.**—सरकार ! आह्मी पिढीजादा नोकर आ- ळावंत. ह्मगून खरें असेल तें सांगणें भाग पडलें. ऐकणें न दिल्कणें आपले मर्जीवर.

आहे **शाहू.**—बोला. काय ह्मणतां ? प्रतिनिधी ! तुह्मास बरें अपाटलें नाहीं.

आ प्रतिनिधी व तत्पक्षाचे मुत्सद्यांनीं ओळखिलें कीं काल ।शत्रे एकान्तीं भेटले त्याचें हें फळ.

**प्रतिनिधी.**—( मंडळीस खूण करून ) सरकारडे आपणास अण्णासाहेब फार फसवीत आहेत.

**दाभाडे.**—होय, महाराज, रावसाहेब ह्मणतात तें खरें हे.

**शाहू.**—सेनापती ! तुह्मी तर मुळीं या कामांत हो, ह्मणूनका. कारण विडा उचलायचे वेळेला मागें झालांत आणखे आतां कां मधीं तोंड घालतां ?

**सेनापति.**—सरकार ! उत्तराची माफी असावी. ( हात जोडतो ) कसें झालें तरि आपण दिल्लीचे बादशाहाचे पदरचे आहोंत. आपण देखील या प्रमाणें कबूल केलेलें हे. शेकडोंदा ऐकिलें आहे. परंतु काय होतें तें, अण्णासाहेबांनी पाहिलें कीं, आपण त्यांच्याकडचे होऊन आह्मा लोकांवर टाकून बोलतां—

**शाहू.**—बस् बस्. उगीच एखाद्यावर आरोप आणण्यांत अर्थ नाहीं.

**बाजी.**—सरकार ! मी त्रिंबकरावजी दाभाडे यांस समजावून सांगतों. ( दाभाड्यास ) तुह्मी ह्मणतां तें समजलों. परंतु महाराज "बादशाहाच्या पदरचे" कोठवर समजतात हें ठाऊक आहे कां !

**दाभाडे.**—नेहमीं.—

**बाजी.**—ही तुमची चूक आहे. तुमचेसारखे सेनापति स्वस्थ असून डौल मिरवितात आणि रावसाहेबांसारखे त्यांत आनंद मानतात तेंथवर "पदरचे" असे शब्द निरुपायानें मुखावाटे निघाले असतील, परंतु आतां मी मी ह्मणणारे यवनाचे सरदार कारागृहीं वास करीत आहेत ह

ाहू.—अहून खचित् महाराज पूर्वीप्रमाणें कधींहि म्हणावयाचे
ो कीं बाहींत. समजलां.

ेल्या द्र० **शाहू.**—वाजवी आहे. घरांत बसून गप्पा मारून राज्य
स धारेसदत नसतें. तुह्मी दंड नीति कबूल कराना, साम दामानें
तसेंच लां यवनांशीं वागूं लागला. समजलांत कां रावसाहेब ! त्रिं-
ाज केलेकराव ! ऐका. ह्मणून मी ह्मटलें कीं " आश्रीत " ह्मणवून
न या गार्जवानें आपलें काम साधावें, परंतु आतां अण्णासाहेबांची
ा आहे. रश्री पाहून आम्हास अतिशय उत्तेजन आलें आहे. मरा-
ा पुत्र कां राज्य चोंहीकडे पसरेल. हिम्मत बहादरी केल्याशिवाय राज्य
कटी आलावतें काय ? बोला आतां, पंत प्रतिनिधी ! कां निंबाळ-
तां सहाय्र ! दाभाडे ! जाधवराव ! एकाहून एक—

ा ती के **प्रतिनिधी.**—काय बोलायचें महाराज ! आण्णासाहेबांनीं
ारानें आपल्यास एकांतीं गाठून पूर्णपणें भारून टाकिलें आहे.
बहादरीापण कालपर्यंत आमचे मसलतीस रुकार देत नव्हतां कां ?
ला आहे **शाहू.**— रावसाहेब ! आण्णासाहेबाकडील जयाचें वर्त-
भोग तुन कळलें नव्हतें त्या मुळें हुरूप खचून जाऊन मी निरा-
**बाजींनें** तुमचें म्हणण्यास कबूल झालों."

ली. **प्रतिनिधी.**—तर मग इतकी खटपट करून व मोठ-
**श्रीपा**ठ्या मुसलमान सरदारांच्या भिडा खर्चून आम्ही काम केलें
ित. ह्मगाणि कृतकृत्यता मानली ती व्यर्थ वाटते ?

कणें अ **त्रिंबकराव दाभाडे.**—आज कचेरींत महाराजांचें मु-
**शाहां**तून निघत असलेले शब्द नवाब साहेबांचें कानीं पड-
टलें त्यास ते काय म्हणतील ?

प्रति **प्रतिनिधी.**—म्हणतात काय ? एक तर महाराजाकडे
ाशने कृतघ्नपणा येईल व शिवाय तो नबाब आपलें नुकसान कर-

ण्यास कमी करणार नाहीं. त्रिंबकरावजी ! आपण वेडे म्हणून या कामांत हात घातला.

**त्रिंबक.**—होय रावसाहेब ! आपलें म्हणणें अगदीं खरें आहे.

**जाधव.**—खरोखर कलीचा महिमाच असा. २९ ना २७ वर्षांचे तरुणाची अक्कल व करामत आमचे सारखे वयोवृद्ध गृहस्थापेक्षां जास्त. ! ! काय चमत्कार हा ! !

**निंबाळकर.**—असेंच आहे, चंद्रसेनराव ! महाराज आमचे बरोबरीचेच आहेत. मागल्या अमदानींत आम्ही तें सुख भोगलें. या राजवटींत सगळा पोरवडा झाला आहे. त्रिंबकराव, रावसाहेब ! हे तरी आपल्या संगतीनें ह्मणून नीट वागतात. पण त्या अण्णासाहेबांचे विचार आणि धोरणें, कांहीं विलक्षण.

**जाधव.**—मूल स्वभाव आहे, चार चार चाललेत. त्याचें काय ह्मणा, पण मला नवल वाटतें कीं महाराज सुद्धां ते ह्मणतील तसें त्यांच्या समक्ष कबूल करतात.

**निंबाळकर.**—महाराज ! आतां आह्मी झालों थकले भागलेले, द्या आह्मास रजा ह्मंजे घरीं राम राम ह्मणत बसूं. नवे डोळे. नवे तमाशे. आह्मांला याचा कंटाळा आला आहे.

**शाहू.**— रागाऊं नका. माझे विचार फिरण्याचीं कारणें लक्ष्यांत आणा.

**प्रतिनिधी.**—काय महाराज ?

**बाजी.**—महाराज ! नुकतेंच रावसाहेब ह्मणाले कीं भिडा खर्चून काम केलें. कायतें कळविल्यास मेहेरबानी होईल.

**शाहू.**—अहो हे पहा अण्णासाहेब ! नबाबाचे मुलखांतला वसूल थकला होता. पुष्कळ वर्षांचा—

**बाजी.**—बरें मग यांनीं काय केलें, घेतला कां तो ?

**शाहू.**—घेतला कशाचा ? त्याचें नांव नको; त्या ऐवजीं इंदापुराजवळचा कांहीं मुलूख व कांहीं थोडें द्रव्य असें त्या नबाबानें दिलें.

**बाजी.**—अरेरे ! घात झाला. आपलें वर्चस्व बुडणार. महाराज ! आपण कबूल केलें ?

**शाहू.**—कबूल अद्याप केलें नाहीं.

**बाजी.**—सरकार ! कृपा करून सही करून कागद पाठवूंनये. काय करावें ! रावसाहेब सर्वस्वी नाश करितात. आणि आपण त्यांचे ह्मणण्याप्रमाणें चालतां ! !

**शाहू.**—छे, अण्णा तुह्मी नव्हतां तेव्हां ऐकणें भाग पडलें. आतां मी साफ नाहीं ह्मणून सांगण्यास भीत नाहीं.

**प्रतिनिधी.**—कायहो अण्णा साहेब ! काय नाश केला आणि काय घात झाला ? हका मारल्या, इतकीं वर्षे झालीं. नित्य वसुलाचें नांवानें रड चालली आहे ती आम्ही कोणत्या हिकमतीनें दूर केली हें आमचें आम्हांस माहीत. जवळचे जवळ त्या पासून मोबदला प्रांत घेतला, त्या मुळें आतां इतकें लांब परमुलखांत जाण्याची दगदग राहिली नाहीं; व जमाबंदी करणारे तिकडील लोक काढून टाकल्यानें तितकी खजीन्यांत जास्त शिल्लक वाढली, आणि आपण तिकडे लोक पाठवीत होतों त्यांचे जिवाचें कसें होईल, काय होईल असा रात्रंदिवस घोर वाटत असे तोहि टाळला. असें रीतीनें कल्याण होण्याची युक्ती काढली; इतकेंच नव्हे, नबाब साहेबाशीं पूर्ण सख्य राखलें, यांत नाश तो काय केला सांगा ? नीट विचार केल्यावांचून उगीच एखाद्याला टाकून

बोलणें म्हणजे काय ? आम्ही कां राजकारस्थानी पुरूष नव्हेतच म्हणतां ? महाराज ! आतां अण्णा कां स्वस्थ बसले ?

प्रतिनिधींचें म्हणणें शाहूस खरें वाटलें परंतु तसा प्रकार बाजीरावास दाखविल्यास तो क्रुद्ध होऊन नीट मसलत देणार नाहीं असे भीतीनें शाहू म्हणतो. " अण्णा ! काय हें पंत साहेब म्हणतात ? द्या जबाब. "

**दाभाडे.**— ( बाजीरावास ) आमचें वचर्स्व बुडालें कसें ? बोला.

**बाजी.**—अहाहा !!! केवढाले नफे दाखविले पण रावसाहेबांनीं ! त्या निजामानें खोटी आशा दाखवून फसविलें आहे तें कोठें रावसाहेबास समजून आलें आहे. ( शाहूस ) राजाधिराज ! प्रतिनिधींचा कावा आपल्या लक्ष्यांत आला नाहीं असें दिसतें. वसूल थकला होता ह्मणून काय झालें ? जर आपले राज्याची भरभराटी चालली आहे तर असे विजयी शिपाई लोक व लष्करी अम्मलदार आणि राजकार्य धुरंधर सेवक पदरीं असतां तिकडील बाकी राहिलेला सरदेशमुखी व चौथाईचा पैसा आपण त्या नबाबाचे बापास तरी सोडला असतां काय ? आपले कडील लोक त्या निमित्तानें तरी हल्लीं त्याचे प्रांतांत संचार करीत आहेत. प्रसंग पडेल तेव्हां तेच आपल्यास मदत करतील. दोन दिवस आपण त्यांच्यावर कमी दाब ठेवल्यामुळें ते तिकडे मनःपुत वागणूक करीत असतील हें खरें, परंतु आपण त्यास आज पांच वर्षांत इकडील खजिन्यांतून एक कवडी तरी पाठविली आहे कां ? त्यामुळें ते तिकडे बरेच लांच खातात हें खरें, पण त्यांनीं ह्मणजे खजीन्यांत अगदीं पैसा पा-

ठविला नाहीं असें नाहीं. कसें झालें तरी ते आपले काम-गार. ते नवाबड्याच्या राज्यांत आहेत हा त्यास केवढा उपद्रव व धाक आहे ? हीच गोष्ट त्याचे 'मनांत डाचत असल्या कारणानें त्यानें आपल्यास इंदापूरपरगणा देऊं केला आहे. आपणच पहा कीं आपले मनांत आलें तर सहज होण्याजोगी गोष्ट कोणती आहे ? हा परगणा जवळ असतां मिळविण्यास कठीण जाईल किंवा एकदां आपले सारे लोक त्यानें त्या मुलखांतून घालवून दिल्यावर पुन्हां आपला शिरकाव होण्यास कठीण पडेल ?

**शाहू.**—अर्थात् रिघाव पुन्हां होणें कठीण पडेल.

**बाजी.**—महाराज, काय लाख रुपयाची गोष्ट बोललांत. तो निजाम ह्मणजे कसला कपटी ! ! त्याचें कपट मी आपल्याजवळ उघड करतों या मुळें तो रात्रंदिवस माझे नावानें धडपडत आहे.

**प्रतिनिधी.**—अण्णासाहेब ! आपण आपल्यावरून जग ओळखतां असें खास आह्माला वाटतें. ते नबाबसाहेब लबाड, त्यांचे हेतु दुष्ट, आह्मी कोते विचाराचे, घरांत बसून गोष्टी सांगणारे, असे प्रकारचीं सर्वांस दूषणें देत सुटला आहां, यावरून तुमचे अंतःकरणांत किती सद्विचार असतील हें उघड दिसतें.

**शाहू.**—असें ह्मटल्यानें कोठें तुमचा कमीपणा दूर होईल ? पंत साहेब ! रागाऊं नका. अण्णासाहेबांचें ह्मणणें सर्वथैव खरें आहे.

**प्रतिनिधी.**—वाहवा ! काय तारीफ करावी राजनीतीची!!! जो कल्याण करतो तो घातकी ! अपूर्व न्याय आहे ! कां

त्रिंबकरावजी ! सेनापती साहेब ! अशा राज्यांत आपला किती दिवस टिकाव लागणार ?

**शाहू.**—पंतसाहेब ! तुह्मी मुत्सदी. तसे तेही मुत्सदी. आह्मास काय पक्षपात करण्याची जरूर आहे ? तुमचें खरें वाटतें तेव्हां तसें करतों. अण्णाचें वाटतें तेव्हां तसें करतों. आह्मास दोघेही सारखे आहां. कोणीहि जरी चांगली गोष्ट सांगितली तरी त्याप्रमाणें वागल्यानें मराठ्यांचाच उत्कर्ष होणार आहे. उगीच अण्णांची स्पर्धा कां ?

**बाजी.**—रावसाहेब ! आपल्यास तर खूप् कावा साधला आहे. करून सवरून साळसूदपणा ! ( शाहूस ) सरकार ! आपले पाय साक्ष आहेत. मी सत्य सांगतों. या रावसाहेबांनीं त्या निजामाचें बंड माजविलें आहे त्यामुळें मी ज्या ज्या उपायांची योजना करतों ते फलद्रुप होत नाहींत.

**श्रीपत.**—अशी बढाई मारण्याजोगीं काय कृत्यें केलींत. नाहीं ह्मणायला खानदेश, बऱ्हाणपूर, नागपूर आणि फार झालें तर माळवा या ठिकाणीं थोडासा अम्मल बसविला आहे. आणि त्याची तरी काय व्यवस्था !! भलभलते लोकांस तेथले व्यवस्थापक तुह्मी परस्परें नेमलेत; ते कसे बंदोबस्त करतात कोणास कळे. कोणी मुसलमान योद्धा येऊन त्यास हाकलून देईल तेव्हां समजेल.

**बाजी.**—आतां मागील उकरून काढलेत ह्मणून सांगणें भाग आलें. निजाम माळव्यांत आला. तेव्हां त्याला आमच्या आप्पानीं जेर आणलें नसतें तर समजलें असतें कसें काय तें ! तसेंच अमदावादेस जात असतां मी जर त्यास भिविविलें नसतें तर काय परिणाम झाला असता ? शिवाय

भलभलतें लोकांस मोठे अधिकार दिले ह्मणतां, पण राव-साहेब! राणोजीनें त्या दाढीवाल्याचा नागपूरास कसा काय समाचार घेतला तो अगोदर शोध करा.' त्यानें त्यास गांजवून सोडलें नसतें तर नबाब या वेळीं दक्षिण हैदराबादेस राहिला असता कां? मी तिकडे गुंतलोंसें पाहून तो नबाब जरा गमजा करतो आहे आणि त्याचे ढवळाढवळीस तुह्मी कबूल होतां तेव्हां हेंच कां तुमचें राजकारस्थान? आतां बोललों तर पुन्हां राग येईल. एक तर त्याची तुह्मां सर्व प्रधान मंडळीस दहशत वसली असावी किंवा त्यानें तुह्मांस आंतून मथविलें असावें या शिवाय तो जसें सांगतो तसें तुह्मी करण्यास कसें प्रवृत्त होतां याचें मला अनुमान करवत नाहीं.

**प्रतिनिधी.**—अण्णासाहेब! तो कसा झाला तरी बादशाहाचा वजीर.—

**अण्णा.**—त्या गप्पा पुरे. त्याची प्रतिष्टा किती आहे ते मला पूर्ण ठाऊक आहे. बादशाहानें त्यास वजीरीवरून काढून टाकून मुतलख केला आहे आणि त्या अपमानामुळें तो पळून प्रथम माळव्यांत आला. तेथून त्यास हकलून दिल्यामुळें तो हैदराबादेस येऊन राहिला आहे. याबद्दल तर मला साद्यंत हकीकत माहित आहे.

**श्रीपत.**—तरी दक्षिणेंतील तो सहा सुभ्यांचा अधिकारी आहेनां? आपल्यास तो वरिष्ट आहे असें कसें न ह्मणावें? तशांतून त्याचा फौज फाटा किती, लष्कर केवढें, त्याला लोक किती राजी? त्याच्याशीं टक्कर मारण्यापासून आह्मांस हंसल तें कोणतें?

**बाजी**.—आहे काय त्यांत! भ्रमाचा भोपळा. एकंदर मुसलमानाचें बळ ह्मटलें तर खरोखर कांहीं नाहीं. पण त्यांचा भपका फार. त्यामुळें लोकांस जरब वाटते. मला दिल्लींतील व उत्तर हिंदुस्थानांतील सर्व व्यवस्था माहीत आहे. देखणें मे ढब्बू, चलणेंमे शिवराई. कसरती आणि डामडौल पाहून घ्यावा. खरोखर पराक्रम त्यांचे अंगांत तितकाच.

**श्रीपत**.—असें कां ह्मणतां? अण्णासाहेब त्यांच्यांत वीर नाहींत कां? एवढा मोठा विस्तीर्ण देश परंतु त्यांनीं आपल्या शक्तीनें पादाक्रांत केला आहे कां नाहीं? शिवाय त्यांचे दैवाची सद्दी काय कमी आहे?

**बाजी**.—तें कांहीं नाहीं. आमचे लोकांचे आपलपोटे स्वभावानें व त्या दाढीवाल्यांना हांजी हांजी करून फितुर झाल्यानें, त्याचें राज्य अबाधित चालू आहे. आपल्यांत एकी पाहिजे कीं हां हां ह्मणतां त्यास समूळ नाहींसें करूं. तुम्हींच पहा कीं गुजराथेंत स्वतंत्रपणें पिलाजी गायकवाड वागतात, उदाजी पोंवार माळव्यांत लुटालुट करतात. असे अनेक सरदार मनाप्रमाणें वागत आहेत. हेच जर आम्हांस मिळून वागतील तर त्या यवनांची काय बिषाद! तशांतून त्या मुसलमानांत हल्लीं जरा बिघाड झाला आहे तर हा समय आपलें कार्य साधण्यास योग्य नाहीं असें कोण म्हणेल? रावसाहेब! आपण व दाभाडे प्रभृति सरदार जर मनांवर घ्याल तर जें काम मी आरंभिलें आहे तें शेवटास जाण्यास किती उशीर लागेल? ( शाहूस ) महाराज मोंगल अत्यंत आळशी आणि अशक्त जाहले आहेत. त्यांस हांकून लावण्याचा हाच योग्य प्रसंग आहे. हल्लीं मराठे सरदारच

वेगवेगळालीं बंडें करित आहेत. ते सारे जर एकत्र होतील तर त्या नीचास घालवून देण्यास किती प्रयास पडणार आहेत ? शिवाजी महाराजांनीं बाहुबलें करून मराठे सरदारांच्याच सहाय्यानें विजापूराचे बादशहाची कशी वाताहात केली ! नाना प्रकारचे उपायांनीं त्यांनीं त्या दुष्ट सरदारास कसें पुरें पुरें केलें आणि स्वसत्तेनें कसें राज्य काबीज केलें, हजारों विघ्नें मूर्तिमंत आडवीं आलीं असतां काडी भरहि न डरतां छाती करून त्यांनीं कसा महाराष्ट्रदेशांत दरारा बसविला ? असे त्यांचें एक कां दोन म्हणून पराक्रम वर्णन करूं. ईश्वराचे अंशच ते. अशा महापुरुषाचे कुलांत सरकार ! आपला जन्म असून आपले राज्यांत जर मुसलमानांस अधीक त्रास न पावल्यामुळें ते सुखानें राज्य करतील तर दोष कोणाचा ? शिवाजी महाराजांनीं राज्य स्थापून आपले हवालीं केलें आहे. आतां त्याच्या संरक्षणार्थ जपणें व त्याची वृद्धि करणें हें आपल्या सारख्यांचेंच काम आहे. आपल्या करितां आम्ही हें काम न केलें तर इनामें घेऊन व पगार खाऊन काय उपयोग ? साधारण प्रपंच्यांतील कां प्रकार पहानां ? बाप मुलाचे स्वाधीन मालमत्ता देतो. परंतु चांगले लोकांचे ऐकून व त्या मिळकतीचें संरक्षण करून ती वाढविण्याचें काम मोठें कठिण आहे. संभाजी महाराजानीं सद्वर्तनानें वर्तणूक ठेवली नाहीं म्हणून आपले राष्ट्रावर किती दुर्धर प्रसंग गुदरले ? परंतु ईश्वराचे मनांतून ती दुःखदायक स्थिती जाऊन पूर्ववत् राज्य चालावें असें होतें. म्हणून त्यानें आपल्यास सद्बुद्धि देऊन राज्यावर बसविलें आहे तर आतां पूर्वजानुरूप कृती करणें महाराजा-

कडे आहे. मी या गादीचा सेवक आहे. माझ्याच्यानें हें सर्व सांगितल्यावांचून राहवेना. ( हात जोडून ) माफी असावी ! महाराज.

हें संभाषण ऐकून कचेरींतील लोकांचीं मनें तटस्थ होऊन शाहू काय उत्तर करतो तें ऐकण्याकडे लागलीं.

**शाहू.**–अण्णासाहेब ! तुमचे हें वीरश्रीचें भाषण ऐकून माझे चित्तास आवेश उत्पन्न जाहला आहे. पूर्वजाप्रमाणें कीर्ति न मिळविली तर आमचा जन्मास येऊन उपयोग काय ? नांवाचा राजा होण्यासारखें दुसरें लांछन नाहीं, असें मला आतां वाटूं लागलें आहे. अण्णा ! करा तयारी. मी स्वतः युद्धास येऊन त्या मुसलमानांचा उच्छेद करून टाकतों. ( लोक रुकार देतात ) आणि अगोदर त्या नबाबाचा. तो पक्का कपटी आहे. माझी खात्री झाली. श्रीपतरावजी ! खरें बोला, आमचें व संभाजीचें भांडण उपस्थित करण्यांत त्या नबाबड्याचें आंतून कारस्थान नाहीं काय ? खचित असलेंच पाहिजे.

**बाजी.**–महाराज, आपले विचार फार योग्य. " स्वतां युद्धास " इतके आपले तोंडचे शब्द ऐकतांच, लोकांनीं आणि विशेषें करून लष्करी शिपायांनीं किती उत्साहानें संमती दाखविली, तें आपण पाहिलेंच आहे. आतां त्या निजामड्याला सरकारस्वारी खुद कशास पाहिजे ? त्याला मी एकटा जाऊन शरण आणतों. बेलाशक मजवर तें काम सोंपवावें. ( बाहू स्फुरतात ) दिल्लीचा बादशाहा " महंमद " तो जेव्हां गुरकावणी दाखवील तेव्हां पाहिजेल तर आपण जावें. कारण सार्वभौमपणांत तो आपले बराबरीचा म्हणतां

येईल. पण अशा ढेंकणास चिरडण्यास आपण खुद्द कशास तसदी घ्यायला पाहिजे. परंतु सरकार ! कोल्हापुरकर संभाजीविषयीं आतां आपले बोलण्यांत भाग निघाला, त्याचा संदर्भ माझे लक्षांत पुरा आला नाहीं तर कृपा करून सेवकास तें कळवावें ( हात जोडतो. )

इतक्यांत भालदार एक लाखोटा आणून देतो. तो फारसनीस तर्जुमा करून महाराजास वाचून दाखवितो.

**फारसनिस**.—( वाचतो, ) सलाम दिगर. शाहू !, तुह्मी पाठविलेला अर्ज आह्मांस पावला. संभाजी तुम्हास राज्याचा अर्धा हिस्सा मागत आहे त्यांशीं युद्ध न करितां तुम्ही आम्हास राजनिष्ठपणें गोष्ट कळविली आणि या कामाचा न्यायानें निकाल करून कज्जा मिटवावा अशी आम्हास विनंती केली ती समजली. या कामांत संभाजीचा पक्ष घेणें प्रथम आम्हास रास्त दिसलें, परंतु तुमचे प्रतिनिधींनीं तसें करण्यास कांहीं नडी दाखविल्या, त्यावरून तो बेत आम्ही तूर्त रहित केला आहे. आम्ही मेहर नजर करून फुरसुदीप्रमाणें तुमचा न्याय करूं. आम्हास तुम्ही दोघेही सारखे आहां. तूर्त आम्हाकडे वसूल जप्त असूं द्या. इंदापूर घेण्याचें कबुलायत पत्र तुम्हाकडोन अझून आलें नाहीं; तरी तें आल्यादाखल आहे असें आम्ही समजतों. आमचे राज्यांत तुमच्याकडून सरदेशमुखी व मोकासेपणा वसूल करणारे कामगार आहेत त्यांस आम्ही दूर केलं आहे. तुम्ही अतां ते पुन्हां इकडे पाय न ठेवतील असा बंदोबस्त राखावा. सर्व आश्रितांत तुम्ही भक्तिमान जमीनदार आहां. सबब तुम्हांस एक गुप्त गोष्ट सांगणें आहे ती ही कीं तुमचे प्रधान बाजीराव

यांचे नादीं न लागतां तुम्ही नेहमीं इकडे सविस्तर मजकूर कळवीत जावा. म्हणजे, बादशाहाची आमच्यावर पूर्ण मर्जी आहे त्या अर्थी आम्ही तुमचे म्हणण्याप्रमाणें त्याजकडोन करवूं. सखाराम नांवाचा तुमचा दिल्लीस वकील आहे त्या पासून तुमचे अतोनात नुकसान होत आहे. हें तुम्हास कळविण्यांत येत आहे.

नबाब साहेबांच्या हुकुमावरून

हैदराबाद. अल्लीखान.

**शाहू.**— ( बाजीस ) ऐकलेंत अण्णा ! काय कारस्थान आहे तें.

**बाजी.**—महाराज ! मी भाकीत केलें, त्या प्रमाणें घडून आलें कीं नाहीं ? सरकार ! आपली कशी काय मर्जी आहे आतां ? युद्धास——

**शाहू.**—श्रीपतराव ! काय म्हणतात अण्णासाहेब ?

**श्रीपत.**—बावगें काय उत्तर आलें ?

**बाजी.**—कामगार काढून तर टाकलेच म्हणा. कज्जाचा निकाल फुरसुदीप्रमाणें करूं, तेथपर्यंत वसूल जप्त केला आहे याचा अर्थ काय ? अंकित कां आपण आहोंत ? आपले महाराजास तो बादशाहाप्रमाणें हुकूम करतो आं ? केवढें अरिष्ट हें ? ( शाहूस ) महाराज ! शिकार दव्यांत धरावी, त्या प्रमाणें त्यास उत्तरेंतून मी हांकून आणून आपल्या पेचांत आणिला आहे. फक्त आज्ञा होण्याची अवधी. कीं मी तयारी करून आतां जाऊन त्यास दक्षिणद्वारास रवाना करितों. त्या दुष्टास या देशांतून पार केल्याशिवाय—

**प्रतिनिधी.**—महाराज ! त्यांचा हेतु दुष्ट असेल असें

मला वाटत नाहीं. आतां बाजीरावाच्या उतावळे व हेकड स्वभावामुळें त्यानें त्याच्या बद्दल कांहीं लिहिलें आहे पण त्या बद्दल आपण वैषम्य मानण्याचें कारण नाहीं. आपण ऐकत आहांच अण्णासाहेब कशा त्याला शिव्या देत आहेत तें ?

**बाजी**.—सरकार ! मी खचित् सांगतों कीं तो पक्का ठक आहे. न्याय करणारा नव्हे. तुमच्या कलहांत त्याचा लाभ सहज होण्याचा संभव आहे. तुमचा मुलुख हाताखालीं घालण्यास तो उद्युक्त झालेला आहे. यावर रावसाहेबांचें खरें वाटेल——

**शाहू**.—छे छे अण्णासाहेब ! ही शंका मनांत किमपी आणूंनये. तुम्ही म्हणतां तें सर्वथैव मला खरें वाटतें.

**श्रीपत**—मग आमचा नाइलाज आहे. तरी महाराज ! करणें करावें पण आमचा सल्ला तर ऐकावा. आम्ही आपले कर्तव्यास चुकलों नाहीं इतकें झालें म्हणजे पुरे.

**जाधव**.—रावसाहेब ! सांगा तुम्ही.

**निंबाळकर**.—आपलें काम आपण करूं मग——

**दाभाडे**.—विश्वासानें नोकरी करावी हें आम्ही जाणतों, न ऐकतील तर महाराज पुढें पस्तावा पावतील. बोला.

**शाहू**.—हें काय म्हणतां, रावसाहेब !

**प्रतिनिधी**,—महाराज ! नबाबसाहेबांशीं युद्ध करणें केवळ वेडेपणाचें काम आहे. अण्णासाहेबांचे करण्यांत खरोखर अर्थ नसतो. ते कांहीं तरी करायचें म्हणून करतात आणि सरकार ! आपल्यास त्यांत भूषण वाटून आपण त्यांस इनामावर इनामें देतां. आम्ही उत्तरेंत स्वाऱ्या करण्याचें नाकारलें त्याचें कारण अंगीं बहादरी नव्हती असें नाहीं, तर तसें

करून व्यर्थ पैसा व मनुष्यें यांची हानी करून घेण्यांत आ-
म्हास बरें वाटलें नाहीं. कां दाभाडे ! असेंच कां नाहीं ?

**सेनापती**.—हों हो. हाच आमचा मतलब.

**शाहू**.—बरें. मग कसें करावें म्हणतां, तुम्ही रावसाहेब !

**प्रतिनिधी**.—आमचे मतें आपले प्रतापी शिवाजी महाराज राजेसाहेब यांनीं घेतलेला जो कर्नाटकांतील मुलुख आपल्या हातचा गेला आहे तो आधीं घेऊन नंतर या उद्योगास लागावें.

**बाजी**.—( समर्पक उत्तराकरितां शाहू आपलेकडे पाहतो असें पाहून ) राजाधिराज ! रावसाहेब नीतिशास्त्रज्ञ म्हणवितात. त्या थोर पदवीस असें बोलण्यानें कलंक लागला. महाराज ! शिवाजी महाराजांची जर या रावसाहेब पंत प्रतिनिधी सारखी बुद्धी असती तर त्यांनीं आधीं विजापूर आणि गोवळकोंडें हीं स्थलें काबीज केलीं असतीं आणि त्यापासून अनेक विघ्नें उद्भवून परिणाम भयंकर जाहला असता. त्यांची योग्यता व चातुर्य कोणीकडे. त्यांनीं त्या वेळेस काय केलें तिकडे लक्ष्य द्यावें. ( प्रतिनिधीस ) अहो रावसाहेब ! कुशाग्रबुद्धी हीच कां ? ह्मणे आह्मास तुमचें करणें आवडलें नाहीं ! शिवाजी महाराजांची आपले सारखीं कारस्थानें नव्हतीं. त्यांनीं एकदाच कर्नाटक सर केलें हें आपल्यास माहित नाहीं काय ? जरा विचार करा ह्मणजे समजेल. जर एखादा पुरातन व अतिविस्तृत वृक्ष असला तर त्याचा समूळ नाश करण्यास काय करावें लागतें. त्याचें एकेक पान व एकेक फांदी तोडीत बसल्यानें निभाव लागेल काय ? तो बुडाशींच तोडिला पाहिजे, ह्मणजे त्याचा उ-

च्छेद होऊन तो पानांफुलांसहित हातीं लागतो. तद्वत् हल्लींचे मुसलमानाचे राज्याची गोष्ट आहे. या विस्तीर्ण आर्यभूमींत त्या दुष्ट यवनांचा अम्मल वसला आणिं आर्यलोक गोगलगाईसारखे वागल्यामुळें त्यांचें राज्य फारच पसरलें. ईश्वरास कां हें पाप खपतें ? त्यांनीं श्रीशिवाजी महाराजाचे शरीरीं अवतार धारण करून त्या वाढलेल्या वृक्षाचे बुंधास तोडण्यास सुरवात केली. अर्धे काम करून दाखविलें आहे. तर आतां त्यांचेच कुलभूषण छत्रपति शाहू महाराजाचे राज्यांत तें काम तडीस गेलें नाहीं तर आह्मासारखे सेवक जवळ असून काय उपयोग ? ( शाहूस ) महाराज ! कृपा करून मला आज्ञा द्यावी ह्मणजे मी कृष्णेपासून अटक ( सिंधु ) नदीपर्यंत आपला झेंडा लावून येतो. ( लोक टाळ्या पिटून संमती दाखवितात. )

**शाहू.**—वाहावा ! अण्णासाहेब ! तुमचे वडील मोठे कुलीन आणि तुह्मीही त्याच प्रमाणें आहांत. शाबास ! बाजीराव ! शावास ! तुम्हास अटक नदी पर्यंत तर काय पण त्या पलिकडेही कदली खंडापर्यंत झेंडा लावायास माझी आज्ञा आहे. ( लोक एकदम उभे राहून गजर करितात. )

**दरबारांतील एकजण पुढें सरसावून.**— ( हात जोडून ) महाराज ! अण्णासाहेबांचा सारा उपदेश आमचे मनांत ठसला. प्राण गेले तरि वेहत्तर आहेत. आम्ही अन्नासाठीं त्या कसाबांचें अर्जव करणार नाहीं. अन्न काय ? कावळा देखील मिळवितो. त्यांत काय अर्थ आहे ? आपली भूमाता परद्वीपस्थांच्या जुलुमांतून आह्मी मुक्त केली नाहीं तर जन्मास येऊन आणि न येऊन सारखेंच होऊं. शपथा

यांहून आह्मी सांगतों कीं श्रीमंताच्या आज्ञेप्रमाणें वागून आह्मी यवनांचा संहार करूं.

**वाजी.**—शाबास. देशाभिमान तो हाच. ( महाराजास ) आतां दरबारचें काम पुरें करायचें ?

**महाराज.**—फार उत्तम.

**भालदार.**—दौलतजादा. नजर रखो महाराज. राजाधिराज छत्रपती श्रीमंत शाहू महाराज !

( सर्व उठतात. कचेरी बरखास्त होते. )

---

## भाग अकरावा.

दरबारांत बाजीरावानें प्रतिज्ञा करून निजामाशीं युद्ध करण्याचा विडा उचलिला, परंतु तात्काळ लढाईस जाण्यास पंचाईत पडली. एक तर त्याचे बरोबरचें निम्मेहून जास्त सैन्य त्यानें खानदेश, माळवा, नागपूर या ठिकाणीं बंदोवस्ताकरितां राखिलें होतें, त्या मुळें थोडें बहुत जें जवळ होतें तेवढेंच घेऊन जाणें त्यास योग्य वाटेना. शाहूनें सेनापतीस व प्रतिनिधीस सक्त ताकीद दिली होती कीं लागेल ती मदत बाजीरावास द्यावी. परंतु तसें केल्यामुळें त्यांचें अकल्याण खचित् होणार सबब ते खरोखर मदत करीनात इतकेंच नव्हे, जे करण्यास तयार होत त्यांचीं मनें ते युक्ती प्रयुक्तीनें वळवीत आणि बाजीरावाबरोबर जाण्यास नाकबूली दाखवीत. बाजीरावानें आजपर्यंत इतके मुलुख काबीज केले परंतु त्या पैकीं एकांताहि त्यानें आपले शिपायास अन्यायानें प्रजेस लुटूं दिलें नाहीं. त्यामुळें शिपायी लोकांस त्यांच्या इच्छा तृप्त करण्यास सांपडत नसत.

ह्मणून बाजीरावास शिपायास संतुष्ट ठेवण्याकरितां सरकारी तिजोरींतून पगार द्यावा लागत असे. पण महाराजांचे दरबारी प्रतिनिधी व मुत्सद्दी मंडळ बहुतेक त्याचे बाईटाव, असल्यामुळें मुत्सद्दी लोक बाजीराव सांगे त्याप्रमाणें मोठमोठे पगार देण्यास शाहूकडोन नाखुषी दर्शवीत. अशा कारणानें बाजीरावास वरचेवर स्वतः कर्ज काढून शिपायी लोकांस खुष ठेवावें लागे. हल्लींचे प्रसंगीं त्यास जरूर असल्यामुळें त्यानें १०००० लोकांचें लष्कर चाकरीस ठेवलें आणि त्यांस रोजमुरा देण्याकरितां बाबूराव बारामतीकर यांजपासून व त्यांचे मार्फत दुसरे सावकारांपासून लाखों रुपये कर्ज काढले आणि त्या लष्करास पगार वांटला. हा आणीबाणीचा प्रसंग जाणून गोविंदराव बुंदेले, माधवराव रास्ते, यशवंतरावजी पटवर्धन, नारायणराव फडके आदिकरून वीरश्रीचे ब्राह्मण आपण होऊन बाजीरावाजवळ आले आणि मेहरबानीनें आश्रय दिल्यास सरदारी बाणा गाजवूं असें ह्मणूं लागले. बाजीनें त्यांचा सत्यभाव व वीरश्री पाहून त्यांस मोठमोठे सरदारांचा अधिकार दिला व त्यांचे हाताखालीं तें लष्कर दिलें. आपण बरोबरचें सैन्य दारुगोळ्यानिशीं तयार केलें. महाराजांचे पदरचे ५००० घोडेस्वार आपण होऊन मदत करण्यास राजी होऊन त्यास मिळाले. या सर्व व्यवस्थेस दोन महिने लागले. या समयीं बाजीरावानें पुत्र सुखाचा उपभोग घेतला. बाजीराव बऱ्हाणपुरांत असतां सन १७२९ सालीं साताऱ्यांतील वाड्यांत त्याची पत्नी काशीबाई प्रसूत होऊन पुत्ररत्न प्रसवली. त्याचें नांव "बाळाजी उर्फ नानासाहेब." हें आनंददायक वर्तमान त्या पुत्राचे

आजीनें कौतुकानें कळविलें. बाजीरावाचें सर्व मन लढाई जिंकून तिकडील प्रांत मिळविण्याकडे होतें, ह्मणून तो लागलींच निघून लष्करांसह पुण्यावरून लोक जमाकरीत करीत खानदेशांत गेला, आणि शाहूनें निजामास दिलेलें पत्र तेथून त्यानें निजामउलमुलखाकडे पाठविलें.

इकडे निजाम सातारच्ये पत्राची वाट पहात होता. आंतील संकेताप्रमाणें शाहूस हुकूम मान्य झाल्याचा मजकूर प्रतिनिधींनीं त्याला उलट कळवावयाचा होता. परंतु त्यांचें मना विरुद्ध सारा प्रकार घडून आल्यामुळें त्यांनीं तसें केलें नाहीं. हैदराबादेस साताऱ्याहून कांहीं लोकांस गुप्त पत्रें आलीं होतीं त्यावरून सातारकर निजामाशीं लढण्यास सिद्ध होत आहे अशी शहरांत दाट अफवा उठली होती. परंतु प्रतिनिधीकडून तसा मजकूर समजत नाहीं त्या अर्थी अफवा खोटी असावी असें तो ह्मणूं लागला. पण त्याचें सारें लक्ष्य प्रतिनिधीचें पत्राकडे लागून राहिलें. सन् १७२७ चे अखेर महिन्यांत एके दिवशीं निजाम व अल्ली या बाबतींत गुप्त संभापण करीत बसले असतां कांहीं स्वार पत्र घेऊन त्याचे दिवाणखान्यांत पाहेरकऱ्याचे परवानगीनें गेले, आणि सलाम करून त्याणीं तें पत्र त्यास दिलें. निजामानें तो लखोटा वाचून अल्लीचें अंगावर टाकला व अल्लीनें तो वाचला. तेव्हां अल्लीस निजाम ह्मणतोः– ( क्रोधानें ) कां अल्ली! दौलतर मोठाच घातला आहे! ( शिपायास ) अरे या लोकांस राजारामपंताचे घरीं पोंचीव आणि भोजनोत्तर दरबारच्या नजीकच्या धाकट्या दिवाणखान्यांत आणण्याची तजवीज ठेव. ( अल्लीस ) अल्ली बाचाहो मोठ्यानें

पुन्हां ऐकूं द्या. आजपर्यंत त्या जमीनदाराचीं पत्रें आलीं, परंतु इतक्या मग्रूरीनें त्यानें कधीं लिहिलें होतें कां ? कांहो— त्या बाज्याची सही आहे नां खालीं ? ( अल्ली हो ह्मणतो पाहून ) ज्याला भीत होतों तें कपाळीं आलें. हा सयाजीचा प्रताप आं ?

**अल्ली**.—सयाजीचा काय दोष आहे ? तो बाजीरावच तसा बेपरवाईनें वागणारा मनुष्य आहे !

**निजाम**.—बरें पुनः वाचा तें पत्र पाहूं.

**अल्ली**.— ( वाचतो ) " कळविण्यांत येतें ऐशिजे "—

**निजाम**.—असें लिहिलें काय ? बरं ( दात ओठ खातो ) आह्मी त्याचे हाताखालचे काय ?

" तुह्मी आंतून फितुरी करून व आमचे दरबारांतील कांहीं मुत्सद्यांस वश करून घेऊन आमचे महाराजांचे व कोल्हापुरचे छत्रपतींचें भांडण लाविलेंत. संभाजीस तुमची फूस खास असल्याचें आह्मास समजलें आहे. असो या दुष्कृत्याबद्दल तुह्मास शासन असणें योग्य दिसतें. तर हा खलिता पावतांच अपराधाची माफी मागून संभाजीची परस्पर समजूत काढावी किंवा "—

**निजाम**.— ( रागानें ) माफी मागावी काय ? चाकर असूं त्याचे ?

**अल्ली**.—" अंगांत सामर्थ्य असेल तर लढण्यास यावें. आह्मी तुमची वाट पहात धुळें शहरीं बसलों आहों—हैदराबाद प्रातांत वसुलाकरितां असलेले आमचे कामगार तेथेंच राहूं द्यावें. त्यांचे शरीरास इजा होईल तर तुमची धडगत राहणार नाहीं. इंदापूर परगणा तुह्मी वसूलाबद्दल आमचे

महाराजास मेहरबानीनें देणार होता असें तुह्मी लिहिलें परंतु तुमचे देण्याची आह्मी जरूर न बाळगितां इकडे येताना आह्मी तो प्रांत सर करून आलों आहोंत. जबाब लवकर पाठवा. कळावें. छ. १२ रजब.

( सही ) बाजीराव बल्लाळ.

पंत प्रधान. ( पेशवे. )

निसबत छत्रपती सातारकर.

वरील मजकुरास आमची संमती आहे.

मोर्तब इसलं

(सही) श्री शिवाजी उर्फ शाहूमहाराज

सातारकर छत्रपति.

पूर्वीं पासून निजामास बाजीरावाची दहशत असे. माळव्यांत त्यानें चैन पडूं दिलें नाहीं. त्यामुळें त्याचे पोटांत त्या विषयीं जास्त भीति वाटली. आणि या प्रकारचे हुकुमी पत्र पाहून तर आंगांत क्षणीक आलेलें स्फुरण जाऊन त्याचें अंत:करणावर निराशेनें आपला पगडा बसविला आणि त्यास कांहीं सुचेनासें झालें. निजाम हा जात्या शूर नव्हताच. तो मोठा धोरणी व मतलबी होता. स्वस्थ बसून जितकें राज्याचें कळसुत्र चालवेल तितकें तो चालवीत असे. तो कपट प्रवीण असे. तो अशा प्रकारचा होता हें अह्मीस माहीत होतें आणि तशांतून पत्र ऐकिल्यावर खर्‍दिशीं यजमानाची मुद्रा उतरलेली पाहून तो म्हणाला :— सरकार !

चित्तास इतका उदासीनपणा कां प्राप्त जाहाला आहे? त्या बाजीरावास आपण मोठा योद्धा समजतां कीं काय? त्यानें उद्दामपणानें लिहिलें यावर जाऊंनका. कुत्रें आंगावर भोंकन येतें त्यास जर आपण न डरतां शासन केलें तर नसें * शेंपुट घालून क्यां क्यां करीत पळून जातें त्याप्रमाणेंच या बाज्याची गोष्ट.—

**निजाम.**—कांहो अल्ली! खरोखर म्हटलें असतां कुराणांत लिहिलें आहे कीं हे हिंदु आपले गुलाम आहेत. यांस नेहमीं दास्यत्वांत ठेवाव. आपले पूर्वजांनीं प्रांतांचें अर्धे उत्पन्न घेऊन यांस मनाप्रमाणें वागण्यास मोकळीक दिली हें खरोखर त्यांचेवर उपकार झाले. परंतु कुत्ते वेटे, तें मनांत न आणतां हे हिंदु उद्धटपणें, उलट आमचेपासून कर घेतात, इतकेच नव्हे; माफी मागा, नाहीं तर लढण्यास या, असा धाकही घालतात तेव्हां या मूर्खपणास काय ह्मणावें?

**अल्ली.**—असा विचार करण्याची वेळ नव्हे हा सरकार! लवकर तयारी—

**निजाम.**—तयारी कशाची कारितां? आमचे पूर्वजांनी तें काम उत्तम प्रकारें करून देशांत स्वस्थता राखिली आणि आह्मी आयतें राज्य करूं लागलों. कधीं लढाईना बिढाई—

**अल्ली.**— ( वरपांगीं ) असें नीच कर्म आज पर्यंत आपलें कपाळीं नव्हत. आतां तरि म्हणजे आपल्या स्वतांवर थोडाच प्रसंग येणार आह? आणि आला म्हणून कां आपण कमी बहाद्दर आहां? सुरतेकडेस जय उगीच मिळावला?

**निजाम.**—छे हो! उगीच बढाया मारण्यांत काय अर्थ आहे? तेव्हां शेरखान होते म्हणून बाजू सांभाळली गेली

आणि शाबासकी मिळवून नांव गाजविलें. आह्मी काय नांवाचे जयास धनी. अल्ली ! मी एकाठिकाणीं बसून कारस्थानें करण्याचें काम पत्करीन. परंतु युद्धाचें काम माझ्याहातून निभावणार नाहीं.

**अल्ली.**—सरकारला असेंच ह्मटलें पाहिजे. कोणी आत्मप्रशंसा करीत असतो ? असो. सयाजीरावास बोलावून युद्धाचा बेत ठरवितो.

**निजाम.**—बरें करा तसें. राजारामपंतानांहि बोलावूं धाडा.

**अल्ली.**—ते विश्वासूपणें उपयोगी पडतील असें मला वाटत नाहीं.—

**निजाम.**—छे छे. येथें आल्यापासून तर मला ते एक विश्वासू व रणशूर दिसतात.

**अल्ली.**—शेरखान गेले ह्मणून काय झालें ? त्याचे जागीं फत्तेखानाची नेमणूक योग्य जाहली आहे. त्यांसहि बोलावतो. ( अल्ली जाऊन शिपायास सांगतो कीं फत्तेखान राजारामपंत आणि सयाजीराव या तिघांस बोलावून आण. इतक्यांत सयाजी आला त्या सह निजामाकडे ते दोघे जातात आणि शिपाई फत्तेखान व राजारामपंत यास बोलावण्याकरितां हाताखालील शिपायास धाडतो. )

**सयाजी.**—( सलाम करून ) जी ! साहेब ! मी हुजर आहे.

**निजाम.**—सयाजीराव ! आला कां ? तुमचीच गरज आहे.

**सयाजी.**—सरकार ! ( हात जोडतो ) काय हुकूम ?

**निजाम.**—तुह्मी फार दिवसांत आला नाहींत. त्या सा-

तारकराकडोन कांहीं पत्र आलें कां ? कांहीं तरी गडबड आहेसें वाटतें.

**सयाजी.**—सरकार ! आलों नाहीं त्याचें कारण झालें.

**निजाम.**—तें काय ? मग आह्मास पूर्वींच नाहीं कळाविलें ?

**सयाजी.**—सरकार ! प्रतिनिधीकडोन दोन सरदार आले आहेत. दारा बाहेर त्यांस बसविलें आहे. हुकूम होईल तर बोलावितों.

**निजाम.**—अल्ली ! आणवा त्यांला वर ( अल्ली त्यांस आणवितो. )

( सरदार सलाम करून सयाजीजवळ बसतात. )

**सयाजी.**—सरकार ! साताऱ्चे दरबारांत बाजीरावानें कशी नासाडी केली, तें वर्तमान हे सांगतात तिकडे मेहरबानींनें——

**निजाम.**—मेहर कशास. ( सरदारास ) बोला, तुमचीं नांवें काय ?

**सरदार.**—आह्मास संताजी घोरपडे आणि तान्हाजी ढफळे ह्मणतात.

**निजाम.**—मग तुह्मांपैकीं कोण सांगतों तर ?

**सयाजी.**—दोघांसहि ठाऊक आहेच.

**संताजी.**—तान्हाजीराव, सांगतील.

**तान्हाजी.**—संताजीराव, आपणच सांगा. मग चुकलं माकलं तिथें मी—

**अल्ली.**—आमचे हुक्याप्रमाणेंच चाललें आहे ! ! संताजीराव तुह्मी कां सांगाना ?

**संताजी.**—बरें तर. ( एकंदर दरबारांतील हकीगत सां-

गतों, परंतु त्यांत इतकी हिकमत करतोकीं प्रतिनिधीची बाजू राखितों )

**निजाम.**—( ऐकून आश्चर्यानें ) भला वस्ताद आहे तो बाजी तर? कां संभाजीराव? कसें काय आतां?

**सयाजी.**—काय, काय? त्याचा जाऊन फडशा पाडायाचा आणि काय?

**निजाम.**—हें पहा पत्र. दाखवा त्या सरदारास ( खिशांतून बाजीरावाचें पत्र त्यास देतो. )

**सयाजी.**—( वाचून ) मदोन्मत्त झालाय तो—

**सरदार.**—चला त्याच्या मुस्क्या बांधून आणूं येथें.—

**सयाजी.**—हो हो तयारी करा! सरकार! दोन हजार पायदळ व पांचशेंस्वार एकेकापाशीं देऊन या दोन रावांस आपले साहाय्यांकरितां प्रतिनिधींनीं पाठविले आहेत. शिवाय आपली येथील फौज ९००० आहेच. आमचे ५०० लोक ह्मणाल तेव्हां तयार आहेतच. आणखी मी संभाजी महाराजास पत्र पाठवून दहाएक हजार फौज आणवितों. फत्तेखान, संताजी, तान्हाजी, व मी, इतके तूर्त जाऊन शत्रूस कैद करून येथें आणतों. लागलीच मदत तर सरकारस्वारी पाठवीलच आणि आमचे महाराजाकडून लोक येऊन मिळतीलच.

**निजाम.**—आणि राजारामपंतास न्या बरोबर. तेहि सरदार बाहादर आहेत. राजारामपंत या नांवाचा ब्राह्मण सरदार फितूर करण्याच्या हेतूनें राहिला आहे, असें अक्लीस व सयाजीस माहीत झालें होतेंच परंतु निजामाचा त्यावर पूर्ण भरंवसा असल्यामुळें त्याचें काडीभरहि त्याच्या

हातून वाईट जाहलें नाहीं. तरि प्रसंगीं कुरापत काढण्यापेक्षां त्यास बरोबर घेण्यास राजी नाहीं ह्मटलें ह्मणजे झालें असे इराद्यानें त्या उभयतांनीं त्यास बरोबर नेण्याचें नाकारलें. इतक्यांत शिपायानें आंत फत्तेखानास आणिलें आणि राजारामपंत स्वाराशीं बोलत बसले आहेत असा निरोप सांगितला. तेव्हां सयाजी व अल्ली यांस तो आला नाहीं यामुळें बरें वाटलें.

**निजाम.**–( फत्तेखानास मजकूर कळावितो ) कसा काय विचार?

**फत्तेखान.**–विचार तो काय असावयाचा. मी एकटा जाऊन त्याचें मुंडकें येथें दाखविण्यास आणतों.

**निजाम.**–( त्यास बाजीची तसबीर दाखवितो ) केवढें प्रकरण आहे ! हें पाहिलेंत !

**फत्तेखान.**–असूं द्या, पहा तर खरें. त्याला चार महिन्याचें आंत या ठिकाणीं कैद करून आणतों. माझे तरवारीचे झपाट्यांत सांपडावा मात्र कीं त्याचें शीर येथें आणून सर्व लोकांस पाहण्याकरितां टांगतों.

अशी प्रतिज्ञा करून युद्धास जाणारे सरदार जवळ आहेत हें पाहून निजामास धैर्य आलें व आपणही त्यांजबरोबर जावें ह्मणजे जय झाल्याबरोबर सर्व महाराष्ट्रदेश काबीज करून येऊं आणि दिल्लीचे बादशाहास कळवूं कीं आपले कृपेनें इकडे येऊन आपले हातचा गेलेला सर्व प्रांत पुन्हां मी मिळविला असें त्याचें मनांत येऊन त्यानें सयाजीस व फत्तेखानास सांगितलें कीं " तयारी करा. मी बरोबर येतों. " तेव्हां कांहींवेळ वाटाघाट होऊन त्या प्रमाणें कर-

ण्याचा बेत ठरला आणि सारे सरदार आपापले घरीं गेले. सयाजीस व फत्तेखानास भ्रम होता कीं सारे लोक शिंग फुंकतांच तयार होतील. त्यांनीं त्या दिवशीं दुपारीं शिंग फुंकलें परंतु लढणारे कोणींच १००० वर जमले नाहींत. अशारीतीनें त्यांचा भ्रम जिरल्यावर त्यांनीं तिजोरींतून अ-तोनात पैसे देऊन व शत्रूंस लुटण्याची सर्वांस मुबा आहे अशी लालूच दाखवून कसें तरी ५००० हजार लोक जम-विले आणि महिन्या दोन महिन्यानीं स्वारी करण्यास निघ-णार, तों त्यास खबर आली कीं " बाजीरावानें वाटेवर येऊन मुलूख उद्वस्त करण्याचा तडाका लाविला आहे, मुस-लमान लोकांस पकडून कैद केलें आहे, घरें दारें पाडलीं, मोडलीं आणि जाळलीं आहेत. सर्वमाल लुटला, मशिदी फोडल्या, दारू गोळ्यास बत्ती पेटवून उडविला व जे त्यास अडथळा करीत त्यांस तोफेचे तोंडीं देऊन त्यानें चिंधड्या चिंधड्या उडविल्या, बायकांपोरांस पकडून त्यांवर अती जुलूम चालविला आहे. " हें ऐकून निजाम व त्याचे बरोबरचे सरदार मोठ्या त्वरेनें निघून बाजीरावास गांठून पाडाव क-रण्याचे हेतूनें चाल करूं लागले. खबर ऐकल्याप्रमाणें वा-टेनें बहुतेक गांवांची नासाडी पाहून तर त्याच फौजेचे म-नांत अति त्वेश आला आणि बाजीराव कधीं सांपडतो व त्यास आपण कधीं मारतों असें त्या सर्वांचे मनांत येऊन ते त्याचा पाठलाग करीत चालले. बाजीरावामध्यें व त्याच्यामध्यें तीस चाळीस कोसांचें अंतर असे, तें कांहीं केल्यानें तुटेना. रोज त्यानें परत खानदेशाकडेस लांबची मजल करावी आ-णि यांनीं त्यांचे मागोमाग जावें. असें होतां होतां पंधरा वी-

स दिवसांनंतर बाजीरावाची व निजामाचे सैन्याची गांठ पडली. तेव्हां बाजीरावानें विचार केला कीं आपले सर्व लोक दमून गेलेले आहेत तर अशा समयास लढाई करणें श्रेय नाहीं. असे समजूतीनें तो त्यावेळेस निजामाशीं निकरानें लढला नाहीं. साधारण चकमक पांच चार दिवस झाल्यावर बाजीरावानें आपला पराजय झाला असें दाखवून पळ काढिला आणि सात आठशें स्वार व २००० हजार पायदळ आणि शंभर तोफा इतकें लष्कर गोविंदराव बुंदेले बाजपाशीं देऊन त्यास बऱ्हाणपुराकडे जाण्यास सांगितलें आणि आपण निजामाचे सैन्याची नजर चुकवून डोंगरा आड झाला; आणि अति त्वरेनें खानदेशांतून मोठें सैन्य जमा करून परस्पर गुजराथेंत शिरला. तेथें एकदोन लढाया करून तो मुलुख लुटला. यावेळेस पूर्वीचा प्रेमभाव आठवून पिलाजी गायकवाड त्यास मदत करण्यास आला ह्मणून बाजीरावानें त्यास त्याचे कृतघ्नपणाची क्षमा केली आणि तेथील अधिकारी सरबुलंदखान यास पळवून लावून त्याचे जागीं पिलाजीस बसविलें आणि त्याचे राज्याची गादी बडोदे शहरीं स्थापिली.

इकडे गोविंदपंत बुंदेले पळाला असतां तोच बाजीराव असें समजून निजामाचे लोक त्याचा पाठलाग करूं लागले. गोविंदराव बुंदेले बऱ्हाणपुरास सुरक्षीतपणें पोंचला, त्यावेळेस बाजीरावाचे पत्रावरून मदत करण्याकरितां तेथें चिमणाजी आप्पा १०००० फौजेनशीं तयार होता. त्यानें आपले पराक्रमेंकरून निजामाच्या लष्कराचें कांहीं प्राबल्य चालूं दिलें नाहीं, इतकेंच नव्हे; निजामाचे लोकांस इतकें

जेरीस आणलें कीं सरते शेवटीं रातोंरात त्यांनीं नकळत पळ काढला. निजामानें पुन्हां खानदेशांत आल्यावर आपले सरदारास असें सांगितलें कीं बाजीराव पक्का ठक आहे, तो कोणीकडे आहे, त्याचा थांग लागत नाहीं; हें चांगलें नव्हे, तथापि त्याच्या पश्चात् आपण आतां असें महाराष्ट्र देशांत गेलों तर पुणें शहर सहज हस्तगत होईल, तितक्या वेळांत बाजीराव आलाच तर त्याच्याशीं सामना करूं. नाहींतर तसेंच सातार्‍यास जाऊन त्या गुलामाचें सारें राज्य हिसकून घेऊं. हा बेत त्याचे सरदारांस पसंत पडून ते अहमदनगरापर्यंत स्वार्‍या करीत आले. तों त्यांस वर्तमान कळलें कीं बाजीरावानें लष्करसहित कासारबारीचे घाटानें येऊन मुलख उध्वस्त केला आहे. तेव्हां निजाम माघारीं फिरून गोदावरी नदी उतरून पलीकडे गेला. तेथें बाजीरावाचे सैन्याची व त्याचे फौजेची जरा चकमक झाली. तेव्हां पाऊस मोठा आल्यानें दाहीं दिशा धुंद झाल्या; चोहींकडे अंधार पडला, म्हणून त्या दिवशीं लढाई तहकूब जाहली. दुसरे दिवशीं लहानशी लढाई झाली. त्यांनीं यांचे लोकांस त्रास द्यावा, यांनीं त्यांचे लोकांस त्रास द्यावा, या प्रकारचा दंगा सुरू झाला. हा प्रकार चालू करण्यांत बाजीरावानें एक मतलब साधला तो असा कीं निजामउलमुलखाचें लोकांस मागें सारतां सारतां अशा जागीं नेलें कीं त्या स्थलीं पाणी बिलकूल नव्हतें. अशी युक्ती करून बाजीरावानें आपले सैन्याचे चार विभाग केले आणि चार बाजूंनीं त्यांनीं जाऊन निजामाचें सैन्यास गराडा घातला. त्यामुळें निजामाचें सैन्यास धान्य व सामुग्री मिळेनाशी झाली. बरोब-

रची सामग्री कांहीं होती तिजवर तीन दिवस पर्यंत नि-
जामाचे लोकांनीं निर्वाह केला. परंतु ती संपल्यावर जे-
व्हां उपासमारा पडूं लागला तेव्हां त्याचे लोक फार
त्रासले. पाण्याचें लहान डबकें होतें त्यांतील पाणी सर-
ल्यामुळें इतर खर्चास तर नाहींच पण त्यानां पिण्यासहीं
पाणी मिळेनासें जाहलें. त्या मुळें जिकडे तिकडे नि-
जामाचे सैन्यांत हाहाकार होऊन लोक निराशेनें ह्मणूं
लागले कीं जीव गेला तरि पतकरला, भुकेनें व तान्हेनें
व्याकूल होऊन शत्रूनीं हालकरून मारण्यापेक्षां युद्धांत मेलें
तर बरें. त्या लोकांनीं या प्रमाणें जिवावर उदार होऊन
निकरानें लढण्यास सुरुवात केली. पूर्वेस खुद्द बाजीराव
होते तिकडेस कोणी जाण्यास धजेना उत्तरेस पहिल्यांदा
ते गेले आणि लढूं लागलें परंतु तिकडे मल्हारजी हो-
ळकरांनीं बाजु राखिली त्यामुळें लोकांचे तिकडे कांहीं
चालेना. त्या बाजूला शत्रू जबर दिसला. शिवाय बाजी-
चे टोळीतून तोफांचे गोळे व बंदुकीच्या गोळ्या आणि
लोकांचे तीर अंगावर येऊं लागले तेव्हां निजाम फार भ-
याभीत झाला आणि शरणजाण्याचे बेतास आला. तेव्हां
सयाजी व संताजी यांनीं त्यांस धैर्य देऊन, सैन्यास प-
श्चिमेचे बाजूस जरा तूट पडलेली दिसल्यावरून, हल्ला
करण्यास उत्तेजन दिलें. त्या प्रमाणें मुसलमान लोक त्या
टोळीवर जाऊन तुटून पडल. तेव्हां त्या बाजूस ना-
रायणराव फडके यांणीं त्यास बाहेर न पडूं देण्याविष-
यीं पुष्कळ यत्न केला परंतु दैवयोगानें सयाजीनें अति
जोरानें केलेला घाव त्यास सहन न होऊन तो रणांगणांत

पडला. नायक मेला पाहून त्या टोळींतील मराठ्यांची वीरश्री खचून ते मागें हटले आणि निजामाचे लोक एकामागून एक रिघाव करून पलिकडील मैदानांत जाऊं लागले. हें अरिष्ट बाजीरावानें दुरून पाहिलें. त्यानें आपले टोळीस खबरदार राहण्याचा हुकूम देऊन तो भरधांव घोडा सोडून फडक्याचे टोळींत शिरला, तेव्हां निजामास राजारामपंतांनीं सांगितलें कीं बाजीराव एकटा सांपडला आहे तर या वेळेस पळून न जातां निकरानें लढावें. हें कपटाचें बोलणें सयाजीरावानें जाणलें आणि तो राजारामपंताचें बोलण्याप्रमाणें करीना तेव्हां निजामास राग आला आणि त्यानें बरोबर ४०० । ५०० लोक घेतले व तो बाजीचें आंगावर चालून गेला. फडक्याचे टोळीनें बाजीरावास पाहिलें तेव्हां जय मिळवूंच अशी त्यांस पुनः वीरश्री आली आणि ते शौर्यानें लढूं लागले. चोंहीकडे धूळदाण होऊन गेली. कोणास कोणी ओळखूं येईनासें झालें. अशा धालमेलींत बाजीरावानें निजामास पकडलें आणि कैद करून कांहीं स्वारांजवळ दिलें. पळालेल्या लोकांवर राजारामपंतानें फितूर होऊन राणोजीस पाठविलें; त्यानें त्यास पिटवून मल्हारराव होळकराकडे आणलें. तेव्हां माघून पुढून मारा झाल्यामुळें त्या लोकांचा पराजय झाला. या प्रकारें अखेर बाजीरावाचा जय होऊन लढाई संपली. बाजीकडील फारतर ८०० स्वार व १००० लोक पडले परंतु निजामाचा मात्र अतिशय तोटा झाला. त्याचे ४००० लोक मेले. शें दोनशें पठाण घायाळ झाले आणि बाजारबुणगे तर हजारों प्राणस मुकले. नंतर लढाईंत जय मिळल्याबद्दल

वाजंत्री, करंडोल, नगारे वगैरे नानातऱ्हेचीं वाद्यें रणशूर शिपायांनीं वाजविलीं आणि जयघोष करीत निजामास व त्याचे लोकांस कैदकरून बाजीरावाची स्वारी पुण्यास जाण्याकरितां मोठ्या थाटानें निघाली.

---

## भाग बारावा.

बाजीराव लढाईस गेला त्या वेळेस धुळें मुक्कामीं आवडीस बळवंतरावाचे घरीं ठेवली होती तीस बरोबर पुण्यास घेऊन जाण्याकारितां जिंकलेल्या शत्रूचे लटांबरासहित तो धुळ्यास आला. तेव्हां यजमानाचे शौर्याची वाखाणणी करण्याकारितां भगवी गुडी उभारून व आनंदानें वाड्यांत जिकडे तिकडे चकचकाट करून ती वाट पहात बसली होती इतक्यांत बाजीराव तेथें गेला तेव्हां ती त्यास प्रेमानें भेटली. बाजीराव आपल्या प्रीय पात्राजवळ आल्यानें, व जयाच्या भूषणानें, पहिल्यापेक्षां अधीक विराजमान होऊन, आपली कृतकृत्यता मानूं लागला. त्याचें मन कांहींवेळ अगदीं गुंग होऊन गेलें. मग कांहीं वेळानें जिकडे तिकडे स्थीर स्थावर जहाल्यावर बाजीरावानें आरंभिलेले कार्याचा शेवट गोड झाला ह्मणून ईश्वराच्या अगाध शक्तीचा स्तव केला.

मग दुसरे दिवशीं विजयी बाजीरावानें आपले सरदार शिपायी मुत्सद्दी लोकांची सभा भरवून तींत महान अधराधी व हाड वैरी शत्रू जो निजामुल्मुलुख त्यास आपल्या समोर आणून बसविलें आणि आबाजी पुरंदऱ्याकडोन त्यास समज देवविली कीं “ बिरबल ! तुमच्या सारखे कपटी

आह्मी पाहिले नव्हते. तुह्मी दिल्लीस प्रत्यक्ष आपले यजमानाचे आंगावर घाव घालण्यास भ्याला नाहीं तेव्हां आमचे सारख्यापाशीं कृतघ्नपणा करण्यास कां भितां? अहो हा आमचा आर्यावर्त देश—येथें आमचे पूर्वजांनीं तुह्मांस राज्य करूं दिलें ही त्यांची चूक झाली. त्याचा फायदा घेऊन तुह्मी नानाप्रकारचे कर बसवून प्रजेस गांजवितां हें नीट काय? याचें तुह्मास महच्छासन पाहिजे. शरणास मरण देणें योग्य नाहीं सबब तुमचा जीव राखिला आहे. तुह्मी कोणती शिक्षा पसंत करतां बोला?"

हें ऐकून निजाम अगदीं मेल्याहून मेल्याप्रमाणें झाला. ज्याच्यापुढें तो कैदेंत होता त्या राजसंभव पुरुषाकडे त्याच्यानें पाहवेना. कोणती तरि शिक्षा देऊन सर्व लोकांचे आड एकीकडे केव्हां नेतील असें त्यास झालें. सबब कांहीं एक न बोलतां खालीं मान घालून तो स्तब्ध राहिला.

**बाजी.**—उत्तर द्या लवकर.

**निजाम.**—( हात जोडून ) मी सर्वस्वी अपराधी आहे.

**राणोजीशिंदे.**—त्यांस जन्म कैदेंत ठेवावा.

**मल्हारराव.**—त्यानां मरणच योग्य. कारण त्यानीं सावकार लोकांचे हाल करून त्यांचा कोट्यावधी पैका खाल्ला आहे.

**बाजी.**—हं!! बिरबल! बोला.

**निजाम.**—नका आतां त्या नांवानें हाका मारूं. मी आत्महत्या करून घेतों.

**बाजी.**—छे छे! मग मी इतकें श्रम केल्याचें सार्थक होणार नाहीं. आम्हास वाटतें कीं तुम्हाला व तुमचे सर्व लोकांस कैदी करून साताऱ्यास श्रीमत्छत्रपती शाहूमहाराजा-

पाशीं न्यावें आणि त्यांचे पाया पडल्यावर ते सांगतील ती शिक्षा करूं.

**निजाम.**—झाला इतका अपमान पुष्काळ झाला. तुह्मी थोर आहां, मला आत्महत्या करण्याची परवानगी द्यावी. नाहीं तर मला या बंदीतून मुक्त करावें. मी आपल्यास पाहिजेत त्या शर्ती लिहून देतों परंतु साताऱ्यास नेऊं नका.

**बाजी.**—बोला काय काय कबूल करतां तें!

**निजाम.**—आपण सांगाल तें.

**बाजी.**—प्रथम संभाजीस स्वाधीन करावें. दुसरें—मराठे कामगार जे आह्मी तुमचे मुलखांत वसूल करण्यास नेमले आहेत त्यांस जमाबंदीचे वेळीं कोणतेही प्रकारची अडचण पडतां कामा नये. तिसरें—आमचे ताब्यांत हैदराबाद प्रांतांतील कोणते तरी बारा किल्ले स्वाधीन करावे आणि आमचे परम मित्र राजरामपंत याशीं नमून वागून त्यांस कोणतेही प्रकारचा त्रास देऊं नये.

**निजाम.**—किल्ले देतो. वसूल जमाकरण्यास मनाई करीत नाहीं परंतु राजारामपंतास पुन्हां आमचे इलाख्यांत पाठवूं नये आणि——

**बाजी.**—कां बरें. ते तुमच्या विरुद्ध झाले ह्मणून ?

**निजाम.**—होय. ते फार विश्वासघातकी आहेत.

**राजारामपंत.**—( पुढें सरसावून ) श्रीमंत ! अशा दुष्टांची अशीच मान दावली पाहिजे. मज्जातीय आर्य लोकांचें कल्याण होण्याकारितां मी कपटानें यांस फसविलें खरें, परंतु यांत मी पाप केलेसें मला वाटत नाहीं. तरी आतां

आपले पायापाशीं माझेंही इतकेंच मागणें आहे कीं मला पुन्हां त्यांचे मुलुखांत पाठवूं नये.

**बाजी.**—तर तुह्मी कोणाजवळ राहतां ?

**राजाराम.**—श्रीमंत ! युद्धांत आपलेपासून निघाल्यानंतर मी राणोजी शिंद्याकडे गेलों तेव्हां त्यांनीं जें शौर्य दर्शविलें तें फारच उत्तम प्रकारचें. ते नागपूरास असतात ह्मणून मला समजलें आहे तर त्यांच्याजवळ.

**बाजी.**—त्यांच्यापाशीं तुमची राहण्याची खुषी आहे तर, कां राणबा अलिजा बहाद्दर ?

**राणबा.**—फार नामी, मीं त्यांचें तेव्हांच सर्व कांहीं जाणलें.

**बाजी.**—बरें तर ! राजरामपंत ! आजपासून तुह्मी नागपुरास राहां.

**राजाराम.**—( नमस्कार करून ) श्रीमंताचा हुकूम शिरसामान्य आहे.

**बाजी.**—बरें पुढें काय ? निजाम ! एकाची लागली वाट.

**निजाम.**—संभाजीस मागूं नये.

**बाजी.**—कां बरें ? तो आमचे स्वाधीन झाल्यास चिंता नाहीं. महाराजासारखा तो. इतकेंच कीं राजाप्रमाणें त्यास नजर कैदेंत ठेवूं. त्याचा मान सन्मान राखण्यांत आमचे कडून कमतर होणार नाहीं.

**निजाम.**—( हात जोडून ) माफी असावी. त्यास मी अभयवचन दिलें आहे. पाहिजे तर आपल्याकारितां त्यास पन्हाळा किल्यावर मी स्वतःचे ताब्यांत ठेवतों.

**बाजी.**—फार चांगलें. तुमच्याकारितां कबूल करितों. ( आबा पुरंदऱ्यास ) आबा ! आणा कलमी लिहून. ( आ-

बा आणतात ) ( निजामास ) करा सही, ( निजाम आश्रु ढाळीत सही करितो ) खबरदार जर पुन्हा बंडावा किंवा फितुरी केलीत तर !

**निजाम.**—मी स्वतां तुमचे विरुद्ध पूर्वी ह्मणून तरी आलो नव्हतोंच.

**बाजी.**—तर कोणी चढीस दिलें ?

**निजाम.**—सयाजीराव घाटगे ह्मणून कोल्हापूरकर संभाजीचा वकील आमचे जवळ होता. आतां त्याचें काय झालें कोण जाणें ?

**अल्ली.**—( पुढें होऊन हात जोडून ) ते पळून गेले आहेत. अर्ध्या वाटेवर गेले असतील. आह्मींच हतभाग्य ह्मणून बंदींत आहोंत.

**निजाम.**—त्याणीं आणि—( अल्लीचें नांव घेणार तों अल्लीनें खुणेनें तसें न करण्याविषयीं विनंती केली. ) हो हो त्यांनींच एकट्यानीं.

**बाजीराव.**—अझून चोरतोस काय ? तो कोणरे आतां बोलला ?

**अल्ली.**—जी साहेब ! मी तो.

**बाजी.**—बोल आणखी कोणतो.

**अल्ली.**—राग नसावा. माझ्याच्यानें उघड सांगवत नाहीं. परवानगी मिळेल तर सर्व लिहून देतों.

**बाजी.**—बरें कर तसें. ( शिपायास ) शिपाय ! दे त्याला दऊत, लेखणी, कागद, वाळू आणि आण त्याचें लिहिणें जाहल्यावर इकडे तो कागद. ( शिपाई त्यास

लिहिण्याचें सामान देतो व अह्मी त्यावर प्रतिनिधी संबंधीं मजकुर लिहितो. )

**बाजी.**—( शिपायानें अह्मी जवळचा कागद आणून दिलेला वाचून ) बरें आहे. ( कागद खिशांत घालतो. )

**अह्मी.**—सरकार ! पाया पडतों. तो कागद फाडून टाकावा माझ्या देखत व मजकुर प्रसिद्ध करूं नये हें मागणें आहे.

**बाजी.**—कागद कांहीं फाडीत नाहीं, पण तो माझे एक दोन परम मित्रा खेरीज दुसरे कोणास दाखवीत नाहीं. इतकें तुला वचन देतों जा. ( शिपायास ) या कैद्यां पैकीं निम्मेजण येथें ठेवून घ्या व ( पुरंदऱ्यास ) अबा ! निजामासून १०००००० चा करभार घेऊन त्यास एक हजार शिपायानिशीं जाण्यास परवानगी द्या. परंतु आपले दोन अडीचशें स्वार त्यांस हद्दपार करण्याकरितां बरोबर पाठवा हो.

**अबा.**—हुकूम सरकार ! श्रीमंताची स्वारी वाड्यांत चालली वाटतें ? मी आज्ञेप्रमाणें व्यवस्था लावितो.

नंतर बाजीराव वाड्यांत गेले. त्याचे मागोमाग बळवंतराव, गोविंदराव, राणोजीराव, मल्हारराव वगैरे मंडळी त्याची खासगी भेट घेण्यास गेले. तेव्हां बाजीराव ह्मणतो:- राणबा ! तुमचा आमचा, तसाच मल्हाररावाचा फार ऋणानुबंध आहे. प्रसंगाचे वेळीं आह्मास तुह्मी येऊन साहय्य करतांच.

**बाळया.**—ऋणानुबंध ह्मणजे ? कसें झालें तरि नाई

कवा आहेत. ते आपले पायापाशीं असायचेच. तसाच ग्या-न्यांहिजवळ.

**मल्हारी.**—तूं ग्यान्या कसारे आलास इतक्या योग्यतेस ?

**बाळया.**—सरकारांनीं मला येथील मुख्य व्यवस्थापक नेमिलें आहे.

बाजीरावानें नंतर दिल्लीस गेल्याची सर्व हकीगत त्यास कळविली आणि बाळ्यानें इमानानें आमची नोकरी बजाविल्यामुळें त्यास व त्याचे हाताखालीं ( गोंद्याप्र उद्देशून ) या रावास नेमिलें आहे.

**मल्हारी.**—श्रीमंतास काय कमी आहे ? रंकाचा राव होताय, कृपा झाल्यावर.

**बाजी.**—पण मल्हारराव ! त्यानें पोरकटपणा टाकून येथील काम चांगलें प्रकारें केलें.

**मल्हारबा.**—सरकारच्या आशिर्वादानें आह्मा सारख्यांचें होतें कसें तरी.

**बाजी.**—बरें पण, तुह्मी इतके दिवस होतां कोठें ?

**मल्हार.**—मी माळव्यांतच एक भाग लुटून इंदुरास लहानसें राज्य स्थापिलें आहे. आपले बंधु चिमणाजी आप्पासाहेबांचे कृपें करून माझें तेथें सुरक्षीत चाललें आहे. आप्पासाहेबांनीं पाठविल्यावरून मी श्रीमंताचे पायाचे सेवेंत हजर राहिलों आहें.

**बाजी.**—फार योग्य. तुह्मी तसेच पराक्रमी अहां. तेथें राज्य करा खुशाल. आह्मी आलों तर मदत करीत चला.

**मल्हारी.**—( पायापडून ) श्रीमंताचे आह्मी दास आहोंत.

**बाजी.**—बरें राणबाचें कसें काय वर्तमान ?

**राणबा.**—सरकार ! एक विनंती आहे. माझे मनांतून माळव्यामध्यें राज्य स्थापावयाचें आहे.

**बाजी.**—फार उत्तम. राजारामपंतास नागपूरची माहिती करून देऊन व त्यांचें लोकांत वजन राहील असें करून नंतर जा. पण—

**राणबा.**—हुकम सरकार ! ( मल्हारबास ) चलायचें ?

**मल्हारबा.**—हो चलावें.

**बाजी.**—तुह्मा उभयतांचे आह्मांवर फार उपकार आहेत. महाराजापासून तुह्मास तसें करण्याविषयीं सनदा देतो पाठवून.

**दोघे.**—छे ! छे ! श्रीमंताचे आह्मी जन्मभर उपकार विसरणार नाहींत. आह्मास सरकार ! आपण अन्नास लाविलें. महाराजाकडून सनदा कशास ? आपला रुकार हाच आह्मागरीबास कोट्यावधी रुपयांचे मोलाचा आहे. जातों आह्मी. उदईक येऊं.

**बाजी.**—फार चांगलें आहे. रामराम.

( राणोजी व मल्हारराव जातात. )

दुसरे दिवशीं संकेताप्रमाणें राणोजी आणि मल्हारराव हे यजमानाचे पाददर्शन केल्यानंतर आपापले फौजेसह माळव्यांत व नागपूरांत परत गेले.

नंतर बाजीराव साताऱ्यास गेला. तेव्हां शाहूमहाराजानें गांवोगांवचें लोकांस बोलावून हल्लीं हुजूर डेपुटीचा अगर जुना हजिरी बंगला आहे त्याचे खालील विस्तीर्ण मैदानांत मंडप उभारून मोठा दरबार भरविला. आणि बाजीरावानें प्रतिज्ञा केल्याप्रमाणें जय मिळविल्याचें सर्व लोकांस जा-

हिर केलें. लोकांनीं अत्युत्सवें गजर केला. अहाहा ! काय त्या वेळेचा समारंभ ! जूलियस सिझर, पांपे, सिपिओ, आँटनी, नेपोलियन, इत्यादि महाविख्यात योध्यांनीं जय मिळवून लॉरेल्स माळा गळ्यांत उत्साहानें धारण केल्याबद्दल तज्जातीय लोक गर्व वाहतात, तसा आमचे आर्य लोकांस हा मोटा सुदीन प्राप्त झाल्याबद्दल किती उत्सव झाला असेल याची वाचकांनीं कल्पना करून मनांत भूषण मानावें. मुसलमान लोक मदोन्मत्त होऊन नानातऱ्हेचे जुलुमी कायदे करूं लागले. लोकांचे हिताकडे मुळीं लक्ष्य देईनात, पाहिजे त्या प्रमाणें त्यांनीं मोंगलाई मांडली, हें दुष्कर्म ईश्वरास न आवडून त्यानें श्रीशिवाजी महाराजाचे पाठीमागें बाजीरावसाहेब पंतप्रधानास सद्बुद्धि व शौर्य देऊन आमचे राष्ट्राचा उद्धार केला आणि मी मी ह्मणणाऱ्या निजामुल्मुल्कास शरण आणलें, या पेक्षां मोठें कृत्य तें कोणतें करावयास पाहिजे ? असो. अशा महदुत्सवाचे प्रसंगीं त्या भरजरी किनखापी दरबारांत महाराजाचे सिंहासनानजीक उजवे बाजूस रत्नखचित् बैठक मांडून ठेविली होती, ती वर शाहूनें बाजीरावास स्वतः हात धरून बसाविलें. आणि बाजीरावाचें अंगावर पोषाख चढविला. तो इतका दिव्य होता कीं त्यांतील हिऱ्यामाणकांचे प्रकाशानें पाहणारांचे डोळे दिपत. दोन शिरपेच, तुरा, बाहुभूषण, पोहोंचीजोड, कंठी, कुडक्या, भिकबाळी, कडीं, तोंडे, इतकीं त्याचे अंगावर घालून, दौत, मोर्तब, कलमदान, ढालतरवार इतकें हातांत दिलें आणि आबापुरंदरे व भानु याजपाशीं दोन मोर्चेलें देऊन त्यांज-

कडून तीं आपले मुख्य प्रधानाचे शिरावर धरविलीं. शिवाय नऊ पोषाख वेगवेगळ्या तऱ्हेचे त्याचे खिसमत्‌गाराजवळ दिले. घोडे, पालख्या, हत्ती, इत्यादि शेकडों वाहनें बक्षीस दिलीं. नंतर मांडलिक राजांनीं व सरदारांनीं मुजरे केले व बाजीराव व शाहू यांचे पायदळ, घोडेस्वार वगैरे जे भरजरी पोषाख करून उभे होते त्यांनीं नौबदादि वाद्यें वाजवून जयघोषाची सलामी केली. श्रीमंतांकडे सर्वांची एकसारखी टक लागून राहिली. जसा काय स्वर्गींचा भानूच या लोकीं उतरून आला आहे असें लोकांस वाटलें. आधीं मुखश्री भव्य आणि सुरेख; तशांतून अलंकार परिधान केलेले, यामुळें अमोलिक हिऱ्याला कोंदण घातल्या प्रमाणें दिसूं लागलें. नंतर चोंहीकडे शांतता झाल्यावर बाजीराव उभा राहिला आणि शाहूस लवून मुजरा करून ह्मणाला, “सरकार ! आज या प्रधानावर मोठी मेहरबानी जाहली. मी स्वतः मोठा पराक्रम केला त्या बद्दल हीं भूषणें परिधान करतों असें नाहीं; तर महाराजांची मर्जी बिघडूं नये हा एक हेतु आणि जे कोणी यवनास ताडण करतील त्यांस असें बक्षीस मिळेल हें लोकांस दाखवून त्यांचे मनांत उत्तेजन आणावें हा दुसरा. मी काय बहादुरी केली ? महाराजांचें चरणांचा प्रताप ह्मणून जयास नांवाचा धनी मी झालों आहें. रास्ते, पटवर्धन आणि फडके या तिघांनीं आपलें काम छान बजाविलें. फडके तर फारच इमानी. प्राण जाई पर्यंत त्यांनीं हार खाल्ली नाहीं. परंतु त्या वेळेस राजारामपंत नांवाच्या सरदारानें बहार उडविली. पट्दिशीं ते आह्मांस मिळाले आणि त्यांनीं आमची

बाजू संभाळली. तसेंच राणोजी शिंदे आणि मल्हारराव होळकर यांनीं आयते वेळीं फौजेनिशीं येऊन अत्युत्तम साह्य केलें. इतक्या पैकीं मी राजारामपंतास नागपुरास नेमिलें. मल्हारराव होळकर यास इंदुरास राज्य करण्यास मोकळीक दिली. आतां पटवर्धन व रास्ते यास काय देणें तें द्यावें—फडक्याच्या वंशास जहागीर.— "

**पटवर्धन व रास्ते.**—महाराज ! आमचीं नांवें घ्यायचीं इतकेंच. बाकीं निजामास पायांपडायास लावण्याचा प्रताप श्रीमंतांचा.

**बाजी.**—आबापुरंदऱ्यास सासवडास किल्याप्रमाणें मजबूत वाडा बांधून देण्याचें मी कबूल केलें आहे, कारण त्यांनीं आमचे मुतालिकीचें काम मनाप्रमाणें केलें, व बरोबर होते तेव्हां तर तिलमात्र चूक न होऊंदेतां त्यानीं हुशारीनें काम बजाविलें.

**शाहू.**—अण्णासाहेब ! आह्मी आपले बाहेर नाहीं.

**बाजी.**—महाराज ! मला खुद्द पुण्यांत वाडा बांधण्याची परवा—

**शाहू.**—परवानगी कशाला ? बांधा. लागतील तितके रुपये खर्च करा.

**बाजी.**—फार उत्तम. ( आबापुरंदऱ्यास ) आबा ! द्या इकडे कागद.

**शाहू.**—तहनामा कां ?

**बाजी.**—होय त्या निजामापासून हे करार लिहून घेतले आहेत. ( वाचून दाखवितो. ते ऐकून सर्वलोक हर्षानें टा-

ल्या पिटतात ) ( प्रतिनिधीस ) रावसाहेब ! हा पाहिलाको निजामाचा करार—

**शाहू**.—यांचा आज खूप हौजा उडाला ! !

याजा नंतर अलीनें दिलेला कागद शाहूपाशीं देतो व वाचून पाहून फाडण्यास सांगतो. शाहू त्या प्रमाणें करतो.

**बाजी**.—महाराज ! आमचे शिपाई लोकांस व सरदारांस शाबासकी दिली पाहिजे.

**शाहू**.—द्यावी.

**बाजी**.—सरदारानों ! तुह्मी मनापासून काम करून आह्मास यश दिल्याबद्दल तुह्मा सर्वांवर श्रीमंत छत्रपती महाराज फार संतुष्ट आहेत. तुह्मी या वेळेस ज्या रीतीची कामगिरी बजाविलीत त्या प्रमाणेंच नित्य बजावीत जा. महाराजानीं प्रसन्न होऊन तुह्मांपैकीं प्रत्येकास १०।१० मोहरा दिल्या आहेत त्यांचा स्वीकार करून व या पुढें हुशारीनें व वीरश्रीनें वागून या गादीचें महात्म्य सर्व आर्य भूमीवर पसरवा. यवन रूपी कांटे जाळून खाक करा. संभाळा. निवडुंग जसा जरा पडला कीं वाढतो तद्वत् या नीच मुसलमानांस जरा संधी सांपडली कीं ते बळावतील. तुमच्या वरच महाराजांचा पूर्ण भरंसा आहे.

नंतर मोहरा वाटण्याचा समारंभ होतो. तो आटपल्यावर लोक पेढे वर्फी वाटतात; नंतर पान सुपारी, हार तुरे, अत्तर गुलाब, दिल्यावर कचेरी बरखास्त होते. तेथून बाजीरावाची स्वारी मातेचे पादवन्दनाकारितां जाते. रस्त्यानें लोकांची मुंग्याप्रमाणें गर्दी होते. बाजीराव जात असतां कोणी त्याचे अंगावर फुलें, कोणी लाह्या, कोणी बुक्का, व कोणी गुलाल

या प्रमाणें सर्व जन वर्षाव करितात. त्यामुळें बाजीराव अधीक धन्यता मानून आपले वाड्यांत जातो.

---

## भाग तेरावा.

निजाम अंगावर आला असतां त्यास फसवून बाजीराव गुजराथेंत गेला आणि तेथें सरबुलंदखान नामें मोंगलाचा सरदार होता त्यास पराजित करून पळवून लावल्याबद्दल चौदावें भागांत सांगितलें आहेच. त्या बुलंदानें नंतर दिल्लीचे बादशाहास कळविलें कीं " बाजीरावानें या मुलखांत दाणादाण करून सोडली आहे, वसूल जमा होईना, माझा टिकाव लागेना, तरी द्रव्य द्वारा मदत करून, तसेंच कांहीं कुमक पाठवून, माझें संरक्षण करावें. " परंतु बादशाहाचे प्रीतींतला सखारामबापू बाजीरावा मार्फत दिल्लीस होताच, त्यानें बुलंदाचें ह्मणणें खोटें आहे असें बादशाहास कळविलें. तेव्हां महंमदशाहानें बुलंदास कांहींएक उत्तर दिलें नाहीं. अशा प्रकारें बुलंदखान निराश्रित झाला पाहून चिमणाजी-आप्पानें लष्करसहित पिटलादेस येऊन त्या शहराची खंडणी घेतली व ढोकळा परगणा लुटला. चिमणाजीचे पत्रावरून बाजीरावानें त्या वेळेस बुलंदास कळविलें कीं " आह्मास गुजराथेची चौथाई व सरदेशमुखी देशील तर आमचा आप्पा तुझें संरक्षण करील. " बाजीरावाचा इतका धाक बसून गेला होता कीं बुलंदखानानें तें ह्मणणें तेव्हांच कबूल केलें आणि सुरतेशिवाय करून एकंदर काळीचा व जकातीचा वसूल यांची निमूटपणें चौथाई व सरदेशमुखी

दिली. या बद्दल बाजीरावानें अडीच हजार स्वार त्याचे मुलुखांत बंदोबस्ताकरितां ठेविले. या प्रमाणें साताऱ्यास असतांच पत्रोपत्रीं बंदोवस्त करून, बाजीराव आंग्र्याचा समाचार घेण्यास जाण्याचे घेतांत होता, तों त्यास चिमणाजीआप्पाचें पत्र आलें, त्यावरून तो एकदम निघून उत्तर हिंदुस्थानांत गेला.

ही संधी पाहून कोल्हापूरकर संभाजीस बंडें करावयास फावलें. सयाजीराव घाडगे ( निजामाचे मुख्य मुत्सदी ) बाजीरावाचा लढाईत जय झाला असें पाहून जे पळाले ते थेट कोल्हापुराकडे मधुनच वळले. संभाजी कडोन त्यास मदतीकरितां सरलष्कर व हिम्मत बहाद्दर ३००० लोकांनिशीं आले होते, त्यांस परत घेऊन ते कोल्हापुरास गेले आणि त्यांनीं संभाजीस सांगितलें कीं बाजीराव उत्तरेंत गुंतला ह्मणजे आपण मोठी फौज घेऊन जाऊन शाहूचे राज्य काबीज करूं आणि प्रतिनिधी वगैरे मंडळी आपल्यास आंतून अनकूल आहेत; तेव्हां हें काम सहज सिद्धीस जाईल. संभाजीस सयाजीचें ह्मणणें खरें वाटलें आणि बाजीराव साताऱ्याहून कधीं जातो त्याकडे त्याचें लक्ष्य लागलें. सन् १७३०सांत बाजीराव उत्तरेंत गेला ही बातमी जासुदानें त्यास कळविल्यावर तो सयाजी सरलष्कर, हिम्मत बहाद्दर आणि घोरपडे यांसह मोठे लष्करानिशीं वारणा नदीच्या उत्तर कांठास आला. त्यांनीं सभोंवारचा मुलुख लुटण्यास सुरुवात केली. सातारचे दरबारचे मुत्सदी आपल्या पक्षास असल्यामुळें जय मिळेल व पुनरपि सातारचें गादीवर बसण्यास सांपडेल, असा त्यास पूर्ण भरंसा होता परंतु दैव-

गति फिरली होती. बाजीरावास जय मिळाल्यामुळे शाहूचे दरबारांत प्रतिनिधीचा बराच अपमान जाहला होता. शिवाय प्रतिनिधीनें लांच खाऊन निजामास फूस दिली होती असें त्यास बाजीराव मार्फत गुप्त बातमी समजली असल्यामुळें शाहू प्रतिनिधीस पूर्वीप्रमाणें मसलत विचारिनासा झाला. हे प्रतिनिधीस वैषम्य वाटून त्यानें बेत केला कीं शाहूस विचारून संभाजीवर जावें, परंतु शाहू ह्मणाला कीं " रावसाहेब! तुमचें आंतून कांहीं कपट असेल, सबब मी परवानगी देतनाहीं " यामुळें प्रतिनिधीचें मनास फारच वाईट वाटलें आणि त्यानें निश्चय केला कीं स्वतां फौज ठेवून संभाजीचा पराभव करावा ह्मणजे आपली योग्यता कमी जाहाली आहे ती पुन्हां वाढेल या इराद्यानें त्यानें जाऊन संभाजीचे छावणिवर हल्ला केला. तेव्हां संभाजी व सयाजी हे गुप्तपणें पळून पुन्हां पन्हाळ्यांत गेले, परंतु श्रीपतरावांनीं, त्या राजाची आई ताराबाई व बायको राजसबाई, यांस कैद करून सातारा किल्ल्यावर आणलें आणि बंदींत घातलें. तेव्हां संभाजीनें पुन्हां निर्लज्जपणानें सयाजीचे सांगण्यावरून शाहूशीं तह केला, त्यांतील कलमें येणें प्रमाणें—

" १ कोंकणचा रत्नागिरी किल्ला शाहूमहाराजांनीं घ्यावा."

" २ मिरज, तासगाव, व अथणी आणि कृष्णा कांठचे इतर गांव जे उत्तरेस असतील ते व तसेंच, विजापुरच्या खालच्या कांहीं गढ्या शाहूमाहाराजांनीं घ्याव्या. "

" ३ व या मोबदला मर्जीप्रमाणें मला गांव द्यावे आणि माझी आई व बायको यांस बंदी मुक्त करावें "

" संभाजी. "

शाहूनें ही विनंती कबूल केली व संभाजीपासून तहांतील सर्व गांव आपले लोक पाठवून ताब्यांत घेवविले आणि भावाची दया येऊन त्यास तुंगभद्रेनजीकचे कोपाळ शहर आणि साळसी पासून अकोल्यापर्यंत कोंकणपट्टी संभाजीकडे लावून दिली आणि त्याचे बायकांस जाण्याची परवानगी दिली.

या प्रमाणें संभाजीजवळ संधान लाविलें असतां तेथें मनांतील कांहीं एक हेतु सिद्धीस गेला नाहीं, त्यामुळें सयाजी फार नाखुष जाहला. तरी हातीं धरलेलें कार्य शेवटास नेल्यावांचून कधीं राहूंनये असा त्याचे मनाचा दृढनिश्चय असल्यामुळें तो स्वस्थ बसला नाहीं. तो पुन्हां निजामाकडे गेला. परंतु बाजीरावाच्या पराक्रमाविषयीं त्याची खात्री झाल्याकारणानें तो निजाम पुन्हां उघडपणें लढण्यास कबूल होईना. तरी त्या सयाजीनें निजामापासून इतकें वचन घेतलें कीं " द्रव्यद्वारा लागेल तितकी गुप्तपणें मदत करीन. " नंतर तो सयाजी वेष पालटून तेथून साताऱ्यास आला. तेथें प्रतिनिधीनें निजामाप्रमाणेंच सल्ला दिली. बाजीरावाचे धाकानें त्याच्यानें याहून जास्त सहाय्य करवेना. नंतर सयाजीनें दाभाडे सेनापतीची मदत घेतली. आणि पिलाजी गायकवाड व उदाजी पोंवार यांस सहाय्य करण्यास अगत्य येण्याविषयीं प्रतिनिधी मार्फत चोरून पत्रें लिहिवलीं आणि त्याचे परम मित्र कांताजी बांडे व चिमणाजी दामोदर पंडित गुजराथ खानदेश वगैरे देशांत लुटारुपणा करीत होते, त्यांसही सहाय्यास येण्याविषयीं आमंत्रण केलें. त्या सर्वांकडोन रुकार पत्रें येतांच, ३५००० हजार फौजेनिशीं सयाजीस बरोबर घेऊन त्रिंबकराव दाभाडे सेनापति बाजीरावाचा

पराभव करण्यास निघाला. तेव्हां त्यानें सर्व लोकांस जाहीर केलें कीं " बाजीराव मदोन्मत्त होऊन स्वतंत्रपणें राज्य कमावून वागूं लागला आहे. यासाठीं आह्मी बाजीरावावर स्वारी करीत आहोंत, तर ज्यास स्वामिभक्ति असेल त्यांनीं येऊन मिळावें." हें वृत्त बाजीरावास कळतांच त्यानें माळव्यांतील सर्व बदोबस्त चिमणाजीअप्पाकडे सोंपविला, व खानदेशांत स्वतांचे लष्कर ठेविलें आणि मल्हारराव व राणोजी याणीं आपल्यास तावडतोब साताऱ्यास येऊन मिळावें ह्मणून आज्ञापत्रें लिहिलीं, आणि आपण स्वतः पुण्यास गेला.

"मी निजामाचा पराजय केला त्या मुळें या दरबारीं दाभाड्यादि मुत्सद्दी मंडळीचा अर्थात् अपमान झाला आहे, तो त्यास सहन न होऊन कोणाकिडून तरी माझा सूड साधावा या हेतूनें निजामाची आंतून मदत घेऊन त्रिंबकराव सेनापति अफाट फौजेनिशीं माझें पारिपत्य करण्यास गेले आहेत!!! त्यांचा हेतु अर्थात दुष्ट आहे. मी या वेळेस निर्बळ आहे ह्मटलें पाहिजे, कारण त्यांचे सैन्याशीं टिकावकरण्याजोगे मजपाशीं लोक नाहींत. महाराजाचे चाकरींतील लोक बहुतेक त्यास मिळाले आहेत, तरी या वेळेस तुह्मांस माझें अगत्य असेल तर मला मिळा. त्यांचे निम्मे लोकांइतके कां होईनांत, पण शिपाई खरे व शूर, मला सहाय्य करतील तर मी विलंब न करितां त्या शत्रूचे पारिपत्यास जातो. सेनापती व तो निजामडा या दोघांचे मनास आपल्या राज्याचे दोन विभाग करून स्वतांत वाटून घ्यावयाचे आहेत असें ऐकतो. हें कृत्य आर्य धर्मास अति विरुद्ध. तर मी सर्वांची प्रार्थना करतो, 'ज्यांस या गादीची सुरक्षितपणाची खरी कळकळ असेल

त्यांनीं मला मिळावें.' ह्मणजे त्यांसह जाऊन मी सत्वर त्या नीच शत्रूस कैद करून आणतो. घरांतच शत्रु उत्पन्न होऊन सार्वजनिक हितांचे कामास अडथळा येत आहे;" वगैरे आशयाचा बाजीरावानें धावडशीचे साधूस व शाहूस आणि इतर प्रमुख सरदारांस पत्रें पाठवून मजकूर कळविला आणि "कांहीं फिकीर नाहीं. तुह्मास यश मिळेल" अशीं उत्तरें आल्यावर बाजीराव सेनापतीशीं लढण्यास निघाले. तो संग्रामविद्येंत निपूण असे. यामुळें थोडक्या अवकाशांत ५००० लोक, आपण होऊन बाजीरावास मिळाले. बाजीराव करील त्यांत तो हटकून सिद्धी पावतो अशाबद्दल मागें निजामास जिंकलें तेव्हांपासून त्या लोकांचा पूर्ण भरंसा होता. तसेंच इतर सरदाराप्रमाणें आपण विलास भोगून शिपायांस जाचणारा हा नव्हे; खरोखर वीर असून प्रसंग पडेल तेव्हां सर्वांबरोबर पडेल तें काम करणारा आहे, अशी बाजीरावाची ख्याती होती; त्यामुळें त्या शिपायी लोकांस उत्तेजन आलें. ते ५०००, बरोबरचे सुमारें २०००, पुण्यास मिळविलेले ३०००, एकूण १०००० लोकांची पटाईत फौजबरोबर घेऊन बाजीराव पुण्याहून निघाला. तो नर्मदा उतरून पलिकडे गेला. तेव्हां त्याची बिनी, पुढें चालली असतां तिजवर, पिलाजीचा पुत्र दमाजी गायकवाड यानें अवचित् घाला घातला. त्यामुळें बिनीवाल्यांचा पराजय झाला. हें दुश्चिन्ह आपले लोकांचे मनांत चमत्कारीक तऱ्हेचे विचार उत्पन्न करील असें बाजीरावास वाटून तो बेधडक दाभाड्याचे सैन्यावर चालून गेला. हा त्याचे लोकांचा अप्रतीम हिय्या पाहून दाभाड्याचे नवीन ठेवलेले अशिक्षित लोक

घाबरून गेले. त्यांच्यानें ' मरूं अथवा मारूं ' अशी प्रतिज्ञा केलेल्या लोकांबरोबर टिकाव धरण्याचें होईना. त्रिंबकराव दाभाडे याणें त्यांस अतिशय उत्तेजन दिलें, परंतु तें सर्व व्यर्थ गेलें. कांताजी बांडे व ते लोक पळून गेले. इतका प्रकार घडत आहे तों रात्र झाली ह्मणून लढाई थांबली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं, बाजीराव पहाटेस उठून मुखमार्जन करून भवानीचे देवालयांत देवीचे दर्शनास गेला. अशी संधी पाहून त्रिंबकराव दाभाड्यानें त्या देवळावर तोफ उडविली. त्या सरसें देऊळ पडलें. एकाएकी ही अनर्थाची बातमी बाजीरावाचे लोकांस लागतांच त्यांची दाणादाण उडाली. ते घाबरून गेल्यामुळें त्यानां कांहीं सुचेनासें झालें. हें पाहून दाभाड्यांनीं आपले लोकांस इशारा दिला. व उदाजी पोंवार, दमाजी गायकवाड, चिमणाजी पंडित, यांजपाशीं निरनिराळे लोक देऊन बाजीरावाचे लोकांभोंवती त्यांनीं एकदम गराडा घातला. असें संकट प्राप्त झालें असतां बाजीरावाकडील सरदार फत्तेसिंग भोसले यानें धैर्य धरलें. त्यानें शंभूसिंग जाधवास २००० लोक बरोबर देऊन गायकवाडाशीं संग्राम करण्यास सांगितलें आणि आपण २००० बरोबर घेऊन त्रिंबकराव दाभाड्याशीं सामना करूं लागला. सुभानराव काकड्यानें उदाजी पोंवाराशीं १००० । २००० लोकांनिशीं झगडा चालविला व सरलष्करानें चिमणाजीपंडिताचे लोकांस बंदुकीचे गोळ्यानें व तीरानें जेर केलें. धनाजी लोखंड्यांनीं १००० । २००० लोकांची मदत घेऊन देवीचे देऊळाचा भाग, जो बाजीरावाचे अंगावर पडला होता तो, मोठ्या त्वरेनें शत्रूंकडील

लोकांचे अंगावर फेंकला; व या रीतीनें तो सारा ढीग दूर केला, तेव्हां त्यास बाजीरावाचें शरीर आंत सुरक्षीत दिसलें. त्यांचे आंगास थोडी बहुत इजा झाली होती खरी, तथापि देवीची मूर्ति त्यांच्या अंगावर पालथी पडल्या कारणानें तें बचावले गेले. बाजीरावानें सावध होऊन लागलींच आपले लोकांस कळविलें 'कीं हें सुचिन्हच झालें. संकट समयीं मला साक्षात् देवीनें आपले अंगावर विघ्नाचा भार सोसून वांचविलें आहे. त्या अर्थी या लढाईत अर्थात जय होईल. देवी प्रसन्न आहे. निकरानें लढा.' हें सांगणें त्यांचे शूर शिपायांस शब्दशः खरें वाटलें. व शिवाय उत्तेजन देणारा त्यांनीं आपला वीर प्रत्यक्ष सजीव पाहिला, तेंव्हां त्यानां अतिशय स्फुरण आलें. व त्यानीं चिमणाजी पंडिताचे लोकांचा पाडाव केला. त्यामुळें हरहर महादेव असा जो एकदम चोहींकडे विजयध्वनी पसरला, तेणें करून बाजीरावाचें सारें सैन्य अरिसैन्यावर तुटून पडलें. त्यामुळें त्रिंबकरावाचे बहुतेक लोक पडले. उदाजी पोंवारास सुभानराव काकड्यानें मारून त्याचे लोकांस कैद केलें. अशी आपले पक्षाची शत्रूकडील लोकांनीं धूळदाण केलेली पाहून त्रिंबकरावास फार वाईट वाटलें, व त्यानें आपले परातनपासून चाकरीस असलेले शिपायास शपथ घालून धैर्यानें लढण्यास सांगितलें. तो हत्तीवर बसला होता. परंतु आणीबाणीची वेळ आली तेव्हां एकदम त्यानें खालीं उडी टाकली. आणि स्वतःहत्तीचे पाय साखळदंडानें बांधून आपण शौर्य धरून लोकांस उत्तेजन देत त्याच जागीं युद्धास तो उभा राहिला. नवळचा दारूगोळा संपल्यामुळें त्यानें तिरंदाजी आरंभिली.

हें पाहून बाजीरावानेंही घोड्यावरून उडी टाकली आणि एका शिपायाआड दडून त्रिंबकराव दाभाड्यावर बंदुकीनें निशाण धरलें. तें पाहून 'हुषार व्हा, अण्णांचा नेम चुकवा, संभाळा, संभाळा,' असा एकाएकीं सेनापतीचे फौजेंत गिल्ला झाला. आणि त्रिंबकराव पळून शिपाया आड लपणार, तों बाजीरावाचे बंदुकींतील गोळी नेमकी त्या सेनापतीचे छातीवर लागली आणि तो धाडदिशी रणांगणीं पडून मेला. नंतर लढाई फार वेळ टिकली नाहीं. सेनापतीचे लोक थोडे वेळ लढले. कांहीं मेले, कांहीं जखमी झाले आणि बाकी जे जिवंत राहिले, ते मुकाट्यानें आपलीं हत्यारें खालीं ठेवून बाजीरावास शरण आले. जाउजी दाभाडा, मालोजी पवार, आणि पिलाजी गायकवाडाचा मुलगा दमाजी, हे घायाळ होऊन शत्रूचे स्वाधीन झाले. आनंदराव पोवार व पिलाजी गायकवाड यांस शंभूसिंगानें पांच सहा वार केले होते परंतु शोधांतीं त्यांचा थांग लागला नाहीं. ही अपसाआपसांतील मराठे लोकांची लढाई बडोदे आणि दुभाय या मध्यें सन् १७३१ सालीं झाली. पिलाजीनें पुढें शरण आल्याचें पत्र पाठविलें, व 'निजामास मी मुळींच सामील नाहीं इतकेंच नव्हे, तुह्मी दक्षिणेंत खुशाल राज्य करा,' मी सेवेंत तत्पर राहीन असेंही त्यानें कळविलें. मग बाजीराव कैद केलेल्या लोकांस घेऊन, सातान्यास आला. या वेळेसही शाहूनें समारंभानें पंतप्रधानाचा आदर सत्कार केला व दिल्लीचे बादशहास जिंकण्याची आज्ञा केली.

# भाग चौदावा.

माळव्यांत राजा गिरीधर होता. त्यास चिमणाजी दामोदर पंडित व उदाजी पोंवार यांनीं लढाईत ठार केला होता. त्याचा आप्त दयाबहादूर असे. तो त्यावेळीं लढण्यास तयार जाहला. परंतु उदाजी व चिमणाजी पंडित यास सेनापतीनें बाजीरावाशीं लढण्यास बोलाविलें असल्यामुळें त्यानां दयाबहादुरांशीं युद्ध करण्यास अवकाश सांपडला नाहीं. तरी दयाबहादुराचें प्राबल्य वाढलें असें नाहीं. कारण चिमणाजी अप्पा, पिलाजी जाधव, आणि मल्हारराव होळकर, हे त्याचा समाचार घेण्यास तेथें सिद्ध होतेच. त्यांनीं त्यावर एक दोन स्वाऱ्या केल्या. त्यांमध्यें तो मारला गेला. अशा रीतीनें सर्व माळव्याचा अधिकार सन १७३२ त चिमाजीअप्पाकडे आला. त्यावेळीं बाजीराव माळव्यांत आला आणि त्यानें अप्पास कोंकणांतील बंदोवस्त राखण्यास पाठविलें; व इंदुरच्या गादीवर मल्हाररावास, आणि ग्वाल्हेरीचे गादीवर राणोजी शिंद्यास, बसविलें आणि आपण मुलखांत स्वाऱ्या घालून खंडणी घेऊं लागला. इतक्यांत दिल्लीचे बादशाहानें महंमदबंगष यास दयाब्रहादुराचे जागीं पाठविलें. तो आपले अधिकाराचे जागीं आल्यावर त्याला असें समजलें कीं बाजीराव सारा प्रांत बळकावून बसला आहे. बाजीरावाची कीर्ति दिगन्तांत पसरल्यामुळें बंगषासही विश्रुत होतीच ह्मणून त्यानें शहाणपणानें बाजीशीं न लढतां बुंदेलखंडांत जाऊन चतुरसालनामें तेथील अधिपति होता त्याजवर आपलें हत्यार धरलें. तेव्हां

चतुरसालानें बाजीरावास मदत मागितली. बाजीरावानें लागलींच कांहीं सराईत लोक बरोबर देऊन त्यास कुमक केली आणि महंमदबंगषाला त्याचे मुलखांतून हद्दपार केलें. त्यावरून तो चतुरसाल राजा प्रसन्न जाहला आणि बाजीरावास एक किल्ला व सवादोन लाख रुपये उत्पन्नाचा झाशी जवळील कांहीं प्रांत बक्षिस दिला. पुढें कांहीं दिवसांनीं तो मेल्यावर त्याचे राजाचा तिसरा हिस्सा बाजीरावास अनायासानें मिळाला व बाकी राहिलेले दोन त्या राजाचे पुत्रांनीं वाटून घेतले.

बंगषानंतर बादशाहानें जयपुरचा राजा जयसिंग यास माळवा व आग्रा येथील सुभेदारी दिली. परंतु जयसिंग हा बाजीरावाचा परम मित्र असल्यामुळें माळव्याचें सर्व राज्य अर्थात् बाजीरावाचें ताब्यांत आलें. ही गोष्ट सन १७३४ त घडली. नंतर दिल्लीचे बादशाहावर स्वारी करण्याच्या बेतांत बाजीराव असतां, त्याला एका एकीं महाराष्ट्र देशांत परत जावें लागलें.

उत्तर कोकणांत अल्लीबागेस चांचेपणा करून कान्होजी आंग्रे राहात असे. त्याचे मागें " सखाजी " राज्यावर बसला होता. परंतु तो मेल्यानंतर संभाजी म्हणून त्याचा दुसरा मुलगा होता तो गादीवर बसला. त्यानें एसाजी व मानाजी या नांवाचे आपले सावत्र भावास कुलाब्यांत ठेवून त्यांजकडोन मुलखाचा व किल्ल्याचा आणि फौजेचा बंदोबस्त ठेवविला. पुढें कांहीं क्षुल्लक कारणावरून मानाजीनें पोर्तुगीज लोकांस कपटानें किल्ल्यांत आणून, येसाजीचे डोळे काढवून, त्याला बंदींत ठेवलें. हें कृत्य संभाजीस न

आवडून तो मानाजीचे पारिपत्यार्थ गेला. परंतु चिमणाजी अप्पा त्यास सहाय्य असल्यामुळें संभाजीचें कांहींएक चाललें नाहीं. अप्पानीं उत्तम मदत दिल्याबद्दल कुतळा व राजमाची हे दोन किल्ले त्यास मानाजीकडोन मिळाले. इतक्यांत दुसरी भानगड उपस्थित जाहली. जंजीऱ्याचा शिद्दी मदोन्मत्त जाहला होता व प्रतिनिधी श्रीपतराव दोन वेळां मोठी फौज घेऊन त्याचा पराभव करण्यास गेले तरि तो हटेना. तेव्हां अर्थात् शाहूमहाराजानीं बाजीरावास बोलावून त्यावर जाण्यास सांगितलें.

बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचा भाऊ, जानोजी कोंकणांत असतां त्यास जंजीऱ्यांतील हबशी लोकांनीं जुलमानें पकडून नेऊन व पोत्यांत घालून व कोंडमारा करून आणि समुद्रांत फेंकून देऊन मारिलें होतें. हें वृत्त लहान असतां बाजीरावानें आपल्या मातापितरांचे मुखांतून ऐकिलें होतें. तेव्हांच त्यानें अशी प्रतिज्ञा केली होती कीं "मी खरोखर बाजीराव असेन तर जंजीऱ्याचे हबसी लोकांस जर्जर केल्यावांचून रहाणार नाहीं". ही त्याची बालपणची शपथ सत्य होण्याचा हा समय आला आहे असें वाटून बाजीराव माळव्याहून निघून तडक दंडराजपुरीस गेला. तेथें त्यास सिद्दीचे विरुद्ध पक्षास असलेले रहिमान व याकूब नामें मोठे सरदार मिळाले. बाजीरावानें लागलींच तळें व घोसाळें हे दोन किल्ले काबीज केले. रायगड प्रतिनिधींनीं घेतला होता. या समयीं सिद्दी रह्मान लढण्यास सिद्ध झाला. बाजीरावानें जाऊन जंजीऱ्यास खुष्की वरून मोरचे लावले आणि तोफांचा भडिमार चालविला. चिमणाजी अप्पा व मानाजी हे समुद्रांत

आले आणि त्यांनीं तेथून तोफा मारल्या. या प्रमाणें हल्ले झाले. तरि सिद्दीरह्यान कांहीं दिवस निकरानें लढला. परंतु किल्यांतील सामग्री संपूंलागली व बाहेरून पदार्थ येण्याचे मार्ग बंद झाले, तेव्हां पुरवठा होण्याची आशा न राहिल्यामुळें सिद्दीरह्यानानें तहाचें बोलणें सुरूंकेलें. परंतु बाजीरावाचें ह्मणणें पडलें कीं त्या सिध्यानें माझे कैदेंत यावे, नाहीं तर मी कधीं स्वस्थ बसणार नाहीं. तेव्हां तह होण्याची आशा दिसेना. त्या एकट्या सिद्दीच्या चुरशीनें आपला सर्वांचा नाश करून घेणें चांगलें नव्हे असें जंजीऱ्यांतील कित्येक लोकांस वाटून त्यांनीं, हा शिद्दीरह्यान किल्याचे तटावर उभा राहिला आहे अशी संधी पाहून त्यास समुद्रांत ढकलून दिलें. त्यामुळें सारे हबशीलोक शरण आले व बाजीरावास यश मिळालें. त्यानें जंजीऱ्याचे गादीवर रहिमानसिद्दीस बसविलें. त्यावेळीं अकरा महालांचें अर्धेउत्पन्न, रायगड, तळें, घोसाळें व उचितगड आणि बिरवाडी, इतके प्रांत बाजीरावानें आपले ताब्यांत घेतले आणि तो परिवारासह साताऱ्यास आला. तेथें शाहूमहाराजांनीं त्याचा जयोत्साह मोठ्या समारंभाचा केला. पूर्वी बाजीरावानें निजामाचा पराभव केला होता. परंतु त्यापेक्षां या वेळीं त्यास जास्त आनंद वाटला, कारण तेव्हां प्रतिनिधीवर नक्षा केलेला नव्हता आणि हल्लीचे समयास प्रतिनिधीनीं ज्या शत्रूस हात टेकले त्याचा पाडाव झाला हें अधीक भूषणास्पद जाहलें. बाजीरावानें मिळविलेल्या सर्व स्थलांची सुभेदारी त्याच्या सांगण्यावरून शाहूमहाराजानें मोठ्या संतोषानें चिमणाजी अप्पास दिली. नंतर बाजीराव सहकुटुंब सहपरिवार पुण्यास गेला. आणि तेथील

शनिवारवाडा नुकताच बांधून तयार झाला होता त्यांत वास्तुशांत वगैरे धर्मोक्त विधी करून राहण्यास गेला. या वेळेसच पुणें शहर " वसलें " ह्मटलें पाहिजे. कारण पूर्वी काय जी थोडी वस्ती होती, ती शेकसल्याजवळ, मुसलमानाची व कसब्यांत, मुख्यत्वें देशस्थ ब्राह्मणांची. बाजीरावास गणपतीची मोठी भक्ती असे. ह्मणून त्यानें कसब्यांत एक देवालय बांधलें व एक शनवार वाड्यांत त्या देवाकरितां निराळा महाल राखून तेथें गणपतीच्या उत्कृष्ट मूर्त्ति स्थापन केल्या. हल्लीं या कसब्यांतील गणपतीची पुण्यांत लोक इतकी भक्ति करतात कीं कित्येक त्याचें दर्शन घेतल्यावांचून रहात नाहींत. एकंदर ब्राह्मण ह्मणून जितके आहेत तितक्यांच्या येथें लग्न कार्य असल्यास या गणपतीसच प्रथम अक्षद जाते व तदनंतर इतर देवांस. बाजीरावाचे आईनें पुण्यांत आल्यावर दिराचे स्मरणार्थ अमृतेश्वराचें देऊळ बांधविलें. या प्रमाणें घरगुती व्यवहारांची व्यवस्था लावून बाजीराव परत माळव्यांत जाणार तों आवडी बाळंतीण होऊन पुत्र प्रसवली. मग काय ? बाजीरावानें जितका पैसा फौजेस पगारवाटण्याकरितां अनेक सावकारांपासून कर्ज काढला होता, तितका सर्व या नवीन बालाचें कौतुक करण्यांत खर्च केला. या पुत्राचें नांव, त्याणें बारावे दिवशीं मोठा समारंभ करून, " समशेर बहाद्दर " ठेविलें.

# भाग पंधरावा.

समशेर बहादराचें कौतुक करीत आवडीचे मर्जीनें आणखीही पुष्कळ दिवस बाजीरावानें पुण्यातच घालविले असते; परंतु मल्हाररावाचें पत्र आलें त्यामुळें त्यास तावडतोब पुणें शहर सोडून माळव्यांत जावें लागलें. मल्हारराव होळकरानें गुजराथेंत जाऊन अमदाबादेशेजारचे बरेच गांव लुटले. नंतर तो आग्र्याचे पलिकडे स्वाऱ्या करूं लागला. त्या वेळेस दिल्लीचे बादशाहाचा वजीर खानडौरान नामें होता. त्याणें आपले भावाबरोबर अफाट सैन्य दिलें आणि मल्हाररावावर पाठविलें. सरोजपर्यंत जाऊन तें सैन्य मागें फिरलें आणि दिल्लीस जाऊन त्यानें आपल्या भावास कळविलें कीं मी मराठ्यांस हिंदुस्थानाबाहेर हांकून लावून आलों. महमदबादशाहा जरी नांवाला सर्व हिंदुस्थानचें राज्य करीत होता, तरी दिल्ली खेरीज बाहेरील कोणतेही गांव त्यानें पाहिले नव्हते. त्यास वजीराचे भावानें बढाईमारलेला पराक्रम खरा असावासें वाटलें आणि त्याबद्दल जयोत्साह करण्याकरितां त्यानें मोठा दरबार भरविला. इतक्यांत जयसिंगानें बाजीरावाचें पत्र आणलें. तें पाहून बादशहा रागानें पुसतो. "कोण आहे हा बाजीराव ?"

**जयशिंग.**—सातारचे राजाचा प्रधान.

**बादशहा.**—आमचे शिवाय दुसरा राजा कोण आहे ? आणि त्या राजाला प्रधान ठेवण्यास कोणी अधिकार दिला ?

**सखाराम.**—(पेशव्यांचा वकील) खुदावंत. मी ज्यांच्या मार्फत या दरबारांत वकील आहे त्या शाहूचे पेशवे ते.

**बादशाहा.**—सातारचा जमीनदार ?

**सखाराम.**—होय खावंद.

**बादशाहा.**—मग आमचे पदरचाच तो.

**जयशिंग.**—( अभिमानानें ) होय सरकार ! आपण मुख्य बादशाहा खरे. तरी आमचे सारखे कांहीं राजे आपले मुलुखांत आहेत.

**बादशाहा.**—असतील ! ! मग ?

**जयशिंग.**—त्यांनीं माळवा मुलुख स्वतः करितां पृथक् मागितला आहे. शिवाय सरबुलंदखान गुजराथेंत असतां त्यांनीं त्यास तेथील सरदेशमुखी देऊं केली होती ती देण्याविषयीं आपली आज्ञा व्हावी ह्मणून ते ह्मणतात.

**वजीर.**—( मनांत ) त्या निजामास देण्यापेक्षां परकी मनुष्यास दिली तरी चिंता नाहीं. कसें झालें तरी ते आपल्या हाता खालचे आहेत. प्रसंगीं उपयोगीं पडतील. निदान त्यांचे हातून आपलें कांहीं वाईट होणार नाहीं. ( मोठ्यानें ) देण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं.

**बादशाहा.**—बिरव्हल ! बरें आहे. द्या. त्याचें मागणें कबूल करा.

**तुराणी मोंगल.**—( आग्रहानें ) छे ! छे ! सरकार ! मुसलमानास द्यावयाचें टाकून येवढे मोठे राज्याचा अधिकार आपण हिंदूस देतां हें काय ?

असा तुराणी मोंगलाचा आग्रह पाहिल्यावर त्या वेळेस खानडौरान कांहीं बोलला नाहीं. मग कांहीं वेळानें तो एकांतांत बादशाहास ह्मणाला कीं— “ माझे वकिलानें त्याजपाशीं जावें; आणि [ आपण या सनदेवर सही करावी ]

( बादशाहा सही करतो. ) ही सनद त्यानें बाजीरावास प्रथम न देतां, सरकारखारी तुमचें ह्मणणें ऐकत नाहीं ह्मणून निरोप कळवावा, परंतु तो नच ऐकेल तर मात्र त्यास द्यावी." बादशाहा अक्कलेचा खंदकच. त्यास वजीराचे युक्तींतील लेशही कळला नाहीं. दरवेशी किंवा गारोडी सांगतो त्याप्रमाणें अस्वल अथवा नाग वागतो; परंतु त्यांजकडून खेळ करवून तो तमासगीर आपल्या स्वतांकारितां पैसे मिळवीत आहे हें जसें त्या अक्कलशून्य प्राण्यास कळत नाहीं त्या प्रमाणेंच या मिजाशी बादशाहाची अवस्था असे. वजीरानें वागविलें तसा तो वागला, पण त्याला त्यांतली गोम कळली नाहीं. सखाराम बापूस ही खानडौरानच्या निरोपाची गुप्त बातमी कळतांच त्यानें ती लागलीच आपले यजमानास कळविली. मग त्यानें खानडौरानचा वकील मुलाकतीस आला व नाकारूं लागला तेव्हां धमकी देऊन जास्त मागणें केलें. त्यावरून तो वकील परत दिल्लीस आला. एके दिवशीं दरबारांत बादशाहा बसला असतां हा वकील तेथें गेला. त्यास महमद पुसतो, " कां साफ नाहीं ह्मणून सांगितलें कां नाहीं ? "

**वकील.**–खावंद ! नाहीं कशाचें ? मी तर सरकार ! त्याला पहातांच घाबरून गेलों. आणि ( वजीरास उद्देशून ) खानसाहेबानीं सांगितल्याप्रमाणें मेहेरबानीनें सनद दिली आहे असें बोललों. पण त्याला कोठें त्याचा उपकार आहे ? त्यानें विलक्षण मागणें केलें आहे.

**बादशाहा.**–काय ?

**वकील.**– ( कागद वाचतो. )

१ संपूर्ण माळव्याची जाहागिरी द्यावी.

२ मांडू, धार, रेमीन हे किल्ले द्यावेत.

३ चंबळा नदीचे दक्षिणचा मुलुख जाहागीर द्यावा आणि तेथील फौजदारी अम्मल मिळावा.

४ पन्नास लाख रुपये सरकारी खजिन्यांतून द्यावे.

५ दक्षिणेंतील सहा सुभ्यांची सरदेशपांडेपणाची सनद द्यावी.

**बादशाहा.**— ( विस्मयानें ) आणखी आमचें राज्यच नाहींकां मागत ? चमत्कार आहे ! ! !

**वजीर.**—सरकार कांहींतरी देणें रास्त आहे. कसा झाला तरि तो आपले हाताखालचा चाकरकां ह्मणानां ? पण कांहीं देऊन त्याचें मनाचा संतोष राखावा हें आपले सारख्यांस उचित होय. आपले कृपेनें कितीक पोसतात त्यांतला हा एक.

**बादशाहा.**—बरें काय कबूल करावें ह्मणतां ?

**वजीर.**— ( मनांत ) बाकी देण्यांत काय अर्थ आहे ? निजाम जिकडे आहे तिकडे हा असला ह्मणजे चांगलें. दोघेही भांडतां भांडतां अपसुकनाश पावतील, व त्यांत आपलें कार्य साधेल. हो हीच युक्ती पसंत. ( मोठ्यानें ) दक्षिणेंतील सहा सुभ्याचे सरदेशपांडेपण द्यावें.

**बादशाहा.**—फारउत्तम, लिहा सनद. ( वजीर लिहितो आणि यजमानापाशीं कागद देतो. ) करूं सही ? ( सही करितो ). ठोका मोर्तब ( मोरतब ठोकल्यावर ) पाठवा, आतांचे आतां स्वाराबरोबर जाऊं द्या. पण त्या कडोन नजर काय ?

**वजीर.**—सहा लक्ष रुपये.

**बादशाहा.**—घाला शोध.

वजीरानें शोध घालून लखोटा स्वाराजवळ देऊन बाजी-रावाकडे पाठविला. हें वर्तमान एकान्तांत झालें, तरी तेव्हांच बाहेर फुटलें आणि तुराणी मोंगल दरबारीं येऊन ह्मणूं लागले कीं " सरकार ! हा बाजीराव कोणता तें समजलें कां ? "

**बादशाहा.**—कोणाला माहीत ? असेल कोणी !

**मोंगल सरदार.**—छे, छे, तो राजनिष्ठ नाहीं. आपला तर मुख्य अपराधी आहे. मागें निजाम साहेबांवर नूरजहान पळविल्याचें तुफान आलें होतें व मागाहून खरोखर समजलें ज्या गृहस्थाचें नांव, तोच हा, असा आह्मास आतां पक्का शोध लागला आहे. आणि आपण त्या कुत्र्यास सनद देतां हें आहे काय ? जर हुकूम होईल तर आह्मी त्याला ठार मारून आणूं.

**दुसरा सरदार.**—होय सरकार ! हुकूम द्यावा.

**बादशाहा.**—तुमच्या सारखे वीर, महावीर कशाला हावेत त्याला ? त्या चिलटाला चिरडायला किती उशीर आहे? कोणी तरी साधारण सरदार त्याच्यावर—

**वजीर.**—चिलट नव्हे. त्यानें निजाम साहेबापासून दक्षिणेंत असतां त्याला बेजारकरून तहनामा लिहून घेतला आहे.

**दुसरा सरदार.**—सरकार ! मग यांनीं अशा नीचाला कां सरदेशपांडेपण देवविलें ?

**बादशाहा.**—कां हो तुह्मी विरबल्ल! द्यायला सांगितलेंत?

**वजीर.**—माफी असावी खुदावंत ! तेव्हां निजामसाहेबावर आपला राग होता. ह्मणून प्रत्येक कामांत त्याचें नुकसान करीत जा असें आपण सांगितलें नव्हतें कां ?

**बादशाहा.**—हो, पण मस्तानीला या बाज्यानें पळविली झणून मागाहून पत्र आलें होतें हें तुह्मास ठाऊक नाहीं ?

**वजीर.**—नाहीं सरकार ! आपण दाखविलें नव्हतें.

**बादशाहा.**—मग विचारायला नव्हतें कां येत तुह्माला ? असो, आतां काय सल्ला आहे तुमची ?

**वजीर.**—तो मोठा प्रतापी आहे. त्यावर मीरकमरू अ-दीन यास मोठें सैन्य देऊन पाठवावें.

**सरदार.**—खुद्द सेनापतीस त्या माकडामुळें कशास तसदी ? आह्मी जातो.

**बादशाहा.**—फार उत्तम आहे. त्याला जिंकून यालच.

**सरदार.**—हो हो. याच ठिकाणीं त्याचें शीर आणतो. तो आमचें अफाट सैन्य पाहिल्याबरोबरच भिऊन जाईल.

या प्रमाणें बादशहाची परवानगी घेऊन अबदुल करीम, मुजफर खान, आजिमखान वगैरे वडेवडे मिजाशी सरदार पुष्कळ लष्कर जमाकरून निघाले. तेव्हां त्यास वाटलें कीं कोणी साधारण वेडवाल्यास पकडून आणावयास चाललों आहों. परंतु त्यांचा भ्रम लवकरच नाहींसा झाला.

इकडे सखारामबापू कडून मोंगल लढाईस प्रवृत्त झाल्याचें वर्तमान कळल्यावरोबर बाजीराव बुंदेलखंडांत गेला, आणि तेथें त्यानें आपल्या लष्कराचें जड जड सामान मित्र जगत्‌राज याजपाशीं ठेवलें, आणि कामापुरतें आपले बरोबर घेतलें व आग्र्यापासून वीस कोसावर दक्षिणेस यमुना तीरीं तळ दिला. याच समयास मल्हारराव होळकर व दुसरे त्याचे सरदार, बरेच लोकांनिशीं यमुने पलिकडे दुवाब येथें ये-ऊन धडकले. तेव्हां दिल्लीहून आलेल्या मोंगल सरदारांस

मोठी भीति वाटली. आणि ते बाजीरावाचे लोकांस न कळूं देतां पळून दिल्लीस आले आणि तेथें त्यांणीं प्रौढी मिरविली कीं " आह्मी मराठ्यांस चंबळा नदीचे पार करून आलों. " हें सांगणें बादशहास खरें वाटलें आणि त्यानें शेफारून सखारामबापूस आपले दरबारांतून घालवून दिलें. तो तसाच बाजीरावाकडे आला व त्याला झालेला वृत्तांत कळविला. नंतर बाजीरावानें स्वाराबरोबर बादशहास पत्र पाठविलें. तें दरबारांत तो बादशहा वलगना करीत बसला असतांना स्वारानें नेऊन दिलें. त्या वेळेस बादशाहानें तें वजीरास वाचावयास सांगितलें. वजीर तें घेऊन वाचतो:—

" आह्मी मागितल्याप्रमाणें सनदेंत हक्क न देतां आपले कडोन आह्मास व्यर्थ धमकी मिळाली. एवढेंच नाहीं. विनाकारण आपण आमच्याशीं युद्ध करण्यास दुराणी सरदार व लष्कर पाठविलें होतें. बरें त्यांणीं तरि लढून जय मिळवून जावयाचें होतें; तेंहि केलें नाहीं. आमचे शूर सरदार मल्हारराव होळकर यांनीं जरा चुटका दाखविला नाहीं तोंच ते दुराणी जीव घेऊन दिल्लीस पळून गेले. असें असतां त्यांनीं आपलेपाशीं पोकळ बढाई मारली आणि चमत्कार हा कीं आपण त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्वस्थ बसलां आहां, आणि आपण आमच्या वकीलास विनाकारण हांकलून दिलें, हें चांगलें नाहीं. संभाळून असा. आमचे मराठे लोक दिल्लीच्या दरवाज्याजवळ येऊन ठेपले ह्मणून समजा. फार काय लिहावें. कळावें. छ. १० रमजान.

बाजीराव.

पंतप्रधान नि० छत्रपति सातारकर.

**बादशाहा.**—काय हो बिरबल ! आतां काय तजवीज ? मला वाटतें ज्या सरदारांनीं आपल्यास फसविलें त्यांस आधीं सुळीं द्यावें.

**वजीर.**—( सूड उगविण्याचे हेतूनें ) हो हो. तसेंच केलें पाहिजे.

**बादशाहा.**—द्या हुकूम.

**वजीर.**—( हुकूम लिहितो व बादशाहा सही करितो. ) शिपाइ ! घेऊन जा हा हुकूम काजी साहेबांकडे आणि सांग, त्यांत फर्माविल्याप्रमाणें शिक्षा द्या. आज दुपारीं बारा वाजतां अमलांत आलीच पाहिजे.

**बादशाहा.**—आतां उपाय काय ! आपलें लष्कर कसें काय लढाईचे कामांत तरबेज आहे ?

**वजीर.**—सर्व उत्तम व्यवस्था आहे. बिल्कूल काळजी करूं नये.

**बादशाहा.**—तरी मला वाटतें कीं निजामाला या प्रसंगास बोलवावें.

**वजीर.**—आह्मी काय कमी आहोंत ? त्या मराठ्यांना येऊं तर द्या.

**बादशाहा.**—छे हो, तुह्मी आहांतच. पण त्या निजामाला ही बोलवा. आतां कठीण समय दिसतो. आजपर्यंत आह्माला असें कोणी दरडावून लिहिलें नव्हतें. हें पत्र ऐकून आतां आमचे हात पाय गळून गेले.

**वजीर.**—भलतेंच. असा धीर सोडूं नये. मी आतां सेनापतीस वर्दी देतो कीं ' कडेकोट बंदोबस्त ठेवा. मग तर झालें.'

**बादशाहा.**—पण लिहिलेंत पत्र तर तुमचें काय काकाचें खर्च होतें ! कां दुसऱ्याकडून लिहवूं ?

**वजीर.**—हा मी लिहितो. उगीच टाकून बोलूं नका. ( त्वेषानें ) हा घ्या वजीरीचा राजीनामा.

**बादशाहा.**—( चपापून ) नाहीं बोलत पण, लिहा हो निजामाला.—

**वजीर.**—( माना लिहिल्यावर ) हुं. काय ?

**बादशाहा.**—" तुह्मी लवकर यावें. न आला तर मुसलमानाचें राज्य बुडणार आहे. तुमचे वडील पुत्र गाजीवदीन यांस गुजराथचा व माळव्याचा अधिकार दिला आहे. सर्व मांडलिक राजे तुमचे हुकूमांत वागतील. पत्र दर्शनीं निघून यावें. त्या सातारकराचा प्रधान पेशवा बाजीराव येथें जवळ आला आहे व आमचा सत्यानाश करीन ह्मणत आहे. तर माझ्या गळ्याची शपथ आहे, मागील सर्व मी विसरलों आहे, तुमच्याकडे कांहीं नाहीं, तुह्मी अगत्य अगत्य आलेंच पाहिजे. "

**वजीर.**—हं लिहिलें, तारीख बिरीख घातली.—

**बादशाहा.**—( कागद घेऊन सही व मोर्तब करतो ) वजीर हा लखोटा आतांचे आतां शंभर स्वाराबरोबर पाठवा ह्मणजे बंदोवस्तानें पोंहोंचेल.

**वजीर.**—बरें आहे.

नंतर बादशाहा व वजीर भोजनास गेले. भोजनोत्तर दुराणी सरदारांस सुळीं देण्याचें काम चालू होतें तेथें मजा पाहण्यास गेले. ते नंतर फौजेची जमवा जमवी करूं लागले.

बादशाहाची चैनबाजीमध्यें नित्य वेळ जात असल्यामुळें

शिपाई लोक सुद्धां त्याचप्रमाणें चैनींत असत. शिवाय, लहरीप्रमाणें वागून पाहिजे त्यास शिक्षा करण्यास तो मागें पुढें पहात नसे. अशा अनेक गोष्टीमुळें त्याच्या राज्यांत अव्यवस्था फार झाली होती. त्याचे प्रजेंत निष्काळजी-पणा, आलस्य व मनःपूतसमाचरण हे दुर्गुण शिरलेले होते. बहुतकरून ज्यांस जसें वाटेल तसें त्यानें वागावें व आर्य लोकांस पाहिजे त्या तऱ्हेनें त्रास द्यावा, मग तो मोठा राजा कां असेनां. अशी बेपर्वाई चालू होती. त्यामुळें आर्य लोक मनापासून असंतुष्ट होते. परंतु दैव ग-तीनें सत्ता पडली मोंगलांच्या हातांत, तेव्हां बोलतां येईना, ह्मणून ते आर्जव करून व लांच देऊन आपलीं कार्यें साधीत असत. संकटाचा प्रसंग येऊन गुदरला ह्मणून बादशाहानें पुष्कळ प्रयत्न केले, परंतु नामां-कित शत्रूचे आंगावर जाण्यास कोणीही धजेना. याप्रमाणें अंदाधुंदीचा प्रकार पाहून बादशाहास वाईट वाटलें, तरी तो करतो काय ? वजीराचें मन दुखविल्यामुळें तो मनापा-सून मदत करीना. त्यामुळें स्वतः बादशाहास लोकांचें घरोघर जाऊन आर्जव करून फौज जमवावी लागली. अशी व्यवस्था करून २०००।३००० रडतराऊ घोड्या-वर बसवून युद्धाकारितां जाण्यास बादशाहा झटून तयारी करीत आहे, तों बाजीराव मजला मजलांनीं आड वाटेनें चाल करून एकाएकीं दिल्लींत शिरला. मग काय ? एकच धांदल. हत्ती धरले. उंठ धरले. मुसलमानास भडाभड तोडून टाकले. फार काय जे आर्य देव दर्शनास जात होते त्यांस देखील धरून कैद केले. मराठे लोक मोठमोठ्यांच्या

घरांत शिरून लूट करूं लागले आहेत; व मावळे लोक दिल्ली दरवाज्यानें आंत शिरून बादशाहास पकडून त्याचे देखत सर्व शहरास आग लावण्याचे बेतांत आहेत. अशी जेव्हां महमदबादशाहास खबर समजली तेव्हां तर त्याची पाचां-वर धारण बसली. तो विहीरींत उडी टाकून जीव देण्या-सही तयार जाहला. इतक्यांत खानडौरान बादशहाजवळ येऊन कपटानें ह्मणाला.— " खावंद ! असें अघोर कर्म करूं नये. निजामसाहेब हैदराबादेहून येऊन बाजीरावाशीं लढत आहेत. "

**बादशाहा.**— (धीर धरून) खरेंच कां ? मग चिंता नाहीं.

**वजीर.**—वेड लागलें? निजाम इतके लांबून कसा येईल !

**बादशाहा.**—मला दु:खांत डाग देतां काय ? मर्जी तु-मची. वजीर साहेब ! ही चेष्टा करण्याची वेळ नव्हे हो !

**वजीर.**—असें समजत होतें, तर पूर्वींच कां आमचें मन दुखाविलें. हं, चलाआतां एकाहून एक अधीक पराक्रमी असे आठहजार लोक त्यांचे अंगावर पाठविले आहेत. एका क्षणांत त्याचा परजय झाल्याचें ऐकाल.

**बादशाहा.**—( हंसून ) शाबास. तुमच्या सारखा बिर-बल नाहीं. आतां निजामाची मला काय गरज आहे ? अहो ! आयते वेळीं सर्वजण मला सोडून जायला लागला ह्मणून ह्मटलें त्याला बोलवावें. तुह्मी माझ्या बोलण्याचा राग न मानतां, समय ओळखून त्या बरोबर लढण्यास सैन्य पाठवि-लेंत. शाबास वजीर साहेब !

**वजीर.**—आतां कसें बोलला. नेहमीं जवळ असतात त्यांस संतुष्ट ठेवलें ह्मणजे कामें होतात.

**बादशाहा.**—वा ! त्या निजामाचें व आमचें किती सख्य आहे हें तुह्मास माहीत नाहीं कां ? पत्र लिहिववलें यावर जाऊं नका.

इतक्यांत एक मुसलमान सरदार लगबगीनें आंत येतो आणि बादशहास ह्मणतो—सरकार ! जीव घेऊन पळून आलों. या वेळेस वांचवा.

**बादशाहा.**—अरे !

**सरदार.**—सरकार ! अरे बिरे पुसण्याची ही वेळ नव्हे. मला वांचवा. व तुह्मीही लवकर तळघरांत शिरून आपला बचाव करा. परिणाम भयंकर आहे—

**बादशाहा.**—बरें, पण काय झालें तेंतर सांग.

**सरदार.**—खावंद ! विचारतां काय ? अहो शहरभर पाहवें तिकडे मराठे लोक आणि ब्राह्मण सरदार आणि त्यांत एक लढाऊ घोड्यावर धिप्पाड पुरुष बसलेला आहे तो तर इतका भव्य आहे कीं त्याच्याकडे पाहण्याचें भय वाटतें. मला आतां एका मावळ्यानें पकडलें होतें पण त्याच्या हातून कसा तरी निसटलों.

**बादशाहा.**—कां हो वजीर! तुमचे सैन्याची काय वाट ?

**सरदार.**—तें कांहीं नाहीं. पहिल्यांदा दिन् दिन् ह्मणायला लागले तेव्हां वाटलें होतें आपला जय होतो ह्मणून पण शर्थ आहे त्या मराठ्यांची. आपले आठदहा हजार लोक हातांत शीर घेऊन लढत होते, पण त्यांनीं एक दिवसांत त्यांचा फडशा पाडिला. अहो फार कशाला ? प्रत्यक्ष मी २३ व्या पतकाचा मुख्य—

**वजीर.**—कोण ! शेखइभ्राईम ! ! आणि तुमची अशी दशा ?

**सरदार.**—होय. कबूल करायला लाज वाटते. त्याचा तडाकाच मोठा. बाण सोडतो काय ! तसेंच तीर टिपतो काय ! शैली खरी. आमच्याकडील जितके हिंदु शिपाई होते तितके चोदि* मथले आणि त्यांनीं हत्यारें खालीं ठेवलीं. आणि चमत्कार हाकीं "बैरामखान" एवढ्या फौजेचे अधिकारी, पण त्यांच्याजवळचे हिंदु फितले आणि उलट त्यांच्याच अंगावर गोळ्या मारूं लागले. जातीस जात मिळते. वहां* काय करावें ? तो ब्राह्मण भाई नसता तर मी पण त्यांची हवेलंडीच उडविली असती——

**वजीर.**—मग आपल्यास पराजय——

**सरदार.**—काय सांगूं ? पण सध्यां पुसाल तर साऱ्या रस्त्यांनीं आपले लोक कोणी मरून व कोणी जखमी होऊन असे पुष्कळ पडले आहेत. आणि खरोखर आश्चर्य हें कीं तो त्यांचा मुख्य, काय त्याला ह्मगतात पहा हो. ( आठवून ) हो, हो, बाजीराव, तो कसा नेनका सगळ्या जागा माहीत असल्या प्रमाणें एकदम आंत शिरून नासाडी करीत आहे.

**बादशाहा.**—आणि मशिदी ?

**सरदार.**—काय असेल तें असो ! उत्तम कारागिरीचे इमारतीला कोणाला अगदीं हात नाहीं लावूं देत.

इतक्यांत दुसरा सरदार धडपडत आंत येतो आणि ह्मणतो. " खावंद उठा. दडून बसा ! "

**बादशाहा.**—( घाबरून ) चला हो बिरबल ! लपूं या—

**वजीर.**—कांहीं नको. आपण येथें बसा. मी जाऊन तजवीज करतो.

( वजीर जातो. )

**सरदार.**—खुदावंत ! एकंदर वेशीला कुलुपें घालून त्या बंद केल्या आहेत. शहराबाहेर कोणाला जातां येत नाहीं कीं आंत येतां येत नाहीं. आपल्या लोकांनां हुडकून काढून कैद करायची किंवा दंगा केला तर मारायची एकच त्यांनीं हल्लड उडविल्यामुळें त्यांचा गोंगाट व आपले दुर्दैवी लोकांची आरडाआरड, काकुलत्या, आणि रागाच्या वल्गना यांहीं चोंहींकडे हल्लकल्लोळ उसळला आहे. रस्त्यानें तर रक्ताचे पाटच वाहताहेत.

**बादशाहा.**—चला आपण शेजारल्या बुरजाच्या आड वसून पाहूं.

**सरदार.**—छे छे ! तेथें कदाचित् ते तोफा लावतील असा रंग दिसतो. वेड आहे कीं काय ? तळघरांत चला. लपून वसूं.

**बादशाहा.**—चला. अहो पण जनान्याची काय अवस्था जाहली असेल ?

**सरदार.**—आमच्या सारख्यांच्या बायकांची दशा पुसूं नका. त्यांचे लोक पाहिजेल त्या रीतीचा बलात्कार करितात. कशाचा गोपा आणि कशाचें काय ? धर, मार, लूट, उचल अशा प्रकारचे शब्द त्यांच्या मुखांतून वारंवार निघून त्या प्रमाणें घडत आहे. पोरांबाळांचा विचार न करतां त्या बायका आडांतून किंवा विहिरींतून जीव देत सुटल्या आहेत. मरणाची नेहमीं भीति वाटत असते. पण आज असा प्रसंग येऊन गुदरला आहे कीं स्वतां कांहीं तरि करून मरण इष्ट झालें आहे. परंतु शत्रूचे हातीं पडून हाल करून घेणें नको.

**बादशाहा.**— ( उत्सुकतेनें ) बरें पण अझून वजिरा-

कडून कांहीं वातमी समजत नाहीं. चला आपण जाऊन दिल्लीदरवाजा बंद करूं.

बादशाहा व ते दोघे सरदार धावऱ्या धावऱ्या जाऊन त्यांनीं पाहरेकऱ्याकडून थोरला दरवाजा बंद करविला आणि बाकीचे दरवाजे बंद करण्याविषयीं शिपायास हुकूम दिला. आणि आतां निर्भय जाहालों असें समजून ते पुनः बुरुजावर गेले. व तेथें आंतले बाजूस गच्ची होती तिचे आड दडून बसून ते शहरांत चाललेली धामधूम पाहूं लागले.

**बादशाहा.**—अरेरे ! घात झाला. पुराण किल्यांत शिरले.

**सरदार.**—अहो पहातां काय ? तो बघा एकंदर आगीचा भडका व धुराचा कल्लोळ उसळून गेला आहे.

**बादशाहा.**—( आवाज ऐकून दचकून पडतो ) अरेरे बुडालों. राज्य गेलें. मोंगलाई बुडाली.

**सरदार.**—( त्यास उठवून ) तो पहा. दारूगोळा फडशा झाला. त्याला त्या काळ्या घोड्यावरच्या मराठ्यानें आग लावली.

**बादशाहा.**—या अल्ला ! आतां काय ? संपलें आमचें. अहो ज्या स्थळीं आमचे तासे वाजत असत तेथें त्यांचे वाजंत्री व चौघडे वाजूं लागले आहेतनां ? तें असो. ( उठून पाहून ) अहो पण बघा बघा, तो त्या घोड्यावर ब्राह्मण बसला आहे, त्याच्या जवळ हातांत बिड्या घातलेला तो कोण आहे ?

**सरदार.**—कोणता ? ( निरखून पाहतो. )

**बादशाहा.**—तो पहा. ( बोटानें दाखवितो ) तो झेंडा फडकत आहे. आणि त्याचे पुढें पायांत बिड्या घातलेले

हजारों लोक कैदी प्रमाणें बाजूस पहारा असून चालले आहेत ते. हाय हाय ! ज्याच्या पुढें सारें हिंदुस्थान ह्मणजे थरथर कापतें त्या बादशाहाचे लोकांवर असा प्रसंग गुदरावा काय ? असो. उपाय नाहीं. अल्लाची मर्जी.

**सरदार.**—हो, हो, दिसला. तो अंगावर चिलखत घातलेला आहे तो कां नाहीं ?

**बादशाहा.**—हो.

**सरदार.**—अहो तोच तो बाजीराव. त्याणें तर इतकी दुर्दशा उडविली आहे. त्याजपाशीं हातांत विड्या असून बोलतात ते आपले वजीर हो. झाला घात ! !

**बादशाहा.**—अरे माझ्याजवळ त्याची तसवीर आहे, ती मी आणितों. तुह्मी बसा इथें हां आलोंच. ( निघून जातो.)

बादशाहाचे मागें पंधरा मिनिटांचे सुमारानें ते सरदार धांवत जातात, त्यांस बादशाहा वाटेंत भेटतो; आणि धांवत येण्याचें कारण पुसतो. तेव्हां एक सरदार सांगतो. " सरकार ! गेले हो गेले. आतां भीऊं नका. "

**बादशाहा.**—पाहूं. ( पाहतो ) अरे छान झालें. फुकट पीडा गेली. ( तसबिरीकडे पाहतो ) काय तरी उग्र मुद्रा आहे. तरी दमला भागलेला काढला आहे. त्याचा मुखडा आतां किती भेसूर दिसतोय. तरवार फेंकतो ती तर जशी वीज चमकती वाटते.

**सरदार.**—अहो आले, पुन्हां आले.

**बादशाहा.**—तिकडील सर्व दरवाजे बंद केलेत. तेव्हां इकडे आलेत वाटतें. बघा.

**सरदार.**—हो थोरल्या दरवाजावरच त्यांचा रोख

दिसतो. अरे अल्ला ! कायरे हे निर्दय आहेत ? आपले लोक घायाळ होऊन व प्राण कासावीस झाल्यानें गयावया रडतात पण त्यानां कांहीं तरी दया येत आहे का ? बेलाशक त्यांच्या अंगांवर पाय देऊन जात आहेत ! ! ! आमचा जय झाला असता तर त्यांचीं नाकेंच कांपलीं असतीं.

**बादशाहा.**—पुरे झाली कोरडी प्रतिष्टा. ते पहा. हजारों स्वार दवडत थोरल्या दरवाज्यापाशीं आले.—चला. आपल्या जनान्यास तळ घरांत घेऊन जाऊन सर्वांचे जिव वांचवूं. मग मागें कांहीं कां होईना. ( भिऊन तिघेही जातात. )

---

## भाग सोळावा.

वजीर खानडौरान उठून राजवाड्याबाहेर गेला आणि बरोबर ४०००।५००० कडवे पठाण लोक घेऊन बाजीरावाचे फौजेवर तुटून पडला. परंतु त्यांचे तेथें कांहींच चालेना. थोडक्या वेळांत लोक शरण गेल्यामुळें वजीरास शत्रूचे हातीं जावें लागलें. याप्रमाणें जयश्रीनें माळ घातल्यानंतर बाजीराव आनंदानें आवडीचे मर्जीस्तव बेगम महालांत जाऊन राहिला. आणि सर्व शहरांत आपले लोकांचा पाहरा ठेऊन त्यानें वजीरापाशीं एक बादशाहाचे नांवाचें पत्र दिलें, आणि त्या बरोबर १००।२०० मराठे लोक देऊन त्याला सांगितलें कीं " हें बादशाहास देऊन लवकर उत्तर आण. " हुकूमाप्रमाणें या लोकांबरोबर वजीर दिल्ली दरवाज्याकडे येत होता परंतु ते शत्रूचेच लोक

वाड्यावर हल्ला करण्यास येत आहेत अशी भीति वाटून बादशाहा व दोघे सरदार बुरजावरून पळून आंत गेले आणि जनान्यास तळघरामध्यें बलात्कारानें कोंडूं लागले. इतकी जों गडबड चालली आहे तों मराठे लोक शिड्या लावून वाड्यांत उतरले आणि दरवाजा खुला करून वजीर व बादशाहा बसले होते त्या स्थळीं जयजयकार करीत आले. हें पाहून मग त्या भितऱ्या भागूबाईची काय दशा पुसावयाची ? तो ह्मणूं लागला कीं " बाबानों ! मागाल ती राणी तुमचे ताब्यांत देतों, सर्व संपत्ती देतों. खजिना कोठें आहे तो दाखवितों, हा वाडा सोडून जातों, पण मला कृपा करून जीवदान द्या. " अशा प्रकारें हात जोडून वेड्याप्रमाणें तो विनवणी करूं लागला, तेव्हां त्याला वजीर ह्मणाला. " सरकार ! इतकें घाबरतां कां अद्याप तशी वेळ आली नाहीं, आपल्यास सुरक्षीत राखण्याकरितां मी आपला जीव धोक्यांत घालून आलों आहे. त्या बाजीराव साहेबांनीं आपल्यास खलिता पाठविला आहे हा वाचून पहावा. "

**बादशाहा**—शिपाई बुवा ? तुह्मी जरा दूर व्हा ह्मणजे आह्मीं उभयतां वाचून पहातों.

**शिपाई.**—( एकजण ) सरकार ! विचार करून बोलावें.—

**बादशाहा.**—विचार काय करायचा ? आह्माला उलटून गोष्टी.—

**शिपाई.**—( दरडावून ) चूप. ही वेळ निराळी आहे.

**वजीर.**—होय सरकार ! मी देतों हा कागद वाचा.

**बादशाहा.**—माझ्याच्यानें वाचवणार नाहीं कारण.—

**शिपाई मुख्य.**—बरें आहे. (वजीरास) खान वाचा तुह्मी.

**वजीर.**—( वाचतो ) मेहेरबान दिल्लीशहरचे बादशाहा महंमद बहादूर यांचें हुजुरास.

सलाम दिगर. श्रीमच्छत्रपति महाराज सातारकर यांचे मार्फत कळविण्यांत येते कीं आजपर्यंत मोंगलाई झाली ती गेली. परंतु तुह्मी राज्यावर बसल्यापासून जे अनर्थ कोसळत आहेत तेणेंकरून प्रजा फार रंजीस झाली. आर्य असला ह्मणजे त्यास हिंदू, चोर, लुच्चा, गुलाम, कुत्रा, अशीं पाहिजेल तशीं विशेषणें देऊन पाहिजे त्यास मुसलमानांनीं तुच्छतेनें छळावें. असा तुमच्या राज्यांत प्रकार सुरू आहे. तसेंच हातांखालील मांडलीक राजांशीं तुमचे लोक मन मानेल तशी वर्तणूक ठेवून कालक्रमानें त्यांचे राज्यांचा विध्वंस करीत आहेत. यापासून सर्वांस दहशत पडून चोहींकडे अस्वस्थता जाहली आहे हें तुह्मीं जाणत नाहीं. बरें ज्या आर्यजातीय शिपायांचे पराक्रमावरच तुमचे राज्य या भरतभूमींत चालण्याचा भरंसा, ते तरी तुह्मी संतुष्ट ठेविले आहेत काय ? ते किती त्रासले होते हें आह्मी येथें आल्यानें तुह्मास कळलेंच आहे. हजारों आर्य निराशेनें तुमचे नोकरीत होते, ते समय पाहून तुह्मावर उलटून पडून आह्मास येऊन मिळाले याचें कारण काय ? अर्थात तुह्मी त्यांस पीडा दिली, हेंच होय. असो. केलें त्याचें फळ भोगलेंत. लोक अन्न अन्न करीत कसें तरी पोटभरून आयुष्याचे दिवस घालवीत असतां त्यांच्यावर नानाप्रकारचे कराचे बोजे बसवून त्यांजपासून दमडी आधेला जो ते संक-

टानें जमवितात तोही हिसकून घेतां तेव्हां ह्मणावें काय ? गरीब बिचारे ब्राह्मण, सन्याशी, बैरागी, पण त्यापासून देखील तुह्मी कर घेतां ! तेव्हां हा नीचपणा लहान सहान आहे काय ? आमचे शास्त्रांत जी पवित्र गाय मानली तिचा वध करण्यांत तुम्हांस काय भूषण वाटतें कोणास ठाऊक ? तसेंच आमचा धर्मही बाटविण्यास मागें पुढें पहात नाहींत. जो परमात्मा ईश्वर आहे तो मुसलमानांचाच फक्त आहे काय ? खचित् मनुष्यमात्रावर त्याची सारखी दृष्टी आहे व त्याणें निरनिराळे धर्म लावून दिले त्या प्रमाणें ते वागतील तर तुम्हास त्यांत व्यत्यय आणण्यानें केवढें मोठें पाप लागल पहा. आह्मी आज विजयी असल्यामुळें शक्तीचे जोरावर काय वाटेल तें करूं. पण नाहीं. तुमचे धर्मकृत्यांत कोठेंही हात घातला नाहीं. किंवा तुमचे मशिदींस आमचे शिलेदारास शिवूं दिलें नाहीं. पक्षपातानें पाहिजे ते कायदे करून रयतेवर हरएक प्रकारचा जुलूम तर तुमचे अमदानींत जारी चालूं आहे. आणि अशी छळणूक प्रजेनें किती दिवस सोसावी ? तुह्मी दाद घ्याल या आशेवर फार दिवस लोक स्वस्थ बसले होते, परंतु वरवर मात्र कळकळ दाखवून आंतून स्वहितार्थाचे जुल्म करायचेच असा तुमचे कामगाराचा निश्चय स्पष्ट जेव्हां दिसून आला तेव्हां सर्व लोक निरुपाय व त्रस्त होऊन बंडें करूं लागले. त्यामुळें तर प्रजेवर नानातऱ्हेचीं संकटें येऊन गुदरलीं. हें पाहून आम्हीं तुमचे सुभेदार निजाम यांच्यावर स्वारी करून त्यास जिंकले आणि ते तुम्हाकडे आमची दाद लावतील अशा आशेवर बसलों होतों. परंतु तेंही जाहलें नाहीं. ते

व्हां आम्ही स्वतां आज या शहरीं येऊन सर्वांचा पराजय केला आहे. तर आतां अर्जिक पत्रावर सही करून आमचे ताब्यांतील राजे आहां असें कबूल करा . व स्वारीचा खर्च द्या. नाहीं तर फक्त वाडा लुटणें राहिला आहे त्यांत शिरून तुमचे आतोनात नुकसान करूं. पोक्त विचार करून लवकर उत्तर लिहा. वास्तविक यवनांचा आमचे भूमीवर कोणतेही प्रकारचा आतां हक्क राहिला नाहीं. या पुढें त्यांचें राज्य केवल आमचे कृपेनें चालेल. फार काय लिहायचें. येवढ्या मजकुराहून आमचा रोंख ओळखून योग्य वाटेल तसें वागावें. कळावे. छ. ११ रविलाकर.

बाजीराव.

पंत प्रधान. ( पेशवे )

नि. सातारकर छत्रपती.

**बादशाहा.**—वजीरसाहेब ! याचें उत्तर तुह्मीच द्या. ह्मणजे मजवर मोठे उपकार होतील. मला तर आतां कांहीं सुचत नाहीं. ( पाया पडतो ) कसें वाटेल तसें करून त्याचे मनाची समजूत करा. मी यापेक्षां जास्ती कांहीं सांगूं शकत नाहीं.

**वजीर.**— ( दया येऊन ) बरें आहे. ( परत जातो )

**बादशाहा** —कोणीकडोन अरिष्ट टाळा.

**वजीर.**—होय.

असें ह्मणून वजीर पाहरेकऱ्याबरोबर परत बाजीरावाकडे आला आणि पायापडून ह्मणतो, "महाराज ! बादशाहा तर वेड्यासारखे जाहले आहेत. त्यांस कांहीं सुचत नाहीं. त्यांनीं सर्व जबाबदारी मजकडे दिली आहे."

**बाजीराव.**—चिंता नाहीं. तुह्मी काय ह्मणतां मग ?

**वजीर.**—महाराज ! आपण खलित्यांत लिहिलेला सर्व प्रकार खरा आहे.. मदोन्मत्तपणानें आमचे सर्वपरि बुडालें. असो. त्या बद्दल बोलून काय फळ ? केल्या अपराधाची सर्वाबद्दल मी माफी मागतों. ( पुढें पदर पसरतो ) मेहेरबानींनें क्षमा करावी. वाडा घेण्यांत काय अर्थ आहे ? कारण तो घेतल्यासारखाच आहे. आतां आह्मी आपले ताबेदार झालेलों आहोंतच. त्यांत लिहून तें काय द्यावयाचें ? आमचा मान राखणें यांतच आपल्या सारख्या सुविचारी पुरुषास भूषण आहे. तहनामा केला असतां आमचा आब राहील. यांत दोघांचीही थोरवी राहणार आहे. मी वजीरीवर आहें तोंवर निजामाचा पिच्छा पुरवतो. व त्याचा पुरता समाचार घेण्यास आपण तिकडे आहां. बादशाहांत आतां राहिलें काय ? नांवाचा राजा. त्याच्या हयातीपर्यंत तरि निदान राज्य चालूं द्यावें. मी आपल्यास आज कोट्यावधी रुपयांची खंडणी देतों. ३०० हत्ती आणि २०००० आरबी घोडा इतकें खुशाल न्यावेंत. त्या प्रमाणें सोनें, रुपें, मोतीं, हिरे, माणकें, कोठ्यांत सांठविलेलीं आहेत त्यांतून लागतील तितकीं घेऊन जावीं. आपण चोहींकडे द्वाहीं फिरवून खुशाल राज्य करा. मुकत्यार आहां .( दऊत लेखणी कागद घेऊन लिहितो ) ही पहा सनद माळव्याची आणि १५०००० रुपयांची. पसंत पडेल तर आतां महमदशहांची सही व मोर्तब आणतो.

बाजीरावानें विचार केला कीं जयानें फुशारून जाऊन सर्वच आपल्या हेक्याप्रमाणें करून घेण्यांत अर्थ नाहीं सनद

व खंडणी आणि जवाहीर मिळत आहे तितकं तूर्त घेऊन जावें हा उत्तम पक्ष. आतां परत जावें आणि सर्वांसही आनंदाची वार्ता कळवावी आणि नंतर सर्वांच्या मदतीनें पुन्हां परत येऊन सर्व मुलुख काबीज करून मोंगलास भरत भूमीतून हाकलून लावावें. या प्रमाणें त्याचे मनांत विचार येऊन तो तेथें एक दोन दिवस मजामारींत राहिला आणि बादशाहानें दिलेली सनद व खंडणी घेऊन आणि सखारामबापू यांस पुन्हां वकीलीचे जागीं दिल्लीदरबारांत ठेवण्याचें बादशाहा कडून कबूल करून घेऊन तेथून निघाला आणि ग्वाल्हेरचे वाटेनें शिंदे व होळकर यांस ती आनंदाची वार्ता कळवून साताऱ्यास परत आला. तेथें शाहूराजानें मोठा दरबार भरवून त्याचा सत्कार केला. नंतर त्यानें स्वस्थपणें पुण्यास पेशवेपणाची गादी स्थापून महाराष्ट्रदेशाचा व नवीन मिळविलेले मुलुखाचा बंदोबस्त करण्याचे अखत्यारीची शाहूची सनद घेतली. नंतर बाजीरावानें पुन्हां पुण्यास जयोत्साहाचा दरबार भरविला. त्यावेळीं साऱ्या मांडलीक राजानीं मोठमोठे नजराणे दिले. या वर्षापासून ह्मणजे सन १७३७ पासून पुण्याचा उत्कर्ष व भरभराटी सुरू झाली. व तें शहर प्रमुख राजधान्यांमध्यें मोडलें गेलें.

पोर्तुगीज लोकांनीं कुलाबा घ्यावयाकरितां मानाजीस मदत केली त्याबद्दलच्या कराराप्रमाणें मानाजी त्यास मुलुख देईना. ह्मणून त्या दोघांमध्यें लढाई सुरू झाली. तेव्हां मदत मागितल्यावरून बाजीराव मानाजीस मिळाला. त्यामुळें त्याचे पक्षाचा जय झाला. या मदतीबद्दल मानाजीनें सात हजार रुपये रोख व तीन हजार रुपयांचें सामान पेशव्यास द्यावें

असा ठराव करून व त्या अन्वयें त्या वर्षी त्यापासून कर घेऊन बाजीराव पुनः उत्तर हिंदुस्थानांत निघाला.

सन १७३८-सांत तो नर्मदा नदीचे पैलतिरीं जाऊन पोंहोंचला. त्यावेळेस निजामुलमुल्क बादशाहानें बोलाविल्यावरून दिल्लीस अफाट फौजेसह चालला असतां वाटेंत सरोंजेस त्याचा मुक्काम पडला. तेथें त्यास नर्मदेवर बाजीराव असल्याची बातमी समजली तेव्हां तो भिऊन भोपाळास गेला. आणि तेथें गेल्यानंतर बाजीराव कदाचित् अंगावर चाल करून येईल अशा भीतीनें तो तयारी करूं लागला. इतक्यांत आपले भक्ष्याचा स्वाहा करावा असें बाजीरावास वाटून तो निजामाचे अंगावर गेला. बाजीरावानें निजामाचे फौजेवर हल्ला केल्यानंतर दोहींकडचे लोक मोठ्या नेटानें लढूं लागले. शेवटीं बाजीरावाच्या लष्कराचा जय झाला. मराठे फार तर १०० पडले व ३०० जखमी झाले असावे परंतु मोंगलाचा तोटा फार जाहला. त्यांचे सैन्यांतील ५०० रजपूत लोक व ५०० घोडा सफई ठार झाला. नतर बाजीरावानें आपले सैन्याचे विभाग करून मुख्य मुख्य सरदाराचे ताब्यांत एक एक टोळी दिली; आणि सर्व दिशेस पळून चाललों आहों असें दाखवून शत्रू भोंवतीं गराडा घालविला. त्यामुळें शत्रूस फार पंचाईत पडली. बाहेरून धान्य, तृण, मांस इत्यादि पदार्थ मिळेनासे झालें. पूर्वीं खानदेशानजीक या राजश्रीनें गराडा घातला होता. व अन्नपानाचे तेव्हां असेंच दुर्भिक्ष्य पडलें होतें. या गोष्टीची निजामास त्या समयीं आठवण जाहली आणि त्यानें दिल्लीस गुप्त रीतीनें एक पत्र रवाना केलें.

त्यांतील आशय असा कीं " मी आपले हुकुमाप्रमाणें तिकडे येत असतां वाटेंत बाजीनें आडविलें आहे तर कुमक सत्वर पाठवून द्यावी. " निजामाचा स्वार हें गुप्त पत्र घेऊन जात असतां त्यास बाजीचे शिपायांनीं आडविलें व त्याजपासून तें पत्र हिसकून घेऊन तें बाजीरावास दाखविलें. बाजीरावानें तें पत्र वाचून पाहिलें व त्या स्वारास दिल्लीस जाऊं देण्याची परवानगी दिली. कारण त्यास पक्कें ठाऊक होतें कीं बादशाहा तर अंकित जाहला आहे. व खान डौरान वजीर तर निजामाचे नाशावरच टपलेला आहे. त्या मुळें निजामास सहाय्य मुळींच मिळावयाचें नाहीं. बाजीरावाची फौज थोडी असल्यामुळें त्यासही कुमेकेची गरज होतीच ह्मणून त्यानेंही आपले आप्त मित्रांस पत्रें लिहिलीं. " औरंगाबादेहून निजामास कोणी मदत करण्यास येईल तर त्यांचें वाटेंतच पारिपत्य करावें आणि सोनगडीं सेनापती आहेत त्यांजला इकडे रवाना करावें " असें त्यानें रघूजी भोंसला यास लिहिलें. रघूजी हा शाहूचे प्रीतींतला होता. त्यानें पांच हजार स्वारानिशीं बाजीरावाचे तैनातींत हजर असावें असें ठरलें होतें. दुसरेंपत्र त्यानें आपला भाऊ चिमणाजीअप्पा यास पाठविलें त्यांत त्यास लिहिलें कीं " ह्यासमयीं फौज मिळेल तितकी आणावी व फत्तेसिंग भोसले, आणि सर लष्कर वगैरे मंडळीस मदतीस आणावें आणि बांडें व दाभाडे यांसही येण्याची विनंती करावी. पण मान्य नच करतील तर त्याणीं निदान शत्रूसतरी मिळूं नये अशी तजवीज ठेवावी. " तसेंच त्यानें महापुरुष धवडशीकरास एक पत्र लिहिलें कीं " महाराज ! मागें मी आपल्यास कळविलें

होतेंच कीं बहुतांचा देणेदार होऊन शिलेदारांच्या पायां-पडतांनां माझा जीव रंजीस आला आहे; चरणीं विज्ञाप्ति कीं सातारचे दरबारीं आमचेच लोक आह्मास हितशत्रू होऊन पाण्यांत पाहतात. यामुळें मी दुःखसागरांत बुडालों आहे. अशा संकटीं कांहीं तरणोपाय सांगा. अशा कांचांत राहून जगण्यापेक्षां हा आपला दीन शिष्य वीष खाऊन मरण्यास तयार आहे. इतका अट्टाहास करून राज्य मिळविलें व यवनांचें पारिपत्य केलें. तरी चित्तास ह्मणून सुख नाहीं. स्पर्धा वाढल्यामुळें केव्हां अकाळीं. मजवर घाला येईल त्याचा नेम नाहीं. येवढ्याकरितां सत्पुरुषांची जशी आज्ञा होईल तसें वागेन. ”

बाजीरावास आवडीनें पूर्ण वेडावून टाकल्यानें त्यानें जितकें कर्ज काढावें तितकें बहुतांशीं तिचे मर्जीप्रमाणें चैन भोगण्यांत खर्च करावें. असा प्रकार बरेच वर्षांपासून चालू झाला होता. त्यामुळें दोन मोठे तोटे झाले. एकतर सैन्यांतील लोकांस पगार वाटण्यास शिलक राहिना व त्यामुळें ते वक्तशीर मदत करण्यास कुचराई करूं लागले व दुसरा असा कीं पुष्कळ सावकार लोकांचें कर्ज चुकतें न झाल्यामुळें ते कर्ज देण्यास नाराजी झाले. अशी स्थिती झाल्यामुळें बाजीरावाचे मनास किती यातना सोसाव्या लागत होत्या त्याचें अनुमान त्यानें साधुपुरुषास लिहिलेंले पत्रावरून सहज होतें. असो. बाजीराव स्वतां स्त्रीलुब्ध होऊन निष्काळजीपणानें वागूं लागला तेव्हां त्याचे लोकही बेफिकीर जाहले असें पाहून निजामानें आपले लष्करास इषारा केला व तो झपाट्यासरसा शत्रूच्या गराड्यातून निघून भोपाळचे कि-

त्यांत शिरला. हें वर्तमान बाजीस समजतांच तो त्याचे पाठोपाठ जाण्यास लोकांस हुकूम करूं लागला. परंतु त्या लोकांचे मार्फत कांहीं सरदारांनीं त्यांस असें कळविलें कीं "आह्मी भीड मुरवत किती दिवस धरावी ? जेव्हां पहावें तेव्हां तुम्हीं जें कर्ज काढतां तें विलास भोगण्यांत खर्चकरतां आणि आह्मास हाका मारीत बसवितां. आह्मास पैसा न मिळेल तर आह्मी तरी काय करावें ? तुह्मी लुटींत जो पैसा मिळवितां तो सरकारी खजिन्यांत टाकतां व आह्मास आमची इच्छा तृप्त करूं देत नाहीं. चोंहींकडोन आह्मास पैसा दुर्मीळ झाला आहे. तर आतां कांहीं तरी बाकी चुकती केल्याशिवाय आह्मी येथून जाण्यास खुषी नाहीं." असा सरदारांकडोन निरोप आला असतां त्यानें धाक दडप खूप करून पाहिली. परंतु कोणी त्यामुळें दबले नाहींत. तेव्हां त्यानें आवडीची बहुत विनवणी केली. परंतु ती आपले जवळचें द्रव्यास किंवा दागिन्यास हात लावूं देईना. बाजीराव तिला अद्वातद्वा बोलला व शिपायांवरही राग पाखडूं लागला. परंतु कोणीच प्रसंगीं ऐकेनात. तेव्हां तो त्रासला आणि तरवार घेऊन आत्महत्या करूं लागला. इतक्यांत तेथें एक बाई आली आणि तिणें त्याचे गळ्यांत मिठी मारली: तेव्हां बाजीराव तिला झिटकारून देऊन ह्मणतो:— अगे तूं कोण आहेस? हो दूर. बायका तितक्या दुष्ट. त्यांचा मला संग नको. ( हात हिसकतो. )

**बाई.**—( बरोबर मुलगा होता त्यास ) नान्या पड पायां. मार गच्च मिठी. सोडूं नको. ( नाना पायां पडतो ) ( बा-

जीस ) हें काय अघोर कृत्य. मेलीतरवार शत्रूवर घालायची, ती कोणी आपल्या अंगावर घालून घेतं कां ?

**बाजीराव.**—( पत्नीस व मुलास ओळखून मनांत ओशाळून ह्मणतो. )तूं कशी येथें आलीस ? बरें, माझे पापी देहास कां हात लावितेस आणि विटाळ करून घेतेस ?

**बाई.**—हें असें कसें उलटें. आज जिवावर उदार कां ह्मणून पण ? इतकें संकट कोणतें ?

**बाजीराव.**—( शुद्धीवर येऊन ) छे, छे, मग मी काय केलें. पण तूं कशी आलीस तें—

**बाई.**—तें राहूं द्या सांगतां येईल मग. पण इतका जिवास त्रास कां झाला तें आधीं कळलें पाहिजे.

**बाजीराव.**—अग ! तुझ्यापाशीं एक मागावयाचें आहे.

**बाई.**—( हात जोडून ) छे ! मागणें काय ह्मणून ? मी आपली दासी आहे. समुद्रानं नदी जवळ—

**बाजीराव.**—माफ—

**बाई.**—( पाया पडते ) भलतेंच-काय झालें तें सांगावें. मी पाया पडतें.

**बाजीराव.**—अग, जवळचें द्रव्य सरल्यामुळें अगदीं त्रासून गेलों आहें. दुसरें काय ?

**बाई.**—( कारकुना जवळची थैली व अंगावरील सर्व दागिनें काढून पुढें ठेऊन ) हें घ्या. जवळ आहे तितकें दिलें आहे.

**बाजीराव.**—प्रिये ! ( प्रेमानें ) परमेश्वर तुझें कल्याण करो ! मी खचित आज धन्य आहे. ( गहिंवरतो ) तूं

माझे सर्व अपराध विसरून मला प्रेमालिंगन देऊन वेळेस सहाय्य केलेंस आं ? शावास. खरी पतिव्रता तूं.

**बाई.**—हें काय ? लोकांदेखत नानाला मांडीवर घेऊन हवेंतर कौतुक करावें.

**बाजीराव.**—( मुलास कवटाळून ) नान्या ! ( मुका घेतो ) कसा आलासरे ?

**नाना.**—आई सांगेल.

**बाई.**—( मनांत ) देवा ! खरोखर मी बळकट कुंकाची. असें कोणतें मी पुण्य केलें होतें कीं त्याचे योगानें संकट समयीं आज उपयोगीं पडलें ? असे गोड शब्द मुखांतून निघून माझे हृदयास सांत्वन होईल असें कधीं तरी वाटलें होतें कां ? हे दिवस दृष्टीं पडतील असें स्वप्नीं सुद्धां वाटलें नव्हतें ? आपला जीव वेडा. आह्मी भलभलत्या बातम्या ऐकल्या तेव्हां एकदा दर्शन घेण्याचे हेतूनें आह्मी आलों. परमेश्वरा ! तूंच सुख दाता. असो असेंच नेहमी सुखांत ठेव ह्मणजे झालें. ( मोठ्यानें ) कोणास पैसा देणें तो द्यावा मग निवांत बोलूं.

**आवडी.**— ( मत्सरानें ) कोण दुतोंडेपणा ? जिचें तोंड पाहणार नाहीं ह्मणून पर्वा पुण्यांत असतां ह्मणालां तीच आवडती झाली. आणि जिचें वांचून पाणी सुद्धां पिणें होत नव्हतें तिला——

**बाजीराव.**— ( रागानें ) मस्तानी ! हो दूर तूं. जवळ आलीस तर ठार मारीन. ह्मटलें होतें ह्मणून काय झालें ? तेव्हांचें तेव्हां गेलें. इच्यावाचून मला सत ना गत. कसें झालें, तरि ती लग्नाची बायको. तुझ्या सारखी———

**आवडी.**—वाहावा ! कोण फसवेपणा हा ! ह्या गोष्टी कां आतां ?

**काशीबाई.**—( बाजीरावाची बायको ) बाई पण तुह्मी अमळ तिकडे जानां ?

**आवडी.**— ( त्वेशानें ) काय करूंग ! नीट असतं तर नांक ठेचलं असतं ( बाजीस ) सख्या बापाचं कीं आईचं देखील कधीं वांकडं बोलणें ऐकलं नवतं. मला नाहीं असं सोसायचं. सांगतें——

**बाजीराव.**—नाहीं तर हो चालती.

**आवडी.**—कुठं ?

**बाजीराव.**—वाट फुटेल तिकडे.

**आवडी.**—लाज तरि वाटते बोलायला ? जळलं मेलं!! मग आधीं आणावं कशाला ? लोकांला कांहीं अब्रूच नसेल ? हेंच पहिल्यांदा नवतं कां कळत ?

**बाजीराव.**—कोणाचें आडलें होतें ?

**आवडी.**—ह्या गोष्टी काय आतां ! विनाकारण दुसऱ्याचा जीव फासांत घालण्यांत काय मिळालें ? येथें आणायचें तरी नवतें. माणसांच्या बोलण्यांत अगदीं बोल नसावा ह्मणजे काय ? अर्ध्या आडांत दोरी कापायला, मी कांहीं दुसमानगिरी केली नवती. चल ह्मटलें तेव्हां हं का चूं तरि बोललें ? बाळ्यावरोबर एकदम नाहीं कां आल्यें ? नकोतल्या पंचाईती झाल्या, पण कधीं डगमगलें कां ? ह्मटल्याप्रमाणें मी बाहेर पडलें. हें कांहीं आतां चालायचं नाहीं. माझी कायती आधीं वाट लावान् मग तिच्याजवळ स्वस्थ रामराज्य करीत बसा. ( बाजीरावाचे अंगावरील धोतराचा पदर धरते.)

**बाजीराव.**—इतकें आपल्यांत शहाणपण आहे ? हं ! तर निक्षून सांगतों ऐका. ( हात हिसकून ) आह्मांला तुमची आतां गरज नाहीं. चला उठा !

**आवडी.**—काय बोलणें हें. मी एकदा चिकटलें ती कां आतां सुटतें ? बळजबरीनें घालवाल तर घालवा, तेंव्हांच काढून आणलें नसतें तर मी एव्हांला खुष्षाल बादशाहीण बनून ऐष आरामांत तरि वेळ घालविला असता.

**बाजीराव.**—मग अझून काय झालें ? जा बेलाशक जा माझी परवानगी आहे . तुझ्या नादीं लागल्यानें माझा जितका तोटा झाला तितका कशानें झाला नवता.

**आवडी.**— ( संतापानें ) बरें, नाहीं तर नाहीं. काय चिंता आहे मी जातें. ( बाहेर निघून जाते )

**काशी.**—लोक लढण्यास तयार जाहले आहेत. त्यानां नानानें पैसा देऊन खुष केले आहेत.

**बाजीराव**— ( विरक्तपणें ) जाऊंदे मला आतां कंटाळा आला——

**लोक.**—महाराज ! श्रीमंतांनीं क्षमा करावी. आह्मी टाकून बोललों. तो गुन्हा जाहला खरा. परंतु आमचा उपाय न्व्हता . आपण त्या बयाचे पूर्ण मोहांत असल्यानें आमची सर्वस्वी बुडणूक होऊं लागली. तेंव्हां निरुपायानें आह्मीं बोललों. ( लोक पायां पडतात ) आतां आईसाहेब आल्याबरोबर त्या बयांचें महात्म्य सरलें. त्या मुळें आह्मांस अतिशय आनंद झाला आहे. तशांतून नानासाहेबांनीं तर आमचे अंगांत फारच स्फुरण आणलें आहे. ते आंत आपलेकडे आले तव्हांची त्यांची शौर्यवृत्ती, व आतांचा मनमिळाऊपणा

व तरतरी, आणि हुषारी, हीं पाहून आह्मास अतिशय उत्तेजन आलें आहे.

**बाजीराव.**—तें कसें काय नाना ?

**नाना.**—अण्णासाहेब ! मी व आई छावणींत शिरत असतां या पैकीं कांहीं लोकांनीं मला मनाई केली. पण मी त्यास हात दाखविला.

**लोक.**—होय महाराज ! श्रीमंताचेच बच्चे. मग वडिलाप्रमाणें कृती कां नसावी ? हे कोण आहेत ते आह्मास पूर्वीं कळलें नव्हतें. तेव्हां त्यानां आह्मी आंत येण्यास मनाई केली. परंतु त्यांनीं आह्मास न जुमानतां ते तसेच बाहूबलाचे जोरावर आंत आले.

**बाजीराव.**— ( मुलाचे पाठीवर थापटून व तोंडावर हात फिरवून ) शाबास नान्या ! पण मी येथें आहें ह्मणून तुह्मास कसें कळलें ?

**नाना.**—आह्मी पुण्यांत होतों. तेव्हां काकानां आपलें पत्र आलें. त्यावरून आपण संकटांत असल्याचें समजलें. आह्मी तेव्हां काकाबरोबर कोकणांत युद्धाकारितां जाणार होतों. तों नाना प्रकारच्या कंड्या गावांत उठल्या. त्या मुळें कांहींच सुचेनासें झालें आणि आह्मी बरोबर दोनतीनशें शिपाई घेऊन निघालों आणि येथें आलों. काका एव्हाला तापी नदी जवळ जवळ आले असतील.

**बाजीराव.**— ( बायकोकडे पाहून ) शाबास ! तुह्मी वेळेवर आलांत या बद्दल शाबासकी जितकी द्यावी तितकी थोडकीच——

**लोक.**—श्रीमंतांनीं कृपा करून लवकर तयारीस लागावें. नाहींतर शत्रू वळावतील.

**बाजीराव.**— ( वीरश्रीनें ) नाना ! चल जेवण खाण करून घेऊं आणि उद्यां सकाळीं त्या निजामड्यावर जाऊं. पाहुंदे कसें काय युद्धविद्येंत नैपुण्य मिळविलें आहेस तें, चल.

नंतर ते भोजनास गेले व तो सुखाचा दिवस मोठ्या आनंदानें घालविला. दुसरे दिवशीं बाजीराव व त्याचा मुलगा नानासाहेब हे आपले सैन्यानिशीं निजामाचे छावणीपाशीं गेले व त्यास कोटांतून बाहेर काढण्याविषयीं प्रयत्न करूं लागले. तट पाडावयाजोग्या तोफा नव्हत्या. तरि न डगमगतां बाजीरावानें बाण टाकून व बंदुकीच्या गोळ्यांचा भडीमार करून शत्रूस इतकें बेजार केलें कीं तो आपलें बहुतेक सामान भोपाळ व विसलामगड येथें ठेवून त्या स्थळांतून मराठ्यांस नकळतां पळून गेला. पुढें दुसरे दिवशीं नानासाहेबानें त्याचा पाठलाग केला. तोफखाना व जेजाला यांचे आश्रयानें मोंगललोक रोज थोडे थोडे निभावून जात. या प्रमाणें ते दोराईसराई गांवापर्यंत चालत गेले. परंतु मराठ्यांनीं त्यास बहुत त्रास दिला. तो त्यास न सोसून अखेर निजामानें तहाचें बोलणें लाविलें. ही आनंदाची बातमी नानासाहेबानें आपले पित्यास कळविली. तेव्हां बाजीरावानें निजामाचा तहनामा कबूल केला. त्यांत असें ठरलें कीं बाजीराव यास चंबळा व नर्मदा या नद्यांमधील मुलुखाचें आधिपत्य बादशाहा कडून देववून ५० लाख रुपये खंडणी देवावी, व तूर्त निजामानें गडबड न कारितां निमूटपणें दिल्लीस चालतें व्हावें, आणि बाजीरावास १० लाख रुपये

रोख देऊन त्या मुलुखामध्यें राज्य करूं द्यावें. असा तहनामा होऊन निजाम रोख १० लाख रुपये देऊन चालता झाला व बाजीराव चंबळा नदीचे दक्षिणेस खंडणी घेत राहिला.

---

## भाग सतरावा.

आवडीची अप्रतिष्ठा झाल्यानंतर तिनें एके दिवशीं अफू खाऊन मेल्याचें ढोंग केलें. तेव्हां बाजीरावास वाटलें कीं " मी तिला बोललों तें सहन न होऊन ती जीव द्यावयास प्रवृत्त झाली. त्या अर्थी ही जरी द्रव्यलोभी व स्वभावानें तिरसट आहे, तरि ती अंतःकरणापासून मजवर प्रीति करते हें खचित् " ह्मणून त्यानें लागलीच वैद्यास बोलाविलें आणि औषधोपचार सुरू केले. त्या मुळें ती बरी झाली. आणि प्रसंग पाहून मत्सरानें एक दिवस आपल्या जीवितरमणास ती ह्मणाली कीं " आपले लाडक बायकोनें मजला विष घालून मारविलें होतें, परंतु देवानें वाचविलें " या आरोपाबद्दल बाजीरावानें चौकशी न करितां आपले पत्नीस व चिरंजिवास रागानें पुण्यास पाठवून दिलें. नंतर बाजीराव माळ्यांत खंडणी घेण्याचें काम करूं लागला. तेव्हां त्यास असें वर्तमान लागलें कीं रघोजी भोसला व सेनासाहेब सुभा यांचा पुतण्या या दोघांनीं प्रळय मांडला आहे. ह्मणून त्यानें आऊजीकावरे यास बरोबर ३००० लोक देऊन त्यांचा पराजय करावयास पाठविलें, परंतु उलटा त्याचाच अपजय झाला. तेव्हां बाजीराव त्याशीं युद्धास निघणार तों त्यास कळलें कीं निजाम व सादतखान यांनीं कपटानें नादीर

शाहास बोलाविल्यावरून तो दिल्लीस आला व त्यानें दिल्लीशहर लुटून बादशाहास कैद केलें आणि नंतर दरबार भरवून त्यांत कृतघ्न निजामाचे दाढीवर थुंकून त्याची छान फजीति उडविली व त्यास दरबारांतून लाथ मारून हकलून दिलें आणि तशीच सादतखानासहि शिक्षा दिली व नंतर महंमदास पुन्हां राज्यावर बसविलें. हें वर्तमान समजून बाजीराव फौज वाढविण्याचे उद्योगास लागला. तों त्यास खुद्द नादीरशाहाचें पत्र आलें कीं " महंमदाचे सांगण्यांत तुह्मी कायते बलाढ्य आहांत. त्या अर्थी तुह्मास आतां असें कळवितों कीं त्यास आह्मी आपले भावाप्रमाणें मानतों, यासाठीं त्यास त्रास न देतां तुह्मी त्याचे हुकुमाप्रमाणें वागावें, नाहीं तर आह्मी तुह्मावर स्वारी करूं."

हें पत्र वाचून बाजीरावास नखशिखान्त कोप चढला. आणि त्यानें सर्व मुसलमान व मराठे सरदारांस विनंती केली कीं या वेळेस दिल्लीस चलून नादीरास कैद केला पाहिजे. कारण त्यानें महंमद बादशाहास सर्वस्वी जिंकिलें व हुकमी केलें, हा सर्व राष्ट्राचा अपमान झाला, हा उपदेश ऐकून लांबलांबचे सरदार त्यास येऊन मिळाले. परंतु सातारा व पुणें या प्रांतांतील लोक मदतीस येण्याची अवधी होती. परंतु ते येतीलच. तेव्हां त्यांची वाट पाहण्यांत अर्थ नाहीं असें समजुतीनें बाजीराव ९०००० हजार लोकानिशीं दिल्लीकडेस चालला. तों महंमदशहानें त्यास पत्र पाठविलें कीं " नादीरशहा परत इराणाकडे गेला. निरुपायास्तव आह्मी शरण गेलों परंतु तुह्मी तयारी करून येत आहां ही बातमी मला तुमचे वकील " सखाराम " यानी कळविली. त्या व-

रून आह्मी फार संतुष्ट जाहलों आहोंत. व तो संतोष प्रदर्शित करण्याकारितां जवाहीर व भरजरी पोषाग स्वारांबरोबर पाठविले आहेत त्यांचा स्वीकार करावा. आतां इकडे येण्याचें कारण नाहीं." हेंपत्र वाचून बाजीराव जरा शांत झाला आणि जमलेल्या सरदारास त्यानें शाबासकी देऊन आपापले स्थलीं जाण्याची परमानगी दिली. परंतु निजामाचा पुत्र नाशिरजंग फार माजला होता त्याची खोड तोडावी असें त्यास वाटून तो आपले लोकांसह त्याचे मागें लागला. नाशीर अहमदनगरापर्यंत उपद्रव देत चालला होता. इतक्यांत् चिमणाजी अप्पा व मराठे सरदार तेथें आले. मग त्या नाशिरास युद्ध करून कांहीं दिवसांनीं शरण यावें लागलें. असा निकाल लावल्यानंतर बाजीराव नर्मदातीरीं जाहागिरीचे उत्पन्नावर विलास भोगीत राहिला. आणि चिमणाजीअप्पा वगैरे मंडळी परत कोंकणांत आली. तेव्हां त्यांस कळलें कीं साष्टीबेट घेऊन वसई किल्लाही मल्हाररावादि सरदारांनीं ताब्यांत घेतला. त्यावेळेस जो युद्ध संग्राम जाहला त्याचे यथार्थ वर्णन इतिहासांत साधलें आहे. तें वाचकांनीं अवश्य वाचावें. असो. नानासाहेब व सदाशिवराव भाऊ हे उभयतां आंग्र्याशीं लढत होते. तिकडे नंतर चिमणाजीअप्पा गेला. तेव्हां मुलगा व पुतण्या याणीं जय मिळविल्याची त्यास शुभवार्ता समजली. ह्मणून त्यानें जय समारंभ मोठ्या कडाक्याचा आलिबागेंतच केला.

दुसरेदिवशीं तो व नानासाहेब आणि सदुभाऊ रेवदंडा किल्ला घेण्याची मसलत करीत बसले होते तों त्यास जासुदानें पत्र आणून दिलें. जासुदाचे खिन्न मुद्रेवरून पत्रांत कांहीं अशुभ

वर्तमान लिहिलेलें असावें असा संशय येऊन त्याचे मनांत धस्स झालें. पत्र वाचतांना अश्रुपात नेत्रांतून एक सारखे वाहूं लागले. आणि नानासाहेब तर मूर्छा येऊन धाडदिशीं जमिनीवर आपटला व त्या प्रमाणेंच अप्पाच्या व भाऊच्या मनास अति दुःख वाटून त्यास मोह प्राप्त जाहला. इतक्यांत यजमानांस स्नानास चलावयाची सूचना करण्याकरितां ब्राह्मण आला. त्यानें ही स्थिती पाहिली तेव्हां त्यास अत्यंत आश्चर्य वाटलें. व असें होण्याचें कारण काय हें समजण्याकरितां तो तेथें स्तब्ध उभा राहिला. तेव्हां तेथें असलेल्या जासुदानें त्यास तें पत्र पहा असें खुणावलें, कारण गहिवरामुळें त्याच्या मुखांतून शब्द उमटेना. त्या शागिर्दानें तें पत्र वाचलें. तेव्हां त्यास फार वाईट वाटलें, आणि त्यानें वाड्यांत जाऊन स्त्री समुदायास बातमी कळविली. तेव्हां बाजीची आई राधाबाई तुळशीची पुजा करीत होती व पत्नी काशीबाई पतीच्या पादुकांची. त्यानां ही खबर प्रथम खोटी वाटली. परंतु ज्या जासुदानें कागद आणला तो ओसरीवर उभा होता त्यानेंहि तसेंच वर्तमान आहे म्हणून सांगतांच काशीची काय अवस्था जाहली असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी. आई तर तडातड जमीनीवर डोकें आपटून घेऊं लागली व पत्नीनें एकदम हंबरडा फोडला. ही अशुभ वार्ता तेव्हांच चोंहीकडे पसरली. मग काय पुसावयाचें ? जिकडे तिकडे रडारडी व आक्रोश सुरू जाहले. स्त्री समुदायांत आकांत झाला. त्या मुळें अप्पा दचकले व बातमी कशी समजली म्हणून आश्चर्य करूं लागले. परंतु पत्र आणणारा जासूद दिसेना तेव्हां त्यानें तर्क केला कीं त्यानेंच जाऊन काळ-

विली असावी. मग त्यानें पाहिलें कीं घरांत पुरुषमाणसांत वडील कायते आतां आपगच राहिलों. आपणच शोक करीत बसणें चांगलें नव्हे; दुसऱ्याचें शांतवन केलें पाहिजे. या हेतूनें त्यानें नानास व भाऊस उठविलें व त्यानां समजाऊन घरांत स्त्रियांकडे नेलें. पाहतात तों तेथें एकच कल्लोळ होऊन गेला आहे. तेव्हां चिमणाजीनें आईस हाक मारिली. त्या गोंगाटानें ती व इतर बायका शुद्धीवर आल्या. परंतु त्यामुळें दुःख कमी व्हावयाचें एकीकडे राहून शोकाग्नीनें त्याचें हृदयांत अधिकच पेट घेतली. पुनः अप्पानें आईस हाका मारली. तेव्हां ती गहिवरून ह्मणाली. " दैव फुटलेंरे ! फुटलें ! ! माझा अण्णा टाकून गेला कांरें अप्पा ! ( सुस्कारा टाकून ) आतां काय करूं ? त्याच्यावरचें मला कां नाहींरें नेलं ? ( कपाळावर हात मारून ) या करंटीला आग कां नाहीं लागली ? ते गेले तेव्हां मी कां नाहीं प्राण सोडला ! अरे त्या दुस्मानानें दावा साधलारें साधला. माझ्या बाळाला भर राज्यावरून उचलून नेलें, तें मला कां नाहीं नेलं ! थेरडीला ? अग आईग ! अरे अण्णा ! मला फशीवलेंस कारे ! तेव्हांरे कां मला ह्मणालासकीं चल आई, ऊठ, रडूं नको, मी तुला आठवण होऊं देणार नाहीं आणि आतां कारे मला टाकून गेलास ? आतां मला कोण पुशील? अग आई. अग आई ! अरे देवा !

**अप्पा.**—आई ! हें काय ? माझ्याकडे बघ. मी आहेनां? तूंच जर असा गोंगाट करशील तर मग या मुलांनीं व ब्रायकांनीं काय करावें. ऊठ हें काय ?

**आई.**—खरं रे अप्पा ! पण माझ्याच्यानं आतां दम

निघेना. मी तरी काय करूं? एकदां त्याचें मुख पाहीन कां रे?

**अप्पा.**—आई! कांहीं मनाला धीर दे. झाली गोष्ट आतां येत नाहीं.

**आई.**—अप्पा! पण पत्र खरं कां रे?

**अप्पा.**—होय त्यांत संशय नाहीं. मरायच्या वेळेला अंथरुणावर पडून (कंठ दाटतो) शक्ती नव्हती तरी चार ओळी आपल्या हातानें लिहिल्या आहेत. पुढें लिहवेना तेव्हां बाकीचा मजकूर राणबा शिंद्यांनीं सांगतल्यावरून लिहिला. बातमी खचित् खरी. अक्षरें अगदीं माझ्या ओळखीची गं!

**आई.**—खरं कां! अप्पा, मरतांना देखील आपली सेवा बजावण्यांत चुकला नाहींना? खरोखर इतका ममतेचा पुत्र असून आज त्याचा अंत झाला आं? देवा! देवा! कां रे असें रत्न या पृथ्वींतून हिरावून नेलेंस? जग बुडालेंनां! अप्पा, आण्णा आतां भेटेल कां रे आपल्याला?

**अप्पा.**—छे. आतां आशा नको. आई, असा आक्रोश किती वेळ जरी करीत बसलों तरी अण्णा फारच पुन्हां दिसणार आहेत? (स्फुंदून) ऊठ आतां, सारी नजर मजवर दे. मी तुझाच आहे नां? चल आधीं नानाला व वहिनीला सावध केलें पाहिजे.

**आई.**—अप्पा! तूं ह्मणतोस तें खरें, पण कसा झाला तरी पोटचा गोळा. येवढा मोठा गेलानां? अरे साधारण कां होता? येवढे थोरले मोंगल, पण त्यांची ज्यानें खोड मोडली तो कां लहान? बाळा तूं आहेस त्यामुळें मी अ-

झून जीव तरी धरला आहे. नाहीं तर केव्हांच प्राणास मुकवून घेतलं असतं.

**आप्पा.**—पण आई !

**आई.**—तें खरं. ऊठ मुलीला आधीं समजविली पाहिजे.

पलिकडील दालनांत काशीबाई दुःखानें तळमळत असल्यामुळें व इकडे तिकडे लोळल्यामुळें तिचे केंस धूलिधूसर होऊन व अंगवस्त्र विष्कलीत होऊन ती निश्चेष्ट पडली होती, तीस सासूनें हालवून उठविलें. तेव्हां ती उठून बसली व दिरास व सासूस आणि इतर जनांस सन्निध पाहून मनांत लाजली आणि लुगडें नीट करून व पदर सांवरून गळा काढून तिनें पुनः शोक करण्यास प्रारंभ केला. घसा दाटून आल्यामुळें मुखावाटें शब्द निघेना. तेव्हां ती वेड्याप्रमाणें झाली व भान न राहतां हस्तानें मोठमोठ्यानें रबके मारून ऊर बडवून घेऊं लागली. तेव्हां सासूनें व जावेनें तीस सांवरून धरलें. तेव्हां ती ह्मणते. " कां मला धरतां ? सासूबाई ! सोडा. मी तुमच्या पायां पडते. "

**सासू.**—अग मुली ! अम्मळ धीर धर, एकसारखी बडवीत काय सुटलीस ?

**काशी.**—काय करूं सासूबाई ? अहो ऐकल्यापासून माझ्या मनांत किती दुःख झालें तें सांगवेना हो. थांबा मला छातीला भोंक पाडूं द्या. ह्मणजे त्यांतून तरी तें साठलेलें दुःख निघून जाऊन मला दोन शब्द मुखावाटें काढवतील. ( पाया पडते. )

**सासू.**—( सुनेचे हात धरून व तिला बसली करून )

मुली दु:ख साऱ्यानांच झालं आहे. मला सुद्धां इतक्या वेळ शुद्ध नव्हती. पण आप्पा ह्मणतो तें खरें. मी उठलें नसतें तर तुला कोणी सावध केलें असतें ? तसंच तुझं. उठ त्या नानाला समजाव, तो बघ बेशुद्ध होऊन पडलाय. मुलाची जात भिईल बिईल आणि धडक घेईल एखादा. ऊठ, त्याला उठीव.

**काशी.**—( किंकाळी फोडून ) आवरेना हो सासूबाई, मी तरी काय करूं. अहो प्रत्यक्ष डोळ्यापुढें मूर्ती दिसते. चांडाळा यमा ! मला कां अगोदर नेलं नाहींस ? अरे मी कां अगदींच पापी कां रे ह्मणून मला हें दु:ख दिलेंस ? सावित्रीचें व्रत तर केलं, गौरी पूजली, हरितालिकेचे उपवास केले, अशीं नानाप्रकारचीं व्रतें केलीं; ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले आणि आतां त्यांचे काय फळ ? मी वैधव्य भोगावें असें तुझ्या मनांतून आहे काय ? अग आई ग ! एक घटका कींग दुसरे विचार मनांत कधीं घोळले नाहींत. रात्रंदिवस त्या मदनमूर्तीचा निजध्यास. पण काय त्याचं ? कां त्या रांडेनें कांहीं कृत्रिम केलें भावजी ! वाचा पत्र पुन्हां ऐकूं द्या तर खरं, काय लिहिलें आहे तें.

**आप्पा.**—वयनी ! आधीं उठा नानाला समजावा हें काय?

**काशी.**—तुह्मी नकां सांगूं. भावजी ! मला तर खचित् वाटतं कीं त्या मेल्या रांडेनें कांहीं तरी केलें. जळली ती. आकाबाई माझ्याच राशीला लागून राहिली नाहीं. ज्यांनीं तिच्या जन्माचं हित केलं, त्यांच्या जिवावर देखील सरतेशेवटीं उदार झाली नां ? तिला आग कां नाहीं लागली ? अवदसेनें मन मोहून टाकलं आणि अगदीं हातांत आणून

कसाबाप्रमाणें घसा कापला नां ? तिचं असो. पण सारा मुलुख जिंकला आणि मुसलमानांला थरथरां कापायला लावलं असा ज्यांचा पराक्रम ते कसे त्या हडळीला भाळले कोण जाणें ?

**सासू.**—मुली ! नशीब आपलं. तरी पहिल्यापासून आपण सांगत होतों बरें, पण नाहीं.

**आप्पा.**—आई ! राणबांनीं लिहिलें कीं वैशाख शुद्ध १३ रोजीं रेवातीरीं मुक्काम रावेर प्रांत कांकडे येथें अण्णास देवाज्ञा झाली, तेव्हां त्यांनीं ( त्वेषानें ) त्या येसवेला बोलावणीं पाठवून पाठवून प्राण कासावीस केला, पण ती मुळीं आली नाहीं. साफ सांगिलन् कीं आतां कशासाठीं यावयाचें आणि निघून गेली. ( संतापानें ) ती रांड हातीं लागेल तर तिला खरोखर ठार मारल्याशिवाय राहणार नाहीं.

**आई.**—शिव ! शिव ! देवा ! कशीही सुरेख सोन्यासारखी पोर, स्वभावानं, चाली रीतिनं, किती गरीब, हुषार किती, किती ठेपराईची, पण ती झाली अप्रीतीची. आणि ती जखणी रांडरु झाली लाडकी. ( हुंदका येऊन ) आणि अण्णा ! तूंरे कसा भाळलास ? व्यर्थ तिनें तुला फसविलें.

**काशी.**—सासुबाई ! नुकतीच मी नानाला घेऊन गेलें होतें, कां नाहीं ? तेव्हां त्या अक्काबाईनंच मला घालवून दिलं. रांडेनं रुसून अफू खाल्याचं ढोंग केलंन् माझ्यावर कुभांड घातलं. तिथं काय, शिवाचा अवतार !! भोळेपणामुळें सगळें खपलें. त्या अवदसेंचं खरं वाटून, मला जायला सांगितल्यावरून मी आपली निमूटपणें निघून परत आलें. ( डोळे पुसते. )

**सासू.**—आणि हें कुठं मला नाहीं सांगितलंस तें ?

**काशी.**—नाहीं बोललें. सासूबाई ! उठल्या बसल्यां काय सांगायचं. म्हणून तसच तें पोटांत ठेवलं. आतां निरुपाय झालां तेव्हां बोलणं भाग आलं.

**सासू.**—अहा हा ! किती पतिव्रता मुलगी ! देवानं तिला तन्‌सडीभर सुख लागूं दिलं नांहीं. साऱ्यांच्या आज्ञेंत वागून मन कसं झेलीत होती, पण नांहीं—शिव ! शिव !! देवा ! ( हंबरडा फोडून ) मला वैधव्यदुःख दिलंस, तितकं नाहीं कां रे आमच्या घराण्यांत पुरं झालं ? अग आई ! पोरीला पाहिलं म्हणजे जीव तुटतो.

**काशी.**— ( मूर्छित होऊं लागते ) सासूबाई ! धीर धरवनां, हो ! कालवतें पोटांत. अग आई ( खालीं पडते )

**सासू.**— ( सुनेस उठवून ) मुली. झाल्या गोष्टीला आतां काय करायचंय ! ऊठ त्या नानाला घे मांडीवर. बघ त्याच्याकडे.

**काशी.**— ( नानास उचलून घेते ) बाळा !

**नाना.**— ( स्फुंदून ) आई ! अण्णा——

**काशी.**— ( हुंदका येऊन ) अग आई ! नको आतां नांवानं हाका मारूं.

**नाना.**—आजी ! ( रडूं लागतो. )

**आजी.**— ( त्याचे डोळे पुसून व त्यास कंवटाळून ) बाळा ! नको रडूं ? डोळे सुजले. तुला रडतानां पाहिलें म्हणजे उगीच आठवण होते.

**अप्पा.**—म्हणजे आई ! तोंडवळा हुबेहुब आहे.

**काशी**.—भाऊजी ! काय करूं हो. आंतडी तुटली तरी मनांतलं जाईना.

**सासू**.—मुली असें रडून काय उपयोग ? ( अप्पास ) अप्पा योग्यतें प्रसंगास केलें पाहिजे. जा तयारी कर.

**काशी**.—सास्बी मला आतां कशाची आशा नाहीं.

**सासू**.—मुली जशी वेळ पडेल तसें वागलं पाहिजे. मी नाहीं कां तसं केलं. तुझ्या सारखंच मला झालं होतं पण करायचंय काय ? मी आपल्या मुलाकडे पाहून नाहीं कां आजपर्यंत जीव धरला ?

**काशी**.—छे ! मला कांहीं तसं वाटत नाहीं. मी——

**सासू**.—काय मागल्या जन्मीचं लागत होतीस तें फेडलंस. आतां काय ? कांहीं मनांत आण. गंगेला पूर येऊन पुष्कळ पदार्थ वहात एके ठिकाणीं येतात तशी या संसारांत तूंन्‌तो दोघेंही एकत्र झालां होतां. काय दोन दिवस नशिबीं होतें तितकें भोगलेंत सुख. आतां तुटातुट झाली तर त्याचं, मनांत आणून काय होणार आहे ? संसार ह्मटला ह्मणजे असाच बुडबुड्या प्रमाणें. आज आहेन् उद्यां नाहीं. देवादिकांनां सुद्धां काळ सोडीत नाहीं. मग तुमची आमची काय कथा?

**काशी**.— ( हंबरडा फोडून ) सास्बी ! तुह्मी देखील आतां उलटलांत कां ?

**अप्पा**.—वहिनी !

**काशी**.—भाऊजी ! माझं आतां कोणी राहिलं नाहीं, असं ऐकतांच तुह्मी व सास्बी निष्ठुरपणानें माझ्याशीं बोलूं लागलां कां हो ? या जगांत कोणी कोणाचें नाहीं. उठा घटकाभर येथून जा तुह्मी सारे. ह्मणजे मी आपली एकटी

विचार करीत बसतें. आतां जर अधिक बोलाल तर खचित् सांगतें तुमच्या पायापाशीं डोकी फोडून प्राण देईन. ( मुर्च्छा येऊन पडते. )

**सासू.**—बरें अप्पा. घ्या दारें लावून. चला.

**अप्पा.**—चल.

असें ठरून सर्वजण तेथून निघून माजघरांत येतात. व काशी येकटी त्या दालनांत मुर्च्छा आलेली निजली राहते.

काशीबाईनें कांहीं वेळानें शुद्धीवर येऊन पाहिलें तों सर्व निघून गेले आहेत असें दिसलें. तेव्हां आपल्या मनाशींच वरचेवर हुंदके येऊन ती शोक करिते—" अग आईग ! होतं कसं आणि झालं कसं ? अहा हा ! काय सौख्य तें आणि आज असे प्रसंग गुदरले आं ? मामंजी होते तोंवर मी जसें सुख भोगलें तसें आजपर्यंत तरी कोणी अनुभवलें असेल काय ? छे ! खचित् नसेल. बरें पुढें तरी त्या कुल्ये करितां जरी माझा अपमान केला तरी मनांत ह्मणजे मजविषयीं किल्मीष होतें असें फारच. किती शांत, गंभीर व दयाळू स्वभाव, किती नीति, केवढी परोपकार बुद्धि, किती सहनशीलता ? पण त्या आकाबाईच्या संगतीनें या गुणांचें व्हावें तितकें चीज झालें नाहीं ! अहो ! तिच्याशीं नेहमीं रमत बसलां तरी मी कधीं उणें उत्तर बोललें कां ? मी तशाच स्थितींत राहण्यास आनंदानें खुषी होतें. असें असूनही मला टाकून कां चालते झालांत ? त्या रांडेनें साफ " नाहीं, येत " ह्मणून सांगितलें त्याबद्दल आह्मांवर रुसवा कां केला ? हर ! हर ! त्या चांडाळणीनें सर्वस्वी घात केला!! अहो ! ! आपल्या जिवावर मी थोरवी मानून राहिलें,

सांगितल्याप्रमाणें गुरुचरित्रादि पोथी पुस्तकें वाचून मनोरंजन केलें, पतिव्रतेचे धर्म चालविले आणि त्या सगळ्यांचा आतां काय उपयोग ? ( गालावर हात देऊन ) रतिसुखास तर सर्वस्वी मुकलें!! अवयवानों ! कां स्फुरतां ? आतां ते हात तुमचे आंगास लागायचें नाहींत. तुह्मी सुंदर कां झालां नाहींत ? तुमच्या अचारुपणानें पहा बरें माझें किती नुकसान झालें ? एक तर मी नावडती होऊन त्या रांडेचें गात्र आवडलें, पण तिनेंहि जेंव्हां नाहीं ह्मटलें तेंव्हां रागा रागानें जगांतील बायकांचाच कंटाळा येऊन स्वर्गांतील देवांगनांचा उपभोग घेण्याकारितां तिकडे जाणें झालें आहे. अहाग सवती ! तुझ्या सारखी मूर्ख नाहीं कोणी. व्यर्थ हातचा हिरा गमांवलास ! अगे तूं अजाण खरी. कोण्याभटाची पोरगी होतीस पण मजपेक्षां स्वरुपानें बरी असल्यामुळें तुझेवर मन बसलें होतें. तें कां तूं विटीवलेंस ? ( थांबून ) खचित् तूं भाग्यवती. मी व्यर्थ तुला निंदितें, तुझ्याकरितां इतका खटाटोप करून दिल्लीस येणें झालें होतें व तुझ्यासाठीं आजपर्यंत लाखों रुपये पाण्यासारखे उधळले, इतकें तुजवर एक चित्त होतें. असें असतां तूं निष्ठूरपणानें कसें ग नाहीं येत ह्मटलेंस ? अगे ! तूं गेली असतीस तर आज आह्मास तो प्राणनाथ दिसला नसता कां ? तूं आह्माला बुडविलेंस ? तुला काय ह्मणावें ? आतां स्वर्गीं जाणें झालें नां ? तिकडे काय ? थोर पुरुषानां कमीं आहे. अंगांत पराक्रम होता तों सर्व राज्य एकट्यानीं मिळविलें आणि अंगांत देखणेपणा आहे त्यामुळें कोणती रंभा नाहीं त्यांच्या पाया पडणार ? देवा ! समर्थाचें कांहीं अडत नाहीं, पण माझी मात्र दुर्दशा झाली !

मी कोणतेंरे पाप केलें ह्मणून मला या संकटांत घातलेंस? मला स्वतां लेखन वाचन वगैरे शिकवून व पुस्तकांचा मज-कडोन अभ्यास करवून सृष्टींतील बरें-वाईट समजण्याची शक्ती दिली; त्या ज्ञानाचा आतां काय उपयोग? झुरणीस लागून मी मरण्याकारितां काय? दिवा गेल्यावर वातीचा काय अर्थ? उलटा तिला दुर्गंध सुटतो व तिचा सर्वांस कंटाळा येतो. त्या प्रमाणें माझी अवस्था जाहली आहे. या राष्ट्राचा व कुलाचा दीप गेला. पण कुधूम मात्र मजकडे आला. तुझे मनांतून मला सूखच लागून द्यायचं नाहीं काय? आतां कितीतरी तळमळ सोसूं? सगळंच वैभव मावळलं ह्मणतातनां तशी गत. आपला होता तो जिवाचा सखा गेला ह्मणजे कोणी कामास येत नाहीं. मना! तुझ्यासारखा कपटी कोणी नाहीं. सूड उगविण्याचे कामांत तर तूं हद्द केलीस. अरे जीवित नाथ गेल्याबरोबर तूंहि तिकडेच गेलास आणि मला येथें अनाथ ह्मणून टाकलेंस काय? उघडच आहे. गरीबास कोण विचारतो. पण तूं मात्र कृतघ्न खरें. अरे! मना!! तूं जिवाहून मला प्यारा, इतका कीं प्रत्यक्ष मी आपले हृदयांत तुला धारण केलें, व वाढिवलें आणि वर्ती-वलें, परंतु सरतेशेवटीं, तूंहि तिकडेस गेलासनां? अरे पण माझीच चुकी आहे. तूं केलेंस तें यथायोग्य केलेंस. आपले यजमाननीचे यजमानाकडे गेलास, तें छान झालें. कारण त्या मुळें पुढें मी काय करावें हें तरि समजलें. खचित तूं मला अक्कल शिकविलीस. अरे, जोत्स्ना निर्जीव पण चंद्रा-बरोबर जाण्यास चुकत नाहीं; विद्युतही मेघाबरोबर जाते; पदार्थमात्रास योग्य कोणतें तें तेंव्हांच सुचतें व ते आपले

धर्माप्रमाणें नित्य वागतात. फार कशाला. मना ! तुला आकार ना विकार ! स्वतांची बुद्धि ना शहाणपण. तुझें सर्व चलन माझ्या अनुरोधानें चालणारें. पण तूं प्रसंगविशेष मनांत आणून पतिकडे गमन केलेंस. तेव्हां खरोखर मला लाज आणलीस. इतकी आंगांत समजूत व शिक्षा असल्याची मी वृथा गर्व वाहतें. अरेरे ! जें कर्तव्य तें सुद्धां मी समजत नाहीं काय ? दिसलें. मला आतां, या संसारांत कांहीं अर्थ दिसत नाहीं. क्षणभंगुर ! तें असो. पण मला आतां निराळेंच वाटतें. ( वर पाहून ), मी किती अगत्य बाळगतें व मी किती प्रीति धारण करितें, तें जाणण्याकरितां तर मला कसोटीस लावून पाहिलें नसेल नां ? मला साताऱ्यांत टाकलें, तेव्हां मी पुण्यास गेल्यावर तेथें माझा मनोभाव पाहून अंगिकार केला. तेथून पुन्हां त्याग केल्यावर मी पुन्हां भक्तीनें चरणकमलापाशीं गेलें, हें मागल्याच्या मागल्या वर्षी जेव्हां पाहिलें तेव्हां माझी खरी माया पाहून पुन्हा माझा स्वीकार केला. तसेंच, आतां कांहीं तरी निमित्त करून मुद्दाम परलोकास जाणें केलें आहे. समजलें मी. माझें सत्व पाहण्याचे हेतूनेंच ते गेले. तर आतां किती जरी संकटें आलीं तरी मी त्यांच्या मागोमाग स्वर्गास जाणार; आणि तेथें जाऊन रमणाचे अंकावर बसून सुख घेणार. झाला. निश्चय झाला. आतां भावजी आले कीं मी त्यांस हा संकल्प कळविणार. ते कां येवढं माझं ऐकणार नाहीत ?

पुढें जो विचार करणार तों अप्पा तेथें आला आणि ह्मणाला. " वाहिनी ! तुह्मी सोंपटाप्रमाणें पांढरे दिसूं लागलां. अंग गळून गेलें, शक्ति क्षीण झाल्या, उठा व्यर्थ शो-

क कां कारितां ? मला नाहीं कां वाईट वाटत ? अण्णा होते तोंवर मला कांहीं काळजी होती कां ? पण तोच आतां सर्व वडीलपणाचा बोजा मजवर येऊन पडल्यामुळें मी त्या खालीं दबून गेलों. परंतु करायचं काय ? रडल्यानें परत येतात कां ते ? ''

**काशी.**—भावजी ! तें खरें! पण बायकांचा जन्म मेला खांपरच. एकदा ज्याचें ह्मणाविलें त्याचें झालें. सास्त्री आहेत तुह्माला वडील. आह्मां दोघांवरचा नाना आहेच. त्याला भाऊ प्रमाणें संभाळा, इतकेंच मागणें आहे.

**अप्पा.**—भलतेंच, असें बोलूं नका माझें हृदय फाटतें—

**काशी.**—भावजी ! मी वाचलें तर तुमच्याजवळ राहून हजारदां कांहीं ना कांहीं तरि मागून तुमचे मनास कंटाळ-वीन व तुह्मीही कदाचित् तसें करण्यास नाकाराल. तर सा-ऱ्यावरचं आतां हात जोडून एक मागणं मागतें तेवढें कृपा करून कबूल करा.

**आप्पा.**—हें काय वयनी. तुह्मी खुशाल रहा ! मातो-श्रीप्रमाणें मी तुह्मास मान देऊन सदा तुमचे आज्ञेंत वागेन. ( पाया पडतो ) असे भलभलते विचार मनांत घोळूं देऊं नका. अण्णा काय ह्मणतील ? ( रडूं लागतो ) मी गेलों तर तुला माझ्या बायकोला देखील संभाळवेनां ? वयनी ! तुमच्या गळ्या शपथ. नानाला मी गादीवर बसवितों. व मी त्याचे हाताखालीं कामकरून राज्याची भरभराट करतों. आपण मुलांचें कौतुक पहावें. दादा मोठाझाल्यावर मी त्यास कारभार देऊन हरि हरि ह्मणत बसेन.

**काशी.**—( हुंदका येऊन ) प्रिया माझी दया येत न-

सेल तर भावाकरितां तरी परत यावें. पण. छे! छे! हें काय मी बडबडतें. भावजी! तुह्मी परवानगी वांचून पाणी सुद्धां पीत नव्हतां. हें मी पाहिलें आहे. तुमच्यासारखे धर्मशील कोणी नाहींत व तुह्मी माझे मनास कोणत्याहीप्रकारें दुखविणार नाहीं हें खरें; परंतु आतां माझें एवढें ऐकाच. प्रियापाशीं जाऊं द्याच. उठा! भावजी! चिता तयार करवा. आंघोळ केल्यानंतर घालण्याचा खडावाचा जोड जुना झालेला टाकला होता तो मी नित्य पूजित असतें. आतां त्या बरोबर मी सती जातें. करा येवढी विनंती मान्य. नाना व दादा आहेत त्यांनां ह्मणतां तसें सुख द्या. ह्मणजे झालं. तुह्मी बोलतां तसें कराल अशी माझी खात्री आहे. मी जाऊन ही आनंद वार्ता कळवीन. तेथें जन्या आहेच, आह्माला. तुह्मी उठा सास्बीला सांगून व त्यांचें मन वळवून तयारी करा. जाच.

चिमणाजीअप्पानें आपले वइनीस पुष्कळ उपदेश केला पण व्यर्थ. ती कांहीं केल्यानें ऐकेना. तेव्हां त्यानें हें वृत्त आपले आईस कळविलें. तिनेंही सुनेस वळविण्याचा भगिरथ प्रयत्न केला. पण निर्फळ. असे सर्वप्रकारें उपाय हरले. तेव्हां चिमणाजीस भावजयीचें ह्मणण्याप्रमाणें करावें लागलें. त्यानें लागलींच सती जाण्याकारितां तयारी करविली. हें वर्तमान काशीबाईस कळलें. तेव्हां ती आनंदानें वेडीच झाली.

बाजीरावाचे मरणाची वार्ता हां हां ह्मणतां सर्व अलिबागेंत झाली. इतकेंच नव्हे, पण आसपासचे गांवींही तेव्हांच पसरली. आणि त्याचे मुलाबाळाचें जवळ दुःखसमयीं जाऊन सान्त्वन करावें ह्मणून गांवोगांवचे लोक गृहधंदे

सोडून धांवपळ करीत अलिबाग बंदरांत आले. तो शूर, पराक्रमी, सद्गुणी, व लोकप्रिय, होता त्यामुळें ते लोक अगत्यानें आले. यांत काय ? परंतु दुष्टबुद्धीचे जे त्याचे शत्रु, त्यांचेकडोनही दुःख प्रदर्शनाकरितां मोठमोठे सरदार चिमणाजी आप्पाकडे आले. मानव जातीचे लोकांस वाईट वाटणें हा धर्मच्च झाला, परंतु चमत्कार असा कीं निर्जीव पदार्थांतही त्या समयास उदासीनत्व दिसूं लागलें. समुद्र खवळला, दिशा धुंद झाल्या, वायू तुफान होऊन मोठें वादळ सुटलें; मी आधीं जाऊन दुःख प्रदर्शित करीन, असे स्पर्धेनेंच जणूं उर्मी एका पेक्षां एक वेगानें उचंबळूं लागून एकापुढेंएक सरसावूं लागल्या. नारळी, पोफळी, व ताड इत्यादि वृक्ष आह्मी वृथा उंच वाढलों, आमच्या हातून त्या महात्म्यासारखी अलौकिक कृती जन्मांतरींही होणार नाहीं, तर, ऱ्हस्वाकृती प्राण्याचे हातून अनंत महत्कृत्यें घडलीं, त्याचे गमनानें दुःख होत आहे असें दाखविण्याकरितां कित्येक वृक्ष वांकले, कित्येकांनीं जमिनीवर आंग टाकलें व कित्येकांनीं तर थरथर कापून व पर्णांचा रडल्याप्रमाणें आवाजकरून शोक स्फुट केला. अशा समयास किल्ल्या पलिकडे एक लढाऊ गलबत येऊन खडकांत आडकलें तेव्हां त्यावरील इंग्रज लोक गळा काढून ओरडूं लागले. हा प्रकार जाणून बुजून ईश्वरानें मुद्दाम करविला असें दिसतें. कारण त्यानें त्या वेळेस असें दाखविलें असावें कीं ब्राह्मण, क्षत्रीय, शूद्र वैश्य किंवा भूमींत असलेले यवनांसच वाईट वाटलें आहे असें नव्हे, खरोखरच अप्रतिम पुरुष नाहींसा झाला याबद्दलचा शोक परखंडस्थ परजातीय असे गोरे लोकही क-

रीत आहेत व त्यांच्याच रुदनाच्या ह्या अरोळ्या ऐकूं येत आहेत. वाड्यांत व सर्व किल्लाभर रडारडी चालली होतीच व तेणेंकरून ऐकणारांचें मन विव्हळत होतेंच; तशांत सर्व लोक जमले व रूदन करूं लागले. गलबतावरील लोकांच्या अरोळ्या ऐकूं येऊं लागल्या आणि सारी सृष्टी सखेद झाली. अशा त्या दिवशीं प्रकार झाला. हळहळ करीत लोक एक-मेकाशीं बसले आहेत; अन्न पाण्यावांचून राहिल्यानें, चालून आल्यानें व रडल्यानें गात्रें सुकून गेलीं आहेत. असे लो-कांचे थवेचेथवे त्या बंदरांत पसरले आहेत. कित्येक कि-ल्यांत जात आहेत व कित्येक किल्यांतून विन्मुख होऊन बाहेर येत आहेत अशी एकच गर्दी जाहली आहे. दानधर्म करतील तेव्हां आपला लाट होईल अशा हेतूनें दूर देशचेही कांहीं द्रव्यदृष्टी भिक्षुक एकत्र जमा होऊन दक्षिणा केव्हां मिळेल अशाकरितां हात पसरून बसले आहेत. काशीबाई साध्वीचें सान्त्वन करण्याकरितां गांवोगांवच्या सुवासिनी बायका रुदनमिश्रित स्वरानें किल्याकडे चालल्या आहेत. किल्यांतले लोक ( जे अधिकारी होते ते ) गडबड होईल तेव्हां बंदोबस्त करण्यास तत्पर जाहले आहेत. एकाएकीं लोकांत शांतता व्हावी व मध्येंच पंचत्व पावलेल्या वीराची कोणी तरी आठवण केल्यानें अगर ओळखीचा किंवा आप्त भेटल्यानें शोकानें पुन्हां चित्तांत पेट घ्यावा. व बायकांनीं हेल काढून त्यास अधिक स्फूर्ती आणावी. अशाप्रकारें क्रम चालला असतां काशीबाईची सती जावयाची तयारी झाली. त्यामुळें लोकांस अतिशय निराशा प्राप्त जाहली. कारण पितृवत् भाव राखून ज्यानें त्यांचें पालन पोषण केलें

तो गेला एवढेंच नव्हे, जननी समान जी साध्वी तीही त्याचे भागें जाऊं लागली. त्यामुळें त्यानां वाईट वाटलें. तथापि ती सती जाणार यामुळें हर्षही जाहला, कारण असह्य वेदन जें वैधव्य त्याचा त्याग करून ती स्वर्ग लोकांस पतिकडे जाण्यास राजी झाली.

भिक्षुक ब्राह्मण जमल्यावर काशीबाई सुस्नात होऊन व पितांबर नेसून आणि अंगावर अलंकार धारण करून, तसेंच मळवट भरून, गुरुजनाचे आज्ञेनें व लहान मुलांबाळांस भेटल्यावर सर्वांचा निरोप घेऊन वाजत गाजत किल्यांतून समुद्र कांठावर येऊन सती जाण्याकारितां निघाली. तेव्हांचा समारंभ काय पहावयाचा ? माणसें ह्मणजे मुंग्यासारखी दाटी. जिकडे पहावें तिकडे पुरुष व बायका. ज्याच्या त्यांच्या तोंडांत ' काशीबाई निरंतर पतिसुखाप्रद पावो ' असे आशीरुक्तीचे उद्गार. शिंगाडे शिंगें फुंकूंलागले, वाजंत्री, सनई वगैरे वाजवूंलागले, चौघडे नगारे वगैरे झडूं लागले, असा चोंहीकडे एकच गजर होऊन ज्या स्थानामध्यें कांहीं तासापूर्वी पूर्ण औदासिन्य वसत होतें त्या स्थानीं आनंदीआनंद झाला. हें इतर जनास लागूं. परंतु काशीबाईची, सासु, भावजी, मुलगा, पुतण्या, जाऊ, इत्यादि जे आप्त बरोबर समुद्र कांठीं आले होते, त्यांस जरी ती पतिकडे चालली त्यामुळें सुख वाटलें, तरि निकट संबंधाचा छेद करून सर्वांस ती मुकणार यामुळें त्यांचें मनांत शतपट अधिक दुःख झालें. ब्राह्मणांनीं मंत्रोक्त विधीनीं अग्निकुंड सिद्ध केलें, आणि काशीबाईस अन्वारोहण करावयास बोलविलें. तेव्हां तिचा व तिचे नातलगांचा थोडाच संवाद झाला पण तो हृदयभेदक होता.

**नाना.**–( आईचे गळ्यांत मिठी मारून ) आई !

अण्णांनीं जन्मापासून मजवर जरी कमी प्रेम ठेवलें तरी तूं जवळ होतीस ह्मणून मला कांहीं एक वाटलें नाहीं. कसें तरी आनंदांत दिवस घालविले. अहाहा ! काय तुझें मजवर प्रेम ! कधीं मला टाकून तूं घास देखील गिळला नाहींस! आई ! तूं अण्णाकडे नको ग जाऊस. मी खचित् तुझ्या आज्ञेंत वागेन. बाळपणींच मी पितृसुखास मुकलों. ईश्वराची मर्जी. तेथें उपाय नाहीं. पण तूं जाणून बुजून मला एकट्याला सोडून चाललीस तेव्हां ह्मणावें तरी काय ? आई अशी माया पातळ करूं नकोग. माझ्याकडे बघ. मी बोलतों तसें वागेन कीं नाहीं हें आजपर्यंत माझें वर्तनावरून तुला दिसून आलें आहेच तर आई ! माझी मुखचर्या पुर्ती पहा. मी नाहीं जा तुला जाऊं देणार. आई माझे कौतुक ग कोण पूरवील. मला 'बाळ्यारे ! ए नान्या' असें लाडानें आतां कोण ह्मणेल. नको निष्टुर होऊं. एवढें ऐकच माझें. आई!

**भाऊ.**—काकी ! नाना तर मुलगाच आहे. पण मी पुतण्या असतां मला त्यापेक्षांही जास्त ममतेनें तूं वागविलेस आणि आतां कशी टाकून चाललीस काकी ! तूंच सांग बरें, कधीं मी आईशीं दोन घटका नीट बसून ह्मणजे बोललोय कां किंवा अप्पापाशीं तरी ? माझा सारा वेळ नानाबरोबर खेळण्यांत जात असे. काकी ! आतां तूं गेल्यावर मला कोण 'भावड्या' ह्मणून गोड नांवानें व प्रीतीनें हाका मारील व गोंजारील ?

**काशी.**—बाळांनों ! तुम्ही सुखानें नांदा. तुम्हाला सास्वी, भावजी व काकू उत्तम रीतीनें संभाळतील. तुम्ही बिलकूल काळजी करूं नका. ते आम्हापेक्षां जास्त प्रीति करतील. बाळानों ! मी राहिलें असतेंरे ! पण आतां मना-

चा संकल्प झाला. तेव्हां नाइलाज आहे. ( त्यानां जवळ घेऊन डोळे पुसते व समजावते ) उगा. हं नानां ! हें काय ( नानास मुर्च्छा येत ) भावजी ! हें बरेंच झालें; आटपून घेऊं द्या लवकर. नाहीं तर तो मला जाऊं द्यायचा नाहीं.

**सासू.**—मुली ! सगळ्यां कामांत ऐकलंस आणि एव-ढ्याच कामीं येथून तेथून साऱ्याचं मन मोडतीस नां ? अग त्या नानाकडे बघ अझून तरी ऐक.

**काशी.**—( पाया पडते ) सास्त्री आतां नका रागावूं. द्याच मला आज्ञा.

**आप्पा.**—वयनी ! बरें नाहींच ऐकणं तर मर्जी तुमची. तुह्मी अण्णाजवळ जातां हें चांगलेंच आहे.

**गांवांतील एक स्त्री.**—( मोठ्यानें गळा काढून ) अरेरे भाग्य लक्ष्मी साक्षात् चालली नां ? अशी गुणवती व ला-वण्यवती आजपर्यंत निपजली नसेल. अहा हा ! काय रूप !! काय लावण्य !! काय अंगावरील कांती ? तरी पतिविरह शोकानें अगदीं शुष्क झालेली आहे बरें ? अझून तारुण्य मी ह्मणतें आहे !! पण हें सर्व आज नाश पावणार नां ? काय क्रूर लोकतरी ? ती जिवावर उदार झाली हें नवल खरें. पण आश्चर्य हें कीं लोक कसें ऐकतात. बाळासाहेबासारखा मुलगा विनवितोय, पण छे ! ती कोठें ऐकतेय. जाणार. ईश्वरा ! तिला जगण्याची बुद्धि दे. आणि बळी पाहिजे असलाच तर आमची लाखोली कां रे मोजीनास ? राहून न राहून सारख्याच अशा आमच्यासारख्या कर्म हीन स्त्रियांस कां जाळून भस्म करीनास ? या सतीला सती जाऊं देऊंनको. अरे कोणी त्या विस्त्यावर पाणी कां ओतानां ?

असें ह्मणून ती बाई धांवत जाऊन विस्त्यावर घागरींतील पाणी ओतूं लागली. या बाईस दरडावलें तरि ती ऐकेना. तेव्हां लोकांनीं घागर हिसकून घेऊन तिला ओढून बाजूस नेलें.

नंतर ब्राह्मणांनीं काशीबाईस चितेजवळ बोलावून नेलें व त्यापैकीं एकजण ह्मणाला. "स्त्रियांनीं अन्वारोहण केलें असतां त्यांचें व त्यांच्या भर्त्याचें पाप नाहींसें होतें. व त्या नरकांत पडत नाहींत! उलट त्यांस स्वर्गलोक प्राप्त होतो, मुक्ति मिळते. किंबहुना जन्मांतर झालेंच तर सौभाग्यधनपुत्रादिकांची त्यांपाशीं समृद्धि होते; फारकाय, अनुगमन केल्यानें मातृकुल, पितृकुल व भर्तृकुल या तिन्हींचें पावन होतें. इतकेंच नाहीं. साडेतीन कोटी जे मनुष्यमात्रावर लोम ( केश ) असतात तितकीं वर्षे ती पतीसह स्वर्गलोकीं राहते." नंतर सर्वांच्या संमतीनें विधीचा प्रारंभ होतो.

काशीबाईनें उदक सोडल्यानंतर वाद्यें वाजूं लागलीं. आणि तिच्या सभोंवतीं सुवासिनी बायकांच्या झुंडीच्याझुंडी आल्या. तिनें तितक्यांस हळदकुंकु दिलें, वायनें वाटलीं, ओट्या भरल्या, खण दिले, आणि विडे देऊन अमूप दाक्षिणाही दिली. या प्रमाणें कडाक्यानें दानसमारंभ झाल्यानंतर तिनें सर्वांस मोठ्या विनयानें नमस्कार केले व अग्नींत प्रवेश करण्याची त्यांची परवानगी घेतली. सुवासिनींनीं काशीबाईस देवता समजून साष्टांग प्रणिपात घातले. मग ती साध्वी अग्नी सन्नीध जाऊन बसली. आणि तिनें भर्त्याच्या पादुका उरःस्थळीं गच्च धरल्या आणि हुंदका आल्यामुळें एकदा मुलाकडे पाहून तोंड हिरमुसलें केलें. तों आप्तवर्गाचा हांकामारण्याचा तडाका सुरू झाला, परंतु हुकुमाप्रमाणें

वाद्यांचा कडाका चालू असल्यानें तो तीस ऐकूं गला नाहीं. आणि पुन्हां एकदा मुलाकडे पाहून व " जातें " ह्मणून मानेनें खूण करून जी वळली ती थेट अग्नीकडे पाहूं लागली आणि पतिनामाचा मनीं निजध्यास घेऊन व अंतःकरण कठोर करून त्या रचिलेल्या विभावसूचे कुंडांत तिनें उडी घातली. काय ती वेळ ! इकडे भट भिक्षुक " इमानारीर विधवा " इत्यादि वेदोक्त ऋचा पठण करूं लागले. वाद्यें जोरानें झडूं लागलीं, लोक आनंदानें टिऱ्या पिटूं लागले, आप्तांनीं तर रडण्याचा कल्लोळ उडवून दिला. चोंहीकडे एकच गर्दी झाली. अशारीतीचा विधी होऊन काशीबाई अग्निकाष्ट भक्षण करून स्वर्गलोकीं पतीकडे अक्षय्य सुख भोगण्यास गेली. व नंतर लोक आपापले घरीं गेले.

**वाचकहो, ध्यानांत ठेवा.**—उदार, गुणसंपन्न, देशाभिमानी, वीर व योद्धा, असा हा नरपुंगव, अवतारी पुरुष—पहिला बाजीराव—सन् १७४० किंवा शके १६६२ सालीं या भूतलांतून नाहींसा झाला. त्या सत्पुरुषाचें आयुष्य या ऐतिहासिक कादंबरींत ग्रंथित करून यथामति समर्पिलें आहे; निरक्षीर न्यायानें ग्रहणकरा.

ग्रंथकर्त्ता.

Scan-27/11/17

समाप्त.